# वसई विरार महानगर पालिका

# लेखा परीक्षण अहवाल

# 2015-2016

उपसंचालक, महानगरपालिका लेखा लेखापरीक्षा, उपविभाग - 2, स्थानिक निधी
लेखापरीक्षा कार्यालय, नवी मुंबई
रायगड भवन, 7 वा मजला, सेक्टर 11, सीबीडी बेलापुर

# <u>अस्वीकृती प्रमाणपत्र</u>

1. सदर लेखापरीक्षण अहवालात नोंदविलेले आक्षेप हे वसई विरार महानगर पालिका यांनी 2015-2016 या वर्षी साठी लेखापरीक्षणास सादर केलेल्या अभिलेखे व माहितीच्या आधारे नोंदविण्यात आलेले आहेत.

2. जी माहिती /अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून देण्यात आली नाही त्या संबंधातील अनियमितता /अपहार/अफरातफरीस लेखापरीक्षक जबाबदार राहणार नाहीत.

# वसई-विरार महानगरपालिका
## वित्तीय वर्ष 2015-2016 चा लेखापरीक्षण अहवाल

जा.क्र.स्था/18/ब/वसई-विरार मनपा/ले.प./2015-16/ दिनांक :

सह संचालक(मनपालेप)
स्थानिक निधी लेखापरीक्षा
7 वा मजला, रायगड भवन,
नवी मुंबई

प्रति,

मा.आयुक्त,
वसई-विरार महानगरपालिका
विरार.

वसई-विरार महानगरपालिकेच्या आर्थिक वर्ष 2015-2016 या वर्षाचे लेखापरीक्षण श्री. प्र.रा. सावंत, सहाय्यक संचालक, पथकाव्दारे दिनांक 05.12.2018 ते दिनांक 08.07.2019 या कालावधीत पूर्ण केले. प्रारुप अहवालाचे श्री. नितिन पाठक, उप संचालक (मनपालेप), उप विभाग - 2, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई यांनी पुनर्विलोकन केले. सदर प्रारुप अहवालाचे श्री. नितिन पाठक, उपसंचालक (मनपालेप), स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी दिनांक 14/01/2020 रोजी आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका यांचे समवेत चर्चा करुन अंतिमीकरण केले. लेखापरीक्षण कालावधीमध्ये खालील पदाधिकारी व अधिकारी वसई-विरार महानगरपालिकेचे कामकाज पाहात होते.

| **महापौर** | |
|---|---|
| **श्री. नारायण लखु मानकर** | **दिनांक 01.04.2015 ते दिनांक 28.06.2015** |
| **श्रीम. प्रविणा हितेद्र ठाकूर** | **दिनांक 29.06.2015 ते दिनांक 31.03.2016** |
| **आयुक्त** | |
| **श्री. गोविंद जमेला राठोड** | **दिनांक 01.04.2015 ते दिनांक 30.09.2015** |
| **श्री. सतिश महादेव लोखंडे** | **दिनांक 01.10.2015 ते दिनांक 31.03.2016** |

# अनुक्रमणिका


विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण ........ 1

**I PART I : भाग १ ........ 2**

मागील लेखा परीक्षण अहवाल ........ 2

**PART II ........ 6**

**कलम ९ अ खालील आक्षेप ........ 7**

1 वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पावरील भाष्य. ........ 8

2 वसई विरार शहर महानगरपालिका दिनांक ३१/०३/२०१६ रोजी असलेल्या मत्ता व दायित्वावरील भाष्य. ........ 13

3 प्रभाग समिती "ब" पेल्हार क्षेत्रातील नवजीवन शांतीनगर येथे मफतलाल कंपाऊड ते मुख्य नाल्यापर्यत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे. ........ 16

4 मुख्य कार्यालय इमारतीकरीता 200 के.वी.ए. डिझेल जेनित्रा करिता केबल व्यवस्था करणे. ........ 18

5 आमदाराचा स्थानिक विकास कार्यक्रम -13-14 वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.12 मध्ये विरार (प) म्यागर्नस मोटार समोर नारंगी बायपास रस्ता आग्रीकट्टा चौक समोर नवीन हायमस्ट दिवे फिटींग करणे बाबत. ........ 20

6 विरार (प.) प्रभाग क्र.22 मध्ये विराट नगर येथे व्दारकेश प्लाझा ते शाम प्लाझा पर्यत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे. ........ 22

7 विरार (प.) नागोरी डेअरी ते सरस्वती विदयामंदिर पर्यतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे. ........ 24

8 मा.आमदार श्री. क्षितिज ठाकूर यांच्या स्थानिक विकास कार्यक्रम सन 2014-15 अंतर्गत विरार (पू.) प्रभाग क्रं. 5 नारिंगी मध्ये एकविरा मंदिरालगत असलेल्या उदयानाचा विकास करणे. ........ 27

9 प्रभाग क्रं. 23 मध्ये विरार (प) विराट नगर खैना अपार्टमेंट जवळ उदयानाचा विकास करणे. ........ 30

10 महापालिकेच्या अधिकारी/कर्मचारी व ठेकेदारांकडे असलेल्या प्रलंबित अग्रिम रकमेबाबत.. ........ 32

**कलम ९ ब खालील आक्षेप ........ 36**

11 विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांची अधिसूचना दिनांक ०४/०४/२०१२ नुसार अनोंदणीकृत कंत्राटदाराकडून वसूल करावयाच्या रकमेबाबत. ........ 37

12 वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ब कार्यक्षेत्रातील पूर्व शिर्डी नगर येथे चंद्रेश हिल्स अंतर्गत १,२,३ येथे पेव्हर ब्लॉक बसविणे. ........ 39

13 वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती क कार्यक्षेत्रातील नालासोपारा पूर्व, प्रभाग क्रमांक २४ मधील कंठ्ज्योती अपार्टमेंट ते सनफ्लॉवर अपार्टमेंट पर्यत खडीकरण व डांबरीकरण करणे. ........ 41

14 वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती ड, वार्ड क्रमांक ६० मधील रेंज ऑफिस येथील जोन्सन मोटर्स ते अंबोजी इंडस्ट्रीयल इस्टेटपर्यंतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. ........ 45

15 वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती “क” अंतर्गत नालासोपारा (प.) येथील मदर मेरी रोड ( श्रीप्रस्ता निळेगाव रेल्वे कार शेड रोड) येथे आर.सी.सी. कल्व्हर्ट बांधणे. ....47

16 वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मनुभाई निदान केंद्राच्या ठिकाणी बहुउद्देशीय इमारत बांधणे. 50

17 वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ई कार्यक्षेत्रातील वार्ड क्रमांक. ८२ मधील रवी जाधव चौक ते अधिश्री बंगल्यापर्यंत गटारावर स्ल्याब टाकणे. ....53

18 वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत विरार (प) मंगलमूर्ती अपार्टमेंटच्या समोरील मार्केटसाठी शेडचे बांधकाम करणे. ....55

19 महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोथान महाअभियान कार्यक्रमांतर्गत वसई विरार महानगरपालिकेसाठी वाढीव १०० द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेची (सूर्या) टप्पा -३ पाणी, पुरवठा योजना. ....57

20 वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती - ब, पेल्हार क्षेत्रातील साईनाथनगर ते तुनसी नगर पर्यंतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे ....61

21 वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नवघर माणिकपूर प्रभाग समितीमधील दिवाणमान-७ येथील पश्चिम रेल्वेच्या एकूण १३ इमारतीवर आकारण्यात आलेला कर थकीत असल्याबाबत. ....63

**कलम ९ क खालील आक्षेप ....66**

**------------------- निरंक ------------------- ....67**

**कलम ९ ड खालील आक्षेप ....69**

22 चंदनसार दैनंदिन घाऊक बाजार कर वसुल करणे याबाबतचा ठेक्यातील अनियमितता. ....70

23 एकाकी ज्येष्ठ निराधार वय वर्ष 65 वरील महीलेच्या उपजिविकेकरिता मासिक अर्थसहाय्य देणे बाबत. ....72

24 महापालिकेने उपलब्ध केलेल्या अंदाजे तीन लक्ष रोपांचे महापालिका निर्देश देईल त्या ठिकाणी वृक्षरोपण करुन तीन वर्षापर्यत संगोपन करणे कामातील अनियमितता. ....73

25 प्रभाग क्र.19 मधील सुर्यकिरण अपार्ट शेजारील महानगरपालिका उद्यान विकसित करणे (आमदार फंडा अंतर्गत सन 2014-15) ....76

26 वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील महिला, बालके, पुरुष नागरीकांना डायलेसिस उपचार घेत असलेल्या/घेणाऱ्या रुग्णांना अर्थसहाय्य देणे बाबतच्या योजनेतील अनियमितता. ....78

27 वसई विरार शहर महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण विभागा अंतर्गत आर्थिक दृष्टया दुर्बल मुली व महिलांचे जिवनमान उंचावण्यासाठी विविध व्यावसायिक प्रशिक्षण देण्यामधील अनियमितता. ....79

28 महिला व बाल कल्याण विभागामार्फत महापालिका हद्दीतील सर्व स्थानिक शाळेत (इंग्रजी, माध्यम वगळुन) शिकणाऱ्या विद्यांर्थ्याना राज्यमार्ग परिवहन मंडळाच्या धर्तीवर महापालिकेच्या परिवहन सेवेचा वार्षिक मोफत पास योजना राबविणे मधील अनियमितता. ....83

29 वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये वृक्षगणना करणे. ....84

30 प्रभाग क्र.23 विरार (प) विराट नगर खैना अपार्ट. जवळील उद्यानाचा विकास करणे. ....86

31 सन 2015-16 या कालावधीत मंजुर करण्यात आलेल्या विकास प्रस्तावा मधील अनियमिततां बाबत. 88
32 प्रभाग समिती "ड" मधील रस्त्यांवर थर्माप्लास्टरचे पट्टे मारणे......89
33 प्रभाग समिती "ब" पेल्हार क्षेत्रातील विविध रस्त्यांवर लेनपार्क करणे, झेब्रा क्रॉसींग मारणे व स्थळ दर्शक फलक लावणे......91
34 प्रभाग समिती "ड" मधील वार्ड नं.64 मध्ये गोखिवरे येथील मधुबन टाऊनशिप येथे रस्त्याच्या दुतर्फा पाईप गटार बांधणे......92
35 सनसिटी गासरोड तुळजाभवानी मंदिरा समोरील नवीन उद्यानात आकर्षक गार्डन पोल उभारणे. ......95
36 प्रभाग समिती “क” नालासोपारा (प.) फनफिएस्टा थेअटरच्या मागे आरसीसी नाला बांधणे. ......97
37 प्रभाग समिती कार्यालय वालीव अतंर्गत अर्जदार श्री. चंदर बी. सजनानी यांच्या मालमत्ता कर आकारणी बाबत. 100
38 नालासोपारा प्रभाग समिती क्षेत्रातील मालमत्ता कर आकारणी मधील नुकसानी बाबत. ......101
39 वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य पुरवठा करणे बाबत. ......103
40 आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत बोट व बोटीवरील मच्छीमारांना लाईफ जॅकेट, लाईफ बॉय प्रथोमोपचार पेटी व साहित्य पुरविणे बाबत. ......107
41 वसई विरार शहर महानगरपालिका सेवेत असलेल्या लिपीक टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तकातील अनियमिततां बाबत......109
42 वसई विरार शहर महानगरपालिका सेवेत असलेल्या आस्थापनेवरील अधिकारी/ कर्मचारी विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या नोंदीबाबत......111
43 वसई विरार शहर महानगरपालिकेत विविध विभागात कामे करण्यासाठी ठेका पद्धती वर भरण्यात आलेल्या विविध संवर्गातील भरतीमधील अनियमितता......113
44 मंजूर आकृतीबंधानुसार पदे न भरल्यामुळे प्रशासकीय व विकास कामावर होणा-या परीणामाबाबत......119
45 वाहन विभागात मुदतबाहय झालेल्या कालावधीची देयके नियमबाहय पध्दतीने प्रदान केल्याबाबत ......120
46 नगर रचना विभागाने स्वतंत्र विकास निधी स्थापन न करणे,तसेच त्या अनुषंगाने प्राप्त होणा-या विकास शुल्काची रक्कम बँकेत स्वतंत्ररित्या न ठेवल्यामुळे झालेल्या अनियमिततेबाबत... ......121
47 नगररचना विभागाने कार्यक्षेत्रातील दुरसंचार सेवा पुरवठादाराकडून मोबाईल टॉवर उभारणी व अनुषंगिक बाबी वर सुरक्षा ठेव, प्रिमियम व प्रशासकीय शुल्क इ. अनुषंगिक शुल्काची आकारणी न करुन वसुली न केल्याबाबत......122
48 प्र.स. “ड” कार्यक्षेत्रातील वार्ड नं. 79 मध्ये कामण पिराचा तलावातील गाळ काढणे व रस्त्याच्या बाजुला संरक्षक भिंत बांधणे. ......124
49 प्र.स. “ई” कार्यक्षेत्रातील वार्ड नं. 80 रोझनगर ते नायगांव फलाय ओव्हर पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. 126
50 प्र.स. “ड” कार्यक्षेत्रातील वार्ड नं. 78 मध्ये डॉन बास्को शाळा ते रश्मी सिटी पर्यंत पाईप गटार बांधणे. ......128

51 प्र.स. “ड” कार्यक्षेत्रातील वार्ड नं. 78 मध्ये जुचंद्र येथे जगन्नाथ चाळ ते गुप्ता चाळीपर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. ....130
52 प्र.स. “ब” पेल्हार क्षेत्रातील नालासोपारा पूर्व येथील पाच आंबा मुख्य रस्ता येथे साई सदन अपार्टमेंट ते राज अपार्टमेंट पर्यंत गटाराची उंची वाढवून त्यावर चेकर्ड टाईल्स व स्टोन बसविणे. ....133
53 प्र.स. “क” नालासोपारा (प ) वार्ड क्रं. 35 मधील पढई दामोदर म्हात्रे ते घोसाळी पर्यंत गटाराचे बांधकाम करणे. 135
54 प्र.स. “क” नालासोपारा (प ) वार्ड क्रं. 52 मधील वाघोळी मधील शनिमंदीर ते अस्तित्वात असलेल्या गटारापर्यंत आर.आर.सी. पाईप गटार बांधणे..... ....137
55 प्रभाग समिती “ड” मधील कामण येथील दलित वस्ती योजनेतील विहीरीवर 10 एच.पी.सबमर्सीबल पंप आणि ऑटोमेटीक पॅनलबोर्ड यंत्रणा पुरविणे व बसविणे. ....140
56 वसई विरार उपप्रादेशिक पाणीपुरवठा योजना (सुर्या उदभव) टप्पा क्रं. 1 अंतर्गत धुकटन येथे कर्मचारी निवासस्थान रंगरंगोटी करणे तसेच जलशुध्दीकरण केंद्रात किरकोळ कामे करणे. ....141
57 वसई विरार उपप्रादेशिक पाणीपुरवठा योजना सुर्या योजना टप्पा क्रं. 1 अंतर्गत धुकटन येथील जलशुध्दीकरण केंद्राच्या कंपाऊंड वॉलची ऊंची वाढविणे. ....143
58 वीजशुल्क भरण्यापासून सूट असलेल्या देयकाची रक्कम अदा केल्याबाबत... ....145
59 नालासोपारा प्रभाग समिती (क) पाणीपुरवठा विभागात समेळपाडा चाणक्य नगरी पंपीग मशनरी करीता 125 के.व्ही.ए. क्षमतेची जनरेटर पुरविणे,बसविणे व जनरेटरसाठी पत्रा शेड करणे. ....146
60 वसई विरार शहर महानगरपालिका सन 2013-14 या वित्तीय वर्षात प्रभाग समिती क´ पाणी पुरवठा विभागाअंतर्गत येणा-या क्षेत्रात आवश्यकतेनुसार विविध व्यासाच्या जलवाहिन्या अंथरणे. ....148
61 प्रभाग समिती ´ड´ अंतर्गत नवघर माणिकपुर शहरातील संतुलन टाकी (एम.बी.आर) दिवाणमाण ते मुख्य अंबाडी रोड 100 फुटी रोड जंक्शन पर्यंत 610 मि.मी. व्यासाची मृदु पोलादी (एम.एस.) जलवाहिनी पुरविणे, अंथरणे व जोडणे. 151
62 जलउपकरावर मिळणारी सूट न घेतल्यामुळे महापालिकेस होत असलेल्या नुकसानीबाबत......... ....153
63 वसई विरार शहर महानगरपालिका सन 2013-14 या वित्तीय वर्षात प्रभाग समिती “अ” पाणी पुरवठा विभागाअंतर्गत येणा-या क्षेत्रात आवश्यकतेनुसार विविध व्यासाच्या जलवाहिन्या अंथरणे. ....154
64 वॉर्ड क्र.55 मध्ये नवीन उद्यानात ऑक्टोगोनोल पोल उभारणे. ....156
65 प्रभाग समिती ‘ब’ पेल्हार अतंर्गत येणाऱ्या विविध प्रभागा मध्ये असुरक्षीत विदयुत पोल सुरक्षित करणे बाबत. 158
66 प्रभाग समिती “ड” कार्यक्षेत्रातील राजप्रभा मिनाक्षी ते एलकॉन पर्यत 22 केव्हीए रिकेय फिडर एच.टी.लाईन पोल स्थलांतर करणे. ....159
67 वसई विरार शहर महापालिका क्षेत्रातील प्रभागामधील मालमत्ता वर जुन्या दराने आकारणी करण्यात आल्याने मोठया प्रमाणावर मालमत्ता कर निर्धारणा मधील नुकसानी बाबत. ....160
68 नालासोपारा विभागातील मालमत्ता धारकांना कमी कर आकारणे बाबत. ....162

69 नवघर माणिकपुर विभागातील मालमत्ता धारकांना कमी मालमत्ता कर आकारणी बाबत. ........................165
70 पेल्हार विभागातील मालमत्ता धारकांना कमी कर आकारणे बाबत. ........................................................166
71 पाणीपट्टी वसुलीच्या थकीत रकमेबाबत.....................................................................................................168
72 अग्निशमन विभागाने स्वतंत्ररित्या " आग सुरक्षा निधी " स्थापन न करणे याबाबत.... ..............................169
73 अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागाने आवश्यक अभिलेख न ठेवल्याबाबत..........................................170
74 वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील मोकळया जागा व मोबाईल टॉवर यावर मालमत्ता कराची आकारणी करुन वसुल न केल्यामुळे महापालिकेस मोठया प्रमाणावरील उत्पन्नापासून वंचित राहावे लागत असल्याबाबत............................................................................................................................................172
75 मालमत्ता कराच्या वसुलीबाबत..................................................................................................................173
76 सन 2015-16 मध्ये महापालिकेने केलेल्या गुंतवणूकीबाबत. .....................................................................174
77 महापालिकेच्या विविध बँक खात्यांचा रोख पुस्तकांशी ताळमेळ न घेतल्याबाबत.......................................176
78 उपर्जित द्विनोंद पध्दतीने लेखे न ठेवल्याबाबत... ......................................................................................179
79 घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत नेमण्यात आलेल्या कंत्राटदाराकडुन करण्यात आलेल्या कामाचे देयके प्रदान करतांना करारनाम्यातील अटी व शर्तीचे पालन न करताच देयके अदा केले बाबत. ................................................179
80 वसई विरार शहर महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागातील कर निर्धारण प्रकरणातील कमी वसुली बाबत. ...................................................................................................................................182
81 भाडे तत्वावर यंत्रसामुग्री पुरविण्यांत आलेल्या देयकांचे प्रदानामधील अनियमितता. ..................................183
82 जाहिरात प्रसिध्दीसाठी घेण्यात आलेल्या परिवहन बसेस व बसथांबे यांच्या भाडयाची रक्कम अदा करण्यामधील अनियमितता. .......................................................................................................................186
83 राज्य शासनाच्या पोलीस विभागाकडून रु. 9.09 लक्ष इतक्या मालमत्ता कराची वसूली न केल्याबाबत. ....188
84 प्रजनन व बालआरोग्य योजना तसेच राष्ट्रीय शहरी आरोग्य योजनेअंतर्गत प्राप्त अनुदानाचा वापर न केल्याबाबत.........................................................................................................................................189
85 सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमा अंतर्गत प्राप्त् अनुदानाचा वापर न केल्याबाबत.....................190
86 नवघर माणिकपुर विभागीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तकातील त्रुटीबाबत...................................191
87 वसई विरार शहर महापालिका अंतर्गत कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधी लेखे ठेवण्याबाबत. ..........................................................................................................................................193
88 परिवहन उपक्रम या नावाने शहर बस वाहतुक BUY,OWN,OPERATE,MAINTAIN (BOOM) तत्वावर चालवण्यासाठी देण्यात आलेल्या कंत्राटातील अनियमितता. .......................................................................194
89 शासनाच्या विविध योजनेअंतर्गत प्राप्त अनुदानाचा वापर न केल्याबाबत..................................................197
90 कंत्राटदारांकडून वसुल करण्यात आलेली गौण खनिज स्वामित्व धनाची रु.108.25 लक्ष इतकी रक्कम शासन खाती जमा न केल्याबाबत. ........................................................................................................................198
लेखा परीक्षकनिहाय परिच्छेदांचे विवरणपत्र ...........................................................................................201
**विवरणपत्रे व जोडपत्रे.........................................................................................................................202**

## *विभागनिहाय परिच्छेदांचे विवरण*

| विभाग | ९अ | ९ब | ९क | ९ड |
|---|---|---|---|---|
| इतर | 3, 4, 5, 6, 7, 8, 9, 10 | | | 22, 23, 24, 25, 26, 27, 28, 29, 30, 31, 32, 33, 34, 35, 36, 37, 38, 39, 40, 41, 42, 43, 44, 45, 46, 47, 48, 49, 50, 51, 52, 53, 54, 55, 56, 57, 58, 59, 60, 61, 62, 63, 64, 65, 66, 67, 68, 69, 70, 71, 72, 73, 74, 75, 76, 77, 78, 79, 80, 81, 82, 83, 84, 85, 86, 87, 88, 89, 90 |
| शहर अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम | | 11, 12, 13, 14, 15, 16, 17, 18, 19, 20 | | |
| कर निर्धारण व संकलन | | 21 | | |
| वैद्यकीय महाविद्यालय | 1, 2 | | | |

# I Part I : भाग १

## *मागील लेखा परीक्षण अहवाल*

13 व्या वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार राज्यातील सर्व महानगरपालिकांचे व त्यांच्या अंतर्गत असलेल्या उपक्रमांचे वैधानिक लेखापरिक्षण वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र . स्थानिले 1010/प्र.क्र.26 ब/विमा प्रशा . दिनांक 31/03/2011 अन्वये संचालक , स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, नवी मुंबई यांचेकडे सोपविण्यात आले आहे . त्यानुसार 2011-12 लेखापरिक्षण सुरु करण्यात आले आहे . वसई विरार शहर महानगरपालिकेचे मागील लेखापरिक्षण अहवालातील प्रलंबित परिच्छेदांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

लेखापरिक्षण वर्ष - 2011-12, 2012-13, 2013-14, व 2014-15

| अ.क्र. | ले.प.वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकुण | वगळलेले एकूण परिच्छेद | प्रलंबित एकूण परिच्छेद **(4-5)** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | 2011-2012 | 1 ते 105 | 105 | 33 | 72 |
| 2 | 2012-2013 | 1 ते 150 | 150 | 44 | 106 |
| 3 | 2013-2014 ते 2014-2015 | 1 ते 132 | 132 | 56 | 76 |

**2013-2014 ते 2014-2015 या वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेद . ( चालू लेखापरिक्षणाचे मागील वित्तीय वर्ष)**

| परिच्छेद क्रमांक | शिर्षक |
|---|---|
| 01 | 2013-14 व 2014-15 वित्तीय वर्षाअखेर महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीबाबत |
| 03 | दूरसंचार सुविधांच्या कामासाठी उपकरणांचे व बेसस्टेशन यांच्या उभारणीसाठी (मोबाईल टॉवर व अनुषंगिक बाबी) परवानगी देणे व मालमत्ता कराची आकारणी करणे बाबत. |
| 04 | विकास आराखडयाची अंमलबजावणी व आरक्षित जागा संपादनाबाबत. |
| 05 | केंद्र शासनाचे सॅट लाईट सिटींना पायभुत सुविधा निर्माण करणे अंतर्गत घनकचरा, व्यवस्थापन कामी वाहन खरेदी करण्याबाबत. |
| 06 | केंद्र शासनाचे सॅट लाईट सिटींना पायभुत सुविधा निर्माण करणे अंतर्गत घनकचरा, व्यवस्थापन कामी वाहन खरेदी करण्याबाबत. |
| 07 | परिवहन सेवा कामी प्रकल्प सल्लागाराची नेमणुक विना निविदा करणेबाबत. |
| 08 | परिवहन सेवा कामी प्रकल्प सल्लागाराची नेमणुक विना निविदा करणेबाबत. |
| 09 | पाणी पुरवठा विस्तारीकरण करणे कामी प्रकल्प सल्लागाराची नेमणुक विना निविदा करणे बाबत. |
| 10 | नगरोत्थान अभियान कार्यक्रमांतर्गत वाढीव 100 द.ल.लि. वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजना(सुर्या) टप्पा-03 कामातील अनियमितते बाबत. |

| | |
|---|---|
| 11 | नगरोत्थान अभियान कार्यक्रमांतर्गत वाढीव 100 द.ल.लि. वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजना(सुर्या) टप्पा-03 साठी प्रकल्प सल्लागाराची नेमणुक करणे बाबत. |
| 12 | पाणीपट्टी कराचा भरणा केलेले धनादेश न वटल्यामुळे थकीत कराच्या व दंडात्मक शुल्काच्या वसुलीबाबत |
| 15 | बांधकाम विभागाने, पाणी पुरवठा विभागाने निरनिराळया कामासाठी नेमलेल्या तांत्रिक सल्लागाराच्या नियुक्ती बाबत. |
| 16 | वॉर्ड क्र.70/71 मधील माणिकपुर नाका ते चुळणा खलाटीपाडा पर्यत रस्ता डांबरीकरण करणे |
| 20 | मुल्यावर्धित कर (व्हॅट) वसुली बाबत. |
| 23 | स्थानिक संस्था कर निर्धारणात कराच्या आकारणीतील त्रुटींबाबत. |
| 27 | मालमत्ता कर आकारणीसाठी केलेल्या मालमत्ता सर्व्हेक्षण खर्चाबाबत. |
| 29 | महिला व बाल कल्याण कार्यक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना साहित्य वाटपातील अनियमिततेबाबत. |
| 30 | नवघर ड प्रभाग निष्कासनासाठी वापरलेल्या मशिनरी भाडे खर्चाबाबत. |
| 32 | नालासोपार क प्रभाग निष्कासनासाठी वापरलेल्या मशिनरी भाडे खर्चाबाबत. |
| 33 | बोळींज अ प्रभाग निष्कासनासाठी वापरलेल्या मशिनरी भाडे खर्चाबाबत. |
| 34 | पेल्हार ब निष्कासनासाठी वापरलेल्या मशिनरी भाडे खर्चाबाबत. |
| 35 | नालासोपार क निष्कासनासाठी वापरलेल्या मशिनरी व वाहन भाडे खर्चाबाबत. |
| 36 | आरसीएच विभागासाठी फर्निचर खरेदीतील अनियमिततांबाबत |
| 37 | पल्स पोलिओ लसिकरण मोहिमेसाठी आवश्यक फलेक्स बोर्ड/बॅनरचा पुरवठा करणेबाबत केलेल्या खर्चातील अनियमितता. |
| 39 | नालासोपारा प्रभागांतर्गत जाहिरात कराच्या वसुलीचे अभिलेख लेखा परिक्षणास उपलब्ध केले नसल्याबाबत |
| 40 | नवघर माणिकपुर प्रभाग समिती कार्यालय हद्दीत शालेय कला क्रिडा महोत्सव-2013 व 2014 आयोजित करण्यासाठी झालेल्या खर्चाची अभिलेख लेखा परिक्षणास उपलब्ध करण्यात आला नसल्याबाबत. |
| 41 | विरार प्रभाग समिती (अ) व (ब) कार्यालय हद्दीत शालेय विद्यार्थ्यांसाठी शालेय कला क्रिडा महोत्सव-2013 व 2014 आयोजित करण्यासाठी झालेल्या खर्चाची अभिलेख उपलब्ध केला नसल्याबाबत. |
| 42 | वसई विरार शहर मनपा नालासोपारा क प्रभाग समिती कार्यालय हद्दीत शालेय विद्यार्थ्यांसाठी शालेय कला क्रिडा महोत्सव-2013 व 2014 आयोजित करण्यासाठी झालेल्या खर्चाचा अभिलेख उपलब्ध करण्यात आला नसल्याबाबत. |
| 43 | केंद्र शासनाचे सॅटे लाईट सिटींना पायाभुत सुविधा निर्माण करणे. भुयारी गटार मलनिसा:रण, कामासाठी प्रकल्प सल्लागार नेमणुक करणे. |
| 48 | गौण खनिजावरील स्वामीत्व धनाची रक्कम (रॉयल्टी) वसुल केली नसल्या बाबत. |
| 57 | नवघर माणिकपुर “ड” प्रभागाचे मालमत्ता कर आकारणी प्रकरणात कमी कर आकारणी केलेबाबत. |
| 59 | नालासोपारा “क” प्रभागाचे मालमत्ता कर आकारणीतील अनियमितताबाबत. |
| 60 | आय प्रभागाकडे मालमत्ता कराचा भरणा केलेले धनादेश न वटल्यामुळे थकीत कराच्या व दंडात्मक शुल्कांच्या वसुलीबाबत. |

| | |
|---|---|
| 61 | पाणीपुरवठा विभागाकडुन पाणी देयकांचे प्रदान करतांना एकाच देयकाचे दुबार प्रदान केल्याबाबत |
| 62 | विरार "अ" प्रभाग पाणीपट्टी कर विभागाकडे दैनंदिन जमा रकमांच्या तपासणीत आढळुन आलेल्या अनियमिततांबाबत |
| 63 | नवघर माणिकपुर कार्यालय अंतर्गत पाणी पुरवठा विभागाकडील पंपींग मशीनरी स्वत:कडील साहित्य वापरुन देखभाल दुरुस्ती करणे कामातील अनियमितता |
| 64 | प्रभाग समिती ब पेल्हार क्षेत्रातील सिध्दी पारिजात सोसायटी ते त्रयंबक बंगल्यापर्यंत 100 मी.मी. व्यासाची जी.आय.जलवाहिनी अंथरणे टाकणे कामातील अनियमितता |
| 65 | प्रभाग समिती ब पेल्हार क्षेत्रातील संतोष भुवन पेट्रोल पंप ते सितारामनगर नाक्यापर्यंत 100 मी.मी. व्यासाची जी.आय.जलवाहिनी टाकणे कामातील अनियमितता |
| 66 | महापालिका रुग्णालये व दवाखाने यांसाठी 2013-2014 व 2014-2015 या वर्षातखरेदी केलेल्या औषधे व उपकरणे खर्चामधील अनियमिततेबाबत |
| 67 | घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अनुदानासह रस्ता, गटारे, नाले, सार्वजनिक ठिकाण स्वच्छता सफाई ठेका व भाडयाच्या वाहनाव्दारे यांत्रिक पध्दतीने नाले खोदाई करणे, औषधी फवारणी करणेबाबत(2013-14) |
| 68 | घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत अनुदानासह रस्ता, गटारे, नाले, सार्वजनिक ठिकाण स्वच्छता सफाई ठेका व भाडयाच्या वाहनाव्दारे यांत्रिक पध्दतीने नाले खोदाई करणे, औषधी फवारणी करणे बाबत(2014-15) |
| 69 | उद्यानासाठी इलेक्ट्रीक फिटींग खेळणी व म्युझीक सिस्टीम खरेदीमधील अनियमिततेबाबत. |
| 70 | 2013-14 व 2014-15 मध्ये टीसीएल पावडर व क्लोरीन सिलेंडर खरेदीमधील अनियमितता |
| 71 | महानगरपालिकेचे रुग्णालय व दवाखाने याकरीता श्वान दंशलस पुरवठा करणे याकामावरील झालेल्या खर्चाच्या अनियमिततेबाबत |
| 72 | आचोळे नागरी आरोग्य केंद्राकडील ओपीडीच्या जमा रकमांचा विलंबाने भरणा करण्याबाबत |
| 73 | वसई विरार शहर महानगापालिका परिवहन सेवा उपक्रम पी.पी.पी. तत्वावर चालविण्यांबाबत |
| 74 | प्रभाग समिती ई वसई विभागातील गिरीज तलाव लिलाव प्रकरणातील अनियमितता |
| 76 | नवघर माणिकपुर प्रभाग कार्यालयांतर्गत परवाना विभागाकडील जमा रकमांच्या तपासणीतील अनियमिततांबाबत |
| 77 | ठेका पध्दतीने घेतलेल्या वाहनांच्या भाडयावरील खर्चातील अनियमिततेबाबत |
| 80 | वसई विरार शहर मनपा प्रभाग समिती कार्यालयातील विविध कार्यालयीन कामे करणेसाठी अभिकर्त्यामार्फत विविध कंत्राटी सेवा पुरविणेच्या ठेक्याबाबत |
| 81 | वसई विरार मनपाच्या विविध प्रभागांतर्गत गाळाभाडे/जागा भुईभाडे कराच्या थकीत रकमांबाबत |
| 83 | नालासोपारा प्रभाग समिती "क" येथील कला-क्रीडा महोत्सवातील झालेल्या खर्चाच्या अनियमिततेबाबत |
| 89 | नालासोपारा प्रभाग कार्यालयाचे कामकाजातील अनियमितता |
| 90 | बोळींज प्रभाग कार्यालयाचे कामकाजाबाबत |
| 91 | केंद्र शासनाचे सॅट लाईट सिटींना पायाभुत सुविधा निर्माण करणे-भुयारी गटार मलनिसा:रण योजनेच्या कामातील अनियमितता |
| 92 | केंद्र शासनाचे सॅट लाईट सिटींना पायाभुत सुविधा निर्माण करणे-भुयारी गटार मलनिसा:रण |

| | |
|---|---|
| | योजनेच्या कामातील अनियमिततेबाबत |
| 93 | विरार (प) मार्गावरील फाटक क्र.40 च्या ठिकाणी रेल्वे उड्डाण पुलाचे बांधकाम करणे |
| 107 | जंगम मालमत्तेच्या वार्षिक पडताळणी व जंगम मालमत्ता पुस्तकातील नोंदी बाबत |
| 108 | महानगरपालिका कार्यक्षेत्रातील स्मशानभुमीसाठी जळावू लाकडे पुरविण्याचे कामाबाबत |
| 109 | विरार विभागाचे घरपट्टी व पाणीपट्टी कराचे कामकाज संगणकीय प्रणालीवर करण्यासाठी 2013-14 व 2014-15 मध्ये दिलेल्या ठेक्यातील अनियमितता |
| 110 | विरार "अ" प्रभाग घरपट्टी विभागाकडील जमा रकमांच्या तपासणीत आढळुन आलेल्या अनियमिततांबाबत |
| 111 | ग्रामीण उपविभागाकडील मालमत्ता कर थकबाकीबाबत |
| 112 | नवघर माणिकपुर "ड" प्रभागाचे मालमत्ता कर थकबाकीबाबत |
| 113 | नालासोपारा "क" प्रभागाचे मालमत्ता कर थकबाकीबाबत |
| 114 | महानगरपालिका क्षेत्रातील मोबाईल टॉवरच्या मालमत्ता कराच्या कर आकारणीबाबत |
| 115 | वसई "आय" प्रभाग घरपट्टी विभागाकडील जमा रकमांच्या तपासणीत आढळुन आलेल्या अनियमिततांबाबत |
| 116 | नालासोपारा "क" प्रभागाचे पाणीपट्टी कर वसुली व थकबाकीबाबत |
| 117 | नवघर माणिकपुर ड प्रभागाचे पाणीपट्टी नळ कनेक्शन मंजुरीबाबत |
| 118 | वसई ई प्रभागाचे पाणीपट्टी वसुली व नळ कनेक्शन मंजुरीबाबत |
| 119 | वसई "ई" प्रभागाचे पाणीपट्टी कर वसुली व थकबाकीबाबत |
| 120 | नवघर माणिकपुर "ड" प्रभागाचे पाणीपट्टी कर वसुली व थकबाकीबाबत |
| 127 | महानगरपालिकेच्या कामासाठी भाडयाने घेतलेल्या वाहनांचे भाडयावरील खर्चातील अनियमिततेबाबत |
| 128 | महानगरपालिकेची वाहने अधिकाऱ्यांना दिलेबाबत व वाहन प्रतिपूर्ती भत्ताबाबत |
| 129 | श्रीमती रेखा वर्मा, लिपीक यांच्या सेवापुस्तकातील नोंदीबाबत |
| 130 | विरार मुख्यालयातील कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकातील अनियमितताबाबत |
| 131 | पेल्हार ब प्रभाग कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकातील अनियमितताबाबत |

उपरोक्त नमुद केलेल्या परिच्छेदांच्या संदर्भात त्या त्या वर्षाच्या प्रथम पुढील अभिप्रायांमध्ये नमुद केलेले परिच्छेद क्रमांक अंतिम समजण्यात यावे.

वरील परिच्छेदांपैकी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या 2011-12 व 2012-13 वर्षाच्या पुनर्विलोकन अहवालाकरिता निवडलेल्या परिच्छेदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | ले .प .वर्ष | परिच्छेद क्रमांक | एकूण |
|---|---|---|---|
| .1 | 12-2011 | 1, 5, 31, 41, 51, 57, 62, 66, 90, 91, 105 | 11 |
| .2 | 13-2012 | 4, 28, 31, 34, 50, 52, 54, 58, 84, 87, 112, 131, 147 | 13 |

# Part II

# भाग एक

# गंभीर अनियमितता

# कलम ९ अ,ब,क खालील आक्षेप

# कलम ९ अ खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने जे प्रदान कायद्याविरुद्ध आहे असे प्रत्येक प्रदान

## *1 वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पावरील भाष्य.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**No. of Irregularities: 10**

*महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***महाराष्ट्र शासन निर्णय, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक लेखासु-१०२००४/७१/प्र.क्र.५/०४/नवि-३१ दिनांक ६ जुलै, २००५ नुसार दुहेरी नोंद लेखा पद्धतीची (Accrual Based Double Entry Accounting System) अंमलबजावणी केलेली नाही. वसई विरार शहर महानगरपालिकेचे खर्चाचे अंदाजपत्रक सरासरीपेक्षा रुपये ७१८४८.४१ लाखाने अधिक मंजूर करण्यात आले आहे. गुंतवणूक निधीची प्रारंभिक व अखेरची शिल्लक अर्थसंकल्पीय वर्षात करणे अपेक्षित असलेल्या गुंतवणुकीसोबत स्वतंत्रपणे दाखविण्यात आलेली नाही. जमेचे अर्थसंकल्पीय अंदाज आणि प्रत्यक्ष जमा यामध्ये एकूण रुपये ४७६९८.२४ लाखाची तफावत दिसुन येते. खर्चाचा अर्थसंकल्पीय अंदाज आणि प्रत्यक्ष खर्च यामध्ये एकूण रुपये ५७८५७.८९ लाखाची तफावत दिसुन येते. महिला व बालविकास कार्यक्रमा अंतर्गत एकूण रुपये २६१७.११ लाखाच्या लाभापासून लाभार्थी वंचीत राहिलेले आहेत. अपंगासाठी कल्याणकारी योजने अंतर्गत एकूण रुपये १९४५.८४ लाखाच्या लाभापासून लाभार्थी वंचीत राहिलेले आहेत. क्रीडा योजने अंतर्गत एकूण रुपये २८५५.८३ लाखाच्या लाभापासून लाभार्थी वंचीत राहिलेले आहेत. रुपये १४३०.४९ लाखाच्या लाभापासून मागासवर्गीय व दुर्बल घटकांचे लाभार्थी वंचित राहिलेले आहेत. महानगरपालिकेने विशेष निधी या सदराखाली वेतन राखीव निधी, निवृत्ती वेतन निधी, कामगार कल्याण निधी, विकास अधिभार निधी, घसारा निधी, कर्ज निवारण निधी, परिवहन निधी साठी कोणत्याही प्रकारची तरतूद केल्याचे दिसून येत नाही.***

### सन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पावरील भाष्य

**(रकमा लाखात)**

| अ.क्र | लेखाशिर्ष | सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ आणि सन २०१४-२०१५ च्या प्रत्यक्ष रकमा | सन २०१५-२०१६ ची अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०१५-२०१६ ची प्रत्यक्ष जमा / खर्च |
|---|---|---|---|---|
| | | जमा | | |

| | | 2012-2013 | 2013-2014 | 2014-2015 | 2015-2016 | 2015-2016 |
|---|---|---|---|---|---|---|
| | **सर्वसाधारण लेखा** | | | | | |
| **अ)** | नगरपालिका कर व दर | 26697.14 | 27081.24 | 29400.18 | 31511.41 | 26858.57 |
| ब) | विशेष अधिनियामाखालील वसुली | 8726.56 | 8967.34 | 5438.10 | 15355.56 | 12121.25 |
| क) | नगरपालिका मालमत्ता उपयोगिता व सेवा यांचेपासून उत्पन्न | 1129.09 | 1091.32 | 1645.89 | 2332.27 | 1927.55 |
| ड) | अनुदाने व अंशदाने | 3057.04 | 5733.47 | 5756.22 | 22627.03 | 22572.60 |
| फ) | संकीर्ण | 5190.37 | 6806.92 | 7689.67 | 8547.17 | 4582.24 |
| | **भाग १ एकूण महसुली जमा** | **44800.20** | **49680.29** | **49930.06** | **80373.44** | **68062.21** |
| | **भाग २** | | | | | |
| | भांडवली जमा | 7158.78 | 6676.22 | 10312.77 | 23626.91 | 10226.17 |
| | **भाग ३** | | | | | |
| | असाधारण ऋण व निलंबन लेखा | 10562.70 | 14963.41 | 16435.47 | 23834.94 | 9312.67 |
| | **एकूण जमा** | **62521.69** | **71319.92** | **76678.32** | **127835.29** | **87601.04** |
| | **वर्ग जमा रकमा** | 12689.35 | 34574.98 | 40622.77 | 37530.67 | 30066.68 |
| | **वर्ग जमा राकमांसह एकूण जमा** | **75211.04** | **105894.90** | **117301.09** | **165365.96** | **117667.72** |
| | **प्रारंभिक शिल्लक** | 45400.36 | 66443.36 | 54990.58 | 32986.47 | 32986.47 |
| | **जमा रकमा, वर्ग जमा रकमा व प्रारंभिक शिलकेसह एकूण जमा.** | **120611.40** | **172338.26** | **172291.67** | **198352.43** | **150654.19** |
| | | | | **खर्च** | | |
| | **सर्वसाधारण महसुली लेखा खर्च** | | | | | |
| अ) | सामान्य प्रशासन व वसुलीचा खर्च | 3623.90 | 5159.28 | 4632.04 | 7025.26 | 5051.89 |
| ब) | सार्वजनिक सुरक्षितता | 1544.39 | 2061.91 | 2225.91 | 2943.22 | 2534.59 |
| क) | आरोग्य व सोयी | 13564.31 | 16302.83 | 20161.99 | 32794.93 | 21886.32 |
| ड) | लोकशिक्षण व सामाजिक कार्यक्रम | 520.60 | 596.37 | 765.39 | 1675.36 | 551.55 |
| इ) | अनुदाने व अंशदाने | 10.24 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| फ) | संकीर्ण | 1010.33 | 1217.62 | 1688.62 | 4363.27 | 2066.34 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **<u>एकूण सर्वसाधारण महसुली खर्च</u>** | **20273.77** | **25338.01** | **29473.95** | **48802.04** | **32090.69** |
| | **<u>भाग २</u>** | | | | | |
| | भांडवली खर्च | 15355.63 | 44708.31 | 60259.17 | 59649.77 | 43510.08 |
| | **<u>भाग ३</u>** | | | | | |
| | असाधारण ऋण निलंबन लेखा | 5849.29 | 12726.38 | 8949.30 | 25334.94 | 7792.08 |
| | **<u>एकूण खर्च</u>** | **41478.69** | **82772.70** | **98682.43** | **133786.75** | **83392.85** |
| | **वर्ग खर्च रकमा** | 12688.52 | 34574.98 | 40622.77 | 37530.67 | 30066.68 |
| | **<u>वर्ग खर्च रकमांसह एकूण खर्च</u>** | **54167.21** | **117347.68** | **139305.20** | **171317.42** | **113459.53** |
| | **<u>अखेरची शिल्लक</u>** | **66444.19** | **54990.58** | **32986.47** | **27035.00** | **37194.66** |
| | **अखेर शिलकेसह एकूण खर्च** | **120611.40** | **172338.26** | **172291.67** | **198352.43** | **150654.19** |

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सन 2015-2016 च्या अर्थसंकल्पाबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र शासन निर्णय, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक लेखासु-१०२००४/७१/प्र.क्र.५/०४/नवि-३१ दिनांक ६ जुलै, २००५ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक व्यवहारात अचूकता आणि पारदर्शकता आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्व महानगरपालिका आणि नगरपरिषदांमध्ये दुहेरी नोंद लेखा पद्धती (Accrual Based Double Entry Accounting System) आमंलात आणलेली आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेने सदर शासन आदेशानुसार दुहेरी नोंद लेखा पद्धतीची (Accrual Based Double Entry Accounting System) सन २०१५-२०१६ साठी अंमलबजावणी केलेली नाही. National Municipal Accounting Manual, Chapter 31, 31.68 नुसार Financial Ratio Analysis ( Incomme Ratios, Expence Ratios, Net Income Ratios, Efficiency Ratios, Leverage Ratios, Investment Ratios, Liquidity Ratio, Assest Ratios, Performance Ratios) तयार करण्यात आलेले नाहीत.

2. खर्चाचे अंदाजपत्रक हे मागील तीन वर्षाच्या प्रत्यक्ष प्राप्त रकमांची सरासरी किंवा अर्थसंकल्पीय वर्षाच्या अंदाजित प्राप्त रकमा, यापैकी जे कमी असेल, यापेक्षा अधिक असणार नाहीत. सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ आणि सन २०१४-२०१५ मधील प्रत्यक्ष प्राप्त रकमांची सरासरी (आरंभीची शिल्लक वगळून) ९९४६९.०१ लाख एवढी आहे. तर सन २०१५-२०१६ ची अंदाजित प्राप्त रक्कम (आरंभीची शिल्लक वगळून) १६५३६५.९६ लाख एवढी आहे. सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ आणि सन २०१४-२०१५ ची प्रत्यक्ष प्राप्त रकमांची सरासरी आणि सन २०१५-२०१६ च्या अंदाजित प्राप्त रक्कमा यापैकी सन २०१२-२०१३, २०१३-२०१४ आणि सन २०१४-२०१५ ची प्रत्यक्ष प्राप्त रकमांची सरासरी कमी असल्यामुळे खर्चाचे अंदाजपत्रक तयार करतांना ते ९९४६९.०१ लाखापर्यंत सीमित करणे अभिप्रेत होते. परंतु खर्चाचे अंदाजपत्रक १७१३१७.४२ लाख, सरासरीपेक्षा रुपये ७१८४८.४१ लाखाने

अधिक मंजूर करण्यात आले आहे. सबब सन २०१५-२०१६ चा अर्थसंकल्प हा रुपये ७१८४८.४१ लाखाने अधिक दर्शविण्यात आल्याचे दिसून येते.

3. गुंतवणूक निधीची प्रारंभिक व अखेरची शिल्लक अर्थसंकल्पीय वर्षात करणे अपेक्षित असलेल्या गुंतवणुकीसोबत स्वतंत्रपणे दाखविण्यात आलेली नाही.

4. वरील अर्थसंकल्पाचे अवलोकन केल्यास असे दिसुन येते की, सन २०१५-२०१६ चा जमेचा अर्थसंकल्प आरंभीच्या शिल्लकेसह रू.. १९८३५२.४२ लाखाने मंजूर करण्यात आलेला आहे. तथापि सन २०१५-२०१६ मध्ये आरंभीच्या शिल्लकेसह प्रत्यक्ष जमा रू. १५०६५४.१९ लाख एवढी झालेली आहे. अर्थसंकल्पीय अंदाज आणि प्रत्यक्ष जमा यामध्ये एकूण रुपये ४७६९८.२४ लाखाची तफावत दिसुन येते.

5. वरील अर्थसंकल्पाचे अवलोकन केल्यास असे दिसुन येते की, सन २०१५-२०१६ चा खर्चाचा अर्थसंकल्प रू. १७१३१७.४२ लाखाने मंजूर करण्यात आलेला आहे. तथापि सन २०१५-२०१६ मध्ये प्रत्यक्ष खर्च रू. ११३४५९.५३ लाख एवढा झालेला आहे. अर्थसंकल्पीय अंदाज आणि प्रत्यक्ष खर्च यामध्ये एकूण रुपये ५७८५७.८९ लाखाची तफावत दिसुन येते.

6. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीसी-१०८१/६०५६/६४-१० दिनांक ०३/०७/१९८२, शासन निर्णय क्रमांक जीईएन-१०९३/३२५/प्र.क्र. २४ दिनांक १७/०४/१९९३ आणि शासन निर्णय, क्रमांक जीईएन-१०९३/११९८/नवि-१४ दिनांक १४/०७/१९९३ नुसार महापालिकेने महसुली उत्पन्नाच्या ५% उत्पन्न महिला व बालविकास कार्यक्रमासाठी आणि त्यासाठीच्या विविध लाभांच्या योजनांसाठी खर्च करणे अपेक्षित आहे. तसेच तशी तरतूद देखील अर्थसंकल्पात करणे अपेक्षित आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पातील तरतूद आणि प्रत्यक्ष खर्च याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| सन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पातील महसुली उत्पन्न | सन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पातील महिला व बाल विकास कार्यक्रमांतर्गत तरतूद | सन २०१५-२० १६ मधील प्रत्यक्ष महसुली उत्पन्न | सन २०१५-२०१६ मध्ये प्रत्यक्ष महसुली उत्पन्नाच्या ५% आवश्यक तरतूद | सन २०१५-२०१६ मधील प्रत्यक्ष खर्च | सन २०१४-२०१५ मध्ये कमी केलेला खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ (४-५) |
| ८०३७३.४४ | २०८०.३० | ६८०६२.२१ | ३४०३.११ | ७८६.०० | २६१७.११ |

वरील ताक्त्यानुसार सन २०१५-२०१६ मध्ये महिला व बालविकास कार्यक्रमासाठी रुपये ७८६.०० लाख एवढा खर्च करण्यात आल्याचे दिसून येते. सबब महिला व बालविकास कार्यक्रमा अंतर्गत एकूण रुपये २६१७.११ लाखाच्या लाभापासून लाभार्थी वंचीत राहिलेले आहेत. तसेच महानगरपालिकेने सन २०१५-२०१६ मध्ये केलेल्या तरतुदीच्या देखील १२९४.३० लाख कमी खर्च केलेला आहे.

7. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक जीईएन-१६५५/प्र.क्र.४६/नवि-३३ दिनांक १४/०२/२००२ नुसार महापालिकेने महसुली उत्पन्नाच्या ३% उत्पन्न अपंगासाठी कल्याणकारी योजनावर खर्च करणे अपेक्षित आहे. तसेच तशी तरतूद देखील अर्थसंकल्पात करणे अपेक्षित आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पातील तरतूद आणि प्रत्यक्ष खर्च याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(आकडे लाखात)

| सन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पातील महसुली उत्पन्न | सन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पातील अपंगासाठी कल्याणकारी योजनेवर तरतूद. | सन २०१५ -२०१६ मधील प्रत्यक्ष महसुली उत्पन्न | सन २०१५-२०१६ मध्ये प्रत्यक्ष उत्पन्नाच्या ३% आवश्यक तरतूद | सन २०१५-२०१६ मधील प्रत्यक्ष खर्च | सन २०१५-२०१६ मध्ये कमी केलेला खर्च. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६(४-५) |
| ८०३७३.४४ | १७१.५० | ६८०६२.२१ | २०४१.८७ | ९६.०३ | १९४५.८४ |

वरील ताक्त्यानुसार सन २०१५-२०१६ मध्ये अपंगासाठी कल्याणकारी योजनावर रुपये ९६.०३ लाख एवढा खर्च करण्यात आल्याचे दिसून येते. सबब अपंगासाठी कल्याणकारी योजने अंतर्गत एकूण रुपये १९४५.८४ लाखाच्या लाभापासून लाभार्थी वंचीत राहिलेले आहेत.

८. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक जीईएन-१०९८/प्र.क्र.२१/९८/नवि-२४ दिनांक ०९/०३/१९९८ नुसार महापालिकेने महसुली उत्पन्नाच्या ५% उत्पन्न क्रीडा क्षेत्रावर खर्च करणे अपेक्षित आहे. तसेच तशी तरतूद देखील अर्थसंकल्पात करणे अपेक्षित आहे. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पातील तरतूद आणि प्रत्यक्ष खर्च याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(आकडे लाखात)

| सन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पातील महसुली उत्पन्न | सन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पातील क्रीडा क्षेत्रासाठी तरतूद. | सन २०१५-२०१६ मधील प्रत्यक्ष महसुली उत्पन्न | सन २०१५-२०१६ मध्ये प्रत्यक्ष उत्पन्नाच्या ५% आवश्यक तरतूद | सन २०१५-२०१६ मधील प्रत्यक्ष खर्च | सन २०१५-२०१६ मध्ये कमी केलेला खर्च. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६(४-५) |
| ८०३७३.४४ | १०००.८१ | ६८०६२.२१ | ३४०३.११ | ५४७.२८ | २८५५.८३ |

वरील ताक्त्यानुसार सन २०१५-२०१६ मध्ये क्रीडा क्षेत्रासाठी रुपये ५४७.२८ एवढा खर्च करण्यात आलेला आहे. सबब क्रीडा योजने अंतर्गत एकूण रुपये २८५५.८३ लाखाच्या लाभापासून लाभार्थी वंचीत राहिलेले आहेत. तसेच महानगरपालिकेने सन २०१५-२०१६ साठी केलेल्या तरतुदीच्या ४५३.५३ लाख कमी खर्च केलेला आहे.

9. शासनाचे धोरणानुसार दुर्बल घटक व मागासवर्गीयांसाठी सोयी व सुविधांसाठी निव्वळ उत्पन्नाच्या ५% निधीची तरतूद करणे बंधनकारक आहे. सन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पात दुर्बल घटक व मागासवर्गीयांसाठी “पी” बजेट अंतर्गत २५१०.६७ लाखाची तरतूद करण्यात आली होती. तथापि खर्च मात्र १०८०.१८ लाख झालेला आहे. रुपये १४३०.४९ लाखाच्या लाभापासून लाभार्थी वंचित

राहिलेले आहेत.

१0. वसई विरार शहर महानगरपालिकेने सन २०१५-२०१६ च्या अर्थसंकल्पात विशेष निधी या सदराखाली वेतन राखीव निधी, निवृत्ती वेतन निधी, कामगार कल्याण निधी, विकास अधिभार निधी, घसारा निधी, कर्ज निवारण निधी, परिवहन निधी साठी कोणत्याही प्रकारची तरतूद केल्याचे दिसून येत नाही.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा (सुधारणा) अधिनियम, २०११ मधील कलम ६ (३) अन्वये अर्धसमास पत्र क्रमांक १३३ दिनांक ३०/०५/२०१९ देण्यात आले होते. अर्ध समास पत्राचे उत्तर लेखापरीक्षणास अप्राप्त असल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात आलेले आहेत.

DATPRSM7301 (Ref No : 8, Hmm No : 133)

## *2 वसई विरार शहर महानगरपालिका दिनांक ३१/०३/२०१६ रोजी असलेल्या मत्ता व दायित्वावरील भाष्य.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 05**

*महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

***महाराष्ट्र शासन निर्णय, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक लेखासु-१०२००४/७१/प्र.क्र.५/०४/नवि-३१ दिनांक ६ जुलै, २००५ नुसार मत्ता व दायित्व तयार करण्यासाठी दुहेरी नोंद लेखा पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला नाही. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या ३१/०३/२०१६ च्या मत्ते स्थावर मालमत्ता दर्शविण्यात न आल्यामुळे महानगरपालिकेच्या मत्तेची आणि महानगरपालिकेची आर्थिक स्थिती स्पष्ट होत नाही. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या मत्ते मधील रु. ११०५८.५१ लाख एवढी रक्कम येणे स्वरुपात अथवा अप्राप्त आहे. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी महानगरपालिकेने ठोस उपाय योजना करून अप्राप्त रक्कमा तत्काळ वसूल करून महानगरपालिकेच्या निधी मध्ये जमा कराव्यात. विशेष निधी या सदरा खाली दर्शविण्यात आलेल्या विविध निधीच्या रकमा या दायित्व आणि मत्ता तसेच मत्ते मधील शिल्लक रक्कमा यामध्ये देखील दर्शविण्यात आलेल्या आहेत. महानगरपालिकेची मत्ता आणि दायित्व दर्शविणारी तपशीलवार विवरणपत्रे मत्ता व दायित्व सोबत जोडण्यात आलेली नाहीत.***

**वसई विरार शहर महानगरपालिका**

**दिनांक ३१/०३/२०१६ रोजी असलेल्या मत्ता व दायित्वाचा तपशील दर्शविणारे विवरणपत्र**

(रु. लाखात)

| अ.क्र. | दायित्व बाब | | एकूण रक्कम | अ.क्र. | मत्ता बाबी | | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **ठेवी** | | | १. | **शिल्लक रकमा** | | |
| अ) | सर्वसाधारण | १३६२५.९१ | | अ) | बँकेतील व पोष्टातील शिल्लक | २७५७५.२८ | |
| ब) | वाचनालय | ७.६० | १३६३३.५१ | ब) | गुंतवणुका | ९५५४.६७ | |
| | | | | ड) | रोख हाती | २४२.८८ | ३७३७२.८३ |
| २. | **फेडावयाची कर्जे** (नियमित) | | १११३२.७१ | | | | |
| | | | | २. | **अग्रिम रकमा** | | |
| ३. | **अदत्त बिले** | | १५२.०० | | इतर अग्रिम रकमा | | १५२३.७० |
| | | | | | | | |
| ४. | **अनुदान निधी सव्याज अखर्चित शिल्लक** | | | ३. | **अप्राप्त मुद्रांक शुल्क अनुदान** | | १८५३.२९ |
| | | | | | | | |
| | वित्त आयोग निधी अनुदान | १२६.६८ | | ४. | **वसूल न केलेले कर व फी** | | |
| | दलित वस्ती अनुदान | २२६.३२ | | | | | |
| | स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत अनुदान निधी | ७८.४३ | | १ | एकत्रित मालमत्ता | ३०९६.७७ | |
| | नागरी प्रोत्साहन निधी अनुदान | १.९९ | | २ | वृक्ष कर | ३४.३९ | |
| | वैशिष्ट्य पूर्ण कामे अनुदान | ४.१० | | ३ | स्वच्छता कर | ४८५.४८ | |
| | प्राथमिक सोयी सुविधा निधी | १७७१.४२ | | ४ | अग्निशमन उपकर | २५०.१९ | |
| | विशेष निधी अनुदान | ७१५.७२ | | ५ | नोटीस फी | ११९.४३ | |
| | सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना अनुदान | १९६.०० | | ६ | वारंट फी | ७.४० | |
| | मस्य विकास महामंडळ अनुदान | २०.२६ | | ७ | व्याज (कारवरील) | १२७७.५३ | |
| | सेटेलाईट सिटी योजना निधी | १०५६.७१ | | ८ | वाचनालय फी | १५.९१ | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकात्मिक तलाव संवर्धन योजना अनुदान | १८४.९८ | | ९ | विशेष पाणीपट्टी | ११६९.९२ | |
| | अल्पसंख्यांक कल्याण निधी अनुदान | ३३.९० | ४४१६.४५ | १० | मालमत्ता कर शास्ती | १०६१.९६ | |
| | | | | ११ | गाळा भुईभाडे | १२०.६५ | |
| ५. | **विशेष निधी** | | | १२ | जाहिरात कर | १६.८४ | |
| १ | पाणीपुरवठा राखीव निधी | ००.५८ | | १३ | दिवाबत्ती | २०.७७ | |
| २ | निवृत्ती वेतन निधी | ३७६.०७ | | १४ | करमणूक कर | १.४५ | |
| ३ | सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना अनुदान निधी | १९६.०० | | १५ | हातगाडी परवाना | २.८३ | ७६८१.५२ |
| ४ | प्राथमिक शिक्षण निधी | ३६२.२७ | | | | | |
| ५ | भविष्य निर्वाह निधी | १५८५.१३ | | ५. | **विशेष निधी** | | |
| ६ | घसारा निधी | २६.५६ | | १ | पाणीपुरवठा राखीव निधी | ००.५८ | |
| ७ | वेतन राखीव निधी | ५१३.६६ | | २ | निवृत्ती वेतन निधी | ३७६.०७ | |
| ८ | वैयक्तिक शौचकूप निधी | ००.९० | | ३ | सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना अनुदान, निधी | १९६.०१ | |
| ९ | परिभाषित अंशदान निधी | १९६.३९ | ३२५७.५७ | ४ | परिभाषित अंशदान निधी | १९६.३९ | |
| | | | | ५ | प्राथमिक शिक्षण निधी | ३६२.२७ | |
| | | | | ६ | भविष्य निर्वाह निधी | १५८५.१३ | |
| | | | | ७ | घसारा निधी | २६.५६ | |
| | | | | ८ | वेतन राखीव निधी | ५१३.६६ | |
| | | | | ९ | वैयक्तिक शौचकूप निधी | ००.९० | ३२५७.५७ |
| | | | | | | | |
| | **एकूण दायित्व** | | **३२५९२.२३** | | **एकूण मत्ता** | | **५१६८८.९१** |
| | **मत्ता अधिक्य** | | **१९०९६.६८** | | | | |
| | **एकूण** | | **५१६८८.९१** | | **एकूण** | | **५१६८८.९१** |

वसई विरार शहर महानगरपालिकेने सादर केलेल्या दिनांक ३१/०३/२०१६ अखेरच्या मत्ता व दायित्वा बाबत खालीलप्रमाणे अभिप्राय नोंदविण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र शासन निर्णय, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक लेखासु-१० २००४/७१/ प्र.क्र.५/०४/नवि-३१ दिनांक ६ जुलै, २००५ नुसार मत्ता व दायित्व तयार करण्यासाठी दुहेरी नोंद लेखा पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला नाही.

2. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या ३१/०३/२०१६ च्या मत्ते मध्ये वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थावर मालमत्ता दर्शविण्यात आलेली नाही. तसेच स्थावर मालमत्तेवरील घसारा देखील दर्शविण्यात आलेला नाही. स्थावर मालमत्ता दर्शविण्यात न आल्यामुळे महानगरपालिकेच्या मत्तेची आणि महानगरपालिकेची आर्थिक स्थिती स्पष्ट होत नाही.

3. वसई विरार शहर महानगरपालिकेने एकूण मालमत्ता रु. ५१६८८.९१ लाख एवढी दर्शविलेली असून मत्ता अधिक्य रु. १९०९६.६८ लाख दर्शविण्यात आलेले आहे. मत्ते मध्ये निव्वळ हाती असलेली रक्कम रु. ४०६३०.४० लाख एवढी दिसून येते तर मत्ते मधील रु. ११०५८.५१ लाख एवढी रक्कम येणे स्वरुपात अथवा अप्राप्त आहे. सबब प्रत्यक्षात मत्ता अधिक्य केवळ ८०३८.१७ लाख असल्याचे दिसून येते. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी महानगरपालिकेने ठोस उपाय योजना करून अप्राप्त रक्कमा तत्काळ वसूल करून महानगरपालिकेच्या निधी मध्ये जमा कराव्यात.

4. विशेष निधी या सदरा खाली दर्शविण्यात आलेल्या विविध निधीच्या रकमा या दायित्व आणि मत्ता तसेच मत्ते मधील शिल्लक रक्कमा यामध्ये देखील दर्शविण्यात आल्यचे दिसून येते.

5. महानगरपालिकेची मत्ता आणि दायित्व दर्शविणारी तपशीलवार विवरणपत्रे मत्ता व दायित्व सोबत जोडण्यात आलेली नाहीत.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा (सुधारणा) अधिनियम, २०११ मधील कलम ६ (३) अन्वये अर्धसमास पत्र क्रमांक १३४ दिनांक ०७/०६/२०१९ देण्यात आले होते. अर्ध समास पत्राचे उत्तर लेखापरीक्षणास अप्राप्त असल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात आलेले आहेत.

DATPRSM7301 (Ref No : 11, Hmm No : 134)

## *3 प्रभाग समिती "ब" पेल्हार क्षेत्रातील नवजीवन शांतीनगर येथे मफतलाल कंपाऊड ते मुख्य नाल्यापर्यत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष : गटार बांधणे महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 4351833.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4308746.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 43087.00/-

***निविदा प्रसिद्धी करीता स्थानिक पातळीवरील वृत्तपत्रांचा वापर केला आहे त्यामुळे निविदेस जिल्हा, राज्य***

***पातळीवर प्रसिद्धी मिळाली नाही. कार्यादेशाच्या दिनांकास कंत्राटदाराचे वैध नोंदणी प्रमाणपत्र नस्तीवर आढळुन आले नाही. तसेच नाल्यावरील वाढत्या अतिक्रमणाची तसेच नैसर्गिक नाल्याची कामापुर्वीची छायाचित्रे नस्तीवर आढळुन येत नाहीत त्यामुळे प्रस्तावित कामाची निकडीची गरज लेखापरिक्षणात पडताळून खात्री करता आली नाही. वसुलपात्र रक्कम ठेकेदाराकडून वसूल करणे आवश्यक आहे.***

| | |
|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम रु. | 43,08,746/- |
| लेखाशिर्ष | गटार बांधणे |
| प्रशासकीय मंजुरी | मा.आयुक्त दि. निरंक |
| तांत्रिक मान्यता | शहर अभियंता, पुस्तक क्र.I पृष्ठ क्र.12/103 दि. 11/6/2013 |
| निविदा सुचना | दि.7/8/2013 दैनिक ‘सकाळ’ व दैनिक ‘मुंबई केसरी’ |
| ई-निविदा | मनपाच्या संकेतस्थळावर उपलब्ध दि. 8/3/2014 |
| प्राप्त निविदा | एकुण 3<br>1) मे. ओमकार कंस्ट्रक्शन 2) मे. भोईर कंस्ट्रक्शन 3) मे. जयभवानी कंस्ट्रक्शन |
| न्युनतम निविदाकार | मे. ओमकार कंस्ट्रक्शन अंदाजपत्रकापेक्षा 4. 95% जास्त दराने. |
| मंजुरी | स्थायी समिती ठराव क्रं.969 दि. 29/10/2013 |
| दरसुची | महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग सन 2012 - 2013 |
| मोजमाप पुस्तक | एम बी नं.107 |
| कार्यादेश | वविशम/बांध/1656/14 दि. 1/1/2014 |
| कामाची मुदत | 240 दिवस (कार्यादेशाच्या दिनांकपासुन) |
| काम पुर्णत्वाचा दिनांक | निरंक |

प्रभाग समिती "ब" पेल्हार क्षेत्रातील नवजीवन शांतीनगर येथे मफतलाल कंपाऊड ते मुख्य नाल्यापर्यत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे कामाच्या नस्तीत खालील अधिनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

1) निविदा मागवितांना प्रसिध्दी माध्यामांच्या अधिकाधिक वापर करणे आवश्यक आहे. प्रसिध्दी जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात देऊन निविदा मागविणे अधिक फायदयाचे ठरते त्यामुळे दर्जेदार व माफक दराचा लाभ होतो. महानगरपालिकेने सदर प्रकरणी स्थानिक "मुंबई केसरी" या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द केली आहे. त्यामुळे महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा झाला असल्याचे दिसुन येत नाही.

2) न्युनतम निविदाकार मे. ओमकार कंस्ट्रक्शन यांनी सादर केलेल्या कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्रावर नोदंणीची मुदत दि. 4/6/2010 ते 3/6/2013 अशी आहे. दि. 1/1/2014 रोजी कार्यादेश निर्गमित केले आहे. त्यामुळे कार्यादेशाच्या दिनांकास कंत्राटदाराचे वैध नोंदणी

प्रमाणपत्र नस्तीवर लेखापरिक्षणत आढळुन आले नाही.

3) सदर कामासाठी ठेकेदाराने विमा संचालनालयाकडुन विमा उतरविण्याचे नस्तीवर आढळुन येत नाही.विमा संचालक,शासकीय विमा महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील पत्रक्रमांक प्रविनी-2300/सहविमा/जीप-2 दि. 7/1/2004 नुसार अंदाजपत्रकिय रकमेच्या एक टक्का विमा कामासाठी व कामगारांच्या सुरक्षेसाठी विमानिधी भरणे आवश्यक आहे.ठेकेदाराने सदर कामाचा विमा उतरविलेला नसल्याने रक्कम रु.4308746/- च्या एक टक्का रु. 43087/- ठेकेदाराकडुन वसुल करुन शासन खाती जमा केल्याची चलनाची प्रत लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात यावी.

4) सदरचा नाला नैसर्गिक असुन नाल्यावर वाढत्या अतिक्रमणामुळे हा नैसर्गिक नाला बुजवण्याची शक्यता असल्यामुळे प्रभाग समिती- ब, पेल्हार क्षेत्रातील नवजीवन शांतीनगर रस्ता येथे मफतलाल कंपाऊड ते मुख्य नाल्यापर्यंत आर.सी.सी. पाईप गटार बांधणे गरजेचे आहे असे नस्तीमधील पृष्ठ क्र.7/प वर नमुद आहे. नाल्यावरील वाढत्या अतिक्रमणाची तसेच नैसर्गिक नाल्याची कामापुर्वीची छायाचित्रे नस्तीवर आढळुन येत नाहीत त्यामुळे प्रस्तावित कामाची निकडीची गरज लेखापरिक्षणात पडताळून खात्री करता आली नाही. या अनियमिततां बाबत विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक 31 दिनांक 7/1/2019 अन्वये अनुपालन सादर करण्या विषयी कळविण्यात आले होते. तथापि, विभागाने कोणताही खुलासा केला नसल्याने वरील आक्षेप कायम करून रक्कम रुपये 43087/- वसुलपात्र व रक्कम रु 43,08,746/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे

DATANJM6301 (Ref No : 23, Hmm No : 30)

## ***4 मुख्य कार्यालय इमारतीकरीता 200 के.वी.ए. डिझेल जेनित्रा करिता केबल व्यवस्था करणे.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष :इतर विकास निधी अतंर्* *महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 498346.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 498346.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 3500.00/-

***सदर कामाचे कार्यादेश देणेपुर्वी ब-1 निविदा दस्त करारनामा करण्यात आलेला नाही. त्यामुळे ब-1 निविदा मधील विहीत अटी व शर्ती प्रमाणे काम केले याबाबत खात्री करता आली नाही. तसेच कामासाठी वापरण्यांत आलेल्या साहित्यांची प्रमाणके, साहित्यांचे थर्ड पार्टी ऑडीट, कामाचे चाचणी अहवाल लेखा परिक्षणांस उपलब्ध न झाल्याने वापरण्यात आलेले साहित्य आवश्यक त्या दर्जाचे होते याबाबत लेखा परिक्षणात खात्री करता आली नाही. विलंबाने काम पुर्ण केल्याने 35×100= 3500/- दंडाची रक्कम वसुलपात्र ठरते.***

| | |
|---|---|
| लेखाशिर्ष | इतर विकास निधी अतंर्गत कामे सी वॉर्ड |
| प्रशासकीय मान्यता | महापालिका ठराव क्र. 9 दि. 30/12/2013 |
| तांत्रिक मान्यता क्र. दिनांक | 16/1469/13-14 दि. 25/2/2014 |
| निविदा प्रसिध्दी वृत्तपत्राचे नाव ई निविदा | मजुर सहकारी संस्थेस काम वाटप |
| कंत्राटदाराचे नाव | यशोधन मजुर सहकारी कामगार संस्था,मुरबाड,जि.ठाणे |
| जिल्हा मजुर सोसायटी/सुशिक्षीत बेरोजगार यांचे कडील प्राप्त पत्र दिनांक | 5673 दि. 3/3/2014<br>ठाणे जिल्हा मजुर सहकारी संस्थांचा संघ,ठाणे |
| निविदा मंजुरी.(म.म.अ.1949 चे कलम 73 (क). | दि. 5/8/2014 पत्र क्र.1425 |
| करारनामा दिनांक | दि. 20/3/2014 |
| कार्यादेश | 1425 दि. 5/8/2014 |
| कामाची मुदत | 60 दिवस |
| काम सुरु केल्याचा दिनांक | दि. 5/8/2014 |
| काम पुर्ण झाल्याची दिनांक | दि. 7/11/2014 |
| मोजपाम पुस्तक क्रमांक | 328 पृ.क्र.87 ते 92 |
| मोजमाप पुस्तकानुसार देयकांची रक्कम | 4,98,346/- |

सदर कामाचे लेखापरिक्षणात खालील आक्षेपांची पुर्तता करण्यांत आलेली नाही.

1) सदर कामाचे कार्यादेश देणेपुर्वी ब -1 निविदा दस्त करारनामा करण्यात आलेला नाही . त्यामुळे ब-1 निविदा मधील विहीत अटी व शर्ती प्रमाणे काम केले किंवा कसे याबाबत खात्री करता आली नाही.

2) सदर कामासाठी वापरण्यांत आलेल्या साहित्यांची प्रमाणके लेखा परिक्षणात उपल ब्ध झाले नसल्याने अंदाजपत्रकाप्रमाणे कामे पुर्ण केली किंवा कसे याबाबत लेखापरिक्षणा मध्ये खात्री करता आले नाही . तसेच साहित्यांचे थर्ड पार्टी ऑडीट न झाल्याने वापरण्यात आलेले साहित्य आवश्यक त्या दर्जाचे आहे किंवा कसे याबाबत लेखा परिक्षणात खात्री करता आली नाही.
3) सदर कामाचे चाचणी अहवाल लेखा परिक्षणात उपलब्ध आले नाहीत.
4) सदर कामाची मुदत 60 दिवस असुन काम दि .7/11/14 रोजी कोणतीही मुदतवाढ न घेता 35 दिवस विलंबाने काम पुर्ण केल्याने 35×100=3500/- दंडाची रक्कम वसुल करुन पुर्तता दर्शविण्या बाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक 55 दिनांक 29/01/2019 अन्वये विभागास अवगत करण्यात आले होते तथापि, विद्युत विभागाने सदर प्रकरणी कोणतेही अनुपालन विहीत मुदतीत सादर न केल्याने वरील आक्षेप कायम करुन रक्कम रुपये आक्षेपाधीन रक्कम रु . 498346/- व रक्कम रुपये 3500/-वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

DATANJM6301 (Ref No : 28, Hmm No : 55)

## *5 आमदाराचा स्थानिक विकास कार्यक्रम -13-14 वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.12 मध्ये विरार (प) म्यागर्नस मोटार समोर नारंगी बायपास रस्ता आग्रीकट्टा चौक समोर नवीन हायमस्ट दिवे फिटींग करणे बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**No. of Irregularities: 5**

*लेखा शीर्ष :इतर विकास निधी अतंर् महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 475413.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 475413.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 11900.00/-

***सदर कामाचे कार्यादेश देणेपुर्वी ब-1 निविदा दस्त करारनामा करण्यात आलेला नाही. त्यामुळे ब-1 निविदा मधील विहीत अटी व शर्ती प्रमाणे काम केले याबाबत खात्री करता आली नाही. तसेच कामासाठी वापरण्यांत आलेल्या साहित्यांची प्रमाणके, साहित्यांचे थर्ड पार्टी ऑडीट, कामाचे चाचणी अहवाल लेखा परिक्षणांस उपलब्ध न झाल्याने वापरण्यात आलेले साहित्य आवश्यक त्या दर्जाचे होते, त्याचप्रमाणे स्थापित दिव्यांचा गुणदोष कालावधी बाबत लेखापरिक्षणात खात्री करता आली नाही. विलंबाने काम पुर्ण केल्याने 119×100= 11,900/- दंडाची रक्कम वसुलपात्र ठरते.***

| | |
|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम रु. | 4,75,413/- |
| प्रशासकीय व वित्तीय मान्यता | प्रभाग समिती ठराव क्र.3/8 दि.13/2/2014 |
| तांत्रिक मंजुरी | 12/1385 सन 2013-14 दि.10/4/2015 |
| कंत्राटदाराचे नाव | मे.सदानंद मजुर कामगार सहकारी संस्था,ठाणे |
| मोजमाप पुस्तक क्रमांक | पु.क्र.198 पृष्ठ क्र. 1 ते 7 |
| कार्यादेश | 1655/28/8/2014 |
| काम सुरु केल्याचा दिनांक | दि.28/8/2014 |
| काम पुर्णत्वाचा दिनांक | दि.23/2/2015 अंदाजपत्रकीय दराने |
| प्रमाणक | 994/25/5/2015 |

उपरोक्त कामा अनुषंगाने लेखा परिक्षणांस उपलब्ध् झालेल्या नस्तीवर खालील आक्षेपाची पुर्तता करण्यात आलेली नाही.

1) सदर कामाचा मजुर सहकारी संस्थेबरोबर ब -1 फॉर्मवर करारनामा केलेला नाही . त्यामुळे ब -1 करारनाम्यातील अटी शर्तीचे पालन केल्याबाब लेखापरिक्षणात खात्री होत नाही.

2) सदर कामाची मुदत 60 दिवस आहे. परंतु काम मोजमाप पुस्तकाप्रमाणे दि . 23/2/2015 रोजी पुर्ण झाल्याचे दिसुन येते त्यामुळे काम विहीत मुदतीत पुर्ण झालेले नाही. म्हणजेच 119 दिवस उशिरा काम पुर्ण केलेले आहे . मुदतवाढ दिलेली नसल्याने स्वीकृत करारनाम्यानुसार प्रति दिवस रु .100/- प्रमाणे रु.11,900/- ही दंडाची रक्कम वसुल करुन पुर्तता केली नाही.

3) अंदाजपत्रकातील लेखापरिक्षणा प्रमाणे नवीन हायमस्ट दिवे बसविले बाबत प्रमाणकाच्या प्रती नस्तीमध्ये उपलब्ध्ा झाल्या नसल्याने योग्य त्या स्पेशिफिकेशनचे दिवे प्राप्त झाल्याबाबत लेखापरिक्षणात खात्री करता आली नाही. तसेच थर्ड पार्टी ऑडीट झाले नसल्याने पुरवठा करण्यात आलेले दिवे योग्य दर्जाचे होते किंवा कसे याबाबत लेखापरिक्षणात खात्री करता आली नाही.

4) स्थापना करण्यांत आलेल्या हायमस्ट दिव्यांचा गुण दोष कालावधी किती आहे. याबाबत लेखापरिक्षणाची माहिती उपलब्ध झाली नाही त्यामुळे स्थापित दिव्यांचा गुणदोष कालावधी किती आहे . याबाबत लेखापरिक्षणात खात्री करता आली नाही . सदर आक्षेपांबाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक 56 दिनांक 29/01/2019 अन्वये विभागास अनुपालन सादर करण्या विषयी अवगत करण्यात आले होते . तथापि, विभागाने विहीत मुदतीत कोणतेही अनुपालन सादर न केल्याने वरील आक्षेप कायम करुन रक्कम रुपये

4,75,417/- आक्षेपाधीन व रक्कम रुपये 11,900/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

DATANJM6301 (Ref No : 29, Hmm No : 56)

## *6 विरार (प.) प्रभाग क्र.22 मध्ये विराट नगर येथे व्दारकेश प्लाझा ते शाम प्लाझा पर्यत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 7**

*लेखा शीर्ष : रस्ता बांधकाम महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 4462802.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4390388.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 72414.00/-

***निविदा प्रसिध्दीसाठी किमान कालमर्यादा पाळली नाही. तसेच निविदा मागवितांना जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात निविदा प्रसिध्दी दिल्याचे आढळुन येत नाही. निविदा अटी शर्ती नुसार मुदतवाढीस मा. आयुक्तांची मान्यता घेतल्याचे दिसुन येत नाही. रस्त्याची मालकी महानगरपालिकेच्या सार्वजनिक मालकीची असल्याची खात्री लेखापरिक्षणात करता आली नाही. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील परिशिष्ठ 24 मधील तरतुदिंचे उल्लंघन झाले आहे. तसेच कामाचे त्रयस्थ संस्थेकडुन तपासणी केली असल्याचा अहवाल व महानगरपालिकेने प्रमाणित केलेली दरपृथ्थ:करणाची प्रत लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.***

| | |
|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम रु. | 43,90,388/- |
| लेखाशिर्ष | रस्ता बांधकाम |
| प्रशासकीय मान्यता | स्थायी समिती विषय क्र. 32 दि. 22/7/2013 |
| तांत्रिक मान्यता | शहर अभियंता बुक क्र.I 23/204 दि. 25/9/2013 |
| निविदा प्रसिध्दी वृत्तपत्र व दिनांक | दैनिक 'नवाकाळ' व 'मुंबई केसरी टाईम्स' दि. 8/11/2013 |
| ई-टेंडरींग निविदा प्रसिध्द | दि.12/11/2013 |
| निविदा स्विकृती दि. | 9/12/2013 दु.3.00 पासुन ते 11/12/2013 दु.4.00 पर्यत |
| एकुण प्राप्त निविदा | तीन 1) मे. कंचन कंस्ट्रक्शन 2) मे. श्रीजी कंस्ट्रक्शन 3) मे. अस्फाल्ट इंडिया कॅापारेशन |
| न्युनतम निविदाकार | मे. श्रीजी कंस्ट्रक्शन,अंदाजपत्रकीय रकमेच्या 4.99% जादा दराने |

वसई विरार महानगर पालिका

| | |
|---|---|
| दरसुची | महाराष्ट्र राज्य सार्वजनिक बांधकाम विभाग सन 2012-13 व दरपृथ्थ:करण |
| मोजमाप पुस्तक क्रमांक | 217 पृ.क्र. 45 ते 53 |
| करारनामा | आहे |
| कार्यादेश | वविशम/बांध/2240/14 दि. 30/1/2014 |
| कामाची कालावधी | 120 दिवस ( कार्यादेशापासुन ) |
| मुदतवाढ | दि. 31/5/2015 |
| काम पुर्णत्वाचा दिनांक | दि. 18/3/2015 |
| प्रथम व धावते देयक | दि. 28/4/2015 |

विरार (प) मधील प्रभाग क्र.22 मध्ये विराट नगर येथील व्दारकेश प्लाझा ते शाम प्लाझा पर्यतच्या रस्त्याचे खडीकरणाच्या नस्तीमध्ये लेखापरिक्षणात खालील त्रुटी आढळुन आल्या आहेत.

1. दैनिक ‘नवाकाळ’ व ‘मुंबई केसरी टाईम्स’ या वृत्तपत्रात दि. 8/11/2013 रोजी प्रसिध्द केलेल्या ई-निविदा सुचना क्र. 9 मध्ये निविदेचा कालावधी नमुद केलेले नाही. केवळ संकेत स्थळावर ही माहिती दि. 12/11/2013 पासुन उपलब्ध होईल असे नमुद केले आहे. जा.क्र.वविशम/बांध/1235/13 दि. 3/12/2013 जाहीर सुचना (व्दितीय मुदतवाढ) अन्वये दिलेल्या मुदतवाढीत ऑनलाईन ई-निविदा खरेदी व प्रिपरेशनची अंतिम तारीख दि. 7/12/2013 सांयकाळी 3.00 पर्यत व ऑनलाईन ई-निविदा स्विकृती दिनांक 9/12/2013 सांयकाळी 3.00 पासुन ते दि. 11/12/2013 दु.4 वाजेपर्यत असे नमुद आहे. महाराष्ट्र बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद 202 सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय सीएटी 10/2006/प्र.क्र.33/इमारती-2 दि. 2/11/2006 अन्वये रु. 50 लक्ष पर्यतच्या कामांकरिता प्रथम सुचना कालावधी 15 दिवस व व्दितीय सुचना कालावधी 8 दिवस निश्चित केली आहे. सदर निविदा प्रसिध्दीसाठी ही कालमर्यादा पाळली नाही. त्यामुळे सदर नियमांचे उल्लंघन झाले आहे. तसेच निविदा मागवितांना जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात निविदा प्रसिध्दी दिल्याचे आढळुन येत नाही. महानगरपालिकेने सदर प्रकरणी स्थानिक वृत्तपत्र दैंनिक “मुंबई केसरी टाईम्स” या वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द केली आहे. त्यामुळे महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा झाल्याचे दिसुन येत नाही.

2. ठेकेदाराने निरंक दिनांकाच्या अर्जान्वये “Non clearance of site” असे नमुद करुन काम पुर्ण करण्यास मुदतवाढ मिळणे बाबत कार्यकारी अभियंता यांना विनंती केली आहे. महानगरपलिकेने जा.क्र.वविशम/बांध/155/2014 दि.13/5/2014 अन्वये “जागेच्या अडचणीमुळे हे काम करणे शक्य्ाळ नसल्याने दि.31/5/2015 पर्यत मुदतवाढ देण्यात येत आहे,” असे नमुद करुन ठेकेदारास मुदतवाढ दिली आहे. निविदा फॉर्म -1 मधील अटी व शर्ती मधील अट क्र. 6 नुसार मुदतवाढ देण्याचा अंतीम निर्णय मा. आयुक्त यांचा असेल असे नमुद आहे. मात्र करारनाम्यातील अट क्र.6 नुसार मदतवाढ देण्याचा निर्णय कार्यकारी अभियंता यांचा राहील असे नमुद केले आहे. निविदा अटी शर्ती नुसार मुदतवाढीस मा.आयुक्तांची मान्यता घेतल्याचे नस्तीवरुन दिसुन येत नाही.

3. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम पुस्तिकेतील परिच्छेद क्र. 251 मध्ये जबाबदार नागरी अधिकाऱ्याने रितसर हस्तांतरित न केलेल्या कोणत्याही जमिनीवर काम सुरु नये असे नमुद आहे. प्रस्तुत प्रकरणी जागेच्या अडचणीमुळे काम करणे शक्य न झाल्याने 120 दिवस कामाचा कार्यकाळ असतांना 1 वर्षाची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. (कार्यादेशाचा दि. 30/1/2014 व काम पुर्णत्वाचा

दि. 18/3/2015) त्यामुळे उशिरा काम पुर्ण केल्यामुळे निविदा फॉर्म 1 मधील अट क्र. 6 व करारनाम्यातील अट क्र. 4 निष:प्रभ ठरल्या आहेत. तसेच व्दारकेश प्लाझा ते श्याम प्लाझा पर्यतच्या रस्त्याची मालकी महानगरपालिकेच्या सार्वजनिक मालकीची असल्याची खात्री लेखापरिक्षणात करता आली नाही.

4. मुंबई गौण खनिज उत्खनन ( सुधारणा ) नियम 2010 अन्वये बांधकाम विभागाने सदर कामात स्वामित्वधनाची रक्कम वसुल केल्याचे दिसुन येत नाही. सबब स्वामित्वधनाची रक्कम रु. 72414/- ठेकेदारकडुन वसुन करुन शासन खाती जमा केल्याची चलनाची प्रत लेखापरिक्षणांस उपलब्ध करुन देण्यात यावी.

5. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील परिशिष्ठ 24 अन्वये केलेल्या कामाचे मोजमाप घेण्याबददलचे आणि नोंदवहया ठेवल्या संबंधी नियम विषद करण्यात आले आहेत. प्रस्तुत कामाची नोंद मोजमाप नोंदवही क्र. 217 मध्ये पृष्ठ क्र. 45 ते 53 वर घेण्यात आली आहे. नस्तीमध्ये नमुद केल्यानुसार सदर कामाच्या पुर्णत्वाचा दिनांक 18/3/2015 असा आहे. प्रस्तुत संपुर्ण काम पुर्ण झाल्यानंतर दि.19/3/2015 रोजी कामाचे मोजमाप नोंदविण्यात आले आहे. त्यामुळे उपरोक्त नियमांचे उल्लंघन झाले आहे.

6. करारनाम्यातील अट क्र. 24 नुसार केलेल्या कामाचे त्रयस्थ संस्थेकडुन तपासणी केली असल्याचा अहवाल लेखापरिक्षणास नस्तीवर उपलब्ध झाला नाही.

7. प्रस्तुत कामाकरिता सन 2012-13 या वर्षाच्या दरसुचीच्या आधारे दरपृथ्थ:करण करण्यात आले आहे. शहर अभियंता वा मा. आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांनी प्रमाणित केलेली दरपृथ्थ:करणाची प्रत लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे केलेल्या कामाचे योग्य दराने प्रदान झाले असल्याची लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

सदरील त्रुटी बाबत विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक 57, दिनांक 29/1/2019 अन्वये अनुपालन सादर करण्या विषयी कळविण्यात आले होते. तथापि, विभागाने कोणताही खुलासा केला नसल्याने वरील आक्षेप कायम करून रक्कम रु 72414/- वसुलपात्र व रक्कम रु. 43,90,388/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATANJM6301 (Ref No : 30, Hmm No : 57)

## *7 विरार (प.) नागोरी डेअरी ते सरस्वती विदयामंदिर पर्यतच्या रस्त्याचे डांबरीकरण करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 7**

*लेखा शीर्ष : रस्ता बांधकाम महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 3541567.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3423126.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 18441.00/-

***कामाच्या मुल्यानुसार व जाहिरात वितरण करणाऱ्या अधिकाऱ्यांचे वर्गिकरणानुसार जाहिरात प्रसिद्ध करण्यात आल्याचे आढळून आले नाही. तसेच मालाची खरेदी स्पेशिफिकेशन प्रमाणेच झाल्याची खात्री करता आली नाही. त्यामुळे ठेकेदारास केलेल्या प्रदानाची पडताळणी करता आली नाही. सदर कामात स्वामित्वधनाची रक्कम वसुल केल्याचे दिसुन येत नाही. त्याच प्रमाणे कामाचे त्रयस्थ संस्थेकडुन तपासणी केली असल्याचा अहवाल लेखापरिक्षणास नस्तीवर उपलब्ध झाला नाही. प्रमाणित केलेली दरपृथ्थ:करणाची प्रत लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे केलेल्या कामाचे योग्य दराने प्रदान झाले असल्याची लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.***

| | |
|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम रु. | 34,23,126/- |
| लेखाशिर्ष | रस्ता बांधकाम |
| प्रशासकीय मंजुरी | स्थायी समिती ठराव क्र.1086 दि. 2/12/14 |
| तांत्रिक मंजुरी | शहर अभियंता दि. 4/12/2014 |
| निविदा सुचना | दि. 24/12/2014 |
| निविदा प्रसिध्दी | दैनिक ‘नवभारत’ व ‘नरविर चिमाजी’ |
| ई-टेंडर प्रक्रिया | महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर दि. 29/12/14 ते दि. 12/1/15 दु. 3.00 वाजेपर्यत |
| ई-टेंडर ऑनलाईन | दि.14/1/2015 ते दु.3.00 पासुन ते दि.17/1/2015 दु.4.00 पर्यत |
| एकुण प्राप्त निविदा | तीन 1) मे. श्रीजी कंस्ट्रक्शन 2) मे. जय भवानी कंस्ट्रक्शन 3) मे. इन्फ्रा प्रोजेक्टस |
| न्युनतम निविदाकार | मे. श्रीजी कंस्ट्रक्शन अंदाजपत्रकापेक्षा 4.98% जास्त दराने |
| दरसुची | महाराष्ट्र राज्य सार्वजनिक बांधकाम विभाग सन 2013-14 व दरपृथ्थ:करण |
| कार्यादेश | वविशम/बांध/553/15 दि. 29/4/15 |
| कामाची मुदत | 150 दिवस |
| करारनामा | आहे |

विरार (प) नागोरी डेअरी ते सरस्वती विदयामंदीर पर्यतच्या रस्त्याचे डांबरीकरण कामाबाबत खालील आक्षेप नोंदविण्यात येत आहेत.

1. कामाच्या मुल्यानुसार प्रसिध्द करावयाच्या जाहिराती बाबतचे वर्गिकरण व जाहिरात वितरण करणाऱ्या अधिकाऱ्यांचे वर्गिकरण करण्यात आले असुन सदरचे वर्गिकरण स्थापत्य स्वरुपाच्या बांधकामानाही लागु करण्यात आले आहे. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.पीयुवी-1000/प्र.क्र.73/2000/34 दि.1/5/2001 अन्वये कामाचे मुल्य रु. 15 लाखाच्यावर ते रु. 50 लाखापर्यत आहे अशा कामाची जाहिरात विभागीय माहिती उपसंचालक यांचे मार्फत एक ‘ब’ वर्ग दैनिक व साप्ताहीक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याबाबत आदेश आहेत. सदरची निविदा ही रु. 34 लाख

रकमेची असल्यामुळे सदर शासन निर्णयात नमुद केल्यानुसार जाहीरात प्रसिध्द देणे आवश्यक होते. तथापि, महानगरपालिकेने दैनिक “नरविर चिमाजी” या दैनिकात जाहिरात प्रसिध्द केली आहे. त्यामुळे उपरोक्त शासन निर्णयातील आदेशाचे अनुपालन न झाल्याने महानगरपालिकेस व्यापक प्रसिध्दीचा फायदा झाल्याचे लेखापरिक्षणात आढळुन आले नाही.

2. कामाच्या आवश्यकते बाबत सदर रस्ता डांबरीकरण करण्याच्या सुचना नगरसेवकांनी दिल्या आहेत असे नमुद आहे. तथापि, या अनुषंगानेचा दस्तऐवज / अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही.

3. राष्ट्रीय नगरपालिका लेखासंहिता मधील नियम क्रमांक 12.82 (डी) नुसार कामाच्या ठिकाणी वापरलेल्या माल/साहित्याची खरेदी चलन/इनव्हाईस, मालाच्या वाहतुकीचे पास इत्यादी अभिलेख रक्कम प्रदान करण्यापुर्वी कंत्राटदाराकडुन प्राप्त करणे आवश्यक आहे. तसेच काम उत्कृष्ट दर्जाचे माल वापरुन सार्वजनिक बांधकाम खात्याच्या स्पेशिफिकेशन प्रमाणे पुर्ण करुन देणे ठेकेदारास बंधनकारक राहील अशी अट करारनाम्यातील अ.क्र.1 वर नमुद करण्यात आली आहे. तथापि, सदरचा अभिलेख लेखापरिक्षणात नस्तीत उपलब्ध न झाल्याने मालाची खरेदी स्पेशिफिकेशन प्रमाणेच झाल्याची खात्री करता आली नाही. तसेच ठेकेदारास केलेल्या प्रदानाची पडताळणी करता आली.

4. मुंबई गौण खनिज उत्खनन (सुधारणा) नियम 2010 अन्वये बांधकाम विभागाने सदर कामात स्वामित्वधनाची रक्कम वसुल केल्याचे दिसुन येत नाही. सबब स्वामित्वधनाची रक्कम रु.18441/- ठेकेदारकडुन वसुन करुन शासन खाती जमा केल्याची चलनाची प्रत लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात यावी.

5. ठेकेदारासोबत केलेल्या करारनाम्यातील अट क्र.16 नुसार काम सुरु करण्यापुर्वीची स्थिती दर्शविणारे छायाचित्रे व कामपुर्ण झाल्या नंतरची छायाचित्रे सादर करणे आवश्यक आहे. तथापि, सदर अटीची ठेकेदाराने पुर्तता केली नाही त्यामुळे केलेल्या कामाची लेखापरिक्षणात खात्री करता आली नाही.

6. करारनाम्यातील अट क्र.24 नुसार केलेल्या कामाचे त्रयस्थ संस्थेकडुन तपासणी केली असल्याचा अहवाल लेखापरिक्षणास नस्तीवर उपलब्ध झाला नाही.

7. प्रस्तुत कामाकरिता सन 2013-14 या वर्षाच्या दरसुचीच्या आधारे दरपृथ्थ:करण करण्यात आले आहे. शहर अभियंता वा मा. आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांनी प्रमाणित केलेली दरपृथ्थ:करणाची प्रत लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही. त्यामुळे केलेल्या कामाचे योग्य दराने प्रदान झाले असल्याची लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही. सदरील अनियमिततां बाबत विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक 58 दिनांक 29/1/2019 अन्वये अनुपालन सादर करण्या विषयी कळविण्यात आले होते. तथापि, विभागाने कोणताही खुलासा केला नसल्याने वरील आक्षेप कायम करून रक्कम रुपये 34,23,126/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATANJM6301 (Ref No : 31, Hmm No : 58)

### *8 मा.आमदार श्री. क्षितिज ठाकूर यांच्या स्थानिक विकास कार्यक्रम सन 2014-15 अंतर्गत विरार (पू.) प्रभाग क्रं. 5 नारिंगी मध्ये एकविरा मंदिरालगत असलेल्या उदयानाचा विकास करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**No. of Irregularities: 11**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 4226454.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4226454.00/-

***निविदा जाहीरात प्रसिध्द करतांना शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम नियमावलीचे पालन न करणे, निविदा कालावधी कमी ठेवणे, कामाच्या मुल्यानुसार योग्य वर्गवारीच्या वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द न करणे, काम करतांना कार्यादेश व करारातील अटी व शर्तीचे पालन न करणे, कामाच्या प्रगतीनुसार दिनांक निहाय नोंदी मोजमाप पुस्तिकेत न नोंदविणे, आदेशाप्रमाणे खर्चाचा हिशेब स्वतंत्र न ठेवणे, आदेशाप्रमाणे खर्चाचा हिशेब, कामाचा प्रगती अहवाल व आहरीत करण्यात आलेल्या रकमेचा तपशील जिल्हाधिकारी कार्यालयास विहित मुदतीत सादर न करणे, महालेखापाल कार्यालयात खर्चाचा ताळमेळ न घेणे इ.***

| | |
|---|---|
| कामाचे नांव | मा.आमदार श्री. क्षितिज ठाकूर यांच्या स्थानिक विकास कार्यक्रम सन 2014-15 अंतर्गत विरार (पू.) प्रभाग क्रं. 5 नारिंगी मध्ये एकविरा मंदिरालगत असलेल्या उदयानाचा विकास करणे. |
| अंदाजपत्रकीय रक्कम | रु. 42,26,454/- |
| प्रशासकीय मंजुरी(मनपा) | ठराव क्रं. 792 दि. 25/8/2014 |
| प्रशासकीय मंजुरी,मा.जिल्हाधिकारी ठाणे | नियो/आस्थाविका/प्रमा/ट-1/1336 दि. 16/8/2014 |
| तांत्रिक सल्लागार संदर्भ | व.वि.श.म/बांध2092/14 दि.31/7/2014 |
| तांत्रिक मंजुरी | 06/8/2014 |
| ई निविदा प्रसिध्दी वृत्तपत्राचे नांव प्रसिध्दी दिनांक | दै. नवभारत दै. वृत्तमानस 04/9/2014 |
| निविदा कालावधी | 04/9/20011 ते 12/9/2014 |
| निविदा स्वीकृती दिनांक | दि. 15/9/2014 ते दि. 16/9/2014 |

| | |
|---|---|
| प्रथम मुदतवाढ सुचना प्रसिध्दी | दै. नवभारत दै. वृत्तमानस<br>13/9/2014 |
| प्रथम मुदतवाढ कालावधी | दि.15/9/2014 |
| प्रथम मुदतवाढ निविदा स्वीकृती दिनांक | दि. 16/9/2014 ते दि. 17/9/2014 |
| द्वितीय मुदतवाढ सुचना प्रसिध्दी | दै. नवभारत दै. वृत्तमानस<br>29/10/2014 |
| द्वितीय मुदतवाढ कालावधी | दि.5/11/2014 |
| द्वितीय मुदतवाढ निविदा स्वीकृती दिनांक | दि. 07/11/2014 ते दि. 11/11/2014 |
| ई-निविदा प्रथम लखोटा उघडण्याचा दिनांक | 13/11/2014 |
| ई-निविदा द्वितीय लखोटा उघडण्याचा दिनांक | 3/12/2014 |
| प्राप्त निविदा | तीन<br>मे. बाबा कंस्ट्रक्शन – 4.5 % जादा दराने<br>मे. सी.एच.देसाई – 9.1 % जादा दराने<br>मे. द्वारका कंस्ट्रक्शन – 7.5 % जादा दराने |
| स्वीकृत निविदा | मे. बाबा कंस्ट्रक्शन – 4.5 % जादा दराने (प्राप्त निविदा मध्ये कमी दराची) |
| कामाचा कालावधी | 180 दिवस |
| करारनामा | रु. 3600/- दिनांक नमुद नाही. |
| कार्यादेश क्रं. व दिनांक | वविशम/बांध/3540अ/14 दि. 19/12/2014 |
| काम पुर्णत्वाचा दिनांक | दि. 11/5/2015 |

उपरोक्त कामाबाबत लेखापरिक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) प्रस्तुत कामाची निविदा दै.नवभारत व दै.वृत्तमानस या वृत्तपत्रात दि. 04/9/2014 रोजी प्रसिध्दी केल्याचे नमूद आहे. सार्वजनिक बांधकाम संहिता परिच्छेद क्रं. 202 व सार्वजनिक बांधकाम विभागाचा शासन निर्णय क्रं. सीएटी-10/2006/प्र.क्र. 133/ इमारती 2 दि. 21/11/2006 नुसार रु. 5 ते 50 लाख किमतीच्या कामासाठी पहिली निविदा सुचना कालावधी 15 दिवस निश्चित करण्यात आलेला आहे. परंतु प्रस्तुत निविदा सुचना कालावधी हा 09 दिवस इतका अत्यल्प ठेवण्यात आला होता. यावरून प्रस्तुत निविदा प्रसिद्ध करतांना सार्वजनिक बांधकाम संहितेच्या परिच्छेद क्र. 202 व उपरोक्त शासन निर्णयाचे पालन करण्यात आले नाही. यामुळे

स्पर्धात्मक दराचा फायदा महापालिकेस होऊ शकला नाही.

2) विभागाने सदरील कामासाठी दै.नवभारत व दै.वृत्तमानस या वर्तमान पत्रात जाहीरात दिलेली आहे. परंतु, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. पीयुबी-100 प्र.क्र.73/2000/34 दि. 01/05/2001 नुसार ज्या एका कामाचे मुल्य रु. 15 ते 50 लाखापर्यंत आहे. अशी जाहीरात प्रसिध्दीचे वृत्तपत्र एक 'ब' वर्ग दैनिक व एक साप्ताहिक या वृत्तपत्रात देऊन त्याचे वितरण विभागीय माहिती उपसंचालक यांचे मार्फत करणे आवश्यक आहे. याप्रमाणे विभागाने कार्यवाही केले नसल्याने प्रस्तुत काम करतांना उपरोक्त शासन निर्णयाचे पालन केले नसल्याचे दिसून येते व त्यामुळे कामाची निविदा राबवितांना स्पर्धा होऊ शकली नाही व महापालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा झाला नाही.

3) महाराष्ट्र बांधकाम नियम पुस्तिकेतील परिशिष्ट 24 मध्ये नमुद असल्यानुसार कामाच्या प्रगतीप्रमाणे दिनांक निहाय कामाच्या नोंदी मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक आहे, परंतु याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

4) राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहिता मधील नियम क्र.12.82 (डि) नूसार कामाच्या ठिकाणी वापरलेल्या माल/साहित्याच्या खरेदीचे चलन/इनव्हाईस, मालाच्या वाहतुकीचे चलने इ. अभिलेख रक्कम प्रदान करणेपुर्वी कंत्राटदाराकडून प्राप्त करणे आवश्यक आहे. परंतू सदर अभिलेख लेखापरीक्षणाकरीता नस्तीत उपलब्ध न झाल्याने मालाची खरेदी स्पेशिफीकेशनप्रमाणेच केल्याची तपासणी करता आली नाही. सबब ठेकेदारास केलेल्या प्रदानाची योग्यता पडताळणी करता आली नाही.

5) मा.जिल्हाधिकारी यांच्या आदेशातील अट क्रं. 10 नुसार या कार्यक्रमाखाली येणा-या खर्चाचा हिशोब स्वंतत्र ठेवून, खर्चासंबंधी अहवाल प्रत्येक महिण्याच्या 10 तारखेच्या आत जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविणे आवश्यक आहे, प्रस्तुत अहवालाची प्रत नस्तीवर उपलब्ध नसल्यामुळे सदर अटीचे पालन झाल्याबाबत लेखापरिक्षणाची खात्री झाली नाही.

6) मा.जिल्हाधिकारी यांच्या आदेशातील अट क्रं. 11 नुसार या कार्यक्रमासाठी तरतूद उपलब्ध करुन देणे व खर्चाचा हिशोब ठेवणे यासाठी रोजगार हमी योजनेची लेखा पध्दती वापरण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे, याप्रमाणे कार्यवाही केल्याचे नस्तीवरुन दिसून येत नाही प्रस्तुत अटीचे पालन झाल्याबाबत लेखापरिक्षणाची खात्री झाली नाही.

7) शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार सदरची कामे पूर्ण होताच, कामाच्या दर्शनी भागावर आमदाराच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या कामाचे नांव,वर्ष,खर्च लिहिणे आवश्यक आहे याअटीची पूर्तता केल्याचे नस्तीवरुन दिसून येत नाही.

8) मा.जिल्हाधिकारी यांनी आदेशित केल्यानुसार काम पूर्ण झाल्यावर तसे प्रमाणपत्र जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविणे आवश्यकआहे या अटीची पूर्तता केल्याचे नस्तीवर दिसून येत नाही.

9) मा.जिल्हाधिकारी यांच्या आदेशातील अट क्रं. 20 नुसार मंजूर कामावरील प्रगती अहवाल प्रत्येक

महिण्याच्या पाच तारखे पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविणे आवश्यक आहे याबाबत पूर्तता केल्याचे नस्तीवर दिसून येत नाही.

10) मा.जिल्हाधिकारी यांच्या आदेशातील अट क्रं. 21 नुसार कोषागारातून आहरित करण्यात आलेल्या रकमेचा प्रमाणक क्रमांक व दिनांक जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविणे आवश्यक आहे,याबाबतचे अनुपालन केल्याचे नस्तीवरुन दिसून येत नाही.

11) मा.जिल्हाधिकारी यांच्या आदेशातील अट क्रं. 22 नुसार खर्च रकमेचा ताळमेळ महालेखापालांचे कार्यालयात घेऊन त्याबाबतचे प्रमाणपत्र तसेच काम पूर्णत्वाचा दाखला व उपयोगिता प्रमाणपत्र जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे, याप्रमाणे कार्यवाही केल्याचे नस्तीवर दिसून येत नाही.

उपरोक्त मुदयांबाबत विभागास अर्धसमास पत्र क्रं. 40 दिनांक 15/1/2019 देण्यात आले होते, परंतु अनुपालन विहीत मुदतीत अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

RTNPRSM6901 (Ref No : 48, Hmm No : 40)

## *9 प्रभाग क्रं. 23 मध्ये विरार (प) विराट नगर खैना अपार्टमेंट जवळ उदयानाचा विकास करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 7**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 3458753.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3458753.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 35252.00/-

***निविदा जाहीरात प्रसिध्द करतांना शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम नियमावलीचे पालन न करणे, निविदा कालावधी कमी ठेवणे, कामाच्या मुल्यानुसार योग्य वर्गवारीच्या वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द न करणे,काम करतांना कार्यादेश व करारातील अटी व शर्तीचे पालन न करणे, कामाच्या प्रगतीनुसार दिनांक निहाय नोंदी मोजमाप पुस्तिकेत न नोंदविणे, काम पुर्णत्वाचा दाखला नस्तीवर उपलब्ध नसणे, मूल्यवर्धित कराची रक्कम कमी वसूल करणे इ.***

| | |
|---|---|
| कामाचे नांव | प्रभाग क्रं. 23 मध्ये विरार (प) विराट नगर खैना अपार्टमेंट |

| | |
|---|---|
| | जवळ उदयानाचा विकास करणे. |
| अंदाजपत्रकीय रक्कम | रु. 34,58,753/- |
| प्रशासकीय मंजुरी | ठराव क्रं. 18 दि. 10/06/2014 |
| तांत्रिक मंजुरी | 10/6/2014 |
| ई निविदा प्रसिध्दी वृत्तपत्राचे नांव व दिनांक | दै. नवाकाळ, दै. मुंबई केसरी 02/8/2014 |
| निविदा कालावधी | दि. 04/8/2014 ते 22/8/2014 |
| निविदा स्वीकृती कालावधी | दि. 25/8/2014 ते दि. 27/8/2014 |
| प्राप्त निविदा | तीन<br>मे. मेहुल अरविंद वर्तक - 3 % जादा दराने<br>मे. वि.वि.पी. एन्टरप्राईजेस - 4 % जादा दराने<br>मे. गणेश जायभाये- 8 % जादा दराने |
| स्वीकृत निविदा | मे. मेहुल अरविंद वर्तक - 3 % जादा दराने (प्राप्त निविदा मध्ये कमी दराची) |
| कामाचा कालावधी | 150 दिवस |
| करारनामा | रु. 2700/- दिनांक नमुद नाही. |
| कार्यादेश क्रं. व दिनांक | वविशम/काअ/बांध/3436/14 दि. 18/11/2014 |
| काम पुर्णत्वाचा दिनांक | दि. 13/6/2015 |

उपरोक्त कामाबाबत लेखापरिक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. विभागाने सदरील कामासाठी दै. नवाकाळ, दै. मुंबई केसरी या वर्तमान पत्रात जाहीरात दिलेली आहे. परंतु, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. पीयुबी-100 प्र.क्र.73/2000/34 दि. 01/01/2001 नुसार ज्या एका कामाचे मुल्य रु. 15 ते 50 लाखापर्यंत आहे. अशी जाहीरात प्रसिध्दीचे वृत्तपत्र एक 'ब' वर्ग दैनिक व एक साप्ताहिक या वृत्तपत्रात देणे आवश्यक असुन त्याचे वितरण विभागीय माहिती उपसंचालक यांचेमार्फत करणे आवश्यक आहे. याप्रमाणे विभागाने कार्यवाही केले नसल्याने प्रस्तुत काम करतांना उपरोक्त शासन निर्णयाचे पालन केले नसल्याचे दिसून येते व त्यामुळे सदरील कामाची निविदा राबविताना स्पर्धा होऊ शकली नाही व महापालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा झाला नाही.

2. कार्यादेश व करारनामा यातील अटी शर्तीप्रमाणे कंत्राटदाराने कामापूर्वीचे, काम चालू असतांनाचे व काम पूर्ण झाल्यानंतरचे असे तीन स्थितीतील कामाचे दिनांकित फोटो सादर करणे आवश्यक आहे, नस्तीवर उपलब्ध असलेल्या फोटोवर दिनांक नमूद नसल्यामुळे उक्त अटीचे पालन करण्यात आलेले नाही, त्यामुळे कालानुरुप करण्यात आलेल्या कामाच्या प्रगतीबाबत बोध होत नाही.

3. महाराष्ट्र बांधकाम नियम पुस्तिकेतील परिशिष्ट 24 मध्ये नमुद असल्यानुसार कामाच्या प्रगतीप्रमाणे दिनांक निहाय कामाच्या नोंदी मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक आहे, परंतु याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

4. राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहिता मधील नियम क्र.12.82 (डि) नूसार कामाच्या ठिकाणी

वापरलेल्या माल/साहित्याच्या खरेदीचे चलन/इनव्हाईस, मालाच्या वाहतुकीचे चलने इ.अभिलेख रक्कम प्रदान करणेपुर्वी कंत्राटदाराकडून प्राप्त करणे आवश्यक आहे. परंतू सदर अभिलेख लेखापरीक्षणाकरीता नस्तीत उपलब्ध न झाल्याने मालाची खरेदी स्पेशिफीकेशनप्रमाणेच केल्याची तपासणी करता आली नाही. सबब ठेकेदारास केलेल्या प्रदानाची योग्यता पडताळणी करता आली नाही.

5. कार्यादेशातील आदेशानुसार ठेकेदाराने प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी कामाचे नांव,एस्टीमेट रक्कम,ठेकेदाराचे नांव,कामाची मुदत इ. दर्शविणारा रंगीत फलक लावणे आवश्यक आहे, सदर बाबीचे पालन केले नसल्याचे नस्तीवरुन दिसून येते.

6. विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी शासन राजपत्र दिनांक 04/04/2012 अन्वये प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेनुसार दि.01/04/2012 पासून मूल्यवर्धिकर नोंदणी प्रमाणपत्र सादर न करणा-या ठेकेदारासाठी 5% या प्रमाणे मूल्यवर्धित कराचा दर निश्चित केला असुन, त्याप्रमाणे वसुली करणे आवश्यक आहे, परंतु प्रस्तुत कामाच्या रकमेची अदायगी करतांना मूल्यवर्धित कर नोंदणी प्रमाणपत्र नस्तीवर आढळून आले नाही, त्यामुळे संबंधिताकडून 5% दराने रक्कम वसुली करुन शासन खाती भरणे आवश्यक होते,परंतु,प्रस्तुत प्रकरणांत ठेकेदारांकडून देय रकमेवर 4% दराने रु. 141009/- इतकी रक्कम वसुल केल्याचे नस्तीवरुन दिसून येते, त्यामुळे कमी वसुल करण्यात आलेली 1% रक्कम रु. 35,252/- वसुल करुन शासन खाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

7. नगर पालिका लेखा संहिता नियम 177 नुसार नमुना 133 मध्ये काम पुर्णत्वाचा दाखला अदायगी पूर्वी सादर करणे आवश्यकआहे, परंतु सदरचा दाखला नस्तीवर उपलब्ध नसल्याने प्रस्तुत नियमाची पुर्तता केली नसल्याचे दिसून येते

उपरोक्त मुदयांबाबत विभागास अर्धसमास पत्र क्रं. 41 दिनांक 15/1/2019 देण्यात आले होते, परंतु अनुपालन विहीत मुदतीत अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

RTNPRSM6901 (Ref No : 49, Hmm No : 41)

## *10 महापालिकेच्या अधिकारी/कर्मचारी व ठेकेदारांकडे असलेल्या प्रलंबित अग्रिम रकमेबाबत..*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9अ*

गुंतलेली रक्कम रु. 147755732.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 147755732.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 147755732.00/-

| ***महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी व ठेकेदार यांना दिलेल्या अग्रीमाचे समायोजन न करणे इ.*** |
|---|

वसई विरार महानगर पालिका

सन 2015-16 पर्यंत महानगरपालिकेने अधिकारी,कर्मचारी व ठेकेदार यांना निरनिराळया प्रयोजनार्थ वेळोवेळी अग्रीम दिलेले आहे, सदर अग्रिमाचे वेळीच समायोजन झालेले नाही त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| प्रकार | प्रारंभिक शिल्लक | वर्षातील प्रदान | वर्षातील समायोजन | वर्षाअखेर शिल्लक अग्रीम |
|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण | 8055726.00 | 11862800.00 | 13109929.00 | 6808597.00 |
| मोबिलाईझशन | 170297459.00 | 58648184.00 | 87998508.00 | 140947135.00 |
| एकूण | 178353185.00 | 70510984.00 | 101108437.00 | 147755732.00 |

अग्रीम घेणा-या व्यक्ती / अधिका-यांचे नांवे.

| अ.क्रं. | व्यक्ती / अधिका-याचे नांव | अग्रीम तपशील | प्रमाणक किंवा पावती क्रं. | महिना व दिनांक | असमायोजित रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री.सुधाकर संख्ये | प्रशिक्षण अग्रीम | 1817 | 01/10/2008 | 415400.00 |
| 2 | मा.कार्यकारी अभियंता,म.जि.प्रा. | 1/0/1900 | 27 | 20/7/2009 | 300000.00 |
| 3 | श्री. संजय प्र.माजगांवकर | 1/0/1900 | 2740 | 27/10/2009 | 1391.00 |
| 4 | श्रीमती निशा पि.मेश्राम | 1/0/1900 | 2823 | 03/11/2009 | 1391.00 |
| 5 | श्री.वसंत मुकणे | 23/1/2011 ते 28/1/2011 | 10369 | 10/2/2011 | 109750.00 |
| 6 | वैद्यकीय अधिकारी आरोग्य | पल्स पोलीओ | 10804 | 05/3/2011 | 45000.00 |
| 7 | इसेन्स इंटरटेटमेंट प्रा.लि. | वसई विजयोत्सव लेझ्र शो | 1159 | 18/5/2011 | 1000000.00 |
| 8 | श्री.वसंत मुकणे | पशुगणना मानधन | 2383 | 25/10/2012 | 50000.00 |
| 9 | श्री.उध्दव निजाई | सदस्य प्रशिक्षणाकरिता | 4935 | 24/1/2014 | 36305.00 |
| 10 | जयराम अँड सन्स | रो-रो सेवासाठी | 5286 | 17/2/2014 | 600000.00 |
| 11 | घारपुरे इंजि.अँड कंस्ट्रक्शन | मोबीलायझेशन महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान कामी | 1301 | 29/3/2014 | 18484986.00 |
| 12 | घारपुरे इंजि.अँड कंस्ट्रक्शन | मोबीलायझेशन महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान कामी | 1 | 07/4/2014 | 46353866.00 |
| 13 | श्री.निलेश जाधव | आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत आयोजित प्रशिक्षण व क्षमता वर्धन कार्यक्रम | 2019 | 11/8/2014 | 178000.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 14 | अशोक लेलँड लि. | नवीन बस खरेदी कामी मोबीलाईझेशन ॲडव्हान्स | 2 | 03/09/2014 | 15860099.00 |
| 15 | जयराम ॲन्ड सन्स मरीन सर्विस | रो-रो फेरी कामी मोबीलाईझेशन | 2832 | 29/09/2014 | 1000000.00 |
| 16 | श्री.उध्दव निजाई | महिला मेळाव्या करिता | 3875 | 20/12/2014 | 94489.00 |
| 17 | अशोक लेलँड लि. | मोबीलाईझेशन | 1 | 16/4/2015 | 20668202.00 |
| 18 | अशोक लेलँड लि. | मोबीलाईझेशन | 2 | 18/4/2015 | 16117490.00 |
| 19 | श्री.रमाकांत जाधव | व.वि.श.मनपा सार्व. निवडणूक 2015 कामी | 641 | 04/6/2015 | 25000.00 |
| 20 | श्री.गुरुनाथ कापडी | व.वि.श.मनपा सार्व. निवडणूक 2015 कामी | 642 | 04/6/2015 | 25000.00 |
| 21 | श्री.विश्वनाथ तळेकर | व.वि.श.मनपा सार्व. निवडणूक 2015 कामी | 643 | 04/6/2015 | 10576.00 |
| 22 | श्री.जगदीश सुतार | व.वि.श.मनपा सार्व. निवडणूक 2015 कामी | 644 | 04/6/2015 | 25000.00 |
| 23 | श्रीमती स्मिता भोईर | व.वि.श.मनपा सार्व. निवडणूक 2015 कामी | 645 | 04/6/2015 | 25000.00 |
| 24 | श्री.एस. आर. पवार | व.वि.श.मनपा सार्व. निवडणूक 2015 कामी | 646 | 04/6/2015 | 25000.00 |
| 25 | श्री.प्रकाश् गायकर | व.वि.श.मनपा सार्व. निवडणूक 2015 कामी | 647 | 04/6/2015 | 25000.00 |
| 26 | श्री.सुरेश थोरात | व.वि.श.मनपा सार्व. निवडणूक 2015 कामी | 648 | 04/6/2015 | 25000.00 |
| 27 | श्री.निलेश जाधव | व.वि.श.मनपा सार्व. निवडणूक 2015 कामी | 694 | 10/6/2015 | 20000.00 |
| 28 | श्री.वसंत मुकणे | व.वि.श.मनपा सार्व. निवडणूक 2015 कामी | 695 | 10/6/2015 | 20000.00 |
| 29 | श्री.अविनाश गुंजाळकर | व.वि.श.मनपा सार्व. निवडणूक 2015 कामी | 696 | 10/6/2015 | 20000.00 |
| 30 | श्री.परवेज भुरे | व.वि.श.मनपा सार्व. निवडणूक 2015 कामी | 697 | 10/6/2015 | 20000.00 |
| 31 | एन.ए.कंस्ट्रक्शन | यशवंत नगर व राजावळी येथे बस डेपो बांधणे कामी मोबीलाईझेशन ॲडव्हान्स | 23 | 21/11/2015 | 21862492.00 |
| 32 | महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ | मनपासाठी सुरक्षा रक्षक नेमणेकामी 1 महिन्याचे सर्व्हीस टॅक्स सह व 3 | 4414 | 31/12/2015 | 4230595.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | महिन्याचे वेतन मिळून वेतन अग्रीम म्हणून | | | |
| 33 | ग्लिसन घोन्सालविस | बसेस नोंदणी | 24 | 15/1/2016 | 12500.00 |
| 34 | श्री.विभा तानाजी जाधव | म.स्वयंत्व सहायता,बचत गट नेत्रुत्व, लेखापरिक्षण आर्थिक साक्षरता कार्यक्रम | 0 | 17/3/2016 | 68200.00 |
| | एकूण् | | | | 147755732.00 |

उपरोक्त अग्रीमाबाबत लेखापरिक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. अग्रिमाची नोंदवही तपासली असता सन 2008-09 पासूनच्या रु.14,77,55,732/- इतक्या अग्रीम रकमांचे मार्च, 2016 अखेरपर्यंत समायोजन झाले नसल्याचे दिसून येते. महाराष्ट्र लेखासंहिता 1971 मधील नियम 189 नुसार अग्रीमाची वसुली तात्काळ किंवा अग्रीम दिल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत करणे आवश्यक आहे, परंतु याप्रमाणे वसुली किंवा समायोजन याबाबत कार्यवाही केली नसल्याचे दिसून येते.

2. महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीवर असलेले अधिकारी यांना दिलेल्या अग्रीमाचे त्यांच्या मूळ विभागात जाण्यापूर्वी समायोजन होणे आवश्यक आहे, परंतु सदर अग्रीमाचे मार्च 2016 पर्यंत समायोजन झाले नसल्याचे दिसून येते.

3. अग्रिम प्रलंबित असलेले काही अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत, अशा अधिकारी / कर्मचारी यांच्याकडे प्रलंबित असलेल्या अग्रीमाची वसुली त्यांच्या निवृत्ती वेतनातून करणे आवश्यक आहे, परंतु, याप्रमाणे कार्यवाही न केल्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येते.

4. पहिले अग्रिम दिल्यानंतर त्याची वसुली झाल्याशिवाय दुसरे अग्रीम देय ठरत नाही असे असतांना एकाच व्यक्तीस वारंवार अग्रीम दिल्याची अनियमितता झाल्याचे दिसून येते.

5. कंत्राटदारांना देण्यात आलेल्या मोबीलायझेशन अग्रीमाची त्यांच्या पहिल्या देयकातून वसूली करणे आवश्यक आहे, परंतु याप्रमाणे कार्यवाही करुन अग्रीम वसूल न केल्यामुळे अनियमितता झाल्याचे दिसून येते.

6. उपरोक्त बाबीवरुन अग्रिम वसूलीसाठी विभागाने ठोस कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही व त्यामुळे मोठया प्रमाणावरील रकमांचे समायोजन होऊ न शकल्यामुळे रकमा खात्याबाहेर असल्याचे दिसून येते.

उपरोक्त आक्षेपाबाबत अर्धसमास पत्र क्रं. 114 दि. 04/05/2019 देण्यात आले होते, परंतु अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

RTNPRSM6901 (Ref No : 73, Hmm No : 114)

# कलम ९ ब खालील आक्षेप

लेखापरीक्षकाच्या दृष्टीने कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे अथवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तुट अथवा जे कोणतेही नुकसान झाले आहे अशा तुटीची किंवा नुकसानीची रक्कम तसेच कंत्राट देण्यात झालेल्या अनियमितता, निर्णयामुळे झालेली महसूल हानी आणि धोरणात्मक निर्णयामुळे झालेले आर्थिक नुकसान

## *11 विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांची अधिसूचना दिनांक ०४/०४/२०१२ नुसार अनोंदणीकृत कंत्राटदाराकडून वसूल करावयाच्या रकमेबाबत.*

**विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांची अधिसूचना दिनांक ०४/०४/२०१२ नुसार अनोंदणीकृत कंत्राटदाराकडून**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष :090 01 निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 25826.00/-

***विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांची अधिसूचना दिनांक ०४/०४/२०१२ नुसार अनोंदणीकृत कंत्राटदाराकडून रुपये २५,८२६/- इतकी रक्कम वसूल करण्यात आलेली नाही.***

विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांची अधिसूचना दिनांक ०४/०४/२०१२ नुसार अनोंदणीकृत कंत्राटदाराकडून वसूल करावयाच्या करामध्ये ४% वरून ५% अशी सुधारणा करण्यात आलेली आहे. खाली नमूद करण्यात आलेल्या प्रकरणात अनोंदणीकृत कंत्राटदाराकडून ४% प्रमाणे VATची रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. १% प्रमाणे वसूल करावयाच्या फरकाची रक्कम रकाना क्रमांक ५ मध्ये दर्शविण्यात आलेली आहे. संबंधित कंत्राटदाराकडून फरकाची रक्कम वसूल करून शासन खाती भरणा करण्यात यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | २% अथवा ४% प्रमाणे अनोंदणीकृत ठेकेदाराकडून कपात केलेली VAT ची रक्कम | ५% प्रमाणे कपात करावयाची VATची रक्कम | वसूल करावयाची फरकाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती “ह”, वार्ड क्रमांक २८ धर्मा पाटील यांच्या घरालगत पाईप गटार बांधणे. | १९६६४ | २४५८० | ४९१६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती "ह", वार्ड क्रमांक ६८ मधील उद्यानांची रंगरंगोटी व इतर दुरुस्ती करणे. | १३२५८ | १६५७३ | ३३१५ |
| ३. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती "ह", वार्ड क्रमांक ६० मध्ये भोयदापाडा येथे मुख्य रस्ता ते अण्णा सावंत यांचे घरा पर्यंत पेव्हर ब्लोक बसविणे. | ७०६२ | ८८२७ | १७६५ |
| ४. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती "ह", वार्ड क्रमांक ६१ मध्ये मेजरवाडी जवळील चाळ येथे पाईपड्रेन बांधणे. | १४८१३ | १८५१७ | ३७०४ |
| ५. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती "ह", वार्ड क्रमांक ६३ मध्ये कोल्ही कार्यालयात लादी शौचालय व उर्वरित कंपाऊंड बांधणे. | १९९१९ | २३७१३ | ३७९४ |
| ६. | प्रभाग समिती –ब पेल्हार क्षेत्रातील नालासोपारा पूर्व येथील चंद्रेश हिल्स १,२,३ अंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे. | १३३३५ | १६६६९ | ३३३४ |
| ७. | प्रभाग समिती -ब पेल्हार क्षेत्रातील नालासोपारा पूर्व येथील साई निवास परमेश्वर चाळ १ ते ३ पर्यंत सी.सी. गटार करणे. | १९९९१ | २४९८९ | ४९९८ |
| | एकूण वसूलपात्र रक्कम | | | २५,८२६/- |

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा (सुधारणा) अधिनियम, २०११ मधील कलम 6(3) अन्वये विहीत कार्यवाहीस्तव अर्धसमास ज्ञापन क्रमांक ४२ दिनांक २३/०१/२०१९ रोजी देण्यात आले होते. सदर अर्धसमासपत्राचे अनुपालन विभागाने विहित कालावधीत सादर केलेले नसल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATPRSM7301 (Ref No : 1, Hmm No : 42)

## *12 वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ब कार्यक्षेत्रातील पूर्व शिर्डी नगर येथे चंद्रेश हिल्स अंतर्गत १,२,३ येथे पेव्हर ब्लॉक बसविणे.*

**वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ब कार्यक्षेत्रातील पूर्व शिर्डी नगर येथे चंद्रेश हिल्स अंतर्**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 06**

*लेखा शीर्ष :090 01 निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 333381.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 3344.00/-

| |
|---|
| ***बांधकाम करण्यात येणारी जागा महानगरपालिकेच्या मालकीची नाही. विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांची अधिसूचना दिनांक ०४/०४/२०१२ रक्कम रुपये ३३४४/- वसूल करून शासन खाती भरणा करण्यात यावी. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नियम ७३ (ड) व (ई) नुसार केलेल्या संविदेची माहिती स्थायी समितीस कळविण्यात आलेली नाही. कामाच्या ठिकाणी माहिती दर्शक फलक लावलेला नाही. बांधकामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याची गुणवत्ता चाचणी केलेली नाही. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, परिशिष्ट २४ मध्ये नमूद केल्यानुसार मोजमाप पुस्तिका लिहिण्यात आलेली नाही.*** |

| | |
|---|---|
| कामाचे नाव | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ब कार्यक्षेत्रातील पूर्व शिर्डी नगर येथे चंद्रेश हिल्स अंतर्गत १,२,३ येथे पेव्हर ब्लॉक बसविणे. |
| लेखाशीर्ष | इतर विकास कामे |
| प्रशासकीय व वित्तीय मान्यता | वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती ब, पेल्हार, मासिक सभा क्रमांक ९, ठराव क्रमांक ८७, दिनांक १६/०१/२०१५ रुपये ३,२०,१६०/- |
| तांत्रिक मान्यता | कार्यकारी अभियंता, व.वि.श.म.न.पा. यांची तांत्रिक मान्यता रुपये ३,१८,२११/- B-१ ७४/७१३, १४-१५, २०/०२/२०१५ |
| निविदा प्रसिद्धीचा दिनांक व वृत्तपत्रे | दिनांक २०/०३/२०१५, मुंबई तरुण भारत आणि २४/०३/२०१५ मुंबई तरुण भारत |
| प्राप्त निविदांचा तपशील | M/S Sharukh Mohamad Ismile Khan 4.81% above. |

| | |
|---|---|
| | M/S. Sharp Enterprises 5.55% above<br>M/S M.B.M. Construction 6.00% above |
| मंजूर निविदा | M/S Sharukh Mohamad Ismile Khan रुपये ३,१८,२११/- ची निविदा ४.८१% जादा दराने मंजूर करण्यात आलेली आहे. |
| निविदा मान्यता | उप आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका, यांची टिपणी दिनांक १३/०५/२०१५ नुसार मान्यता प्रदान. |
| करारनामा | रक्कम रुपये ३,१८,२११/- ४.८१% ने जास्त, मुद्रांक शुल्क ४१००/- दिनांक १४/०५/२०१५ |
| कार्यादेश | उप-आयुक्त तथा नियंत्रण अधिकारी, प्रभाग समिती ब पेल्हार, वसई विरार शहर महानगरपालिका यांचे कार्यादेश जा.क्र. व.वि.श.म./बांध/२८३/१५-१६ दिनांक १४/०५/२०१५ |
| कामाचा कालावधी | ६० दिवस |
| काम पूर्ण झाल्याचा दिनांक | १६/०७/२०१५ |
| काम पूर्ण करण्याचा कालावधी | १२/०७/२०१५ |

वरील कामाबाबत खालीलप्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

१. बांधकाम करण्यात येणारी जागा महानगरपालिकेच्या मालकीची असणे अनिवार्य आहे. नस्तीसोबत जोडण्यात आलेल्या छायाचित्रावरून असे निदर्शनास येते कि, बसविण्यात आलेले पेव्हर ब्लॉक हे खाजगी निवासी संकुलात बसविण्यात आलेले आहेत.

२. विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांची अधिसूचना दिनांक ०४/०४/२०१२ नुसार अनोंदणीकृत कंत्राटदाराकडून वसूल करावयाच्या करामध्ये ४% वरून ५% अशी सुधारणा करण्यात आलेली आहे. प्रस्तुत प्रकरणात कंत्राटदाराकडून ४% प्रमाणे VATवसूल करण्यात आलेला आहे सबब फरकाची १% रक्कम रुपये ३३४४/- वसूल करून शासन खाती भरणा करण्यात यावी.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नियम ७३ (ड) व (ई) नुसार केलेल्या संविदेची माहिती स्थायी समितीस कळविण्यात आल्याचे अभिलेख नस्तीमध्ये दिसून येत नाहीत.

४. करारनाम्यातील अट क्रमांक २३ नुसार कामाच्या ठिकाणी माहिती दर्शक फलक लावल्याचे छायाचित्र नस्तीस दिसून येत नाही.

५. करारनाम्यातील अट क्रमांक १९ नुसार बांधकामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याची गुणवत्ता चाचणी केलेली असल्याचा अहवाल नस्तीस दिसून येत नाही.

६. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, परिशिष्ट २४ मध्ये नमूद केल्यानुसार मोजमाप पुस्तिका कामाच्या प्रगतीनुसार तारीखनिहाय लिहून साक्षांकित करणे आवश्यक आहे. तथापि महापालिकेने अशाप्रकारे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा (सुधारणा) अधिनियम, २०११ मधील कलम 6(3) अन्वये विहीत कार्यवाहीस्तव अर्धसमास ज्ञापन क्रमांक ४३ दिनांक २३/०१/२०१९ देण्यात आले होते. सदर अर्धसमासपत्राचे अनुपालन विहित कालावधीत प्राप्त न झाल्याने अर्धसमासपत्राचे परिच्छेद कायम करण्यात आलेला आहे.

DATPRSM7301 (Ref No : 2, Hmm No : 43)

## *13 वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती क कार्यक्षेत्रातील नालासोपारा पूर्व, प्रभाग क्रमांक २४ मधील कंठ्ज्योती अपार्टमेंट ते सनफ्लॉवर अपार्टमेंट पर्यंत खडीकरण व डांबरीकरण करणे.*

**वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती क कार्यक्षेत्रातील नालासोपारा पूर्व, प्रभाग क्रमांक २४ मधील**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 5**

*लेखा शीर्ष :090 01 निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 680142.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 9736.00/-

***महाराष्ट्र शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, शा.नि. क्रमांक सिएटी १०/२००६/प्र.क्र.१३३/इमारती-२ दिनांक ०२ नोव्हेंबर, २००६ नुसार सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद २०२ आणि शासन निर्णय क्रमांक सीएटी १०८७/सीआर ८२/इमारती-२. दिनांक ५ सप्टेंबर १९८८ अन्वये प्रचलित असलेल्या नियमांनुसार निविदा प्रसिद्ध केलेली नाही. महाराष्ट्र सार्वजनिक नियम पुस्तिका, परिशिष्ट २४ (१५), मध्ये देण्यात आलेल्या सूचनांनुसार मोजमाप पुस्तिका लिहिण्यात आलेली नाही. कामास आयुक्त, व.वि.श.म.न.पा. यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ कलम ७३ (ड) प्र अन्वये आयुक्तांनी केलेल्या संविदेची माहिती स्थायी समितीस कळविण्यात आलेली नाही. कामाच्या ठिकाणी माहिती दर्शक फलक लावलेला नाही. महाराष्ट्र***

| |
|---|
| ***सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, परिच्छेद क्रमांक २६३ व २६४ नुसार अतिरिक्त रकमेस रुपये ९,७३६/- आयुक्त, व.वि.श.म.न.पा. यांची मान्यता घेतलेली नाही.असल्याचे अभिलेख नस्तीस दिसून येत नाहीत. सबब रुपये ९,७३६/- वसूलपात्र ठेवण्यात येत आहे.*** |

| | |
|---|---|
| कामाचे नाव | वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती क कार्यक्षेत्रातील नालासोपारा पूर्व, प्रभाग क्रमांक २४ मधील कंठ्ज्योती अपार्टमेंट ते सनफ्लॉवर अपार्टमेंट पर्यंत खडीकरण व डांबरीकरण करणे. |
| लेखाशीर्ष | रस्ते बांधकाम |
| प्रशासकीय व वित्तीय मान्यता | आयुक्त, व.वि.श.म.न.पा., यांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मान्यता प्रशासकीय व वित्तीय मान्यता, जा.क्र. वविशम/काअ/बांध/२१६८/२०१४ दिनांक २०/०२/२०१४ |
| तांत्रिक मान्यता | कार्यकारी अभियंता, वविशमनपा यांची मान्यता रुपये ६,३८,४८२/- I\| १५३/१३९८, २०१३-१४ दिनांक २०/०२/२०१४. |
| निविदा प्रसिद्धीचा दिनांक व वृत्तपत्रे | दै. हमारा महानगर व दैनिक मुंबई लक्षद्वीप, दिनांक २८/०७/२०१४.<br>दै. जागल्या व दै. जागरूक टाईम्स, दिनांक १५/०८/२०१४.<br>दै. वृत्तमानस व दै. जागरूक टाईम्स, दिनांक २८/०८/२०१४ |
| प्राप्त निविदांचा तपशील | मे. मेहुल अरविंद वर्तक , अंदाजपत्रकापेक्षा ७% जास्त दराने.<br><br>मे. मेघना एन्टरप्रायजेस, अंदाजपत्रकापेक्षा ८% जास्त दराने.<br><br>मे. मैदे मजूर कामगार सहकारी संस्था, |

| | |
|---|---|
| | अंदाजपत्रकापेक्षा ५% जास्त दराने. |
| मंजूर निविदा | मे. मैदे मजूर कामगार सहकारी संस्था, यांची रुपये ६,३८,४८२/- अंदाजपत्रकापेक्षा ५% जास्त दराने निविदा मंजूर करण्यात आलेली आहे. |
| निविदेस मान्यता | आयुक्त, व.वि.श.म.न.पा., यांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार मान्यता. प्रभाग समिती क, दिनांक ११/०९/२०१४ |
| करारनामा | रक्कम रुपये ६,३८,४८२/- अंदाजपत्रकापेक्षा ५% जास्त दराने, मुद्रांक शुल्क १००/-, दिनांक २४/११/२०१४ |
| कार्यादेश | कार्यकारी अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका जा.क्र. व.वि.श.म./बांध/२०६९/१४ दिनांक २४/११/२०१४. |
| कामाचा कालावधी | ४ महिने |
| काम पूर्ण झाल्याचा दिनांक | १८/०२/२०१५ |
| काम पूर्ण करण्याचा कालावधी | २३/०३/२०१५ |
| प्रथम व अंतिम धावते देयक | ६,८०,१४२/- |
| प्रमांक क्रमांक व दिनांक | ३९७५ / ०९/११/२०१५ |

वरील कामाबाबत खालीलप्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

१. महाराष्ट्र शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, शा.नि. क्रमांक सिएटी १०/२००६/प्र.क्र.१३३/इमारती-२ दिनांक ०२ नोव्हेंबर, २००६ नुसार सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद २०२ आणि शासन निर्णय क्रमांक सीएटी १०८७/सीआर ८२/इमारती-२. दिनांक ५ सप्टेंबर १९८८ अन्वये प्रचलित असलेल्या नियमांनुसार निविदा सूचनेचा कालावधी ५ ते १५ लाखापर्यंतच्या किमतींच्या कामासाठी १५ दिवसांचा करण्यात आलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात प्रथम निविदा प्रसिद्ध करतांना अशा प्रकारे कार्यवाही केलेली नसल्याने महानगरपालिकेस स्पर्धात्मक दरांचा फायदा झालेला नाही.

२. महाराष्ट्र सार्वजनिक नियम पुस्तिका, परिशिष्ट २४ (१५), नुसार ज्यावेळी बिलाची रक्कम विभागीय

कार्यालयामध्ये दिली जाते, त्यावेळी कार्यकारी अभियंता व विभागीय लेखापाल या दोघांनी न चुकता तारखेनिशी अद्याक्षरी केलेली असावी. तसेच बिल समंत करण्यात आले त्या प्रमाणकाचा क्रमांक व दिनांक दर्शविणारे मुखांकन लाल शाई मध्ये करण्यात यावे. प्रस्तुत कामाची मोजमाप पुस्तिका क्रमांक २०१ पान क्रमांक ९२ वर नमूद प्रथम व अंतिम धावते देयक एकूण रुपये ६,८०,१४२/- निव्वळ देयक ५,९७,३२२/- वर संबंधितांच्या तारखेसह स्वाक्षऱ्या दिसून येत नाहीत. तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी / लेखापाल यांची तारखेनिशी स्वाक्षरी नाही. तसेच मोजमाप पुस्तकात प्रमाणकाचा क्रमांक व दिनांक दर्शविणारे मुखांकन लाल शाई मध्ये करण्यात आलेले नाही. महाराष्ट्र सार्वजनिक नियम पुस्तिका, परिशिष्ट २४ मध्ये देण्यात आलेल्या सूचनांनुसार मोजमाप पुस्तिका लिहिण्यात आल्याचे दिसून येत नाही.

३. प्रस्तुत कामास आयुक्त, व.वि.श.म.न.पा. यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ कलम ७३ (ड) प्र अन्वये शासकीय व वित्तीय मान्यता देऊन निविदा मंजूर केलेली आहे. उक्त कलमातील तरतुदीनुसार आयुक्तांनी केलेल्या संविदेची माहिती संविदा केल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत स्थायी समितीस कळविणे आवश्यक आहे. संविदेची माहिती स्थायी समितीस कळविल्याचा अभिलेख नस्तीस दिसून येत नाही.

४. करारनाम्यातील अट क्रमांक २२ नुसार कामाच्या ठिकाणी माहिती दर्शक फलक लावल्याचे छायाचित्र नस्तीस दिसून येत नाही.

५. मंजूर निविदा अंदाजपत्रकीय किमतीच्या ५% जादा दराने रुपये ६,७०,४०६/- ने मंजूर करण्यात आलेली आहे. मोजमाप पुस्तिकेतील कामाचे मोजमापा वरून ६,८०,१४२/- किमतीचे काम झालेले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, परिच्छेद क्रमांक २६३ व २६४ नुसार अतिरिक्त रकमेस रुपये ९,७३६/- आयुक्त, व.वि.श.म.न.पा. यांची मान्यता घेतलेली असल्याचे अभिलेख नस्तीस दिसून येत नाहीत. सबब रुपये ९,७३६/- वसूलपात्र ठेवण्यात येत आहे.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा (सुधारणा) अधिनियम, २०११ मधील कलम 6(3) अन्वये विहीत कार्यवाहीस्तव अर्धसमास ज्ञापन क्रमांक ४८ दिनांक २३/०१/२०१९ देण्यात आलेला आहे. सदर अर्धसमासपत्राचे अनुपालन विहित कालावधीत अनुपालन प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात आलेला आहे.

DATPRSM7301 (Ref No : 3, Hmm No : 48)

## *14 वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती ड, वार्ड क्रमांक ६० मधील रेंज ऑफिस येथील जोन्सन मोटर्स ते अंबोजी इंडस्ट्रीयल इस्टेटपर्यंतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.*

**वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती ड, वार्ड क्रमांक ६० मधील रेंज ऑफिस येथील जो**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 08**

*लेखा शीर्ष :090 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 3437300.00/-

***M/S Jain Construction Company यांचा कामाचा परवाना महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्राची वैधता दिनांक २२/०२/२०१४ रोजी संपुष्टात आलेली आहे. निविदा उघडणेबाबतच्या अहवालावर निविदा समितीच्या स्वाक्षऱ्या नाहीत. तसेच तुलनात्मक तक्ता बनविण्यात आलेला नाही. काम सुरु करण्यापूर्वीची पूर्व परिस्थिती दर्शविणारे छायाचित्रे नस्तीमध्ये दिसून येत नाही. कामाच्या ठिकाणी माहिती दर्शक फलक लावल्याचे छायाचित्र नस्तीस दिसून येत नाही. त्रयस्थ संस्थेचा तपासणी अहवाल जोडण्यात आलेला नाही. कामासाठी वापरण्यात आलेल्या साहित्याचा दर्जा कामात वापरण्यापूर्वी तपासण्यात आलेली नाही. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, परिशिष्ट २४ मध्ये नमूद केल्यानुसार मोजमाप पुस्तिका लिहिण्यात आलेली नाही.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती ड, वार्ड क्रमांक ६० मधील रेंज ऑफिस येथील जोन्सन मोटर्स ते अंबोजी इंडस्ट्रीयल इस्टेटपर्यंतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. |
| लेखाशीर्ष | रस्ता बांधकाम |
| प्रशासकीय व वित्तीय मान्यता | वसई विरार शहर महानगरपालिका, स्थायी समिती सभा, ठराव क्रमांक ७३७ दिनांक १६/०९/२०१३. रक्कम रुपये ३२,७२,१६०/- |
| तांत्रिक मान्यता | शहर अभियंता, ववविशमनपा यांची मान्यता रुपये ३२,७५,१६०/- २२/१९२ सन २०१३-२०१४ दिनांक १६/०९/२०१३. |
| निविदा प्रसिद्धीचा दिनांक व वृत्तपत्रे | प्रथम निविदा दिनांक ०९/१०/२०१३, वृत्तपत्रे<br>१. हमारा महानगर २. दै. मुंबई मित्र<br>द्वितीय निविदा दिनांक ०८/११/२०१३<br>१. दै. नवाकाळ २. दै. महाराष्ट्र जन मुद्रा |

| | |
|---|---|
| प्राप्त निविदांचा तपशील | M/S Jagdamba Construction Co. 4.98% above.<br>M/S Jain Construction Co. 4.95% above<br>M/S J. K. D Enterprises 5.55% above |
| मंजूर निविदा | M/S Jain Construction Co. रुपये ३२,७५,१६०/- ची निविदा ४.९५% जादा दराने मंजूर करण्यात आलेली आहे. |
| स्थायी समिती मान्यता | वसई विरार शहर महानगरपालिका, स्थायी समिती सभा, ठराव क्रमांक १२६८ दिनांक ३१/१२/२०१३. |
| करारनामा | रक्कम रुपये ३२,७५,१६०/- मुद्रांक शुल्क २६००/- दिनांक ०४/०१/२०१४ |
| कार्यादेश | कार्यकारी अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका जा.क्र. व.वि.श.म./२/३४/बांध/१६१०/१४, दिनांक ०६/०१/२०१४ |
| कामाचा कालावधी | ४ महिने |
| काम पूर्ण झाल्याचा दिनांक | ०२/०५/२०१४ |
| काम पूर्ण करण्याचा कालावधी | ०५/०५/२०१४ |

वरील कामाबाबत खालीलप्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

१. ठेकेदारास कामाचे आदेश दिनांक ०६/०१/२०१४ रोजी देण्यात आलेले असून काम दिनांक ०२/०५/२०१४ रोजी पूर्ण करण्यात आलेले आहे. M/S Jain Construction Company यांचा कामाचा परवाना महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्राची वैधता दिनांक २२/०२/२०१४ रोजी संपुष्टात आलेली आहे. पुढील कालावधीच्या वैधतेचे प्रमाणपत्र नस्तीस उपलब्ध नाही.

२. निविदा उघडणेबाबतच्या अहवालावर निविदा समितीच्या स्वाक्षऱ्या दिसून येत नाहीत. तसेच निविदा समितीचे इतिवृत्त, तुलनात्मक तक्ता नस्तीस दिसून येत नसल्यामुळे निविदा निविदा समिती समक्ष उघडण्यात आल्याची खात्री लेखापरीक्षणास करता येत नाही.

३. दिनांक ०४/०१/२०१४ च्या करारनाम्यातील अट क्रमांक १५ नुसार सदर काम सुरु करण्यापूर्वीची पूर्व परिस्थिती दर्शविणारे छायाचित्रे नस्तीमध्ये दिसून येत नाही.

४. दिनांक ०४/०१/२०१४ च्या करारनाम्यातील अट क्रमांक २२ नुसार कामाच्या ठिकाणी माहिती दर्शक फलक लावल्याचे छायाचित्र नस्तीस दिसून येत नाही.

५. दिनांक ०४/०१/२०१४ च्या करारनाम्यातील अट क्रमांक २४ नुसार त्रयस्थ संस्थेचा तपासणी अहवाल नस्तीस जोडण्यात आलेला नाही.

६. नस्तीसोबत विद्यावर्धिनी भाऊसाहेब वर्तक Polytechnic यांचा दिनांक ३०/०४/२०१४ रोजीचा टेक्नीकल टेस्ट रिपोर्ट जोडण्यात आलेला आहे. काम दिनांक ०२/०५/२०१४ रोजी पूर्ण झालेले आहे. कामासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याचा दर्जा कामात वापरण्यापूर्वी तपासणे आवश्यक आहे. तथापि अशा प्रकारे साहित्याची गुणवत्ता तपासल्याचे दिसून येत नाही.

७. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, परिशिष्ट २४ मध्ये नमूद केल्यानुसार

मोजमाप पुस्तिका कामाच्या प्रगतीनुसार तारीखनिहाय लिहून साक्षांकित करणे आवश्यक आहे. तथापि महापालिकेने अशाप्रकारे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

८. वसई विरार शहर महानगरपालिका, स्थायी समिती सभा, ठराव क्रमांक ७३७ दिनांक १६/०९/२०१३ आणि वसई विरार शहर महानगरपालिका, स्थायी समिती सभा, ठराव क्रमांक १२६८ दिनांक ३१/१२/२०१३ ठरावाच्या मूळ प्रती नस्तीस दिसून येत नाहीत.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा (सुधारणा) अधिनियम, २०११ मधील कलम 6(3) अन्वये विहीत कार्यवाहीस्तव अर्धसमास ज्ञापन क्रमांक २५ दिनांक ०३/०१/२०१९ देण्यात आले होते. सदर अर्धसमासपत्राचे अनुपालन विहित कालावधीत प्राप्त न झाल्याने अर्धसमासपत्राचे परिच्छेद कायम करण्यात आलेला आहे.

DATPRSM7301 (Ref No : 4, Hmm No : 25)

## *15 वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती “क” अंतर्गत नालासोपारा (प.) येथील मदर मेरी रोड ( श्रीप्रस्ता निळेगाव रेल्वे कार शेड रोड) येथे आर.सी.सी. कल्व्हर्ट बांधणे.*

**वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती “क” अंतर्गत नालासोपारा (प.) येथील मदर मेरी**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 7**

*लेखा शीर्ष :090 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1498676.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 14987.00/-

***महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : मातंस/नस्ती-२०१०/प्र.क्र. ३४/३९ दिनांक ०६ ऑगस्ट, २०१० नुसार ई निविदा प्रक्रियेचा अवलंब केल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही. महाराष्ट्र सार्वजनिक नियम पुस्तिका, परिशिष्ट २४ (१५), नुसार कामाची मोजमाप पुस्तिका लिहिण्यात आलेली नाही. विमा संचालनालयाचे पत्र क्रमांक प्रविनी-२३१०/साबवि/ विमावसुली/अभी-३ दिनांक ०८/०९/२०१० नुसार ठेकेदाराकडून १% विमा रक्कम रुपये १४,९८७/- वसूल करण्यात आलेली नाही. काम सुरु करण्यापूर्वीची पूर्व परिस्थिती दर्शविणारी छायाचित्रे नस्तीमध्ये दिसून येत कामाच्या ठिकाणी माहिती दर्शक फलक लावल्याचे छायाचित्र नस्तीस दिसून येत नाही. साहित्याचा दर्जा साहित्य कामात वापरण्यापूर्वी तपासल्याचे दिसून येत नाही. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, परिच्छेद क्रमांक २५५ नुसार तपशीलवार अभिकल्पना देण्यात आल्याशिवाय बांधकाम सुरु करण्यात आलेले आहे. निविदेतील अटी व शर्ती CLAUSE NO 2 नुसार ठेकेदारवर दंडात्मक कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती "क" अंतर्गत नालासोपारा (प.) येथील मदर मेरी रोड ( श्रीप्रस्ता निळेगाव रेल्वे कार शेड रोड) येथे आर.सी.सी. कल्व्हर्ट बांधणे. |
| लेखाशीर्ष | इतर विकास कामे. |
| प्रशासकीय व वित्तीय मान्यता | वसई विरार शहर महानगरपालिका, स्थायी समिती सभा, ठराव क्रमांक ३८६ दिनांक २७/०७/२०१२. रक्कम रुपये ५७,८१,४४४/- |
| तांत्रिक मान्यता | शहर अभियंता, व.वि.श.म.न.पा. यांची मान्यता रुपये ५०.४१,४३२/- । १९/१६०, २०१२-२०१३ दिनांक २७/०९/२०१२ |
| निविदा प्रसिद्धीचा दिनांक व वृत्तपत्रे | दिनांक १०/१०/२०१२, दैनिक पुढारी आणि दैनिक आजतक. |
| प्राप्त निविदांचा तपशील | मे. जश Construction, अंदाजपत्रकापेक्षा ५% जास्त दराने.<br>मे. पाटील Construction, अंदाजपत्रकापेक्षा ९.७७ % जास्त दराने.<br>मे. नवनिर्माण Construction, अंदाजपत्रकापेक्षा ९% जास्त दराने. |
| मंजूर निविदा | मे. जश Construction, यांची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ५०,४१,४३२/- पेक्षा ५% जास्त दराने निविदा मंजूर करण्यात आलेली आहे. |
| स्थायी समिती मान्यता | वसई विरार शहर महानगरपालिका, स्थायी समिती सभा ठराव क्र. ६८५ दिनांक २३/११/२०१२ |
| करारनामा | दिनांक १७/०१/२०१३ रुपये ५०,४१,४३२/- अंदाजपत्रकापेक्षा ५% जास्त दराने, मुद्रांक शुल्क ४,४००/-. |
| कार्यादेश | कार्यकारी अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका जा.क्र. व.वि.श.म./का.अ./बांध/१३३२/ दिनांक ३०/०१/२०१३ |
| कामाचा कालावधी | ९० दिवस |
| काम पूर्ण झाल्याचा दिनांक | ३१/१०/२०१४ |
| काम पूर्ण करण्याचा कालावधी | ३०/०४/२०१३ |
| दुसरे धावते देयक/ प्रमाणक क्रमांक / दिनांक | १४,९८,६७६/- / १४५९ / ०३/०८/२०१५ |
| मोजमाप पुस्तक क्रमांक ३४६ पा. क्र. ७५ ते ८२ नुसार कामाची एकूण रक्कम | ४३,४९,८६८ अधिक ५% जादा |

वरील कामाबाबत खालीलप्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

1. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : मातंस/नस्ती-२०१०/प्र.क्र. ३४/३९ दिनांक ०६ ऑगस्ट, २०१० नुसार रुपये ५० लक्ष पेक्षा जास्त निविदांसाठी ई - निविदा

प्रणालीचा वापर करणे अनिवार्य करण्यात आलेले आहे. प्रस्तुत प्रकरणी निविदा प्रसिद्धीसाठी ई निविदा प्रक्रियेचा अवलंब केल्याचे नस्तीवरून दिसून येत नाही.

2. महाराष्ट्र सार्वजनिक नियम पुस्तिका, परिशिष्ट २४ (१५), नुसार ज्यावेळी बिलाची रक्कम विभागीय कार्यालयामध्ये दिली जाते, त्यावेळी कार्यकारी अभियंता व विभागीय लेखापाल या दोघांनी न चुकता तारखेनिशी अद्याक्षरी केलेली असावी. तसेच बिल समंत करण्यात आले त्या प्रमाणकाचा क्रमांक व दिनांक दर्शविणारे मुखांकन लाल शाई मध्ये करण्यात यावे. प्रस्तुत कामाची मोजमाप पुस्तिका क्रमांक ३४६ पान क्रमांक ८२ वर नमूद दुसरे व अंतिम धावते देयक एकूण रुपये १४,९८,६७६/-/- निव्वळ देयक १३,१५,०५२/- वर केलेल्या स्वाक्षऱ्या कोणत्या अधिकाऱ्याच्या आहेत याचा बोध होत नाही. तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची तारखेनिशी स्वाक्षरी नाही. तसेच मोजमाप पुस्तकात प्रमाणकाचा क्रमांक व दिनांक दर्शविणारे मुखांकन लाल शाई मध्ये करण्यात आलेले नाही. महाराष्ट्र सार्वजनिक नियम पुस्तिका, परिशिष्ट २४ मध्ये देण्यात आलेल्या सूचनांनुसार मोजमाप पुस्तिका लिहिण्यात आल्याचे दिसून येत नाही.

3. विमा संचालनालयाचे पत्र क्रमांक प्रविनी-२३१०/साबवि/विमावसुली/अभी-३ दिनांक ०८/०९/२०१० नुसार ठेकेदाराकडून १% विमा रक्कम रुपये १४,९८७/- वसूल करण्यात आलेली नाही. नस्तीस पृष्ठ क्रमांक ९१ वर जोडण्यात आलेला विमा संचलनालय, बांद्रा यांचा विमा दिनांक २९/०६/२०१३ पर्यंत वैध आहे. पुढील कालावधीचा विमा नस्तीस उपलब्ध नसल्याने रुपये १४,९८७/- वसूलपात्र ठेवण्यात येत आहे.

4. करारनाम्यातील अट क्रमांक १४ नुसार सदर काम सुरु करण्यापूर्वीची पूर्व परिस्थिती दर्शविणारी छायाचित्रे नस्तीमध्ये दिसून येत नाहीत.

5. करारनाम्यातील अट क्रमांक २१ नुसार कामाच्या ठिकाणी माहिती दर्शक फलक लावल्याचे छायाचित्र नस्तीस दिसून येत नाही.

6. नस्तीसोबत विद्यावर्धिनी भाऊसाहेब वर्तक Polytechnic यांचे दिनांक ३०/१०/२०१४ रोजीचे टेक्नीकल टेस्ट रिपोर्ट जोडण्यात आलेले आहेत. काम दिनांक ३१/१०/२०१४ रोजी पूर्ण झालेले आहे. कामासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याचा दर्जा साहित्य कामात वापरण्यापूर्वी तपासणे आवश्यक आहे. तथापि अशा प्रकारे साहित्याची गुणवत्ता तपासल्याचे दिसून येत नाही.

7. कार्यकारी अभियंता, व.वि.श.म.न.पा. यांनी त्यांचे पत्र क्रमांक जा.क्र. व.वि.श.म./का.अ./बांध/६५४/ १३-१४ दिनांक २८/०८/२०१३ अन्वये प्रस्तुत कामास दिनांक ३१/०५/२०१४ पर्यंत मुदत वाढ दिलेली आहे. M/S Jash Construction यांनी केलेले विनंती अर्ज दिनांक २१/०७/२०१३ नुसार ठेकेदारास बांधकाम विभागामार्फत कामाचा लाईन आउट देण्यात न आल्यामुळे कामास विलंब झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, परिच्छेद क्रमांक २५५ नुसार तपशीलवार अभिकल्पना देण्यात आल्याशिवाय कोणतेही बांधकाम सुरु करण्यात येऊ नये असे स्पष्ट आदेश आहेत. तसेच प्रस्तुत काम दिनांक ३१/१०/२०१४ रोजी पूर्ण करण्यात आलेले आहे. दिनांक ३१/०५/२०१४ नंतर पुढील कालावधीसाठी ठेकेदारास देण्यात आलेली मुदतवाढ किंवा ठेकेदाराची विनंती नस्तीस दिसून येत नाही. निविदेतील अटी व शर्ती CLAUSE NO 2 नुसार ठेकेदारवर दंडात्मक कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. कार्यादेशानुसार कामाची मुदत हि ९० दिवसांची आहे. वर उल्लेख केलेल्या पत्रानुसार कामास अवाजवी (२७५ दिवसांची) मुदतवाढ देण्यात आल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा (सुधारणा) अधिनियम, २०११ मधील कलम 6(3) अन्वये

विहीत कार्यवाहीस्तव अर्धसमास ज्ञापन क्रमांक ४७ दिनांक २३/०१/२०१९ देण्यात आलेला आहे. सदर अर्धसमासपत्राचे अनुपालन विहित कालावधीत अनुपालन प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात आलेला आहे.

DATPRSM7301 (Ref No : 5, Hmm No : 47)

## *16 वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मनुभाई निदान केंद्राच्या ठिकाणी बहुउद्देशीय इमारत बांधणे.*

**वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मनुभाई निदान केंद्राच्या ठिकाणी बहुउद्देशीय इमारत बांधणे**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 02**

*लेखा शीर्ष :090 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***महाराष्ट्र शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, शा.नि. क्रमांक सिएटी १०/२००६/प्र.क्र.१३३/इमारती-२ दिनांक ०२ नोव्हेंबर, २००६ नुसार सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद २०२ आणि शासन निर्णय क्रमांक सीएटी १०८७/सीआर ८२/इमारती-२. दिनांक ५ सप्टेंबर १९८८ अन्वये प्रचलित असलेल्या नियमांनुसार निविदा सूचना प्रसिद्ध करण्यात आलेली नाही. महाराष्ट्र सार्वजनिक नियम पुस्तिका, परिच्छेद क्रमांक २५१ नुसार जागेची मालकी महानगरपालिकेकडे नसतानाही निविदाप्रक्रिया पार पाडून कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आलेले आहेत. लेखापरीक्षणाच्या दिनांकापर्यंत अपूर्ण अवस्थेत असल्यामुळे महारष्ट्र शासनाचा रुपये १२१.५ लक्ष निधी विनावापर अडकून पडलेला आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचा प्रार्थमिक सोयी-सुविधा योजनेअंतर्गत विकास कामे करण्याचा उद्देश सफल झालेला नाही.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मनुभाई निदान केंद्राच्या ठिकाणी बहुउद्देशीय इमारत बांधणे. |
| लेखाशीर्ष | प्रार्थमिक सोयी-सुविधा अनुदान योजनेअंतर्गत |
| प्रशासकीय व वित्तीय मान्यता | वसई विरार शहर महानगरपालिका, सर्वसाधारण सभा, ठराव क्रमांक ४ दिनांक २०/०१/२०१४. रक्कम रुपये ४,५३,५७,९००/- |
| जिल्हास्तरीय समितीची प्रशासकीय मान्यता | विभागीय आयुक्त, कोकण विभाग तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय समिती, जिल्हाधिकारी, ठाणे तथा सदस्य |

| | |
|---|---|
| | सचिव जिल्हास्तरीय समिती आणि आयुक्त, व.वि.श.म.न.पा., तथा सदस्य जिल्हास्तरीय समिती या जिल्हास्तरीय समितीची प्रशासकीय मान्यता दिनांक २४/०२/२०१४ |
| तांत्रिक मान्यता | शहर अभियंता, व.वि.श.म.न.पा. यांची मान्यता रुपये ४,४५,७७,३३६/- I ४६, २०१३-१४ दिनांक २७/०१/२०१४. |
| निविदा प्रसिद्धीचा दिनांक व वृत्तपत्रे | ई. निविदा सूचना दिनांक ०६/०२/२०१४, १. लोकमत २. नरवीर चिमाजी या वृत्तपत्रात दिनांक ०७/०२/२०१४ रोजी प्रसिद्ध. निविदा कालावधी १० दिवस. |
| प्राप्त निविदांचा तपशील | M/s Jyoti Construction, अंदाजपत्रकापेक्षा ३१% जास्त दराने.<br>M/s N. A. Construction Pvt. Ltd, अंदाजपत्रकापेक्षा ३४% जास्त दराने.<br>M/s Gajnan Construction, अंदाजपत्रकापेक्षा २५% जास्त दराने. |
| मंजूर निविदा | M/s Gajnan Construction, यांची रुपये ४,४५,७७,३३६/- अंदाजपत्रकापेक्षा २५% जास्त दराने (PWD, DSR नुसार ३.२०% जास्त दराने) निविदा मंजूर करण्यात आलेली आहे. |
| स्थायी समिती मान्यता | वसई विरार शहर महानगरपालिका, स्थायी समिती सभा ठराव क्र. १९७२ दिनांक ०१/०३/२०१४ |
| करारनामा | रक्कम रुपये ४,४५,७७,३३६/- अंदाजपत्रकापेक्षा २५% जास्त दराने (PWD, DSR नुसार ३.२०% जास्त दराने) मुद्रांक शुल्क ४५,२००/- दिनांक १२/०३/२०१४. |
| कार्यादेश | आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका जा.क्र. व.वि.श.म./बांध/२९९९/१४ दिनांक ०३/०३/२०१४. |
| कामाचा कालावधी | १ वर्ष |
| काम पूर्ण झाल्याचा दिनांक | काम अपूर्ण आहे. |
| काम पूर्ण करण्याचा कालावधी | ०२/०३/२०१५ |
| महारष्ट्र शासन अनुदान | महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सोयीसुविधांच्या विकास कामासाठी विशेष अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत महाराष्ट्र शासन निर्णय, नगरविकास विभाग, शा.नि.क्र.जीईएन-२०१३/प्र.क्र.२९५/नवि-१६, मंत्रालय दिनांक ०३/१२/२०१३ नुसार रुपये १२१.५ लाखाचे अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे. |

वरील कामाबाबत खालीलप्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

1. महाराष्ट्र शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, शा.नि. क्रमांक सिएटी १०/२००६/

प्र.क्र.१३३/इमारती-२ दिनांक ०२ नोव्हेंबर, २००६ नुसार सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद २०२ आणि शासन निर्णय क्रमांक सीएटी १०८७/सीआर ८२/इमारती-२. दिनांक ५ सप्टेंबर १९८८ अन्वये प्रचलित असलेल्या नियमांनुसार निविदा सूचनेचा कालावधी ५० लाखापेक्षा जास्त किमतींच्या कामासाठी २५ दिवसांचा करण्यात आलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात निविदा सूचनेचा कालावधी १० दिवसांचा देण्यात आलेला आहे तसेच निविदा सूचना पुरेशाप्रमाणात नामांकित राज्यस्तरीय वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेली (लोकमत आणि नरवीर चिमाजी) नसल्यामुळे निविदेस व्यापक प्रमाणात प्रसिध्दी मिळालेली नाही. सबब महानगरपालिकेस स्पर्धात्मक दरांचा फायदा झालेला नाही.

2. उपसंचालक, नगररचना विभाग, व.वि.श.म.न.पा. यांचे कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, व.वि.श.म.न.पा. यांना लिहिलेले पत्र क्रमांक व.वि.श.म./न.र./शास.०८/२०१४, दिनांक १७/०४/२०१४ नुसार "वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्राथमिक सोयी-सुविधा अनुदान योजनेअंतर्गत प्रस्तावित केलेली मनुभाई निदान केंद्राच्या ठिकाणी बहुउद्देशीय इमारत हि मंजूर विकास आराखड्यामधील स्मशानभूमीच्या जागेमध्ये असून सदर ठिकाणी हॉस्पिटल इमारत अनज्ञेय नाही. व सदर जागा हि १२.०० चौ.मी.डी.पी. रस्त्याने देखील बाधित आहे." असे कळविलेले आहे. जिल्हास्तरीय समितीची प्रशासकीय मान्यता दिनांक २४/०२/२०१४ मधील अट क्रमांक ६ नुसार प्रस्तावित कामे शहराच्या विकास नियंत्रण नियमावली नुसार आहे व विकास आराखड्याशी सुसंगत असल्याबाबत महानगरपालिकेने खात्री करावी आणि अट ७ नुसार जागेचा ताबा मालकी महानगरपालिकेकडे असल्याशिवाय कामाचे आदेश देऊ नयेत. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक नियम पुस्तिका, परिच्छेद क्रमांक २५१ नुसार "जबाबदार नागरी अधिकाऱ्याने रीतसर हस्तांतरित न केलेल्या कोणत्याही जमीनीवर काम सुरु करू नये. जेव्हा एखाद्या बांधकामासाठी निविदा स्वीकारण्यात येतात, परंतु त्यासाठी लागणारी जमीन संपादित करावयाची असते, तेव्हा, प्रत्यक्ष काम सुरु करण्याचे आदेश देण्यापूर्वी जमीन संपादित करण्यास किती कालवधी धरावा याबाबत निश्चित माहिती करून घ्यावी. सदर जागा हि स्मशानभूमीची असून १२.०० चौ.मी.डी.पी. रस्त्याने देखील बाधित असल्याने सदर जागेची मालकी महानगरपालिकेकडे नसतानाही निविदाप्रक्रिया पार पाडून कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आलेले आहेत. कंत्राटदारास जागेचा ताबा दिलेला नसल्यामुळे प्रस्तावित काम हे लेखापरीक्षणाच्या दिनांकापर्यंत अपूर्ण अवस्थेत आहे. सबब महारष्ट्र शासनाचा रुपये १२१.५ लक्ष निधी विनावापर अडकून पडलेला आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचा प्रार्थमिक सोयी-सुविधा योजनेअंतर्गत विकास कामे करण्याचा उद्देश सफल झालेला नाही.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा (सुधारणा) अधिनियम, २०११ मधील कलम 6(3) अन्वये विहीत कार्यवाहीस्तव अर्धसमास ज्ञापन क्रमांक ४६ दिनांक २३/०१/२०१९ देण्यात आले होते. सदर अर्धसमासपत्राचे अनुपालन विहित कालावधीत प्राप्त न झाल्याने परिच्छेद कायम करण्यात आलेला आहे.

DATPRSM7301 (Ref No : 7, Hmm No : 46)

## *17 वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ई कार्यक्षेत्रातील वार्ड क्रमांक. ८२ मधील रवी जाधव चौक ते अधिश्री बंगल्यापर्यंत गटारावर स्ल्याब टाकणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**No. of Irregularities: 9**

*महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ब*
आक्षेपाधीन रक्कम रु. 4138893.00/-

***कामाच्या आदेशाच्या दिनांकास ९/०४/२०१५ रोजी M/S Sai Siddhi Construction यांचा कामाचा परवाना महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्राची वैधता संपुष्टात आलेली आहे. काम मुदती पूर्वी दोन महिने आधीच पूर्ण करण्यात आल्यामुळे काम कामाची गुणवत्ता व दर्जा राखून काम पूर्ण केल्याची खात्री लेखापरीक्षणास करता येत नाही. कामाचे आदेश १३ महिने विलंबाने देण्यात आलेले आहेत. निविदा निविदा समिती समक्ष उघडण्यात आल्याची खात्री लेखापरीक्षणास करता येत नाही. कामाची पूर्व परिस्थिती दर्शविणारे छायाचित्रे नस्तीमध्ये दिसून येत नाही. कामाच्या ठिकाणी माहिती दर्शक फलक लावल्याचे छायाचित्र नस्तीस दिसून येत नाही. त्रयस्थ संस्थेचा तपासणी अहवाल नस्तीस जोडण्यात आलेला नाही. कामासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याचा दर्जा साहित्य कामात वापरण्यापूर्वी तपासल्याचे दिसून येत नाही. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, परिशिष्ट २४ मध्ये नमूद केल्यानुसार मोजमाप पुस्तिका लिहिण्यात आलेली नाही.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती ई कार्यक्षेत्रातील वार्ड क्रमांक. ८२ मधील रवी जाधव चौक ते अधिश्री बंगल्यापर्यंत गटारावर स्ल्याब टाकणे. |
| लेखाशीर्ष | गटार बांधकाम |
| प्रशासकीय व वित्तीय मान्यता | वसई विरार शहर महानगरपालिका, स्थायी समिती सभा, ठराव क्रमांक ९०० दिनांक २९/१०/२०१३. रक्कम रुपये ४९,३७,३६३/- |
| तांत्रिक मान्यता | शहर अभियंता, ववशिमनपा यांची मान्यता रुपये ४९,३७,३६३/- २९/२५५/ २०/०३/२०१४ दिनांक २९/१०/२०१३. |
| निविदा प्रसिद्धीचा दिनांक व वृत्तपत्रे | दिनांक २०/११/२०१३ १. दैनिक नवभारत टाईम्स २. दै. परशुराम समाचार |
| प्राप्त निविदांचा तपशील | M/S Sai Siddhi Construction 4.95% above. M/S. Mandeep Enterprises 09.00% above<br>M/S Sai Ganesh Enterprises 6.00% above |

| | |
|---|---|
| मंजूर निविदा | M/S Sai Siddhi Construction रुपये ४९,३७,३६३/- ची निविदा ४.९५% जादा दराने मंजूर करण्यात आलेली आहे. |
| स्थायी समिती मान्यता | वसई विरार शहर महानगरपालिका, स्थायी समिती सभा, ठराव क्रमांक १५९४ दिनांक ०३/०२/२०१४. |
| करारनामा | रक्कम रुपये ४९,३७,३६३/- मुद्रांक शुल्क ४१००/- करार कोणत्या तारखेस करण्यात आला ती तारीख नमूद नाही. |
| कार्यादेश | कार्यकारी अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका जा.क्र. व.वि.श.म./बांध/का.अ./३८/२०१५ दिनांक ०९/०४/२०१५ |
| कामाचा कालावधी | ४ महिने |
| काम पूर्ण झाल्याचा दिनांक | ०६/०६/२०१५ |
| काम पूर्ण करण्याचा कालावधी | ०८/०८/२०१५ |

वरील कामाबाबत खालीलप्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

1. ठेकेदारास कामाचे आदेश दिनांक ०९/०४/२०१५ रोजी देण्यात आलेले आहेत. M/S Sai Siddhi Construction यांचा कामाचा परवाना महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या कंत्राटदार नोंदणी प्रमाणपत्राची वैधता दिनांक १३/०३/२०१४ रोजी संपुष्टात आलेली आहे. पुढील कालावधीच्या वैधतेचे प्रमाणपत्र नस्तीस उपलब्ध नाही.

2. कामाचे आदेश दिनांक ०९/०४/२०१५ रोजी देण्यात आलेले आहेत. कामाचा कालावधी ४ महिन्यांचा असून काम दिनांक ०८/०८/२०१५ रोजी पूर्ण होणे अपेक्षित होते. तथापि काम मुदती पूर्वी दोन महिने आधीच म्हणजे दिनांक ०६/०६/२०१५ रोजीच पूर्ण करण्यात आल्यामुळे काम कामाची गुणवत्ता व दर्जा राखून काम पूर्ण केल्याची खात्री लेखापरीक्षणास करता येत नाही.

3. कामाची प्रशासकीय, वित्तीय व तांत्रिक मान्यता दिनांक २९/१०/२०१३ रोजी घेण्यात आलेली आहे. तसेच निविदा मंजूर करून निविदेस मान्यता ०३/०२/२०१४ रोजी घेण्यात आलेली आहे. परंतु कामाचे आदेश १३ महिने विलंबाने देण्यात आलेले आहेत. याबाबत अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

4. निविदा उघडणेबाबतच्या अहवालावर निविदा समितीच्या स्वाक्षऱ्या दिसून येत नाहीत. तसेच निविदा समितीचे इतिवृत्त, तुलनात्मक तक्ता नस्तीस दिसून येत नसल्यामुळे निविदा निविदा समिती समक्ष उघडण्यात आल्याची खात्री लेखापरीक्षणास करता येत नाही.

5. करारनाम्यातील अट क्रमांक १३ नुसार सदर काम सुरु करण्यापूर्वीची पूर्व परिस्थिती दर्शविणारे छायाचित्रे नस्तीमध्ये दिसून येत नाही.

6. करारनाम्यातील अट क्रमांक २० नुसार कामाच्या ठिकाणी माहिती दर्शक फलक लावल्याचे छायाचित्र नस्तीस दिसून येत नाही.

7. करारनाम्यातील अट क्रमांक २१ नुसार त्रयस्थ संस्थेचा तपासणी अहवाल नस्तीस जोडण्यात आलेला नाही.

8. नस्तीसोबत विद्यावर्धिनी भाऊसाहेब वर्तक Polytechnic यांचा दिनांक २९/०५/२०१५ रोजीचा टेक्नीकल टेस्ट रिपोर्ट जोडण्यात आलेला आहे. काम दिनांक ०६/०६/२०१५ रोजी पूर्ण झालेले आहे. कामासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याचा दर्जा साहित्य कामात वापरण्यापूर्वी तपासणे आवश्यक आहे. तथापि अशा प्रकारे साहित्याची गुणवत्ता तपासल्याचे दिसून येत नाही.

9. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, परिशिष्ट २४ मध्ये नमूद केल्यानुसार मोजमाप पुस्तिका कामाच्या प्रगतीनुसार तारीखनिहाय लिहून साक्षांकित करणे आवश्यक आहे. तथापि महापालिकेने अशाप्रकारे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा (सुधारणा) अधिनियम, २०११ मधील कलम 6(3) अन्वये विहीत कार्यवाहीस्तव अर्धसमास ज्ञापन क्रमांक २८ दिनांक ०४/०१/२०१९ देण्यात आलेला आहे. सदर अर्धसमासपत्राचे अनुपालन विहित कालावधीत अनुपालन प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात आलेला आहे.

DATPRSM7301 (Ref No : 9, Hmm No : 28)

## *18 वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत विरार (प) मंगलमूर्ती अपार्टमेंटच्या समोरील मार्केटसाठी शेडचे बांधकाम करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 7**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

आक्षेपाधीन रक्कम रु. 6190773.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 61908.00/-

***महाराष्ट्र शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, शा.नि. क्रमांक सिएटी १०/२००६/प्र.क्र.१३३/इमारती-२ दिनांक ०२ नोव्हेंबर, २००६ नुसार सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद २०२ आणि शासन निर्णय क्रमांक सीएटी १०८७/सीआर ८२/इमारती-२. दिनांक ५ सप्टेंबर १९८८ अन्वये निविदेस व्यापक प्रमाणात प्रसिध्दी मिळालेली नाही. विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांची अधिसूचना दिनांक ०४/०४/२०१२ नुसार कंत्राटदाराकडून फरकाची १% रक्कम रुपये ६१,९०८/- वसूल करून शासन खाती भरणा करण्यात यावी. काम तीन महिने आधीच पूर्ण करण्यात आल्यामुळे काम कामाची गुणवत्ता व दर्जा राखून काम पूर्ण केल्याची खात्री लेखापरीक्षणास करता येत नाही. काम सुरु करण्यापूर्वीची पूर्व परिस्थिती दर्शविणारे छायाचित्रे नस्तीमध्ये दिसून येत नाही. कामाच्या ठिकाणी माहिती दर्शक फलक लावल्याचे छायाचित्र नस्तीस दिसून येत नाही. साहित्याची गुणवत्ता चाचणी साहित्य कामात वापरण्यापूर्वी करण्यात आल्याचे दिसून येत नाही. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, परिशिष्ट २४ मध्ये नमूद केल्यानुसार मोजमाप पुस्तिका लिहिण्यात आलेली नाही.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत विरार (प) मंगलमूर्ती अपार्टमेंटच्या समोरील मार्केटसाठी शेडचे बांधकाम करणे. |
| लेखाशीर्ष | नस्तीस दिसून येत नाही. |
| प्रशासकीय व वित्तीय मान्यता | वसई विरार शहर महानगरपालिका, स्थायी समिती सभा, ठराव क्रमांक १७२२ दिनांक १५/०२/२०१४. रक्कम रुपये ५९,९६,०५७/- |
| तांत्रिक मान्यता | शहर अभियंता, व.वि.श.म.न.पा. यांची मान्यता रुपये ५९,७८,३३१/- ५४/४७५, २०१३-१४ दिनांक १५/०२/२०१४. |
| निविदा प्रसिद्धीचा दिनांक व वृत्तपत्रे | १.ई-टेंडरिंग द्वारे निविदा प्रसिद्धी दिनांक १४/०२/२०१४, दिनांक १६/०२/२०१४ रोजी दै. मुंबई केसरी टाईम्स आणि दै. जागरूक टाईम्स वृत्तपत्रात प्रसिद्ध. प्रथम निविदा ८ दिवस<br>२. ई-टेंडरिंग द्वारे निविदा प्रसिद्धी दिनांक १४/०५/२०१४, दिनांक १६/०५/२०१४ रोजी दै. वार्ताहर आणि दै. महाराष्ट्र सम्राट वृत्तपत्रात प्रसिद्ध. द्वितीय निविदा १४ दिवस<br>३. ई-टेंडरिंग द्वारे निविदा प्रसिद्धी दिनांक १६/०६/२०१४, दिनांक १६/०६/२०१४ रोजी दै. मुंबई केसरी टाईम्स आणि दै. महाराष्ट्र टाईम्स वृत्तपत्रात प्रसिद्ध. तृतीय निविदा १० दिवस<br>४. ई-टेंडरिंग द्वारे निविदा प्रसिद्धी दिनांक ०१/०८/२०१४, दिनांक ०२/०८/२०१४ रोजी दै. मुंबई केसरी टाईम्स आणि दै. नवाकाळ वृत्तपत्रात प्रसिद्ध. चतुर्थ निविदा १९ दिवस |
| प्राप्त निविदांचा तपशील | M/S Smruti Enterprises, 4.99% above.<br>M/S. Hamid J Shaikh 19.50% above<br>M/S Sanjay Construction 15.00% above |
| मंजूर निविदा | M/S Smruti Enterprises रुपये ५९,७८,३३१/- ची निविदा ४.९९% जादा दराने मंजूर करण्यात आलेली आहे. |
| स्थायी समिती मान्यता | नस्तीस उपलब्ध नाही. |
| करारनामा | रक्कम रुपये ५९,७८,३३१/- मुद्रांक शुल्क ५४००/- करार कोणत्या तारखेस करण्यात आला ती तारीख करारावर नमूद नाही. |
| कार्यादेश | कार्यकारी अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका जा.क्र. व.वि.श.म./बांध/४०२१/१५ दिनांक २८/०१/२०१५ |
| कामाचा कालावधी | १५० दिवस |
| काम पूर्ण झाल्याचा दिनांक | २२/०३/२०१५ |
| काम पूर्ण करण्याचा कालावधी | २६/०६/२०१५ |
| कामाचा एकूण खर्च ४.९९% जादा धरून | ६१,९०,७७३/- |

वरील कामाबाबत खालीलप्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, शा.नि. क्रमांक सिएटी १०/२००६/प्र.क्र.१३३/इमारती-२ दिनांक ०२ नोव्हेंबर, २००६ नुसार सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद २०२ आणि शासन निर्णय क्रमांक सीएटी १०८७/सीआर ८२/इमारती-२. दिनांक ५ सप्टेंबर

१९८८ अन्वये प्रचलित असलेल्या नियमांनुसार निविदा सूचनेचा कालावधी ५० लाखापेक्षा जास्त किमतींच्या कामासाठी २५ दिवसांचा करण्यात आलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात प्रथम निविदा सूचनेचा कालावधी ७ दिवसांचा देण्यात आलेला आहे तसेच निविदा सूचना प्रसिद्ध केलेली वृतपत्रे हि नामांकित राज्यस्तरीय वृत्तपत्रे (दै. मुंबई केसरी टाईम्स आणि दै. जागरूक टाईम्स) नसल्यामुळे निविदेस व्यापक प्रमाणात प्रसिध्दी मिळालेली नाही. सबब महानगरपालिकेस स्पर्धात्मक दरांचा फायदा झालेला नाही.

2. विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांची अधिसूचना दिनांक ०४/०४/२०१२ नुसार अनोंदणीकृत कंत्राटदाराकडून वसूल करावयाच्या करामध्ये ४% वरून ५% अशी सुधारणा करण्यात आलेली आहे. प्रस्तुत प्रकरणात कंत्राटदाराकडून ४% प्रमाणे VAT वसूल करण्यात आलेला आहे सबब फरकाची १% रक्कम रुपये ६१,९०८/- वसूल करून शासन खाती भरणा करण्यात यावी.

3. कामाचे आदेश दिनांक २८/०१/२०१५ रोजी देण्यात आलेले आहेत. कामाचा कालावधी १५० दिवसांचा असून काम दिनांक २६/०६/२०१५ रोजी पूर्ण होणे अपेक्षित होते. तथापि काम मुदती पूर्वी तीन महिने आधीच म्हणजे दिनांक २२/०३/२०१५ रोजीच पूर्ण करण्यात आल्यामुळे काम कामाची गुणवत्ता व दर्जा राखून काम पूर्ण केल्याची खात्री लेखापरीक्षणास करता येत नाही.

4. करारनाम्यातील अट क्रमांक १६ नुसार सदर काम सुरु करण्यापूर्वीची पूर्व परिस्थिती दर्शविणारे छायाचित्रे नस्तीमध्ये दिसून येत नाही.

5. करारनाम्यातील अट क्रमांक २३ नुसार कामाच्या ठिकाणी माहिती दर्शक फलक लावल्याचे छायाचित्र नस्तीस दिसून येत नाही.

6. भावना सरदार पटेल कॉलेज ऑफ इंजिनियरिंग यांचे साहित्यचे गुणवत्ता चाचणी अहवाल नस्तीस जोडण्यात आलेले आहेत. साहित्याची गुणवत्ता चाचणी ११/०२/२०१५, १०/०४/२०१५, २६/०२/२०१५ आणि १०/०३/२०१५ रोजी केल्याचे अहवालात नमूद आहे. साहित्याची गुणवत्ता चाचणी साहित्य कामात वापरण्यापूर्वी करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

7. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, परिशिष्ट २४ मध्ये नमूद केल्यानुसार मोजमाप पुस्तिका कामाच्या प्रगतीनुसार तारीखनिहाय लिहून साक्षांकित करणे आवश्यक आहे. तथापि महापालिकेने अशाप्रकारे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा (सुधारणा) अधिनियम, २०११ मधील कलम 6(3) अन्वये विहीत कार्यवाहीस्तव अर्धसमास ज्ञापन क्रमांक ४४ दिनांक २३/०१/२०१९ देण्यात आलेला आहे. सदर अर्धसमासपत्राचे अनुपालन विहित कालावधीत अनुपालन प्राप्त न झाल्यामुळे परिच्छेद कायम करण्यात आलेला आहे.

DATPRSM7301 (Ref No : 10, Hmm No : 44)

## *19 महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोथान महाअभियान कार्यक्रमांतर्गत वसई विरार महानगरपालिकेसाठी वाढीव १०० द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेची (सूर्या) टप्पा -३ पाणी, पुरवठा योजना.*

वसई विरार महानगर पालिका

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 5**

*लेखा शीर्ष :310 महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 70310093.00/-

***शासन परिपत्रक क्रमांक जी.ए.व्ही. / १०८७ / सीए / १९६ / इमारत -२, दिनांक ०४/०५/१९८८ नुसार अंदाजपत्रकीय रकमेच्या ५% पेक्षा जास्त किमतीच्या निविदा स्वीकारण्यात आलेली आहे. प्रकल्प लेखापरीक्षणाच्या कालावधी पर्यंत अपूर्ण असल्यामुळे शासनाचे ९८.५५५५ कोटी आणि महापालिकेचे १०८.३६ कोटी प्रकल्पात अडकून पडलेले आहेत. तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोथान महाअभियान कार्यक्रमांतर्गत शासनाचा मूळ उद्देश काम अपूर्ण असल्यामुळे पूर्ण झलेला नाही. महाराष्ट्र सार्वजनिक नियम पुस्तिका, परिच्छेद क्रमांक २५१ नुसार जागेची मालकी महानगरपालिकेकडे नसतानाही निविदाप्रक्रिया पार पाडून कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र सार्वजनिक नियम पुस्तिका, परिशिष्ट २४ (१५), नुसार देण्यात आलेल्या सूचनांनुसार मोजमाप पुस्तिका लिहिण्यात आल्याचे दिसून येत नाही. कंत्राटदाराला दिलेल्या रुपये २९,६३,५३,८६६/- एवढे मोबिलायझेशन अग्रीमापैकी मार्च २०१६ अखेर एकूण देण्यात आलेल्या अग्रीमापैकी ७,०३,१०,०९३/- एवढे अग्रिम शिल्लक असल्याचे दिसून येते.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोथान महाअभियान कार्यक्रमांतर्गत वसई विरार महानगरपालिकेसाठी वाढीव १०० द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेची (सूर्या) टप्पा -३ पाणी, पुरवठा योजना. |
| लेखाशीर्ष | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोथान महाभियान |
| प्रकल्प मान्यता | महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक. नगरो-२०१३/प्र.क्र.३०७/नवि-३३, मंत्रालय दिनांक २५/११/२०१३ नुसार राज्यस्तरीय प्रकल्प मंजुरी व सनियंत्रण समितीने २६९.७८ कोटीच्या प्रकल्प अहवालास मंजुरी दिलेली आहे. |
| प्रशासकीय मान्यता | महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक. नगरो-२०१३/प्र.क्र.३०७/नवि-३३, मंत्रालय दिनांक २७/०१/२०१४ |
| वसई विरार शहर महानगरपालिकेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता | वसई विरार शहर महानगरपालिका, सर्वसाधारण सभा, ठराव क्रमांक १७ दिनांक १३/०८/२०१२ आणि ठराव क्रमांक १८ दिनांक १५/०९/२०१२ रुपये ३५०/- कोटीच्या खर्चास मान्यता. |
| तांत्रिक मान्यता | मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, पुणे यांची तांत्रिक मान्यता जा.क्र.मु.अ.(प्रव्यससे)/तांशा १/ १४०६ दिनांक ०८/०७/२०१३ रक्कम रुपये २५९,५५,३६,१५०/--. |

| | |
|---|---|
| निविदा प्रसिद्धीचा दिनांक व वृत्तपत्रे | ई टेंडर द्वारे निविदा प्रसिद्ध, निविदेचा कालावधी दिनांक २१/०१/२०१४ ते १४/०२/२०१४ २५ दिवस. निविदेची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २२६,२९,३४,२२४/-<br>निविदेची अंदाजपत्रकीय रक्कम<br>१. दै. टाइम्स ऑफ इंडिया, दिनांक २०१/०१/२०१४.<br>२. दैनिक सकाळ, दिनांक २०१/०१/२०१४.<br>३. दै. लोकमत, दिनांक २०१/०१/२०१४.<br>४. दै. महानगर, दिनांक २०/०१/२०१४ |
| प्राप्त निविदांचा तपशील | M/s Larson And Toubro, Chennai. अंदाजपत्रकापेक्षा ४५.७२% जास्त दराने.<br>M/s S. M. C. Infrastructure Pvt., LTD., Thane, अंदाजपत्रकापेक्षा जास्त दराने.<br>मे. घारपुरे इंजिनियरिंग, पुणे, अंदाजपत्रकापेक्षा ३९.६०% जास्त दराने. |
| मंजूर निविदा | मे. घारपुरे इंजिनियरिंग, पुणे, यांची निविदेची अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २२६,२९,३४,२२४/-पेक्षा ३०.९६% जादा दराने रुपये २९६,३५,३८,६६०/- ची निविदा मंजूर करण्यात आलेली आहे. |
| स्थायी समिती मान्यता | वसई विरार शहर महानगरपालिका, स्थायी समिती सभा ठराव क्र. १८९९ दिनांक २५/०२/२०१४. |
| करारनामा | करारनामा दिनांक २६/०२/२०१४, अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २२६,२९,३४,२२४/- पेक्षा ३०.९६% जास्त दराने, मुद्रांक शुल्क ५ लाख. |
| कार्यादेश | आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका जा.क्र. व.वि.श.म./का.अ./पापु/७११/१३-१४ दिनांक २६/०२/२०१४. |
| कामाचा कालावधी | १५ महिने |
| काम पूर्ण झाल्याचा दिनांक | काम अपूर्ण |
| काम पूर्ण करण्याचा कालावधी | २५/०५/२०१५ |
| प्रथम धावते देयक | ६३,४३,१५५/- |
| शासन अनुदान | १३४.८९५३ कोटी |
| प्राप्त शासन अनुदान | १. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक. नगरो-२०१३/प्र.क्र.३०७/नवि-३३, मंत्रालय दिनांक १७/०५/२०१४ नुसार रुपये ६७.४४७६ कोटी<br>२. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक. नगरो-२०१३/प्र.क्र.३०७/नवि-३३, मंत्रालय दिनांक १५/०९/२०१५ नुसार रुपये ३१.१०७८ कोटी |
| सन २०१५-२०१६ पर्यंत झालेला खर्च | २०६.९१ कोटी |
| मोबिलायझेशन अग्रिम | २९,६३,५३,८६६/- |

वरील कामाबाबत खालीलप्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

1. मे. घारपुरे इंजिनियरिंग, पुणे, यांची अंदाजपत्रकिय किमतीपेक्षा ३०.९६% जादा दराने रुपये २९६,३५,३८,६६०/- ची निविदा स्वीकारण्यात आलेली आहे. चालू दराशी तुलना करता सदर निविदा अंदाजपत्रकिय किमतीच्या १८% पेक्षा जास्त दराची आहे. शासन परिपत्रक क्रमांक जी.ए.व्ही. / १०८७ / सीए / १९६ / इमारत -२, दिनांक ०४/०५/१९८८ नुसार अंदाजपत्रकीय रकमेच्या ५% पेक्षा जास्त किमतीच्या निविदा स्वीकारण्यात येऊ नयेत असे आदेश आहेत.

2. महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या एकूण १३४.८९५३ कोटी इतक्या निधी पैकी केवळ ९८.५५५५ कोटी एवढा निधी लेखापरीक्षण कालावधीपर्यंत प्राप्त झाल्याचे दिसून येते. प्रकल्प लेखापरीक्षणाच्या कालावधी पर्यंत अपूर्ण असल्यामुळे शासनाचे ९८.५५५५ कोटी आणि महापालिकेचे १०८.३६ कोटी प्रकल्पात अडकून पडलेले आहेत. तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोथान महाअभियान कार्यक्रमांतर्गत शासनाचा मूळ उद्देश काम अपूर्ण असल्यामुळे पूर्ण झलेला नाही.

3. महाराष्ट्र सार्वजनिक नियम पुस्तिका, परिच्छेद क्रमांक २५१ नुसार "जबाबदार नागरी अधिकाऱ्याने रीतसर हस्तांतरित न केलेल्या कोणत्याही जमीनीवर काम सुरु करू नये. जेव्हा एखाद्या बांधकामासाठी निविदा स्वीकारण्यात येतात, परंतु त्यासाठी लागणारी जमीन संपादित करावयाची असते, तेव्हा, प्रत्यक्ष काम सुरु करण्याचे आदेश देण्यापूर्वी जमीन संपादित करण्यास किती कालवधी धरावा याबाबत निश्चित माहिती करून घ्यावी. प्रकल्पास आवश्यक १८ किलोमीटर जमीन हि वन विभागाच्या अखत्यारीत असून सदर जमीन लेखापरीक्षण वर्षात वन विभागाकडून संपादित करण्यात आलेली नाही. ६ किलोमीटरची जागा हि मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गातून जात असून आवश्यक परवानगी लेखापरीक्षण वर्षात प्राप्त नाही. तसेच राष्ट्रीय महामार्ग आणि रेल्वे क्रॉसिंगसाठी आवश्यक परवानग्या लेखापरीक्षण वर्षात प्राप्त करून घेण्यात आलेल्या नाहीत. सदर जागेची मालकी महानगरपालिकेकडे नसतानाही निविदाप्रक्रिया पार पाडून कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आलेले आहेत. कंत्राटदारास नमूद जागांचा ताबा दिलेला नसल्यामुळे प्रस्तावित काम हे लेखापरीक्षणाच्या दिनांकापर्यंत अपूर्ण अवस्थेत आहे.

4. महाराष्ट्र सार्वजनिक नियम पुस्तिका, परिशिष्ट २४ (१५), नुसार ज्यावेळी बिलाची रक्कम विभागीय कार्यालयामध्ये दिली जाते, त्यावेळी कार्यकारी अभियंता व विभागीय लेखापाल या दोघांनी न चुकता तारखेनिशी अद्याक्षरी केलेली असावी. तसेच बिल समंत करण्यात आले त्या प्रमाणकाचा क्रमांक व दिनांक दर्शविणारे मुखांकन लाल शाई मध्ये करण्यात यावे. महाराष्ट्र सार्वजनिक नियम पुस्तिका, परिशिष्ट २४ मध्ये देण्यात आलेल्या सूचनांनुसार मोजमाप पुस्तिका लिहिण्यात आल्याचे दिसून येत नाही.

5. कंत्राटदाराला रुपये २९,६३,५३,८६६/- एवढे मोबिलायझेशन अग्रिम अदा करण्यात आलेले आहे. निविदा अटी व शर्ती नुसार दिलेल्या अग्रीमापोटी देयकातून २५% रक्कम व्याजासह वसूल करणे आवश्यक आहे. तथापि मे. घारपुरे इंजिनियरिंग, पुणे यांनी दिलेले पत्र दिनांक २०/०८/२०१४, पाणीपुरवठा विभागाकडील टिपणी दिनांक २९/१०/२०१४ आणि स्थायी समिती सभा ठराव क्रमांक १०७१ दिनांक २४/११/२०१४ नुसार देयकातून व्याजासह वसूल करावयाची अग्रीमाची रक्कम २५% वरून १०% अशी करण्यात आली. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता, प्रकरण १०, बांधकाम लेखे "घ" कंत्राटदाराना आगाऊ रकमा देणे, परिच्छेद १०.२.२१, १०.२.२२ अन्वये नियमानुसार कंत्राटदाराला आगाऊ रकमा देण्यास मनाई आहे. जागेवर आणलेल्या सामानाच्या मूल्याच्या ७५% पेक्षा अधिक

नसेल इतक्या आगाऊ रकमा मंजूर करता येतील, त्यासाठी ठेकेदाराने जागेवर आणलेल्या सामानाची नोंद मोजमाप पुस्तकात घेऊन त्याच्या प्रमाणात अग्रिम दिल्याची नोंद घेणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने सदर आदेशांचे उल्लंघन करून वित्तीय औचित्याचा भंग केल्याचे दिसून येते. पहिल्या धावत्या देयकातून निविदा अटी व शर्तीनुसार अग्रीमाची व्याजासह वसुली केल्याचे दिसून येत नाही. तसेच लेखापरीक्षण कालावधीतील अदा करण्यात आलेल्या धावत्या देयकातून नियमित व्याज वसूल केल्याचे दिसून येत नाही. मार्च २०१६ अखेर एकूण देण्यात आलेल्या अग्रीमापैकी ७,०३,१०,०९३/- एवढे अग्रिम शिल्लक असल्याचे दिसून येते. पुढील कार्यवाही लेखापरीक्षणास अवगत करावी.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा (सुधारणा) अधिनियम, २०११ मधील कलम 6(3) अन्वये विहीत कार्यवाहीस्तव अर्धसमास ज्ञापन क्रमांक ७४ दिनांक ०६/०२/२०१९ देण्यात आले होते. सदर अर्धसमासपत्राचे अनुपालन विहित कालावधीत प्राप्त न झाल्याने परिच्छेद कायम करण्यात आलेला आहे.

DATPRSM7301 (Ref No : 89, Hmm No : 74)

## *20 वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती - ब, पेल्हार क्षेत्रातील साईनाथनगर ते तुनसी नगर पर्यंतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 6**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

***ठेकेदारास कामाचे आदेश दिनांक ३०/१०/२०१३ रोजी देण्यात आलेले आहेत. मे. अस्फाल्ट इंडिया कॉर्पोरेशन यांचा कामाचा परवाना महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या नोंदणी प्रमाणपत्राची वैधता दिनांक १६/०८/२०१३ रोजी संपुष्टात आलेली आहे. कामास प्रशासकीय आणि वित्तीय मान्यता दिल्यानंतर १० महिने विलंबाने कामाचे आदेश देण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, परिशिष्ट २४ मध्ये नमूद केल्यानुसार मोजमाप पुस्तिका लिहिण्यात आलेली नाही. निविदा अटी व शर्ती नुसार ४% अनामत रक्कम रुपये ३,०९,७००/- FDR च्या स्वरुपात भरल्याचे अभिलेख नस्तीमध्ये दिसून येत नाही.***

| | |
|---|---|
| कामाचे नाव | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती – ब, पेल्हार क्षेत्रातील साईनाथनगर ते तुनसी नगर पर्यंतचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे |
| लेखाशीर्ष | रस्ता बांधकाम |

| | |
|---|---|
| प्रशासकीय व वित्तीय मान्यता | वसई विरार शहर महानगरपालिका, स्थायी समिती सभा, ठराव क्रमांक ७९६ दिनांक १८/०१/२०१३. रक्कम रुपये ७४,७०,७१८/- |
| तांत्रिक मान्यता | रुपये ७३,७२,२२२/- २३/२० सन २०१२-२०१३ दिनांक २१/०१/२०१३ |
| निविदा प्रसिद्धीचा दिनांक व वृत्तपत्रे | २८/१२/२०१३ दैनिक लोकमत व दैनिक जागल्या |
| प्राप्त निविदांचा तपशील | M/S N A Construction 9.99% above.<br>M/S kanchan Construction Co. 8.99% above<br>M/S Asphalt India Corporation 4.99% above |
| मंजूर निविदा | मे. अस्फाल्ट इंडिया कॉर्पोरेशन |
| स्थायी समिती मान्यता | वसई विरार शहर महानगरपालिका, स्थायी समिती सभा, ठराव क्रमांक १०२ दिनांक २६/०४/२०१३. |
| करारनामा | रक्कम रुपये ७३,७२,२२२/- मुद्रांक शुल्क ६९००/- मुद्रांक शुल्क भरल्याचा दिनांक १७/०६/२०१३ |
| कार्यादेश | कार्यकारी अभियंता, वसई विरार शहर महानगरपालिका जा.क्र. व.वि.श.म./बांध/२०६७/२०१३-२०१४, दिनांक ३०/१०/२०१३ |
| कामाचा कालावधी | २४० दिवस |
| काम पूर्ण झाल्याचा दिनांक | ०२/०२/२०१५ |
| काम पूर्ण करण्याचा कालावधी | २६/०६/२०१४ |

वरील कामाबाबत खालीलप्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

1. ठेकेदारास कामाचे आदेश दिनांक ३०/१०/२०१३ रोजी देण्यात आलेले आहेत. मे. अस्फाल्ट इंडिया कॉर्पोरेशन यांचा कामाचा परवाना महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या नोंदणी प्रमाणपत्राची वैधता दिनांक १६/०८/२०१३ रोजी संपुष्टात आलेली आहे. पुढील कालावधीच्या वैधतेचे प्रमाणपत्र नस्तीस उपलब्ध नाही.

2. कामास प्रशासकीय आणि वित्तीय मान्यता दिनांक १८/०१/२०१३ रोजी देण्यात आलेली आहे परंतु प्रत्यक्ष कामाचे कार्यादेश मात्र १० महिने विलंबाने देण्यात आलेले आहेत.

3. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका, परिशिष्ट २४ मध्ये नमूद केल्यानुसार मोजमाप पुस्तिका कामाच्या प्रगतीनुसार तारीखनिहाय लिहून साक्षांकित करण्या आवश्यक आहे. तथापि महापालिकेने अशाप्रकारे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

4. कामाचा करारनामा करण्यात आलेला आहे तथापि करारनामा कोणत्या तारखेस करण्यात आला याची नोंद करारनाम्यात करण्यात आलेली नाही.

5. निविदेस वसई विरार शहर महानगरपालिका, स्थायी समिती सभा, ठराव क्रमांक १०२ दिनांक २६/०४/२०१३ नुसार मान्यता दिल्याचे नमूद आहे तथापि सदरचा ठराव नसतीस दिसून येत नाही.

6. निविदा अटी व शर्ती नुसार ४% अनामत रक्कम रुपये ३,०९,७००/- FDR च्या स्वरुपात भरल्याचे अभिलेख नस्तीमध्ये दिसून येत नाही.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा (सुधारणा) अधिनियम, २०११ मधील कलम 6(3) अन्वये विहीत कार्यवाहीस्तव अर्धसमास ज्ञापन क्रमांक २४ दिनांक ०४/०१/२०१९ देण्यात आले होते. सदर अर्धसमासपत्राचे अनुपालन विहित कालावधीत प्राप्त न झाल्याने परिच्छेद कायम करण्यात आलेला

आहे.

DATPRSM7301 (Ref No : 90, Hmm No : 24)

## *21 वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नवघर माणिकपूर प्रभाग समितीमधील दिवाणमान-७ येथील पश्चिम रेल्वेच्या एकूण १३ इमारतीवर आकारण्यात आलेला कर थकीत असल्याबाबत.*

**वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नवघर माणिकपूर प्रभाग समितीमधील दिवाणमान-७ येथील पश्चिम र**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 1**

*महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ब*

वसूलपात्र रक्कम रु. 8465947.00/-

***वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नवघर माणिकपूर प्रभाग समितीमधील दिवाणमान-७ येथील पश्चिम रेल्वेच्या एकूण १३ इमारतीवर आकारण्यात आलेला एकूण ८४,६५,९४७/- रुपये सेवाशुल्क कर आणि पाणीपट्टी कर थकीत आहे.***

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात नवघर माणिकपूर प्रभाग समितीमध्ये दिवाणमान-७ येथे पश्चिम रेल्वेच्या एकूण १३ इमारती असून वसई विरार शहर महानगरपालिकेने सदर इमारतीवर सन २००१-२००२ पासून सेवा शुल्क कर आणि पाणीपट्टी कराची आकारणी करून रेल्वे प्रशासनास कर भरणा करण्याबाबत वेळोवेळी रेल्वे प्रशासनास कळविलेले आहे. तथापि लेखापरीक्षणाच्या दिनांक पर्यंत सदर करांचा भरणा रेल्वे प्रशासनाने केलेला नसल्याने महानगरपालिकेचे नुकसान झालेले आहे. तपशील खालीलप्रमाणे.

१) सेवाशुल्क

| अ.क्र. | मालमत्ता क्रमांक | मालमत्ता धारकाचे नाव | एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| १ | VN30/18464 | पश्चिम रेल्वे इमारत | ४,७८,०४४/- |
| २ | VN30/18465 | पश्चिम रेल्वे इमारत | ४,७८,०४४/- |
| ३ | VN30/18466 | पश्चिम रेल्वे इमारत | ४,७८,०४४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | VN30/18467 | पश्चिम रेल्वे इमारत | ३,१७,४४८/- |
| ५ | VN30/18468 | पश्चिम रेल्वे इमारत | ६,३४,८७५/- |
| ६ | VN30/18469 | पश्चिम रेल्वे इमारत | ६,३४,८७५/- |
| ७ | VN30/18470 | पश्चिम रेल्वे इमारत | ६,३४,८७५/- |
| ८ | VN30/18471 | पश्चिम रेल्वे इमारत | ६,३४,८७५/- |
| ९ | VN30/18472 | पश्चिम रेल्वे इमारत | ६,३४,८७५/- |
| १० | VN30/18473 | पश्चिम रेल्वे इमारत | ६,३४,८७५/- |
| ११ | VN30/18474 | पश्चिम रेल्वे इमारत | ६,३४,८७५/- |
| १२ | VN30/18475 | पश्चिम रेल्वे इमारत | ८,४७,१२१/- |
| १३ | VN30/18476 | पश्चिम रेल्वे इमारत | ८,४७,१२१/- |
| | एकूण | | ७८,८९,९४७/- |

२) पाणीपट्टी

| अ.क्र. | नळ कनेक्शन | मालकाचे नाव | एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| १ | १५८६ ते १५८९ | रेल्वे स्टेशन वसई रोड पि.आर.एस.बुकिंग ऑफिस, नवघर | २,८८०००/- |
| २ | १९८४ ते १९९६ | सिनियर डीव्हीजनल इंजिनीअर पश्चिम रेल्वे | २,८८,०००/- |
| | एकूण | | ५,७६०००/- |
| | एकूण वसूलपात्र रक्कम | सेवाशुल्क + पाणीपट्टी | ८४,६५,९४७/- |

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा (सुधारणा) अधिनियम, २०११ मधील कलम 6(3) अन्वये विहीत कार्यवाहीस्तव अर्धसमास ज्ञापन क्रमांक ६४ दिनांक ०५/०२/२०१९ देण्यात आले होते. सदर अर्धसमासपत्राचे अनुषंगाने विभागाने सादर केलेल्या नस्तीवरून सदर परीच्छेद अंतिम करण्यात आलेला आहे.

# कलम ९ क खालील आक्षेप

लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक असतानाही लेख्यात दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम

**-------------------- निरंक --------------------**

# भाग दोन

# सर्वसाधारण अनियमितता

# कलम ९ ड खालील आक्षेप

खंड अ,ब,क मध्ये नमूद केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी

## *22 चंदनसार दैनंदिन घाऊक बाजार कर वसुल करणे याबाबतचा ठेक्यातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 2543802.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2543802.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 90643.00/-

***बाजार ठेक्याची निश्चितरक्कम विलंबाने जमा, आधारभूत रक्कम निश्चित न करता निविदाप्रक्रिया, बाजार क्रं. 1 ची नस्ती लेखापरिक्षणास उपलब्ध करुन न देणे.***

| | |
|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम रु. | बाजार-1 रु.11,30,342/- , बाजार-2 रु.14,13,460/- |
| प्रशासकीय मान्यता | मा.स्थायी समिती ठराव क्र.1625 दि.11/3/2015 |
| ई निविदा प्रसिध्दी दिनांक | 26/3/2015 |
| ई निविदा कालावधी | दि.26/3/2015 ते 1/4/2015 |
| ई निविदा स्विकृती दिनांक | 4/4/2015 दु.5.00 पर्यत उघडण्याची तारीख 6/4/15 सायंकाळी 5.00 |
| प्राप्त ई निविदा | बाजार -1 -7 निविदा, बाजार -2 -7 निविदा |
| न्युनतम ई निविदाकार | बाजार -1 - श्री.मंदार बंडु पिंपळे रु.20,21,000/- ,<br>बाजार - 2 - श्री.मेहुल वर्तक रु.20,21,000/- |

सन 2015-16 मध्ये प्रभाग समिती (ब) पेल्हार कार्यक्षेत्रातील दैनंदिन बाजार कर वसुल करणेकामी श्री .मंदार बंडु पिंपळे व श्री .मेहुल वर्तक यांना ठेका मंजुर करण्यात आला आहे . त्याबाबत खालील प्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहेत.

1) वरील ठेक्या अंतर्गत मंजुर रकमेच्या स्वीकृत करारनाम्याप्रमाणे टप्प्यानिहाय रक्कम जमा

करणे आवश्यक असतांना खालील प्रमाणे विलंबाने रक्कमा जमा केल्या आहेत.
स्वीकृत निविदा रक्कम रु.20,21,000/-

| अ.क्र | पहिला टप्पा | दुसरा टप्पा | तिसरा टप्पा | चौथा टप्पा |
|---|---|---|---|---|
| | कार्यादेशानंतर त्वरीत 25% दि.24/4/2015 | देय तारीख 1 ऑगस्ट 15 | 1 नोव्हें-15 | 1 जानेवारी-15 |
| | रु.505250/- | 7/1/2016 रोजी भरणा | 29/2/16 रोजी भरणा | 17/3/2016 रोजी भरणा |
| | 69448/- सेवा कर 12.36% × 18% | रु.567609/- 5 महिने 7 दिवस विलंब × 18% | रु.567699/- 4 महिने विलंब × 18% | रु.567699/- 2 महिने 17 दिवस विलंब × 18% |
| एकुण | 567698/- | 42577/- | 34035/- | 17031/- |
| | | एकुण 90643/- | | |

रु.90643/- वसुलपात्र असुन कंत्राटदाराने सदर रक्कम विहीत कालावधीत भरणा न केल्याने स्वत:जवळ ठेवुन महापालिकेचे वित्तीय नुकसान केले आहे.

2. बाजार क्र.2 चंदनसार दैनंदिन घा ऊक बाजार अपेक्षीत रक्कम रु .14,13,460/- दर्शविण्यांत आली असुन ती बेस रक्कम घेवुन निविदा प्रसिध्द केली आहे ती घेतांना प्रत्यक्ष बाजार फी किती वसुल होईल याबाबत कोणतीही सांखिकी माहिती अथवा सर्वेक्षण केल्याचे लेखा परिक्षणात आढळुन आले नाही. त्यामुळे टेंडर बेस व्हल्यु अचुक असल्याबाबत लेखा परिक्षणात खात्री करता आली नाही.
3. बाजार क्र.1 बिलालपाडा, धानिव, पेल्हार, चंदनसार व शिरसाड दैनंदिन बाजार ठेका धारिका उपलब्ध करण्यांत आली नाही ती उपलब्ध करुन देण्यांत आली नाही.

वसुलपात्र रक्कम रु.90,643/-

उपरोक्त आक्षेपांबाबत अर्धसमास पत्र क्रं . 109 दि. 18/04/2019 देण्यात आले होते, परंतु विहीत कालावधीत आक्षेपाचे निराकरण न केल्याने परिच्छेद कायम.

DATPGWM6201 (Ref No : 12, Hmm No : 109)

## *23 एकाकी ज्येष्ठ निराधार वय वर्ष 65 वरील महीलेच्या उपजिविकेकरिता मासिक अर्थसहाय्य देणे बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 408000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 408000.00/-

***वसई विरार शहर महापनगरपालिकेने पालिका क्षेत्रातील एकाकी जेष्ठ निराधार वय वर्ष 65 वरील महिलांना लाभ देणे अनुषंगाने एकूण किती लाभार्थींना या योजनेचा लाभ दिला त्याची सांख्या नस्तीवर उपलब्ध नाही. लाभार्थींसाठी विहित केलेल्या अटी / शर्तीची पूर्तता झाल्याचे आढळून येत नाही.***

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सन 2015-16 या वर्षाच्या महिला बाल कल्याण विभागाच्या लेखापरिक्षणात विविध योजनांच्या नस्तींचे लेखापरिक्षणात एकाकी जेष्ठ निराधार वय वर्ष 65 वरील महिलेच्या उपजिविके करिता अर्थसहाय्य देण्याबाबत प्रस्तावित असुन सदर योजनेतंर्गत ज्या जेष्ठ महिलांचे पती अथवा मुले किंवा इतर कोणत्याही नातेवाईकांचा महिलांना आधार नाही अशा वय वर्षे 65 वरील एकाकी जेष्ठ महिलांना या योजनेचा लाभ देण्याचे सर्वसाधारण सभा ठराव क्रमांक 9 सुचना क्रमांक 4 दि.12/8/2014 अन्वये घेण्यात आला आहे. सदर योजनेत पात्र लाभार्थीस एकरकमी बारा महिन्यांचे अनुदान देण्यात यावे. याकरिता अटी-शर्ती तयार करुन अर्ज तयार करण्यात यावे. 65 वर्षावरील निराधार महिलांना या योजनेचा लाभ देण्यात यावा .ही योजना कायम स्वरुपी राबवावि या धोरणात्मक निर्णायस मंजुरी देत असुन या कामी अंदाजे रु.60,00,000/- खर्चास ही सभा मान्यता देत आहे असा निर्णय उपरोक्त सर्वसाधारण सभेत घेण्यात आला आहे . वसई विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीतील जेष्ठ निराधार महिलांच्या उपजिविकेकरिता मासिक अर्थसहाय्य ही योजना लागु केली असुन सन 2015-16 या वर्षात सदर योजनेचा लाभ दिलेल्या लाभार्थिंची नस्ती लेखापरिक्षणास उपलब्ध झाली असुन सदर नस्तीवर खालील प्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

1. सन 2015-16 मध्ये सदरच्या योजनेचा लाभ देण्यात आला असुन एकुण किती लाभार्थींना या योजनेचा लाभ देण्यात आला यांची संख्या नस्तीत उपलब्ध नसल्याने एकुण , पात्र व अपात्र लाभार्थींच्या संख्येची लेखा परिक्षणात खातरजमा करता आली नाही.

2. विभागाने विहीत केलेल्या अर्जातील अटी शर्तीची पुर्तता केली असल्याचे लाभार्थींच्या अर्जावर अथवा नस्तीमध्ये आढळुन येत नाही . त्यामुळे सर्व लाभार्थी पात्र होते याची लेखापरिक्षणात खात्री करता आली नाही.

3. विहीत केलेल्या अटी व शर्ती मधील अट क्रमांक 6 मध्ये महापालिकेने निर्धारित केलेल्या बॅकेत खाते उघडणे बंधणकारक राहील अशी अट नमुद करण्यात आली आहे तथापि, सदरची निर्धारित केलेली बॅक कोणती आहे याचा बोध होत नाही . तसेच नस्तीमध्ये उपलब्ध असलेल्या लाभा थींच्या

अर्जासोबत बॅसीन कॅथलिक को .ऑप.बॅक लि., बॅक ऑफ इंडिया, माणिकपुर को.ऑप.क्रेडिट सोसा.लि., बॅक ऑफ महाराष्ट्र , सिडीकेट बॅक इत्यादी बॅकेत खाती असल्याचे आढळुन येते . त्यामुळे महानगरपालिकेने विहीत केलेल्या अट क्रमांक 6 ची पुर्तता झाली नाही.

4. धनादेश क्रमांक 072601 ते 072617 एकुण 17 धनादेशान्वये मासिक रु. 2000 प्रमाणे प्रत्येक लाभार्थीस रु . 24,000/- अदा केले आहेत . तथापि, धनादेश अदा केल्यानंतर लाभार्थीच्या स्वाक्षरी घेतल्याचे आढळुन येत नाही . त्यामुळे धनादेश संबंधीत लाभार्थीस प्रदान केल्याची लेखापरिक्षणात खात्री करता आली नाही.

सदर आक्षेपाबाबत अर्धसमास ज्ञापन क्र . 137 दि. 06/07/2019 अन्वये विभागास अनुपानन सादर करणेविषयी सुचित करण्यात आले होते . तथापि, विभागाने विहित मुदतीत अनुपान सादर न केल्याने सदरचा परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATPGWM6201 (Ref No : 13, Hmm No : 137)

## *24 महापालिकेने उपलब्ध केलेल्या अंदाजे तीन लक्ष रोपांचे महापालिका निर्देश देईल त्या ठिकाणी वृक्षरोपण करुन तीन वर्षापर्यत संगोपन करणे कामातील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 117069152.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 117069152.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 29967646.00/-

***निश्चित कराराप्रमाणे प्रथम त्रैमासिकामध्ये लागवड करणे आवश्यक असलेली झाडांची लागवड न करता नियमबाहय प्रदान, कराराप्रमाणे विहीत कालावधीत झाडांची लागवड न केल्याने रु. 29967646 नियमबाहय प्रदान, झाडे जिवंत असल्याचे प्रमाणित न करता प्रदान, कोणत्या प्रकारची व किती झाडे लागवड करण्यात आली याबाबतची माहिती नस्तीवर उपलब्ध नसणे, रस्त्याच्या दुतर्फा लावलेल्या झाडांना संरक्षणार्थ लोखंडी जाळया ट्री गार्ड व संरक्षक कुंपन लावल्याबाबत नस्तीवरुन खात्री झाली नाही,***

| | |
|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम रु. | 11,73,00,000/- |
| लेखाशिर्ष | नागरी वनीकरण |
| प्रशासकीय मान्यता | महासभा ठराव क्र.24 दि.20/1/2014 |
| तांत्रिक मान्यता | शहर अभियंता पत्र क्र.27/229 दि.6/3/2013 |

| | |
|---|---|
| निविदा सुचना | 10/2/2014 |
| प्राप्त निविदा | तीन |
| न्युनतम निविदाकार | मे.हिरावती एन्टरप्रायझेस |
| कार्यादेश | जा.क्रं.वृक्षप्राधिकरण/427 दि.4/3/2014 |
| कामाची कालावधी | 3 वर्ष कार्यादेशापासुन |

सदर योजनेवर सन 2015-16 मध्ये रु. 11,70,69,152/- एवढा खर्च नोंदविला आहे.

सदर कामाच्या स्विकृत निविदा अटी व शर्ती नुसार अंदाजे 3.00 लक्ष झाडे लावणे व संगोपनासह पुढील 3 वर्षासाठी खालील बाब निहाय दर स्विकृत करण्यांत आलेले आहेत.

1. सार्वजनिक रस्त्याचे दुतर्फा वृक्ष लागवड रु. 1395/- प्रती वृक्ष
2. सार्वजनिक स्मशानभुमी,उद्याने,सरोवर,धार्मिक स्थळे इत्यादी मोकळया जागेवर गट लागवड रु.1090/- प्रति वृक्ष
3. शासकीय/निमशासकीय मोकळया जमिनीवर वृक्ष लागवड रु. 900/- प्रती वृक्ष

वरील मंजुर दरातील स्विकृत निविदेतील अट क्र.7 प्रमाणे खालील प्रमाणे प्रदान निश्चित केलेले आहे.

अ) प्रथम वर्ष - कार्यादेश दिल्यानंतर लावलेल्या झाडांचे 35 % दराप्रमाणे रक्कम अदा करण्यांत येईल व त्यापुढील दर तीन महिन्यांनी झाडांची तपासणी अंती 5% दराप्रमाणे रक्कम अदा करण्यांत येईल (प्रथम वर्षात एकुण 50 % रक्कम) लावलेल्या झाडांपैकी 80 % झाडे जगविल्यानंतरच पुढील देयकांची मागणी करता येईल.

ब) व्दितीय वर्ष - व्दितीय वर्षामध्ये दर 3 महिन्यांनी 9 महिन्यांपर्यत 5% व 12 महिन्यानंतर 10% प्रमाणे रक्कम अदा करणेत येईल (व्दितीय वर्षात एकुण 25%)

क) तृतीय वर्ष - जिवंत झाडाच्या संखेप्रमाणे देयक अदा केले जाणार असुन पुर्वीच्या टप्यात लावलेल्या परंतु पुढील टप्यात जिवंत नसलेल्या रोपांसाठी केलेले प्रदान ठेकेदाराकडुन वसुलपात्र असेल व 3 वर्ष पुर्ण झाल्यानंतर उर्वरित 25 % देयक अदा करण्यांत येईल.

सन 2015-16 मध्ये सदर योजनेवर 11,70,69,152/- एवढा खर्च केला आहे त्याबाबत खालील आक्षेप नोंदविण्यात येत आहेत.

1. निविदा तरतुदीनुसार कार्यादशानंतर प्रथम तिमाहीत 3 लक्ष झाडे लावणे आवश्यक असुन त्यानुसार 35% दराप्रमाणे रक्कम अनुज्ञेय ठरते. परंतु तशा प्रकारे 3 लक्ष झाडे कार्यादेश दि.4/3/2014 पासुन दि.30/6/2014 पर्यत वरील प्रमाणे बाब निहाय स्थळावर कोणत्या प्रकारची झाडे लावली याबाबतचे नोंदवही तपशील लेखे लेखापरिक्षणात उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे महापालिकेने अदा केलेले 35% दराची रक्कम कोणत्या आधारे कंत्राटदारास प्रदान केली याबाबत लेखापरिक्षणात खात्री करता आली नाही.

| अ.क्र. | लागवड दिनांक | | प्रमाणक क्रं दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | 8/7/14 ते 20/7/14<br>1. रस्त्याचे दुतर्फा<br>2. सार्व.स्मशानभुमीतील उद्याने | <br>1160×488.85<br>6082×381.50 | 63 दि.31/1/2016 | 2886653 |
| | | 7242 | | |
| 2 | 7/7/14 ते 31/7/14 | | 58 दि.8/5/15 | 2918856 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | 1. सार्व.स्मशानभुमी उद्याने | 7651×381.50 | | |
| 3 | 25/7/14 ते 2/8/14<br>1. गट लागवड | 6217×315.00 | 108 दि.8/5/15 | 2588355 |
| 4 | 8/7/15 ते 22/8/14<br>1. सार्व.रस्त्याचे दुतर्फा | 17582×488.25 | 38 दि.8/5/15 | 8584411 |
| 5 | 17/7/14 ते 28/7/14<br>1. गट लागवड | 16804×315 | 88 दि.8/5/15 | 5293260 |
| 6 | 4/8/14 ते 13/8/14<br>1. सार्व.स्मशानभुमी | 9533×381.50 | 68 दि.8/5/15 | 3636839 |
| 7 | 4/8/14 ते 8/8/14<br>1. सार्व.रस्त्याचे दुतर्फा | 4940×488.25 | 48 दि.8/5/15 | 2411955 |
| 8 | 18/8/14 ते 13/8/14<br>2) सार्व.स्मशानभुमी | 4318×381.50 | 98 दि.8/5/15 | 1647317 |
| | | | एकुण | 29967646 |

वरील तपशीलाप्रमाणे एकुण 84287 झाडाचे लागवडीचे देयक कार्यादेशानंतर पहिल्या तिमाहीत लागवड करणे आवश्यक असतांना ती पहिल्या तिमाही नंतर जुलै-ऑगस्ट-2014 मध्ये केल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे पहिल्या तिमाहीत मंजुर करारनाम्यातील अट क्र.7 नुसार 35 % रक्कम वरील प्रमाणे अनुज्ञेय नाही ती रक्कम रु.2,99,67,646/- वसुल करुन महानगरपालिका निधीत भरणा करुन पुर्तता दर्शवावी. सदर लागवड भर पावसाळयात अतिवृष्टी कालावधीत केल्यामुळे किती झाडे जिवंत राहिली याबाबत सांखिकी माहिती लेखापरिक्षणात सादर करावी. तसेच त्यापुढील कालावधीतील 5% दराची रक्कम अदा करतांना मागील तिमाही लावलेल्या झाडाची तपासणी केल्यानंतर पुढील तिमाहीची 5% दराची रक्कम अनुज्ञेय ठरते त्याप्रमाणे मागील तिमाही लावलेल्या झाडांची संख्या व त्यामधील जिवंत झाडांची संख्या याबाबतचा कोणताही अहवाल किंवा सांखिकी माहिती लेखापरिक्षणात उपलब्ध झाले नाही त्यामुळे पुढील तिमाहीत झालेले 5% दराचे प्रदानाबाबत लेखा परिक्षणात खात्री करता आली नाही.

2. पुढील तिमाहीतील झालेल्या प्रदानाबाबत असे निदर्शनास येते कि कंत्राटदाराने सादर केलेल्या देयकाप्रमाणे प्रदान करण्यांत आलेले आहे व प्रत्यक्षात मागील तिमाहीतील किती झाडे जिवंत आहेत याबाबत कोणतेही सांखिकी माहिती लेखापरिक्षणात उपलब्ध झाली नाही. त्यामुळे किती झाडे जिवंत आहेत याबाबत लेखापरिक्षणात खात्री करता आली नाही त्यामुळे प्रत्यक्षात झाडे जिवंत नसल्यास त्यांची वसुली कंत्राटदाराकडुन होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने महापालिकेमार्फत कोणताही आढावा घेतल्याचे लेखापरिक्षणात दिसुन येत नाही. त्याबाबत समर्थनीय अनुपालन सादर करावे.

3. महापालिका निर्देश देईल त्या ठिकाणी झाडे लावण्याबाबत तरतुद आहे परंतु त्याप्रमाणे केव्हा व कोणत्या संदर्भाव्दारे कोणती व किती झाडे लागवड करण्याबाबत कत्राटदारांना आदेशीत केले त्याबाबत माहिती लेखापरिक्षणात उपलब्ध झाली नाही त्यामुळे योग्य त्या मापदंडानुसार व्यवहार्य जागेवर लागवड झाल्याचे लेखापरिक्षणात तपासणी करता आली नाही.

4. रस्त्याच्या दुतर्फा लावलेल्या झाडांना संरक्षणार्थ लोखंडी जाळया ट्री गार्ड व संरक्षक कुंपन लावणे बंधनकारक आहे त्याप्रमाणे जेवढी झाडे लावली त्यांना स्वीकृत निविदेतील तरतुदीनुसार अट

क्र.6 नुसार आवश्यक स्पेशिफीकेशनची लोखंडी जाळया ट्री गार्ड, सरंक्षक कुंपन लावल्याबाबत लेखापरिक्षणात खात्री पटवावी.

5. सदर योजनेखाली गट लागवडी अंतर्गत बांबु रोपाची लागवड केली आहे ती वृक्ष या संज्ञेत मोडते काय? याबाबत आवश्यक अनुपालन सादर करावे.

6. नागरी वनीकरण ही योजना शासन स्तरावरुन मोठया प्रमाणावर अंमलबजावणी होत असतांना तसेच पार्क ॲन्ड गार्डन डेव्हल्पमेंट अंतर्गत संचालनालय, पार्क ॲन्ड गार्डन, महाराष्ट्र शासन यांचे मार्फत मोठया प्रमाणावर वनीकरण कार्यक्रम राबविण्यात येत असतांना अशा प्रकारच्या योजना राबवुन नाहक वित्तीय दायित्व निर्माण केल्याचे लेखापरिक्षणात आक्षेप आहे.

वरील आक्षेपांची पुर्तता होईपर्यत सदर योजनेवर झालेला खर्च रु.11,70,69,152/- आक्षेपाधीन ठेवण्यांत येत आहे. व वसुलपात्र रक्कम रु.2,99,67,646/- .

उपरोक्त आक्षेपांबाबत अर्धसमास पत्र क्रं. 111 दि.18/04/2019 देण्यात आले होते, परंतु विहीत कालावधीत आक्षेपाचे निराकरण न केल्याने परिच्छेद कायम ठेवण्यात आला आहे.

DATPGWM6201 (Ref No : 14, Hmm No : 111)

## *25 प्रभाग क्र.19 मधील सुर्यकिरण अपार्ट शेजारील महानगरपालिका उद्यान विकसित करणे (आमदार फंडा अंतर्गत सन 2014-15)*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 5**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 1906700.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1906700.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 17181.00/-

***लॉग बुकची प्रत नस्तीवर उपलब्ध नसणे, वापरलेल्या माल साहित्याचा रिपोर्ट नस्तीवर उपलब्ध नसणे, काम पुर्णत्व दाखल्याची प्रत नस्तीवर उपलब्ध नसणे, रॉयल्टीची रक्कम वसुल करुन शासन खाती न भरणे, कामाचे फोटो नस्तीवर उपलब्ध नसणे इ.***

| | |
|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम रु. | 19,06,290/- |
| लेखाशिर्ष | विकास निधी अंतर्गत उदयान विकास |
| प्रशासकीय मान्यता | मा.स्थायी समिती ठराव क्र.792 दि.25/8/2014 |

| | |
|---|---|
| तांत्रिक मान्यता | प्र.मा.मा.जिल्हाधिकारी ठाणे -निमा/आस्था/प्रमा/ट-1/3336 दि.16/8/14 |
| निविदा प्रसिध्दी वृत्तपत्र व दिनांक | 16/9/2014 |
| निविदा स्विकृती दि. | मा.स्थायी समिती ठराव क्र.40 दि.16/12/14 |
| प्राप्त निविदा | तीन |
| न्युनतम निविदाकार | मे.चंदना कंन्स्ट्रक्शन |
| मोजमाप पुस्तक क्रमांक | 244 पृष्ठ क्र.39,53 |
| करारनामा | 4/2/2015 |
| कार्यादेश | वविशम/बांध/4249 अ/2015 दि.4/2/2015 |
| कामाची कालावधी | 180 दिवस |
| मुदतवाढ | - |
| काम पुर्णत्वाचा दिनांक | 27/5/2015 |
| प्रथम व अंतिम देयक | रु.19,06,700/- |
| प्रमाणक क्रमांक | 2482 दि.14/9/2015 |

उपरोक्त कामावरील खर्च सन 2015-16 या वित्तीय वर्षात नोंदविण्यात आले असुन सदर कामाचे लेखापरिक्षणात खालील आक्षेप नोंदविण्यात येत आहेत.

1) सदर कामासाठी बाब क्र.8 नुसार 96 तास डिवॉटरींग बीएचपी बेसीसवर करण्यात आले आहे . त्याबाबत वॉटर पंपचे लॉगबुकची प्रत लेखापरिक्षणात आढळुन आली नाही त्यामुळे सदर बाबीवरील झालेला खर्च लेखापरिक्षणात मान्य करता येत नाही तेव्हा सदर बाबीवर आलेला खर्च 96 तास × 75.26 = 7224/- संबधिताकडुन वसुल करुन महापालिका निधीत भरणा करुन पुर्तता दर्शवावी.
2) सदर कामामध्ये बाब क्र.3 मध्ये 27.68 M3 - M-15 सिमेंट क्रॉक्रीटचे काम बाब क्र.9 मध्ये 3.74 M3 सिमेंट क्रॉक्रीट M-20 व बाब क्र.10 मध्ये 36.49 M3 सिमेंट क्रॉक्रीट M-20 चे काम केले आहे . त्याचे संबधात शासकीय प्रयोगशाळेचे टेस्ट क्युब गुणवत्ता अहवाल लेखापरिक्षणात उपलब्ध न झाल्याने झालेले काम कोणत्या दर्जाचे झाले किंवा कसे याबाबत लेखापरिक्षणात खात्री करता आली नाही समर्थनीय अनुपालन सादर करावे.

3) सदर कामात बाब निहाय कमी /जादा झालेल्या कामाबाबत आवश्यक ते स्पष्टीकरण लेखापरिक्षणात उपलब्ध झाले नाही त्यामुळे कामाच्या गुणवतेबाबत लेखापरिक्षणात खात्री करता आली नाही.
4) सदर कामामध्ये परिगणना करण्यात आलेली रॉयलटीची रक्कम रु . 17,181/- संबधित कंत्राटदाराकडुन वसुल करुन शासन भरणा केल्याबाबतचे चलनाची प्रत लेखापरिक्षणात उपलब्ध झाली नाही तेव्हा सदर रक्कम संबधिताकडुन वसुल करुन शासन भरणा केल्याबाबत पुर्तता दर्शवावी.
5) कामाचे फोटो लेखापरिक्षणात उपलब्ध झाले नाही.
   आक्षेपाधिन खर्च रु.19,06,700/-
   आक्षेपाधिन खर्च रु.17,181/-

प्रस्तुत आक्षेपाबाबत विभागास अर्धसमास पत्र क्रं. 102 दि. 05/04/2019 देण्यात आले होते, परंतु अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

DATPGWM6201 (Ref No : 15, Hmm No : 102)

## *26 वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील महिला, बालके, पुरुष नागरीकांना डायलेसिस उपचार घेत असलेल्या/घेणाऱ्या रुग्णांना अर्थसहाय्य देणे बाबतच्या योजनेतील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 4894750.00/-

***अर्थ सहाय्याचे रुग्णांना थेट वाटप न करणे, रकमेचे दुबार प्रदान टाळण्यासाठी नियंत्रण नोंदवही न ठेवणे, रुग्णांना प्रत्यक्ष अर्थसहाय्य झाल्याबाबत पोहोच उपलब्ध नसणे इ.***

| | |
|---|---|
| तरतुद अंदाजपत्रकिय | 50,00,000/- |
| लेखाशिर्ष सांकेतांक | 721-2291-02 |
| प्रशासकीय व वित्तीय मंजुरी | मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.13, सभा सुचना क्र.2 दि.04/5/2015 |
| झालेले खर्च | रु.48,94,750/- |

सदर योजनेच्या नस्तीची तपासणी केली असता खालील आक्षेप नोदविण्यांत येत आहेत.

1. सदर योजनेसाठी अर्थसहाय्य प्रत्यक्ष ठरावाप्रमाणे थेट रुग्णांना देणे आवश्यक असतांना सदर अर्थसहाय्याबाबत हॉस्पीटल निहाय प्रस्तावा प्रमाणे अर्थसहाय्य वाटप केले आहे. त्यामुळे अर्थसहाय्य थेट रुग्णांना वाटप आल्याबाबत लेखा परिक्षणात खात्री करता आली नाही.

2. हॉस्पीटल निहाय प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी केली असता डायलेसिस अर्थसहाय्य देतांना रुग्णांना आजार केव्हा झाला व त्यास केव्हा पासुन डायलेसिस अर्थसहाय्य देण्यांत येते व सदर डायलेसिस अर्थसहाय्य दुबार प्रदान होऊ नये म्हणुन नियंत्रण नोंदवही अथवा कोणतेही दस्त ठेवल्याबाबत लेखा परिक्षणात उपलब्ध झाले नाही. त्यामुळे डायलेसिस अनुदान दुबार प्रदान झाले किंवा कसे याबाबत लेखा परिक्षणात खात्री करता आले नाही.

3. प्रत्यक्ष रुग्णांना अर्थसहाय्य मिळाल्याबाबत पोहोच लेखा परिक्षणात उपलब्ध झाल्या नाहीत. पोहोच उपलब्ध करुन संबंधित रुग्णांस अर्थसहाय्य मिळाल्याबाबत लेखा परिक्षणात खात्री करुन दयावी.

उपरोक्त बाबत अर्धसमासपत्र क्रं. 92 दि. 26/03/2019 देण्यात आले होते, परंतु अनुपालन विहीत मुदतीत अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.
आक्षेपाधीन खर्च रु.48,94,750/-

DATPGWM6201 (Ref No : 16, Hmm No : 92)

## *27 वसई विरार शहर महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण विभागा अंतर्गत आर्थिक दृष्टया दुर्बल मुली व महिलांचे जिवनमान उंचावण्यासाठी विविध व्यावसायिक प्रशिक्षण देण्यामधील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**No. of Irregularities: 8**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 7000000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 7000000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 410461.00/- अंतिम अमान्य रक्कम रु. 630000.00/-

***निविदा कालावधी कमी ठेवण्यात आला, निविदेस योग्य त्या स्तरावर प्रसिध्दी नाही, आवश्यक स्पर्धेचा लाभ नाही, रु.410461/- कमी आयकर कपात, प्रशिक्षण दिल्याबाबतचे कोणतेही अहवाल हजेरीपट उपलब्ध नाहीत, निविदाकाराने हमी दिल्यानुसार रोजगार दिल्याचे निदर्शनास दिसून येत नाही, व्यावसायिक सदरात न मोडणारे प्रशिक्षण देणे, प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबाबत प्रमाणपत्र नस्तीवर उपलब्ध नसणे इ.***

| | |
|---|---|
| प्राकलन रक्कम रु. | 70,00,000/- |

| | |
|---|---|
| लेखाशिर्ष सांकेतांक | 722-2740-2 |
| प्रशासकीय व वित्तीय मंजुरी | वसई विरार महापालिका स्थायी समिती सभा ठराव क्र.717 दि.19/8/2014 |
| निविदा प्रसिध्दी वृत्तपत्राचे नाव व दिनांक | दैनिक नवभारत व दैनिक जागल्या दि.27/6/2014 |
| निविदा उघडण्याचा दिनांक | 10/7/2014 दुपारी 3.00 वाजता |
| प्राप्त निविदा | प्रत्येक प्रशिक्षणासाठी तीन निविदा प्राप्त |
| न्युनतम निविदाकार | खाली नमुद केल्याप्रमाणे |
| वाटाघाटीसाठी पाचारण | वाटाघाटी केल्याचे निदर्शनास येत नाही |
| कार्यादेश | नस्तीवर उपलब्ध नाही |

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील आर्थिक दृष्टया दुर्बळ मुली व महिलांचे जिवनमान सुधारण्यासाठी महिला व बाल कल्याण विभागाने खालील प्रमाणे विविध व्यावसायिक प्रशिक्षण वर्ग आयोजित केले आहेत.

सदर प्रशिक्षण सन 2014-15 मध्ये घेण्यात आली असुन त्यांची देयके सन 2015-16 मध्ये खालील प्रमाणे खर्ची पडली आहेत . सदर व्यावसायिक प्रशिक्षणासाठी नियुक्त करण्यात आलेल्या एजन्सी यांनी प्रोफेशनल सर्विसेस दिलेल्या असल्याने त्यांना अदा करण्यात आलेल्या देयकातुन आयकर अधिनियम 1961 मधील कलम 194 जे प्रमाणे 10.30 टक्के आयकर कपात क रणे आवश्यक असतांना 2 टक्के आयकर वसुल केला आहे. त्याचा प्रशिक्षण निहाय तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र | प्रशिक्षणाचे नाव | अभिकरणाचे नाव | निविदेव्दारे स्विकृत दर प्रति लाभार्थी | निवडण्यात आलेले एकुण लाभार्थी | प्रदानाचा तपशिल प्रमाणक क्र/दिनांक | रक्कम | वसुल केलेला आयकर | वसुल करावयाचा आयकर | वसुल पात्र आयकर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | एम.एस.सी.आय.टी | त्रषी कॉम्पुटर ऐज्यकेशन | 3500 | 158 | 1536/31/8/15 | 553000 | 11060 | 56959 | 45899 |
| 2 | डी.टी.पी | आर्यन ऐज्यकेशन सोसायटी | 3500 | 180 | 1820/31/8/15 | 630000 | 64890 | 64890 | - |
| 3 | टॅली | त्रषी कॉम्पुटर ऐज्यकेशन | 3000 | 208 | 1535/31/8/15 | 624000 | 12480 | 64272 | 51792 |
| 4 | शिवणकाम | समृध्दी महिला बचत गट | 3200 | 195 | 1333/31/8/15 | 624000 | 12480 | 64272 | 51792 |
| 5 | मेहंदी व | समृध्दी | 2600 | 240 | 791/14/7/15 | 62400 | 12480 | 64272 | 51792 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ब्युटीशियन प्रशिक्षण | महिला बचत गट | | | | 0 | | | |
| 6 | इंग्लिश स्पिकिंग प्रशिक्षण | स्मार्ट ओरियन्ट इंग्लिश | 4200 | 150 | 744/7/7/15 | 630000 | 12600 | 64890 | 52290 |
| 7 | वाहन चालक प्रशिक्षण | एक्सलंट मोटार ड्रायव्हिग ट्रेनिंग स्कुल | 4200 | 150 | 745/7/7/15 | 630000 | 12600 | 64890 | 52290 |
| 8 | रोप वाटीका, नर्सरी प्रशिक्षण | आर्यन ऐज्यकेशन क्लासेस | 3200 | 128 | 461/8/15 | 409600 | 42189 | 42189 | - |
| 9 | केटरिंग, बेकरी, अन्नप्रक्रिया प्रशिक्षण | अर्चना कुकींग क्लासेस | 5200 | 96 | 2052/9/15 | 499200 | 51418 | 51418 | - |
| 10 | टायपिंग (मराठी व इग्लिंश) प्रशिक्षण | महाशक्ती जनजागृती शैक्षणिक ट्रस्ट | 4850 | 130 | 792/14/7/15 | 630500 | 12610 | 64941 | 52331 |
| 11 | कराटे प्रशिक्षण | प्रेयस कार्पोरेशन | 4350 | 145 | 793/14/7/15 | 630000 | 12615 | 64890 | 52275 |
| | | | | | एकुण | | 257422 | 667883 | 410461 |

वरील प्रमाणे राबविण्यात आलेल्या योजनेच्या नस्त्या तपासल्या असता खालील आक्षेप नोंदवण्यात येत आहेत.

1. प्रस्तुत कामाची निविदा जाहीरात दैनिक “जागल्या” व “नवभारत” या वृत्तपत्रात दि.27/6/2014 रोजी प्रसिध्दी देण्यात आली असुन निविदा फॉर्म दिनांक 30/6/2014 ते 10/7/2017 पर्यत विक्री साठी उपलब्ध होते. निविदा स्विकृती दिनांक 10/7/2014 रोजी दुपारी 3.00 वाजेपर्यत होती. सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय सीएटी 10/2006/प्र.क्र.33/इमारती-2 दि.2/11/2006 अन्वये रु. 50 लक्ष पेक्षा जास्त किंमतीच्या कामासाठी पहिली निविदा सुचना कालावधी 25 दिवस निश्‍चित करण्यात आली आहे. सदर निविदा प्रसिध्दीकरिता विहीत केलेली कालमर्यादा पाळली नाही. त्यामुळे सदर नियमांचे उल्लंघन झाले आहे.

2. सदर व्यावसायिक प्रशिक्षणासाठी निविदा मागवितांना प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर आवश्यक आहे. निविदा प्रसिध्दी जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात देऊन निविदा मागविणे अधिक फायदयाचे ठरते. त्यामुळे चढाओढीची दरपत्रके प्राप्त होतात व त्यातुन दर्जेदार व माफक दराचा फायदा होतो. महानगरपालिकेने सदर प्रकरणाची जाहिरात स्थानिक वृत्तपत्र दैंनिक

“जागल्या” व दैनिक “नवभारत” या वृत्तपत्रात प्रसिध्द केली आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाखस.1088/(2512)/ उद्योग -6 दि.2/1/1992 मधील परिच्छेद क्र.10.8 चे उल्लंघन झाले आहे.

3. महाराष्ट्र शासन सामान्य्ा प्रशासन विभाग शासन निर्णय पीयुबी 1000/प्र.क्र.73/2000/34 दि.1/5/2001 अन्वये ज्या कामाचे मुल्य्ा 50 लाखांपेक्षा अधिक आहे अशा कामांची जाहिरात संबंधित विभागातील ‘अ’ वर्ग दैनिकात व त्या विभागातील ‘ब’ व ज्या जिल्हयाचे काम असेल त्या जिल्हयातील ‘क’ वर्ग दैनिकात प्रसिध्द करणे आवश्यक आहे. तसेच त्याचे वितरण मुख्यालयाकडुन होणे आवश्यक होते. तथापि, सदर निविदा जाहिराती प्रकरणी महानगरपालिकेने पालिका स्तरावर जाहिरात प्रसिध्द केल्यामुळे शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही. परिणामी व्यापक प्रसिध्दी अभावी महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा झाल्याचे आढळुन येत नाही.

4. वरील प्रमाणे कमी वसुल करण्यात आलेला आयकर रुपये 4,10,461/- संबंधीता कडुन वसुल करुन शासन खाती भरणा करुन पुर्तता दर्शवावी.

5. ज्या ज्या प्रशिक्षणामध्ये निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्याची हजेरी पत्रके तसेच आवश्यक ते प्रशिक्षण दिल्याबाबत एजन्सीने कोणतेही अहवाल दिल्याचे लेखा परिक्षणात निर्देशनात आले नाही. त्यामुळे ते ते प्रशिक्षण लाभार्थ्यास दिल्याबाबत लेखा परिक्षणात खात्री पटत नाही.

6. लाभार्थ्याना प्रशिक्षण दिल्यानंतर निविदेतील अट क्रमांक 2 नुसार प्रशिक्षीत महिलांना, मुलीनां रोजगार विविध संस्था व्यवसायिक, सरकारी, निमसरकारी, खाजगी कार्यालयाकडुन उपलब्ध करुन देण्याचे हमी निविदाकारानी घेतली असुन त्यानुसार किती प्रशिक्षणार्थी यांना रोजगार मिळाले याबाबत कोणतेही अहवाल लेखा परिक्षणात उपलब्ध न झाल्याने योजनेचे उदिष्ट साध्य झाल्याचे लेखा परिक्षणात स्पष्ट होत नाही.

7. व्यावसायिक प्रशिक्षणामध्ये कराटे प्रशिक्षण महिला व मुलींना देण्यात आलेले आहे. त्यामुळे महिलांचा व मुलींचे आर्थिक जिवनमान कश्या प्रकारे उंचावले हया बाबत आवश्यक अहवालासह अनुपालन सादर करावे. कराटे प्रशिक्षण हे व्यवसायिक प्रशिक्षणामध्ये मोडत नसल्याने त्यावर झालेला एकुण खर्च रुपये 6,30,000/- लेखा परिक्षणात मान्य करता येत नाही.

8. प्रशिक्षणार्थी यांनी यशस्वी प्रशिक्षण पुर्ण केले बाबत प्रमाणपत्र व त्याचे वाटप याबाबतची छायाचित्रासहित अहवाल लेखा परिक्षणात उपलब्ध न झाल्याने किती लाभार्थी यांनी प्रशिक्षण यशस्वीपणे पुर्ण केले याबाबत लेखा परिक्षणात खात्री करता आली नाही.

प्रस्तुत आक्षेपाबाबत विभागास अर्धसमास पत्र क्रं. 98 दि. 28/03/2019 देण्यात आले होते, परंतु अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

वसुल पात्र रक्कम रुपये 4,10,461/-

DATPGWM6201 (Ref No : 17, Hmm No : 98)

## *28 महिला व बाल कल्याण विभागामार्फत महापालिका हद्दीतील सर्व स्थानिक शाळेत (इंग्रजी, माध्यम वगळुन) शिकणाऱ्या विद्यांर्थ्यांना राज्यमार्ग परिवहन मंडळाच्या धर्तीवर महापालिकेच्या परिवहन सेवेचा वार्षिक मोफत पास योजना राबविणे मधील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 11772940.00/-

***लाभार्थी संख्या निश्चित न करता योजना राबविणे, विद्यार्थी पासेस देतांना प्रवासाच्या प्रत्यक्ष अंतराची खात्री न करणे, लाभ देतांना शाळा मराठी माध्यमाची असल्याची खात्री न करणे इ.***

| | |
|---|---|
| लेखाशिर्ष सांकेतांक | 722-2741 महिला व बाल कल्याण विभाग |
| प्रशासकीय व वित्तीय मान्यता | महापालिका महासभा ठराव क्र.7 दि.08/5/2015 |
| वित्तीय तरतुद | रु.1,00,00,000/- |

उपरोक्त योजनेअंतर्गत विभागाने खालील प्रमाणे सन 2015-16 मध्ये वसई विरार महापालिकेच्या परिवहन सेवेस (मे.भागीरथी ट्रान्स कॉर्पोरेशन प्रा .लि.) यांना खालील तपशीला प्रमाणे मोफत पास योजनेकरिता प्रदान केले आहे.

| अ.क्र | मोफत पासाचा कालावधी | एकुण शाळा | एकुण विद्यार्थी | प्रमाणक क्र./दि. | प्रदान केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | जुन-15 ते एप्रिल-16 | 15 | 1973 | 976/7/15 | 3889310 |
| 2 | जुन-15 ते एप्रिल-16 | 5 | 957 | 1349/8/15 | 1962070 |
| 3 | जुन-15 ते एप्रिल-16 | 9 | 524 | 2143/9/15 | 939610 |
| 4 | जुन-15 ते एप्रिल-16 | 8 | 1515 | 1035/7/15 | 3114070 |
| 5 | ऑगस्ट-15 ते एप्रिल-16 | 1 | 318 | 2347/10/16 | 430980 |
| 6 | ऑगस्ट-15 ते एप्रिल-16 | 1 | 824 | 2144/2/15 | 1436900 |
| | एकुण | 39 | 6111 | | 11772940 |

उपरोक्त योजनेवर केलेल्या खर्चाबाबत खालील प्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहेत.

1. सदर योजनेखाली सन 2015-16 करिता रु.1,00,00,000/- तरतुद करण्यात आली होती . परंतु वर्षाच्या शेवटी रु .50,00,000/- वाढीव तरतुद सर्वसाधारण ठराव क्रमांक 8 दि.14/9/2015 अन्वये मंजुर केली आहे . त्यावरुन सदर योजनेखाली किती लाभार्थी आहेत व किती शाळा मधील

विद्यार्थ्यांना लाभ दयावयाचा आहे याबाबत कोणतीही लेखी माहिती अथवा अहवाल प्राप्त न करुन घेताच योजना राबविली आहे . त्यामुळे महापालिका क्षेत्रातील सर्व विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ मिळाले बाबत लेखा परिक्षणात खात्री करता आली नाही.

2. सदर योजनेखाली प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे यांचे पत्र क्रमांक 4286 दि.13/4/2015 मधील निश्चित केलेल्या कि .मी. टप्पा भाडे निश्चिती नुसार रक्कम प्रति विद्यार्थी पासाची रक्कम परिगणना करुन अदा केल्याचे निदर्शनास येते . परंतु सदर विद्यार्थी किती कि .मी. वरुन शाळेत जात आहे याबाबत परिगणना तकत्यात माहिती नमुद नाही त्यामुळे पासाची निश्चित केलेली रक्कम योग्य आहे किंवा कसे याबाबत लेखापरिक्षणात खात्री करता आली नाही.

3. सदर योजनाखाली शाळा निहाय विद्यार्थ्यांना मोफत पासाची रक्कम प्रदान केली आहे त्यामध्ये काही शाळा खालील प्रमाणे मराठी माध्यमांच्या असल्याबाबत लेखापरिक्षणात खात्री झाली नाही.

1. सेंट ॲलायन्सेस स्कुल
2. सोपारा इंग्लिश स्कुल
3. सेंट जेम्स हायस्कुल
4. न्यु इंग्लिश स्कुल, वसई (प)
5. सेंट ॲलायन्सेस गर्ल हायस्कुल, पापडी

सदर मोफत पास योजनेखाली अनुदान देण्यासा ठी लाभार्थी निश्चित करतांना विद्यार्थी किती कि.मी. वरुन प्रवास करणार आहे याबाबत कोणतीही माहिती लेखा परिक्षणात उपलब्ध झाली नाही त्यामुळे योजनेखाली मोफत पासाचा लाभ योग्य लाभार्थी यांना प्रदान झाला आहे याबाबत लेखा परिक्षणात खात्री करता आली नाही . वरील प्रमाणे बाबीचा अनुपालन आवश्यक त्या समर्थनीय खुलासासह उपलब्ध करुन दयावे तो पर्यत सदर बाबीवरील झालेला एकुण खर्च रु . 1,17,72,940/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

प्रस्तुत आक्षेपाबाबत विभागास अर्धसमास पत्र क्रं . 99 दि. 28/03/2019 देण्यात आले होते, परंतु अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

DATPGWM6201 (Ref No : 18, Hmm No : 99)

## *29 वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये वृक्षगणना करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 03**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1854855.00/-

***विहीत मुदतीत काम पुर्ण न करणे, योजनेचा उद्देश सफल न होणे, पुर्ण केलेले काम व अपुर्ण कामाची टक्केवारी उपलब्ध नसणे इ.***

| | |
|---|---|
| प्राकलन रक्कम रु. | 20,00,000/- |
| लेखाशिर्ष सांकेतांक | वृक्ष गणना व वृक्ष संरक्षण |
| प्रशासकीय व वित्तीय मान्यता | स्थायी समिती ठराव क्र.441 दि.31/4/2014 |
| करारनामा दिनांक | दि. 05/1/2013 |
| न्युनतम निविदाकार | मे. टेरेकॉन प्रा.लि., विले पार्ले,मुंबई |
| कार्यादेश | वविशम/302/वृक्षप्राधिकरण/दि.5/1/2013 मा.आयुक्त यांची दि.26/9/14 ची मंजुर टिप्पणी |

सन 2015-16 मध्ये सदर कामावर प्रमाणक क्र .82 दि. 31/3/2016 अन्वये रु.18,54,855/- एवढा खर्च नोंदविण्यात आला आहे . त्याबाबत संपुर्ण नस्तीची तपासणी केली असता खालील प्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

1) महापालिकेचे एकुण क्षेत्रफळ 311 चौ. कि.मी. इतके असुन दि .5/1/2013 ते कार्यादेशानुसार महापालिका हद्दीतील वृक्षगणना व कांदळवनाची गणना 6 महिन्यांत पुर्ण करणे आवश्यक असतांना केवळ 5 लक्ष वृक्षाची गणना करण्यांत आल्याने सदर कामांस पत्र दि.9/10/2014 चे पत्रान्वये दि.31/12/2014 पर्यत मुदतवाढ देण्यांत आली आहे. सन 2015-16 मध्ये मे.टेरेकॉन इन्फोटेक यांनी आठरावे धावते देयक एकुण 82438 वृक्षाची गणना केल्याचे दि .21/10/2014 ते दि .31/12/2014 या कालावधीचे रु .18,54,855/- सादर केल्याचे दिसुन येते व एकुण 11,31,490 वृक्षाची गणना झाल्याचे निदर्शनास येते . तथापि, अद्याप साधारणत: 1,50,000 वृक्षाचे गणना बाकी असलेबाबत अहवाल महापालिका सचिव यांना दि .23/10/2015 चे पत्राव्दारे कळविल्याचे लेखा परिक्षणात आढळुन येते . यामुळे सदर काम सन 2015-16 मध्ये पुर्ण झाल्याचे दिसून येत नाही . विहीत कालावधीत काम पुर्ण न झाल्याने योजनेचा उद्देश सफल झाल्याची लेखापरिक्षणाची खात्री झाली नाही.

2) मंजुर करारनाम्यातील अट क्र . 10 नुसार वृक्षाची गणना व सलंग्न माहिती महापालिकेने दररोज सादर करुन त्याचे होणारे देयक पंधरवाडयात सादर करतील व सदर कामाचा महापालिका उपआयुक्त तथा वृक्ष अधिकारी खातेप्रमुख वृक्ष प्राधिकरण मुख्यालय संबधित प्रभाग समितीने सहाय्यक आयुक्त यांनी नियुक्त केलेले कर्मचारी यांचे मार्फत वृक्षगणना झाले बाबत पडताळणी करुन मुख्यालयात अहवाल दिल्यानंतर देयक अदा करण्यात येईल अशी अट

असतांना तशी कार्यवाही केल्याची लेखापरिक्षणाची खात्री झाली नाही.

3) उपरोक्त योजनेखाली किती टक्के काम पुर्ण झाले व किती टक्के काम बाकी आहे याबाबत लेखापरिक्षणाची खात्री झाली नाही.

वरील योजनेवर झालेला खर्च रु.18,54,855/- आक्षेपाधिन ठेवण्यात येत आहे.

प्रस्तुत आक्षेपाबाबत विभागास अर्धसमास पत्र क्रं.100 दि. 05/04/2019 देण्यात आले होते, परंतु अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

DATPGWM6201 (Ref No : 19, Hmm No : 100)

## *30 प्रभाग क्र.23 विरार (प) विराट नगर खैना अपार्ट. जवळील उद्यानाचा विकास करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 5**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 2535235.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 2535235.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 39791.00/-

***दरपृथ्थकरणाची प्रत नस्तीवर उपलब्ध नसणे, वापरलेल्या माल साहित्याचा रिपोर्ट नस्तीवर उपलब्ध नसणे, काम पुर्णत्व दाखल्याची प्रत नस्तीवर उपलब्ध नसणे, रॉयल्टीची रक्कम वसुल करुन शासन खाती न भरणे, कामाचे फोटो नस्तीवर उपलब्ध नसणे इ.***

| | |
|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम रु. | 34,58,753/- |
| लेखाशिर्ष | उद्यान विकास |
| प्रशासकीय मान्यता | मा.स्थायी समिती ठराव क्र.09 दि.6/9/2014 |
| तांत्रिक मान्यता | 10/6/14 |
| निविदा प्रसिध्दी<br>वृत्त्ापत्र व दिनांक | 2/8/2014 |
| निविदा स्विकृती दि. | 18/11/2014 |

| | |
|---|---|
| प्राप्त निविदा | तीन |
| न्युनतम निविदाकार | मे.मेहुल अरविंद वर्तक |
| मोजमाप पुस्तक क्रमांक | 239 पृष्ठ क्र. 51 ते 69 |
| करारनामा | 17/11/2014 |
| कार्यादेश | 18/11/2014 |
| कामाची कालावधी | 5 महिने |
| मुदतवाढ | - |
| काम पुर्णत्वाचा दिनांक | 12/6/2015 |
| प्रथम व अंतिम देयक | रु.35,25,235/- |
| प्रमाणक क्रमांक | 2927 दि.30/9/2015 |

उपरोक्त कामावरील खर्च सन 2015-16 या वित्तीय वर्षात नोंदविण्यात आले असुन सदर कामाचे लेखापरिक्षणात खालील आक्षेप नोंदविण्यात येत आहेत.

1) सदर कामामधील मटेरियल डिसपोजींग बाब क्र .10 प्रमाणे 136.76 क्यु मिटर परिणाम डिसपोजींग केल्याचे निदर्शनास येते त्याबाबत अंदाजपत्रका प्रमाणे किती कि .मी. चा लीड ग्राहय धरला होता व त्याप्रमाणे मटेरियल डिसपोजींग केले त्याबाबतचे दर पृथ :करण लेखापरिक्षणात उपलब्ध झाले नाही . त्यामुळे सदर बाबीवरील झालेला खर्चा बाबत 136.76 क्यु. मी. × 126.74 = 17333/- आवश्यक त्या लीड प्रमाणे मटेरियल डिसपोज झाल्याची लेखापरिक्षणास खात्री पटत नाही.
2) सदर कामामध्ये बाब क्र.3,5,6,7 अन्वये सिमेंट कॉक्रीटचे काम केले आहे. त्याबाबत शासकीय प्रयोगशाळेचे टेस्ट क्युब रिपोर्ट लेखापरिक्षणात उपलब्ध झाले नाहीत . त्यामुळे झालेल्या कामाचा दर्जा बाबत लेखापरिक्षणात खात्री करता आली नाही.
3) काम पुर्णत्व दाखला मा.आयुक्त यांनी प्रमाणित केलेला नाही.
4) सदर कामामध्ये परिगणना करण्यात आलेली रॉयलटीची रक्कम रु .39,791/- संबधित ठेकेदाराचे देयकातुन वसुल करण्यात आली नाही . ते वसुल करुन शासन भरणा केल्याबाबत अनुपालन दर्शवावे.
5) कामाचे फोटो लेखापरिक्षणात उपलब्ध झाले नाही.

आक्षेपाधिन खर्च रु.25,35,235/-

आक्षेपाधिन खर्च रु.39,791/-

प्रस्तुत आक्षेपाबाबत विभागास अर्धसमास पत्र क्रं. 101 दि. 05/04/2019 देण्यात आले होते,

परंतु अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

DATPGWM6201 (Ref No : 20, Hmm No : 101)

## *31 सन 2015-16 या कालावधीत मंजुर करण्यात आलेल्या विकास प्रस्तावा मधील अनियमितता बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र राजभाषा अधिनियम,1964 मधील तरतुदी तसेच शासन मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र.मभावा-2015/ प्रक्र.38/ भाषा-2 दि.28/04/2015 अन्वये कार्यालयीन कामकाज मराठी भाषेमधुन करण्या बाबत आदेशित केले आहे. तथापि, नगररचना विभागा कडून सदर अधिनियम वा शासन निर्णयाचे अनुपालन झाले नाही.***

वसई विरार शहर महानगरपालिकेचे सन 2015-16 या कालावधीचे लेखापरिक्षण सुरु असुन नगररचना विभागाकडुन लेखापरिक्षणात उपलब्धकरुन देण्यात आलेल्या नस्त्यांमधील विविध प्रस्तावांचे लेखापरिक्षण करित असतांना खालील अनियमितता निर्देशनास आली आहे.

1) महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, 1964 मधील तरतुदी नुसार शासकीय कार्यालयाप्रमाणे शासनाच्या अंगीकृत व्यवसायांनी/स्थानिक स्वराज्य्संस्था/सार्वजनिक उपक्रम/महामंडळे यांनी वर्जित प्रयोजने वगळता सर्व कामकाज मराठी भाषेतुन करणे बंधनकारक करण्यात आले आहे. याच अनुषंगाने सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी कार्यालयीन कामकाज मराठीत करण्याबाबत गंभीरपणे नोंद घेवुन नस्तीवरील टिप्पणी, पत्रव्यवहार, अभिप्राय, शेरे, अनौपचारिक संदर्भावरील टिप्पण्या तसेच दिल्या जाणाऱ्या निविदा, जाहिराती, बैठकांचे कार्यवृत्त, अहवाल, मागविण्यात येणारी माहिती इत्यादी मराठी मधुन सादर करण्याची दक्षता घेण्याबाबत आदेशित केले असुन याकरिता महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र.मभावा-2015/प्रक्र.38/ भाषा-2 दि.28/04/2015 अन्वये आदेश निर्गमित केले आहेत.लेखापरिक्षणास उपलब्धकरुन दिलेल्या नस्त्या मध्ये सादर केलेल्या

टिप्पण्या, त्यावरील अभिप्राय, शेरे व अनुषांगिक पत्रव्यवहार हा इंग्रजी भाषेमधुन केल्याचे दिसुन येते. त्यामुळे महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, 1964 व त्याअनुषंगाने निर्गमित झालेले आदेश व दि. 28/04/2015 मधील शासन आदेशांचे उल्लघन झालेले आहे. या बाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक 23 दिनांक 24/12/2018 अन्वये विभागास अनुपालन सादर करण्याविषयी अवगत केले होते. विभागाने त्यांचे पत्र क्रमांक 1912 दिनांक 03/01/2019 अन्वये केलेला खुलासा आक्षेपाची पुरता करत नसल्याने तो अमान्य करून आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATANJM6301 (Ref No : 21, Hmm No : 23)

## *32 प्रभाग समिती "ड" मधील रस्त्यांवर थर्माप्लास्टरचे पट्टे मारणे*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**No. of Irregularities: 5**

*लेखा शीर्ष : रस्ता बांधकाम महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 7119525.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 7119525.00/-

***प्रभाग समिती ड'मध्ये एकुण किती किलोमीटर लांबीचे रस्ते आहेत. तसेच सदरचे काम या पुर्वी कधी करण्यात आले होते याबाबतचे दोषदायित्व प्रमाणपत्र व मेजरमेंट शिट नस्तीवर उपलब्ध नाही. निविदा प्रसिध्दीसाठी विहित करण्यात आलेला कालावधी देण्यात आला नाही. मा. आयुक्त यांचे मान्यते शिवाय मुदतवाढ देण्यात आली आहे. त्या मुळे निविदा फॉर्म बी-1 अटी व शर्ती मधील अट क्रमांक 2 व 6 नि: प्रभ ठरल्या आहेत.***

| | |
|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम रु. | 71,19,525/- |
| लेखाशिर्ष | रस्ता बांधकाम |
| प्रशासकीय मंजुरी | मा. आयुक्त दि. 31/1/2014 ची टिप्पणी |
| तांत्रिक मंजुरी | शहर अभियंता, पुस्तक क्र. I पृष्ठ क्र. 55/478 दि. 15/2/2014 |
| निविदा सुचना | दि. 28/2/2014 दैनिक 'लोकमत' व दैनिक 'जागल्या' |
| ई-निविदा | मनपाच्या संकेतस्थळावर उपलब्ध दि. 8/3/2014 |
| प्राप्त निविदा | एकुण 3<br>1) शिखर एन्टरप्रायझेस 2) मे. ओम साई कंस्ट्रक्शन 3) मे.गजानन कंस्ट्रक्शन |

| | |
|---|---|
| न्युनतम निविदाकार | मे. शिखर एन्टरप्रायझेस अंदाजपत्रका पेक्षा 4.83% जादा दराने. |
| मंजुरी | स्थायी समिती ठराव क्र. 28 दि.13/5/2014 |
| दरसुची | महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग सन 2013 - 2014 |
| मोजमाप पुस्तक क्रमांक | 249 पृष्ठ 97 ते 100 |
| कार्यादेश | दि.10/6/2014 रोजी निर्गमित तथा नस्तीवर उपलब्ध नाही. |
| कामाची मुदत | 6 महिने (कार्यादेशाच्या दिनांका पासुन दि. 9/12/2014 पर्यत) |
| कामपुर्णत्वाचा दिनांक | दि. 10/3/2015 |
| मुदतवाढ | दि. 9/12/2014 ते दि. 9/4/2015 |

प्रभाग समिती "ड" क्षेत्रातील रस्त्यांवर थर्माप्लास्टरचे पट्टे मारणे कामाची नस्ती लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर नस्तीत लेखापरिक्षणाच्या अनुषंगाने खालील अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

1. प्रभाग समिती "ड" मध्ये एकुण किती किलोमीटर लांबीचे रस्ते आहेत. तसेच सदरचे काम या पुर्वी कधी करण्यात आले होते याबाबतचे दोषदायित्व प्रमाणपत्र व मेजरमेंट शिट नस्तीवर उपलब्ध नसल्यामुळे परिमाणाची खात्री करता आली नाही.

2. स्थायी समिती सभा प्रस्तावाचा ठराव क्र.1706 दि.15/2/2014 मध्ये कामाच्या आवश्यकते बाबत रस्त्यांवर लेनसाठी पट्टे मारणे तसेच विविध चौकांमध्ये झेब्रा क्रॉसींग पट्टे मारणे आवश्यक व त्यासाठी नागरिक विचारणा करित आहेत असे नमुद आहे. तथापि, या अनुषंगानेचा कोणताही दस्तऐवज नस्तीवर लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही.

3. प्रस्तुत कामाची निविदा दैनिक 'लोकमत' व 'जागल्या' या वृत्तपत्रात दि. 25/2/2014 रोजी प्रसिध्द केली असुन महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आल्याचे जाहिरातीमध्ये नमुद आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग नियम पुस्तिका परिच्छेद क्र. 202 व सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय सीएटी -10/2006 प्र.क्र.133/इमारती-2 दि. 21/11/2006 अन्वये रक्कम रु. 50 लक्ष पेक्षा जास्त किमतीच्या कामासाठी पहिली निविदा सुचना कालावधी 25 दिवस निश्चित करण्यात आला आहे. सदर निविदा प्रसिध्दीसाठी दि. 28/2/2014 ते दि.14/3/2014 असा 15 दिवसांचा कालावधी देण्यात आला आहे. त्यामुळे सदर नियमांचे उल्लघंन झाले असुन स्पर्धात्मक दराचा फायदा महापालिकेस झाल्याची खात्री करता आली नाही.

4. निविदा फॉर्म बी-1 अटी व शर्ती मधील अट क्र. 6 नुसार मुदतवाढी प्रकरणी मुदत संपण्यापुर्वी 30 दिवस आधी आयुक्त यांना सबळ कारणे नमुद करुन लेखी कळविणे आवश्यक आहे. तसेच मुदतवाढ देण्याचा अंतिम निर्णय मा. आयुक्त यांचा असेल असे स्पष्ट असतांना ठेकेदाराने 7 दिवस आधी (कामाची मुदत दि. 9/12/2014) दि. 2/12/2014 रोजी कार्यकारी अभियंता यांना दि. 9/04/2015 पर्यत मुदतवाढ मिळणेबाबत अर्ज सादर केला आहे. व त्यास जा.क्र.वविशम/3617/14-15 दि. 5/12/2014 अन्वये मा. आयुक्त यांचे मान्यते शिवाय दि. 9/4/2015 पर्यत मुदतवाढ देण्यात आली आहे. मुदतवाढ दिल्याने निविदा फॉर्म बी-1 अटी व शर्ती मधील अट क्र. 2 व 6 नि:प्रभ ठरल्या आहेत.

5. काम पुर्ण झाल्या बद्दलचे प्रमाणपत्र नस्तीमधील पृष्ठ क्र. प/155 व प/157 वर उपलब्ध असुन यात कामाचा प्रारंभाचा दिनांक 5/12/2014 व कामाच्या समाप्तिचा दिनांक 10/3/2015 असा नोंदविण्यात आला आहे. नस्तीमधील पृष्ठ क्र. प /141 वरील टिप्पणीत दि. 4/12/2014 रोजी 60%

काम पुर्ण झाल्याचे नमुद आहे. प्रत्यक्षात दि. 5/12/2014 रोजी काम सुरु झाले आहे, तर प्रथम धावते देयक दि. 10/11/2014 रोजी अदा करण्यात आले आहे. या सर्व बाबी विचारात घेता अंदाजपत्रकीय रक्कम रुपये 71,19,825/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे. या अनियमिततां बाबत विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक 29 दिनांक 7/1/2019 अन्वये अनुपालन सादर करण्या विषयी कळविण्यात आले होते. तथापि, विभागाने कोणताही खुलासा केला नसल्याने वरील आक्षेप कायम करून रक्कम रुपये 71,19,825/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATANJM6301 (Ref No : 22, Hmm No : 29)

## *33 प्रभाग समिती "ब" पेल्हार क्षेत्रातील विविध रस्त्यांवर लेनपार्क करणे, झेब्रा क्रॉसींग मारणे व स्थळ दर्शक फलक लावणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष : रोड मार्किंगसाठी राखी महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ङ*

गुंतलेली रक्कम रु. 4970267.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 4970267.00/-

***कार्यादेशात नमुद करण्यात आलेल्या कामाची मुदत विचारात घेता कामाचा कालावधी निश्चित करता येत नाही. कार्यादेशातील अट क्र. 4 व निविदा फॉर्म बी-1 मधील अटी व शर्ती मधील अट क्र.1 चे अनुपालन झाले नाही.***

| | |
|---|---|
| प्राकलन रक्कम रु. | 49,70,267/- |
| लेखाशिर्ष | रोड मार्किंगसाठी राखीव तरतुद पट्टे मारणे |
| प्रशासकीय मान्यता | मा. आयुक्त |
| तांत्रिक मान्यता क्रं.दिनांक | शहर अभियंता 21/188 दि.23/8/13 |
| मंजुरी | स्थायी समिती ठराव क्र. 575 दि.6/8/2013 |
| निविदा प्रसिध्दी वृत्तपत्राचे नाव | दैनिक 'प्रहार' व दैनिक 'केसरी' |
| ई-टेंडर/निविदा सुचना दि. | 21/10/2013 महापालिकेच्या संकेत स्थळावर उपलब्ध |
| दरसुची | सार्वजनिक बांधकाम विभाग दरसुची 2012-13 |
| मोजपाम पुस्तक क्रमांक | 43 पृष्ठ क्र. 60 ते 69 |
| प्राप्त निविदा | एकुण 3<br>1) मे.शिखर एंटरप्रायझेस 2) मे.ओम साई कंस्ट्रक्शन 3) |

| | |
|---|---|
| | मे.श्री.गजानन कंस्ट्रक्शन |
| करारनामा दिनांक | 18/1/2014 |
| न्युनतम निविदाकार | मे.शिखर एंटरप्रायझेस प्राकलन दराच्या 4.95% जादा दराने |
| कार्यादेश | वविशम/बांध/2095/14 दि.22/1/14 |
| काम पुर्ण झाल्याची दिनांक | 5/6/2015 |
| तपासणी अहवाल | विवा कॉलेज ऑफ डिप्लोमा इंजनियरींग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी दि.16/9/2015 |

प्रभाग समिती "ब" पेल्हार क्षेत्रातील विविध रस्त्यावंर लेनमार्क करणे,झेब्रा क्रॉसींग करणे व स्थळदर्शक फलक लावणे या कामाच्या लेखापरिक्षणात खालील त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

1. ठेकेदारास दि. 22/1/2014 रोजी कार्यादेश देण्यात आला आहे. सदर आदेशात कामाची मुदत 240 दिवस अशी नमुद करण्यात आली आहे. तर कार्यादेशाच्या तारखेपासुन 150 दिवसात काम पुर्ण करण्यात यावे असेही नमुद करण्यात आले आहे. त्यामुळे कामाचा कालावधी निश्चित करता आला नाही.

2. कार्यादेशातील अट क्र. 4 नुसार प्रत्यक्ष कामांचे ठिकाणी कामाचे नाव, एस्टीमेट रक्कम, ठेकेदाराचे नाव, कामाची मुदत इत्यादी दर्शविणारे रंगीत फलक ठेकेदाराने कामाचे ठिकाणी लावणे आवश्यक होते. तथापि, असे फलक लावल्याची खात्री लेखापरिक्षणात करता आली नाही.

3. सदर कामाचा दोषदायीत्व प्रमाणपत्र नस्तीवर आढळुन येत नाही. दुसरे धावते देयक रक्कम रु.20,50,114/- मधुन 5% सुरक्षा अनामत रक्कम वसुल केलेली नाही. त्यामुळे निविदा फॉर्म बी-1 मधील अटी व शर्ती मधील अट क्र.1 चे उल्लघंन झाले आहे.

4. बाब क्र. 3 मध्ये 60 व 90 CMS आकाराचे प्रत्येकी 14 (Cautional /Warning) असे एकुण 28 बोर्ड प्रस्तावित करण्यात आले आहेत. तथापि, मोजमाप पुस्तकात फक्त 10 Informatory Sign Boards लावले असल्याचे मोजमाप आहे. त्यामुळे निविदेमध्ये नमुद केल्यानुसार काम झाले नाही. या अनियमिततां बाबत विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक 31 दिनांक 7/1/2019 अन्वये अनुपालन सादर करण्या विषयी कळविण्यात आले होते. तथापि, विभागाने कोणताही खुलासा केला नसल्याने वरील आक्षेप कायम करून रक्कम रुपये 49,70,267/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATANJM6301 (Ref No : 24, Hmm No : 31)

## *34 प्रभाग समिती "ड" मधील वार्ड नं.64 मध्ये गोखिवरे येथील मधुबन टाऊनशिप येथे रस्त्याच्या दुतर्फा पाईप गटार बांधणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 7**

*लेखा शीर्ष : गटार बांधकाम महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 6998635.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 6998635.00/-

***कामाच्या निविदा प्रसिध्दीसाठी विहित करण्यात आलेली कालमर्यादा पाळण्यात आलेली नाही. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील परिशिष्ठ 24 मधील तरतुदींचे उल्लंघन झाले आहे. कामाची गुणवत्ता व कामाचा दर्जा राखुन कामपुर्ण केल्याची खात्री लेखापरिक्षणात करता आली नाही. कामाच्या ठिकाणी वापरलेल्या माल/साहित्याच्या खरेदीचे चलन / इनव्हाईस मालाच्या वाहतुकीचे पास इत्यादी अभिलेख नस्तीत उपलब्ध न झाल्याने मालाची खरेदी स्पेशिफिकेशन प्रमाणेच केल्याची पडताळणी करता आली नाही. महानगरपालिकेने प्रमाणित केलेल्या दरः पृथकरणाची प्रत लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.***

| | |
|---|---|
| अंदाजपत्रकीय खर्च रु. | 69,98,635/- |
| लेखाशिर्ष | गटार बांधकाम |
| प्रशासकीय मान्यता | मा.आयुक्त दि.9/6/2014 |
| तांत्रिक मान्यता क्र. दिनांक | शहर अभियंता, पुस्तक क्र.I पृष्ठ क्र.17/150 दि. 22/7/2014 |
| दरसुची | महाराष्ट्र राज्य सार्वजनिक बांधकाम विभाग सन 2013-14 मोजमाप पुस्तक क्र.51 |
| निविदा प्रसिध्दी वृत्तपत्राचे नाव | दैनिक 'लोकमत' व 'नवाकाळ' दि.29/7/2014 |
| ई-टेंडर/निविदा सुचना दि. | महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर उपलब्ध ऑनलाईन दि.12/8/14 ते दि.13/8/14 |
| प्राप्त निविदा | एकुण 3 1) मे.ओमकार कंस्ट्रक्शन 2) मे.संदेश कंस्ट्रक्शन 3) मे.भोईर कंस्ट्रक्शन |
| न्युनतम निविदाकार | मे.ओमकार कंस्ट्रक्शन अंदाजपत्रक दरापेक्षा 4.99% जादा दराने |
| मंजुरी | स्थायी समिती सभा प्रस्तावाचा ठराव क्र.740 दि.22/8/2014 |
| कार्यादेश | वविशम/काअ/बांध/2092/14 दि.25/11/14 |
| करारनामा | आहे |
| काम पुर्णत्वाचा दाखला | नस्तीवर उपलब्ध नाही |

प्रभाग समिती "ड" मधील वार्ड नं. 64 मध्ये गोखिवरे येथील मधुबन टाऊनशिप येथे रस्त्याच्या दुतर्फा पाईप गटार बांधण्याची नस्ती लेखापरिक्षणास उपलब्ध झाली आहे. सदर नस्तीचे लेखापरिक्षणात खालील अनियमितता निदर्शनास आल्या आहेत.

1. सदरील कामाची निविदा दैनिक लोकमत व नवाकाळ या वृत्तपत्रात दि. 28/7/2014 रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर दि. 30/7/2014 ते दि. 11/8/2014 पर्यत कोरे फॉर्म उपलब्ध करुन दिले आहेत तर दि.12/8/2014 ते दि. 13/8/2014 दुपारी 4.00 वाजेपर्यत कार्यप्रणालीव्दारे ऑनलाईन स्विकारले जाण्याबाबत नमुद केले आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग नियम पुस्तिका परिच्छेद क्र. 202 सार्वजनिक बांधकाम विभाग शासन

निर्णय सीएटी 10/2006/प्र.क्र.133/इमारती-2 दि. 21/11/2006 नुसार रु. 50 लक्ष पेक्षा जास्त किमतीच्या कामासाठी पहीली निविदा सुचना कालावधी 25 दिवस निश्चित करण्यात आला आहे. प्रस्तावित कामाच्या निविदा प्रसिध्दीसाठी ही कालमर्यादा पाळण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर नियमांचे उल्लंघन झाले असुन महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा झाल्याची खात्री करता आली नाही.

2. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील परिशिष्ठ 24 अन्वये केलेल्या कामाचे मोजमाप घेण्याबददलचे आणि नोंदवहया ठेवण्या संबंधी नियम विशद करण्यात आले आहेत. प्रस्तुत कामाची नोंद मोजमाप नोंदवही क्र. 51 मधील पृष्ठ क्र. 42 ते 50 वर घेण्यात आली आहे. सदर कामाचे कार्यादेश दि. 25/11/2014 रोजी निर्गमित झाल्यानंतर ठेकेदाराने दि. 20/3/2015 रोजी काम सुरु करुन याच दिनांकास एकुण 16 बाबी कार्यन्वीत करुन काम पुर्ण केले असल्याचे नोंदवही वरुन दिसुन येते. त्यामुळे सदर नियम पुस्तिका मधील परिशिष्ठ 24 अन्वये करावयाची कार्यपध्दती अवलंबविण्यात आली नाही त्यामुळे सदर नियमांचे उल्लंघन झाले आहे.

3. कामाचा कालावधी 8 महिने असा आहे. तथापि, सदरचे काम सुमारे चार महिने आधिच पुर्ण झाल्याचे मोजमाप नोंदवही वरुन दिसुन येते. त्यामुळे कामाची गुणवत्ता व कामाचा दर्जा राखुन कामपुर्ण केल्याची खात्री लेखापरिक्षणात करता आली नाही.तसेच कामपुर्ण झाल्याची नोंद नमुना नं.139 मध्ये घेतल्याचे नस्ती मध्ये आढळुन येत नाही.

4. करारनाम्यामधील अट क्र. 22 अन्वये कामाच्या ठिकाणी कामाचे माहिती दर्शक फलक लावणे बंधनकारक आहे. तथापि, ठेकेदाराने कामाच्या माहितीचा फलक कामाच्या ठिकाणी लावल्याचे छायाचित्रात आढळुन येत नाही. त्यामुळे करारनाम्यातील सदर अटी/शर्तीचे अनुपालन झाले नाही.

5. महानगरपालिकेने आर.सी.सी. पाईप पुरवठा करणेसाठी स्वतंत्र ठेकेदार नेमला आहे. या कामासाठी नेमणुक केलेल्या ठेकेदाराकडुनच आर.सी.सी. पाईप खरेदी केले असल्याचे चलन / इनव्हाईस नस्तीवर लेखापरिक्षणात आढळुन येत नाहीत.

6. राष्ट्रीय नगरपालिका लेखासंहिता मधील नियम क्रमांक 12.82(डी) नुसार कामाच्या ठिकाणी वापरलेल्या माल/साहित्याच्या खरेदीचे चलन / इनव्हाईस मालाच्या वाहतुकीचे पास इत्यादी अभिलेख रक्कम प्रदान करण्यापुर्वी कंत्राटदाराकडुन प्राप्त करणे आवश्यक आहे. तथापि, सदर अभिलेख लेखापरिक्षणाकरिता नस्तीत उपलब्ध न झाल्याने मालाची खरेदी स्पेशिफिकेशन प्रमाणेच केल्याची पडताळणी करता आली नाही . तसेच ठेकेदारस केलेल्या प्रदानाची पडताळणी करता आली नाही.

7. सदर कामा करिता सन 2013-14 या वर्षाच्या दरसुचीच्या आधारे दरपृ:थकरण करण्यात आले आहे. शहर अभियंता व मा. आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांनी प्रमाणित केलेले आणि महानगरपालिकेने प्रमाणित केलेल्या दर:पृथकरणाची प्रत लेखापरिक्षणास उपलब्ध झालेली नसल्यामुळे अंदाजपत्रकीय रक्कम रु.69,98,635/- लेखापरिक्षण कालावधीत आक्षेपाधित ठेवण्यात येत आहे. सदरील अनियमिततां बाबत विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक 32 दिनांक 9/1/2019 अन्वये अनुपालन सादर करण्या विषयी कळविण्यात आले होते. तथापि, विभागाने कोणताही खुलासा केला नसल्याने वरील आक्षेप कायम करून रक्कम रुपये 69,98,635/-आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATANJM6301 (Ref No : 25, Hmm No : 32)

## *35 सनसिटी गासरोड तुळजाभवानी मंदिरा समोरील नवीन उद्यानात आकर्षक गार्डन पोल उभारणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**No. of Irregularities: 7**

*लेखा शीर्ष : दिवाबत्ती पोल स्थलां महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 3907066.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3907066.00/-

***निविदा प्रसिध्दीसाठी विहित करण्यात आलेली कालमर्यादा पाळली नाही. कामाच्या मुल्यानुसार जाहिरात प्रसिद्ध व जाहिरात वितरण करणाऱ्या अधिकाऱ्यांचे वर्गिकरणा नुसार कार्यवाही केलेली नाही. तसेच प्राकलन दरापेक्षा 5% जादा दराची निविदा स्विकारण्या पुर्वी ठेकेदारासोबत वाटाघाटी केल्याचे नस्तीवर आढळुन येत नाही. कामपुर्णत्वाचे प्रमाणपत्र निर्गमित केल्याचे लेखापरिक्षणात आढळुन येत नाही. कामाच्या प्रगतीनुसार कामाचे मोजमाप नोंदविल्याचे दिसुन येत नाही. मालाची खरेदी स्पेशिफिकेशन प्रमाणेच झाल्याची खात्री करता आली नाही. तसेच ठेकेदारास केलेल्या प्रदानाची पडताळणी करता आली. सदर नस्तीच्या लेखापरिक्षणात ठेकेदाराने स्थानिक संस्था करा बाबतचे प्रमाणपत्र जोडल्याचे दिसुन येत नाही. त्याच प्रमाणे करारनाम्यातील अट क्र. 23 चे ठेकेदाराने अनुपालन केले नाही.***

| | |
|---|---|
| प्रकालन रक्कम रु. | 39,07,066/- |
| लेखाशिर्ष | दिवाबत्ती पोल स्थलांतर व सर्किट लाईट व्यवस्था |
| प्रशासकीय व वित्तीय मान्यता | स्थायी समिती प्रस्तावाचा ठराव क्र.1026 दि.17/11/2014 |
| तांत्रिक मंजुरी | शहर अभियंता बुक क्र. I पृष्ठ क्र. 35/324 दि. 26/11/2014 |
| निविदा प्रसिध्दी वृत्तपत्राचे नाव व दिनांक | दै. 'वार्ताहर' दै. 'महाराष्ट्र जनमुद्रा' दि. 7/01/2015 |
| ई निविदा | महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दि. 8/1/15 ते दि. 17/1/15 पर्यत |
| ऑनलाईल अर्ज करण्याचा कालावधी | 3 दिवस दि. 19/1/15 ते 21/1/15 |
| एकुण प्राप्त निविदाकार | तीन 1) मे.यश इंजिनिअरिंग 2) मे.करंट इलेक्ट्रॉनिक्स 3) मे.किंजल इलेक्ट्रॉनिक्स |
| न्युनतम निविदाकार | मे.यश इंजिनिअरिंग प्राकलन दराच्या 5 % जादा दराने |
| दरसुची | महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग सन 2013-14 |
| 4 % सुरक्षा अनामत भरणे व | जा.क्र. 474/2015-16 दि. 27/04/2015 |

| | |
|---|---|
| करारनामा करणेबाबत पत्र | |
| करारनामा दिनांक | 8/05/2015 |
| कार्यादेश | जा.क्र.वविशम-806/2015-16 दि. 12/5/2015 |
| कामाची मुदत | 4 महिने |
| काम पुर्ण झाल्याची दिनांक | दि. 7/8/2015 |
| तपासणी अहवाल | नस्तीत उपलब्ध नाही |
| मोजपाम पुस्तक क्र. | 42 पृष्ठ क्र. 8 ते 13 |

उपरोक्त कामा अनुषंगाने लेखापरिक्षणास उपलब्ध झालेल्या नस्तीचे लेखापरिक्षणात खालील आक्षेप नोंदविण्यात येत आहेत.

1. कामाच्या मुल्यानुसार प्रसिध्द करावयाच्या जाहिराती बाबतचे वर्गिकरण व जाहिरात वितरण करणाऱ्या अधिकाऱ्यांचे वर्गिकरण करण्यात आले आहे. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.पीयुवी-1000/प्र.क्र.73/2000/34 दि. 1/5/2001 अन्वये कामाचे मुल्य रु. 15 लाखाच्यावर ते रु. 50 लाखापर्यंत आहे अशा कामाची जाहिरात विभागीय माहिती उपसंचालक यांचे मार्फत एक 'ब' वर्ग दैनिक व साप्ताहिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याबाबत आदेश आहेत. सदरची निविदा ही रु. 34 लाख रकमेची असल्यामुळे सदर शासन निर्णयात नमुद केल्यानुसार जाहिरात प्रसिध्द देणे आवश्यक होते. तथापि, महानगरपालिकेने दैनिक "वार्ताहर" व दैनिक "महाराष्ट्र जनमुद्रा" या दैनिकात जाहिरात प्रसिध्द केली आहे. त्यामुळे उपरोक्त शासन निर्णयातील आदेशाचे अनुपालन झाले नाही. महानगरपालिकेस सपर्धात्मक दराचा फायदा झाल्याचे लेखापरिक्षणात आढळुन आले नाही.

2. दैनिक 'वार्ताहर' व 'महाराष्ट्र जनमुद्रा' या वृत्तपत्रात दि.8/01/2015 रोजी प्रसिध्द केलेल्या निविदा सुचना मध्ये संकेत स्थळावर ही माहिती दि. 8/01/2015 ते दि. 17/1/2015 पर्यत उपलब्ध असेल असे नमुद असुन ई-निविदा स्विकृती दिनांक 19/1/2015 सांयकाळी 3.00 पासुन ते दि. 21/1/2015 दु. 4 वाजेपर्यत असे नमुद आहे. महाराष्ट्र बांधकाम नियम पुस्तिका परिच्छेद 202 सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय सीएटी 10/2006/प्र.क्र.33/इमारती -2 दि. 2/11/2006 अन्वये रु. 50 लक्ष पर्यतच्या कामांकरिता प्रथम सुचना कालावधी 15 दिवस निश्चित केला आहे. सदर निविदा प्रसिध्दीसाठी ही कालमर्यादा पाळली नाही. त्यामुळे सदर नियमांचे उल्लंघन झाले आहे.

3. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका मधील परिशिष्ठ 24 अन्वये केलेल्या कामाचे मोजमाप घेण्याबद्दल आणि नोंदवहया ठेवण्या संबंधी नियम विषद करण्यात आले आहेत. प्रस्तुत कामाची नोंद मोजमाप नोंदवही क्र. 42 मध्ये पृष्ठ क्र. 8 ते 13 वर घेण्यात आली आहे. तथापि, मोजणीची तारीख नोंदविण्यात आलेली नाही. नस्तीमध्ये नमुद केल्यानुसार सदर कामाच्या पुर्णत्वाचा दिनांक 07/8/2015 असा आहे. कामाच्या प्रगतीनुसार कामाचे मोजमाप नोंदविल्याचे दिसुन येत नाही.

4. करारनाम्यातील अट क्र.1 नुसार काम उत्कृष्ठ दर्जाचे माल साहित्य वापरुन सार्वजनिक बांधकाम (विद्युत) खात्याच्या स्पेशिफिकेशन प्रमाणे पुर्ण करुन देणेस ठेकेदारास बंधनकारक राहील अशी अट आहे. राष्ट्रीय नगरपालिका लेखासंहिता मधील नियम क्रमांक 12.82 (डी) नुसार कामाच्या ठिकाणी वापरलेल्या माल/साहित्याची खरेदी चलन/इनव्हाईस, मालाच्या वाहतुकीचे पास इत्यादी अभिलेख रक्कम प्रदान करण्यापुर्वी कंत्राटदाराकडुन प्राप्त करणे आवश्यक आहे. तसेच काम उत्कृष्ट दर्जाचे माल वापरुन सार्वजनिक बांधकाम खात्याच्या स्पेशिफिकेशन प्रमाणे पुर्ण करुन देणे ठेकेदारास बंधनकारक राहील अशी अट करारनाम्यातील अ.क्र.1 वर नमुद करण्यात आली आहे. तथापि, सदरचा

अभिलेख लेखापरिक्षणात नस्तीत उपलब्ध न झाल्याने मालाची खरेदी स्पेशिफिकेशन प्रमाणेच झाल्याची खात्री करता आली नाही. तसेच ठेकेदारास केलेल्या प्रदानाची पडताळणी करता आली.

5. ठेकेदाराने दर सादर करतांना आयकर, जकातकर वा इतर तत्सम करासहित सादर केले असल्याने ठेकेदारास सदर कामी मुभा वा सवलत देता येणार नाही असे करारनाम्यातील अट क्र. 9 मध्ये नमुद केले आहे. तसेच अट क्र. 21 अन्वये स्थानिक संस्था करासाठी नोंदणी करणे ठेकेदारास बंधनकारक आहे. अन्यथा देयक अदा केले जाणार नाही असे नमुद केले आहे. सदर नस्तीच्या लेखापरिक्षणात ठेकेदाराने स्थानिक संस्था करा बाबतचे प्रमाणपत्र जोडल्याचे दिसुन येत नाही तथापि, धावते देयक 1 व 2 मध्ये स्थानिक संस्था कर 1% वसुल केला आहे. महानगरपालिकेने करारनामा व कार्यालयीन आदेशामध्ये नमुद केलेल्या अटी/शर्ती नुसार उर्वरीत 4% रक्कम ठेकेदाराकडुन वसुल करुन शासन खाती भरल्याची चलनाची प्रत लेखापरिक्षणांस उपलब्ध करुन देण्यात यावी.

6. करारनाम्यातील अट क्र. 23 नुसार ठेकेदाराने कामाचे ठिकाणी फलक लावणे आवश्यक आहे. तथापि, ठेकेदाराने कामाच्या ठिकाणी फलक लावल्याचे लेखापरिक्षणात आढळुन येत नाही.

7. कार्यादेशातील अट क्र. 5 अन्वये विद्युत कामासाठी वापरावयाच्या साहित्याचे टेस्ट रिपोर्ट ठेकेदाराने करुन घेतल्याचे नस्तीवर आढळुन येत नाही. सदरील अनियमिततां बाबत विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक 50 दिनांक 25/1/2019 अन्वये अनुपालन सादर करण्या विषयी कळविण्यात आले होते. तथापि, विभागाने कोणताही खुलासा केला नसल्याने वरील आक्षेप कायम करून रक्कम रुपये 39,07,066/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATANJM6301 (Ref No : 26, Hmm No : 50)

## *36 प्रभाग समिती “क” नालासोपारा (प.) फनफिएस्टा थेअटरच्या मागे आरसीसी नाला बांधणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 8**

*लेखा शीर्ष :इतर विकास कामे महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 6926038.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 6926038.00/-

***निविदा प्रसिध्दीकरिता विहीत केलेली कालमर्यादा पाळली नाही. तसेच निविदा प्रसिध्दी जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात दिल्याचे आढळून आले नाही. कार्यादेशाच्या दिनांकास ठेकेदाराकडे वैध प्रमाणपत्र असल्याचे दिसुन येते नाही. त्याच प्रमाणे मालाची खरेदी स्पेशिफिकेशन प्रमाणेच केल्याची तपासणी करता आली नाही. कार्यादेशामधील अट क्र.15 व करारनाम्यातील अट क्र. 22 चे ठेकेदाराकडून अनुपालन झालेले नाही. शासन खाती जमा केलेल्या स्वामित्वधनाच्या रक्कमेची चलने लेखापरिक्षणास उपलब्ध झाली***

***नाहीत. नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याने Dewatering करिता घेण्यात आलेल्या मोजमापाची खात्री करता आली नाही.***

| | |
|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम रु. | 69,26,038/- |
| लेखाशिर्ष | इतर विकास कामे |
| प्रशासकीय मान्यता | स्थायी समिती सभा विषय ठराव क्र.1931 दि. 1/3/2014 |
| तांत्रिक मान्यता | शहर अभियंता बुक क्र.I 58/509 दि. 1/3/14 |
| निविदा प्रसिध्दी वृत्तपत्र व दिनांक | दैनिक “खबरे आजतक” व “सामना” दि. 28/5/2014 |
| ई निविदा स्विकृती दि. | दि. 7/6/2014 |
| ई निविदा उघडण्याचा दिनांक | दि. 13/6/2014 |
| एकुण प्राप्त निविदा | तीन 1) मे. सुधाकर बी. दातीर 2) मे. धनेश्वर भोईर 3) मे. नेवाळकर एन्टरप्रायझेस |
| न्युनतम निविदाकार | मे. सुधाकर बी. दातीर, अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा 4.89% जादा दराने |
| दरसुची | सार्वजनिक बांधकाम विभाग दरसुची सन 2012-13<br>मोजमाप पुस्तिका क्र. 45 |
| करारनामा | आहे दि.12/8/2014 |
| कार्यादेश | वविशम/काअ/बांध/770/14-15 दि.12/8/14 |
| कामाची कालावधी | 7 महिने |

प्रस्तावित कामा अनुषंगाने पुढील प्रमाणे अभिप्राय नोदविण्यात येत आहेत.

1. प्रस्तुत कामाची निविदा जाहीरात दैनिक “सामाना” व “खबरे आजतक” या वृत्तपत्रात दि. 26/5/2014 रोजी प्रसिध्दी देण्यात आली असुन महापालिकेच्या संकेतस्थळावर दि. 28/05/2014 ते 4/6/2014 पर्यत उपलब्ध करुन दिली आहे. तसेच ऑनलाईन ई-निविदा स्विकृती करिता दि. 6/6/2014 दु. 3.00 ते 7/6/2014 दु. 4.00 वाजेपर्यत असा कालावधी देण्यात आला आहे. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग नियम पुस्तिका परिच्छेद क्रमांक 202, सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय सीएटी 10/2006/प्र.क्र.33/इमारती-2 दि. 2/11/2006 अन्वये रु. 50 लक्ष पेक्षा जास्त किंमतीच्या कामासाठी पहिली निविदा सुचना कालावधी 25 दिवस निश्चित करण्यात आली आहे. सदर निविदा प्रसिध्दीकरिता विहीत केलेली कालमर्यादा पाळली नाही. त्यामुळे सदर नियमांचे उल्लंघन झाले आहे.

2. निविदा मागवितांना प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर आवश्यक आहे. निविदा प्रसिध्दी जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात देऊन निविदा मागविणे अधिक फायदयाचे ठरते. त्यामुळे दर्जेदार व माफक दराचा फायदा होतो. महानगरपालिकेने सदर प्रकरणाची जाहिरात स्थानिक दैंनिक “खबरे आजतक” या वृत्तपत्रात प्रसिध्द केली आहे. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय पीयुबी 1000/प्र.क्र.73/2000/34 दि. 1/5/2001 अन्वये ज्या कामाचे मुल्य 50 लाखांपेक्षा अधिक आहे अशा कामांची जाहिरात संबंधित विभागातील ‘अ’ वर्ग दैनिकात व त्या

विभागातील 'ब' व ज्या जिल्हयाचे काम असेल त्या जिल्हयातील 'क' वर्ग दैनिकात प्रसिध्द करणे आवश्यक आहे. तसेच त्याचे वितरण माहिती व प्रसारण विभागा कडून होणे आवश्यक होते. तथापि, सदर निविदा जाहिराती प्रकरणी शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही. परिणामी व्यापक प्रसिध्दी अभावी महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा झाल्याचे आढळुन येत नाही.

3. ज्या दिनांकास कार्यादेश निर्गमित करण्यात आला आहे. त्या दिनांकास ठेकेदाराचे वैध नोंदणी प्रमाणपत्र नस्तीवर आढळुन येत नाही. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग जव्हार जि. ठाणे यांनी दि. 8/1/2014 रोजी निर्गमित केलेल्या नोंदणी प्रमाणपत्र श्री.सुधीर बी. दातीर यांना दि. 5/2/2014 ते दि. 3/8/2014 पर्यत (180 दिवस) प्रथम व अंतिम मुदतवाढ देण्यात येत असलेले प्रमाणपत्रात नमुद आहे. दि. 12/8/2014 रोजी निर्गमित केलेल्या कार्यादेशाच्या दिनांकास सदरचा ठेकेदाराकडे वैध प्रमाणपत्र असल्याचे दिसुन येते नाही.

4. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिशिष्ठ 24 अन्वये कामाच्या प्रगती प्रमाणे दिनांक निहाय कामाच्या नोंदी मोजमाप पुस्तिकेमध्ये नोंदविणे आवश्यक आहे. सदर प्रकरणी दि. 12/8/2014 रोजी कार्यादेश निर्गमित केल्यानंतर काम पुर्ण झाल्यानंतर दि. 9/3/2015 या दिनांकास मोजमाप पुस्तिकेत सर्व परिमाणे नोंदविण्यात आली आहेत. त्यामुळे उपरोक्त परिशिष्ठात नमुद केल्याप्रमाणेच्या कार्यपध्दतीचे अनुपालन केल्याचे दिसुन येत नाही.

5. राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहिता मधील नियम क्र.12.82 (डी) नुसार कामाच्या ठिकाणी वापरलेल्या माल/साहित्याच्या खरेदीची चलन / इनव्हाईस, मालाच्या वाहतुकीची चलने इत्यादी अभिलेख रक्कम प्रदान करण्यापुर्वी कंत्राटदाराकडुन प्राप्त करणे आवश्यक आहे. तथापि, सदरचा अभिलेख लेखापरिक्षणा करिता नस्तीत उपलब्ध नसल्याने मालाची खरेदी स्पेशिफिकेशन प्रमाणेच केल्याची तपासणी करता आली नाही. त्यामुळे ठेकेदारास केलेल्या प्रदानाची योग्यता पडताळता आली नाही.

6. कार्यादेशामधील अट क्र.15 व करारनाम्यातील अट क्र. 22 नुसार कामाच्या ठिकाणी कामाचे नाव इस्टीमेट रक्कम ठेकेदाराच नाव कामाची मुदत दर्शविणारा रंगीत फलक लावणे आवश्यक आहे. ठेकेदाराने सदरची कार्यवाही केली नसल्यामुळे कार्यादेश व करारनाम्यातील अटीचे अनुपालन झालेले नाही.

7. कार्यादेश दि. 12/8/2014 रोजी निर्गमित झाले आहेत. याच दिनांकास सकाळी 7.15 वाजले पासुन गौण खनिज वाहतुक सुरु केली आहे. गौण खनिज वाहतुक परवाना पावती क्र.1001 ते 1096 दि. 12/8/2014 (एकुण चलने 96) तसेच पावती क्र.1665 ते 1674 दि. 17/8/2014 (एकुण चलने 10) चलने नस्तीवर उपलब्ध् आहेत. सदरच्या चलनाव्दारे 212 ब्रास गौण खनिज (दगड / डबर) कोणत्या कामाकरिता वापरण्यात येणार आहे याचा चलनावर उल्लेख नाही. त्यामुळे ठेकेदाराने सदर कामाकरिता वापरलेल्या गौण खनिजा पोटी स्वामित्वधन म्हणुन किती रक्कम शासन खाती जमा केली हे नस्तीवर आढळुन येत नाही. शासन खाती जमा केलेल्या स्वामित्व धनाच्या रक्कमेची चलने लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात यावीत.

8. मोजमाप पुस्तिका क्र. 45 मधील पृष्ठ क्र. 45 वर बाब क्र. 3 (Dewatering) या करिता एकुण 1450 तास पंप चालविल्याची नोंद आहे. कार्यादेश दि. 12/8/2014 ते 9/3/2015 या कालावधीत सदरचे काम 210 दिवसात पुर्ण केले आहे. 210 दिवसांपैकी Dewatering करिता (1450 ÷ 24 = 60 दिवस 41 मिनिट) सतत 60 दिवस वापरण्यात आलेले आहेत. सदर प्रकरणी ठेवण्यात

आलेली नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध न झाल्याने Dewatering करिता घेण्यात आलेल्या मोजमापाची खात्री करता आली नाही. सदरील अनियमिततां बाबत विभागास अर्धसमास ज्ञापन क्रमांक 55 दिनांक 25/1/2019 अन्वये अनुपालन सादर करण्या विषयी कळविण्यात आले होते. तथापि, विभागाने कोणताही खुलासा केला नसल्याने वरील आक्षेप कायम करून रक्कम रुपये 69,26,038/- आक्षेपाधीन ठेवण्यात येत आहे.

DATANJM6301 (Ref No : 27, Hmm No : 51)

## *37 प्रभाग समिती कार्यालय वालीव अतंर्गत अर्जदार श्री. चंदर बी. सजनानी यांच्या मालमत्ता कर आकारणी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 26782.00/-

***प्रभाग समिती वालीव कार्यालय यांनी कर आकारणी करतांना असेसमेन्ट यादी नुसार कर आकारणी केली नाही. कमी कर आकारणी केल्यामुळे महानगरपालिकेचे रक्कम रुपये 26782/- इतके नुकसान झाले आहे.***

| | |
|---|---|
| अर्जदार | चंदर बी. सजनानी/हर्षा सी. सजनानी |
| मालक | चंदर बी. सजनानी/हर्षा सी. सजनानी |
| सर्वे नं. | 95 |
| गाव | वालीव |
| बांधकाम परवानगी क्र.(सीसी) | CIDCO/VVSR/CC/BP/3962/E/487 दि.24/4/2006 |
| भोगवटा दाखला क्र. | CIDCO/VVSR/OC/BP/3962/E/2008 दि.25/8/2008 |
| बांधकामाचा प्रकार | अ |
| बांधकामाचे क्षेत्र | औद्योगिक 1967 चौ.फु. |
| दर | औद्योगिक रु. 3/- |
| निश्चित केलेले कर योग्य मुल्य | रु. 5,901/- |
| आकारण्यात आलेले कर | घरपट्टी 5901 + दिवाबत्ती कर 50 + आरोग्य कर 50 = 6001/- |

| प्रत्यक्ष पाहणी अहवाल | आहे |
|---|---|
| कर आकारणीचे आर्थिक वर्ष | सन 2015-16 |

विषयांकीत नस्तीच्या लेखापरिक्षणात खालील प्रकारच्या त्रुटी आढळुन आल्या आहेत.

5) प्रभाग समिती वालीव कार्यालय यांनी सदर क्षेत्रफळा करिता कर आकारणी केली असुन असेसमेन्ट यादी नुसार सन 2015-16 करिता रुपये 6001/- इतके निश्चित केले आहे . तथापि, निश्चित केलेल्या करानुसार करवसुल केल्याचे आढळुन येत नाही.

6) मालमत्ता क्रमांक 6357/1 ते 10 मागणी व खतावणी रजिस्टर 2015-16 मध्ये नोंदविण्यात आलेली रक्कम खालील प्रमाणे.

| एकत्रित मालमत्ता कर | | | दिवाबत्ती कर | | | आरोग्य कर | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मागील | चालु | एकुण | मागील | चालु | एकुण | मागील | चालु | एकुण | |
| 13050 | 2175 | 15225 | 300 | 50 | 350 | 300 | 50 | 350 | 15925 |

नगरविकास विभागाने त्यांचे पत्र क्रमांक वविशम /नर/शा 716/2015-16 दि. 31/12/2015 अन्वये भोगवटा प्रमाणपत्र दि. 25/8/2008 ची तपासणी करुन ते बरोबर असल्याचे प्रमाणित केले आहे . त्यामुळे सन 2009 ते 2014 (एकुण 6 वर्ष) पर्यत मालमत्ता कराची वसुली झाल्याचे दिसुन येत नाही

| एकत्रित मालमत्ता कर | | | दिवाबत्ती कर | | | आरोग्य कर | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मागील | चालु | एकुण | मागील | चालु | एकुण | मागील | चालु | एकुण | |
| 36006 | 6001 | 42007 | 300 | 50 | 350 | 300 | 50 | 350 | 42707 |

सदर तक्यात नमुद केल्याप्रमाणे एकुण रुपये 42707/- इतकी रक्कम वसुल होणे आवश्यक असतांना उपरोक्त तक्यात नमुद केल्याप्रमाणे केवल 15925/- इतकीच कर आकारणी करुन वसुल केल्यामुळे 26782/- इतक्या रक्कमेचे महानगरपालिकेचे नुकसान झाले आहे . सदरची रक्कम संबंधीतांकडु न वसुल करुन महानगरपालिकेच्या खाती जमा केल्याच्या चलनाची प्रत लेखा परिक्षणास सादर करणे बाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक 89 दिनांक 11/3/2019 अन्वये विभागास अनुपालन सादर करण्याविषयी अवगत करण्यात आले होते . तथापि, विभागाने विहीत मुदतीत अनुपालन सादर न केल्यामुळे वरी ल प्रमाणेचे आक्षेप कायम करुन रक्कम रुपये 26782/- वसुलपात्र ठेवण्यात येत आहे.

DATANJM6301 (Ref No : 32, Hmm No : 89)

## *38 नालासोपारा प्रभाग समिती क्षेत्रातील मालमत्ता कर आकारणी मधील नुकसानी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***श्री.लक्ष्मी शांती अपार्टमेंट मधील एकुण 36 सदनिका धारकांची नावे व सदनिकेचे क्षेत्रफळ नमुद केले आहे. प्रत्यक्ष असलेले क्षेत्रफळ व करयोग्य मुल्य निश्चिती करिता विचारात घेण्यात आलेले क्षेत्रफळ यात तफावत आढळुन येत आहे. त्यामुळे कर योग्य मुल्याची फेरतपासणी होवुन नव्याने कर आकारणी होणे आवश्यक आहे.***

| | |
|---|---|
| अर्जदार | सुगंध नरहरी सोपारकर |
| मालक | मे.आकृती कॉन्ट्रक्टर ॲन्ड डेव्हलपमेंन्ट प्रा.लि. |
| सर्वे नं. | 105 |
| गाव | तुळींज |
| बांधकाम परवानगी क्र. | नाही |
| भोगवटा दाखला क्र. | नाही |
| बांधकामाचा प्रकार | अ |
| बांधकामाचे क्षेत्र | रहीवास- 7025, वाणिज्य- 1750 |
| एकुण सदनिका | 24 सदनिका व 4 दुकाने |
| दर | रहीवास रु. 1.40, वाणिज्य रु. 2.10 |
| निश्चित केलेले कर योग्य मुल्य | रु. 1,45,908/- |
| आकारण्यात आलेले कर | रु. 1,41,750/- |
| अनधिकृत असल्याची शास्ती | रु. 81,722/- |

विषयांकीत नस्तीच्या लेखापरिक्षणात खालील त्रुटी आढळुन आल्या आहेत.

1. श्री.जनार्दन तुकाराम सनगरे यांनी मे .सारा डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री .सुगंध नरहरी सोपारकर यांचे सोबत दि.8/2/2013 रोजी करारनामा केला असुन सदर करारनाम्यात त्यांनी नमुद केले आहे की “लिहुन देणार (बिल्डर) यांनी लिहुन घेणार हयांना नविन इमारती मध्ये कायम स्वरुपी पर्यायी जागा म्हणुन एक रुम दिली आहे. ज्याचा रुम नं. 204, ज्याचे क्षेत्रफळ 450 चौ.फु. असे आहे”. सदर नस्तीमध्ये श्री.लक्ष्मी शांती अपार्टमेंट मधील एकुण 36 सदनिका धारकांची नावे व सदनिकेचे क्षेत्रफळ नमुद केले आहे . यात दुसरा मजला रुम नं .204 व क्षेत्रफळ 300 चौ.फु. असे नमुद केले आहे. तर करयोग्य मुल्य निश्चिती करतांना विभागाने रुम नं.204 चे क्षेत्रफळ 225 चौ.फु. इतके नमुद करुन करयोग्य मुल्य निश्चित केले आहे त्यामुळे 225 चौ.फु क्षेत्राची कर आकारणी न झाल्याने महानगरपालिकेचे नुकसान झाले आहे . 225 चौ.फु. क्षेत्राची कर वसुली करुन लेखा परिक्षणास अनुपालन दर्शविण्यात यावे.

2. नस्तीमध्ये महापालिकेने प्रत्यक्ष पाहणी करुन क्षेत्रफळाची मोजणी केलेला अहवाल आढळुन येत नाही . त्यामुळे करयोग्य मुल्य निश्चिती करण्याकरिता नमुद केलेल्या क्षेत्रफळाची लेखा परिक्षणात खात्री करता आली नाही.

3. खालील नमुद तक्त्यातील प्रत्यक्ष असलेले क्षेत्रफळ व करयोग्य मुल्य निश्चिती करिता विचारात घेण्यात आलेले क्षेत्रफळ यात तफावत आढळुन येत आहे

| अ.क्रं | मालकाचे नाव | रुम नं. | क्षेत्रफळ (चौ.फु.) | करयोग्य मुल्य निश्चिती करिता विचारात घेतलेले क्षेत्रफळ (चौ.फु.) | फरक (चौ.फु.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | संदिप रत्नाकर मोहिते | 107 | 375 | 275 | 100 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | जनार्दन तुकाराम सनगरे | 204 | 450 | 225 | 225 |
| 3 | सौ.विनया विनायक चव्हाण | 304 | 450 | 300 | 150 |
| 4 | विजय बाबु वालेकर | 307 | 375 | 275 | 100 |

प्रत्यक्ष् असलेले क्षेत्रफळ विचारात घेवुन सुधारीत करयोग्य मुल्य निश्चित करुन मालमत्ता कराची वसुली करुन लेखा परिक्षणास अनुपालन दर्शविण्या बाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक 90 दिनांक 11/3/2019 अन्वये विभागास अनुपालन सादर करण्याविषयी अवगत करण्यात आ ले होते. तथापि, विभागाने विहीत मुदतीत अनुपालन सादर न केल्यामुळे वरील प्रमाणेचे आक्षेप कायम ठेवण्यात येत आहेत.

DATANJM6301 (Ref No : 33, Hmm No : 90)

## ***39 वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य पुरवठा करणे बाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 27500000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 27500000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 13200.00/-

***निविदा कालावधी कमी ठेवण्यात आला, निविदेस योग्य त्या स्तरावर प्रसिध्दी नाही, आवश्यक स्पर्धेचा लाभ नाही, आवश्यकतेपेक्षा जास्त खरेदी, जिल्हा परिषद स्तरावर प्रस्तुत योजनेचा लाभ दिल्याची खात्री नाही, रु.13200/- चा कमी मुद्रांक शुल्क भरणा इ.***

| | |
|---|---|
| प्राकलन रक्कम रु. | 2,75,00,000/- |
| लेखाशिर्ष सांकेतांक | 722-2740-2 |
| प्रशासकीय मान्यता | मा.आयुक्त (विभागाची दि.20/2/2015 रोजीची टिप्पणी) |
| प्रशासकीय व वित्तीय मंजुरी | स्थायी समिती सभा ठराव क्र.55 दि.29/9/2015<br>महासभा ठराव क्र.10 दि.23/3/2015 |

| | |
|---|---|
| निविदा प्रसिध्दी वृत्तपत्राचे नाव व दिनांक | दैनिक वार्ताहर व दैनिक जागल्या दि.13/5/2015 |
| ई-टेंडर | मनपाच्या संकेतस्थळावर दि .13/5/2015 ते 21/5/2015 सांय.4.00 वाजेपर्यंत उपलब्ध |
| ऑनलाईन अर्ज स्विकृती | दि.21/5/2015 संध्याकाळी 5.00 वाजेपासुन ते दि .24/5/15 संध्याकाळी 6.00 पर्यंत |
| निविदा उघडण्याचा दिनांक | 25/5/2015 (संध्याकाळी 6.57 वाजता) |
| प्राप्त निविदा | एकुण 7 |
| न्युनतम निविदाकार | एकुण 5, 1) मे.हरजित कलेक्शन 2) मे.युध्दी एंटरप्रायझेस 3) सुहास एंटरप्रायझेस 4) एम.के.शहा एंटरप्रायझेस 5) वरायटी बुक सेंटर ॲण्ड स्टेशनरी |
| वाटाघाटीसाठी पाचारण | दि.1/7/2015 रोजीचे पत्र |
| करारनामा रक्कम रुपये व दिनांक | आहेत<br>1) मे.हरजित कलेक्शन रु. 6600/- दि. 3/10/2015<br>2) सुहास एंटरप्रायझेस रु. 5000/- दि. 3/9/2015<br>3) युध्दी एंटरप्रायझेस रु. 100/- दि. 5/10/2015<br>4) एम.के.शहा एंटरप्रायझेस रु. 1300/- दि. 30/9/2015<br>5) वरायटी बुक सेंटर ॲण्ड स्टेशनरी रु . 400/- दि. 30/9/2015 |
| कार्यादेश | नस्तीवर उपलब्ध नाही |

वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य पुरवठा करणे बाबतची नस्ती लेखा परिक्षणांस उपलब्ध झाली असुन सदर नस्तीवर खालील प्रमाणेचे आक्षेप नोंदविण्यात येत आहेत.

1) प्रस्तुत कामाची निविदा जाहीरात दैनिक "जागल्या" व "वार्ताहार" या वृत्तपत्रात दि.13/5/2015 रोजी प्रसिध्दी देण्यात आली असुन महापालिकेच्या संकेतस्थळावर दि.13/05/2015 ते 21/05/2015 पर्यंत उपलब्ध करुन दिली आहे. तसेच ऑनलाईन ई-निविदा स्विकृती करिता दि.21/5/2015 संध्याकाळी 5.00 वाजेपासुन ते दि.24/5/2015

पर्यत संध्याकाळी 6.00 वाजेपर्यत असा कालावधी देण्यात आला आहे . सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय सीएटी 10/2006/प्र.क्र.33/इमारती-2 दि.2/11/2006 अन्वये रु. 50 लक्ष पेक्षा जास्त् किंमतीच्या कामासाठी पहिली निविदा सुचना कालावधी 25 दिवस निश्चित करण्यात आली आहे. सदर निविदा प्रसिध्दीकरिता विहीत केलेली कालमर्यादा पाळली नाही. त्यामुळे सदर नियमांचे उल्लंघन झाले आहे.

2) वस्तु खरेदीसाठी निविदा मागवितांना प्रसिध्दी माध्यमांचा अधिकाधिक वापर करणे आवश्यक आहे. निविदा प्रसिध्दी जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवरील वर्तमान पत्रात देऊन निविदा मागविणे अधिक फायदयाचे ठरते . त्यामुळे चढाओढीची दरपत्रके प्राप्त होतात व त्यातुन दर्जेदार व माफक दराचा फायदा होतो . महानगरपालिकेने सदर प्रकरणाची जाहिरात स्थानिक वृत्तपत्र दैंनिक "जागल्या" व दैंनिक "वार्ताहार" या वृत्तपत्रात प्रसिध्द केली आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र . भांखस.1088/(2512)/उद्योग -6 दि.2/1/1992 मधील परिच्छेद क्र.10:8 चे उल्लंघन झाले आहे.

3) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय पीयुबी 1000/प्र.क्र.73/2000/34 दि.1/5/2001 अन्वये ज्या कामाचे मुल्य् 50 लाखांपेक्षा अधिक आहे अशा कामांची जाहिरात संबंधित विभागातील 'अ' वर्ग दैनिकात व त्या विभागातील 'ब' व ज्या जिल्हयाचे काम असेल त्या जिल्हयातील 'क' वर्ग दैनिकात प्रसिध्द करणे आवश्यक आहे. तसेच त्याचे वितरण मुख्यालयाकडुन होणे आवश्यक होते. तथापि, सदर निविदा जाहिराती प्रकरणी महानगरपालिकेने पालिका स्तरावर जाहिरात प्रसिध्द केल्यामुळे शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही . परिणामी व्यापक प्रसिध्दी अभावी महानगरपालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा झाल्याचे आढळुन येत नाही.

4) सन 2015-16 या वर्षामध्ये वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील जिल्हा परिषदेच्या एकुण 147 शाळा असल्याचे नस्तीत नमुद आहे . इयत्ता 1 ली ते 7 वी पर्यत पटावर असलेल्या एकुण विद्यार्थ्याची संख्या 22964 इतकी असुन यात इयत्ता 8 वी च्या एकुण 101 विद्यार्थ्याचा अंर्तभाव करुन सदरची पटसंख्या एकुण 23065 अशी नमुद आहे. वर्ग निहाय सदरची पटसंख्या खालील प्रमाणे.

| इयत्ता | मुलगे | मुली | एकुण |
|---|---|---|---|
| 1 ली | 1654 | 1845 | 3499 |
| 2 री | 1766 | 2005 | 3771 |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 री | 1727 | 2009 | 3736 |
| 4 थी | 1807 | 2056 | 3863 |
| 5 वी | 1251 | 1435 | 2686 |
| 6 वी | 1306 | 1500 | 2806 |
| 7 वी | 1274 | 1329 | 2603 |
| 8 वी | 54 | 47 | 101 |
| एकुण | 10839 | 12226 | 23065 |

वरील प्रमाणे एकुण पटसंख्या नस्तीवर उपलब्ध असतानांही 25000 नगांची खरेदी करण्यात आली आहे. परिणाम स्वरुप साहित्य वाटप करुनही खालील प्रमाणेचे साहित्य शिल्लक राहीले आहे.

| अ.क्र. | साहित्याचे नाव | शिल्लक नग | दर | एकुण |
|---|---|---|---|---|
| 1 | दप्तर | 255 | 155 | 39525 |
| 2 | रेनकोट | 255 | 175 | 44625 |
| 3 | बुट (बाटा) | 255 | 210 | 53550 |
| 4 | मोजे | 255 | 18 | 4590 |
| 5 | टुथब्रश | 255 | 14 | 3570 |
| 6 | कंपास बॉक्स | 142 | 55 | 7810 |
| 7 | वॉटर कलर(24 सेट) | 142 | 53 | 7526 |
| 8 | ड्राईग बुक | 90 | 19 | 1710 |
| 9 | वहया(100 पेजेस) | 863 | 13.90 | 11995.70 |
| 10 | वहया(200 पेजेस) | 2906 | 17.90 | 3741.10 |
| एकुण | | | | 1,78,642.80/- |

अचुक हजेरीपट उपलब्ध असतांनाही वरील प्रमाणे वाजवी पेक्षा जास्त खरेदी केल्याने महानगरपालिकेची रक्कम रुपये 1,78,643/- गुंतुन राहीली आहे . तसेच अनुज्ञेय ठरत नसतानांही महानगरपालिकेने इयत्ता 8 वी मधील 101 विद्यार्थ्यांना साहित्य पुरवठा केला आहे . सदर पुरवठा केलेल्या वस्तुंची पोच पावती नस्तीत दिसुन येत नाही.

5) आर्थिक दृष्टया दुर्बल व मागासवर्गीय विद्यार्थ्या करिता जिल्हा परिषदेकडुन वरील प्रमाणेच्या साहित्याची खरेदी करुन वाटप केले जाते या संदर्भात विभागाने जिल्हा परिषदेकडे सदरची योजना राबविण्यात आलेली आहे किंवा नाही याची खातरजमा केल्याचे दिसुन येत नाही.
6) मुबंई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 03 मधील तरतुदीनुसार कामाच्या ठेक्याचे संबंधीत पुरवठादारांकडुन अधिनियमाच्या शेडयुल 1 मधील क्रमांक 63 नुसार दि.1/5/2006 पासुन न्युनतम निविदाकाराकडुन विहीत रकमेचे मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे. निविदा नस्तीत नमुद केल्यानुसार एकुण 2,75,00,000/- रकमेची खरेदी करावयाची असल्याने रक्कम रुपये 26600/- इतक्या रकमेचे मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक असतांना एकुण 13400/- इतक्याच रकमेचे मुद्रांक शुल्क रक्कम वसुल करण्यात आली असल्यामुळे 13200/- रुपयाचे मुद्रांक शुल्कापोटी शासनाचे नुकसान झाले आहे . सबब सदरची रक्कम संबधीत पुरवठादारांकडुन वसुल करुन शासन खाती जमा केल्याची लेखा परिक्षणास अनुपालन दर्शवावे.

   प्रस्तुत आक्षेपाबाबत विभागास अर्धसमास पत्र क्रं . 97 दि. 28/03/2019 देण्यात आले होते , परंतु अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

DATANJM6301 (Ref No : 34, Hmm No : 97)

## *40 आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत बोट व बोटीवरील मच्छीमारांना लाईफ जॅकेट, लाईफ बॉय प्रथोमोपचार पेटी व साहित्य पुरविणे बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 10**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 30000000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 30000000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 19100.00/-

***निविदा प्रसिध्दीचा विहीत कालावधी पाळण्यात आला नाही, विविध जिल्हास्तरीय/ राज्यस्तरीय/ राष्ट्रीय पातळीवरील प्रसिध्दी न करता स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दी दिल्याने स्पर्धात्मक दराचा फायदा***

***महानगरपालिकेस झालेला नाही. रक्कम रु.19100/- रकमेचा मुद्रांक शुल्क भरणा केलेला नाही, अत्यावश्यक बाब म्हणून लाभार्थींना पुरवठा करण्याचा उद्देश सफल झाल्याचे दिसुन येत नाही, मे.सिकॉम सर्विसेस यांचे सोबत महानगरपालिकेने करारनामा केला असल्याचे दस्तऐवज आढळुन येत नाही.***

| | |
|---|---|
| प्राकलन रक्कम रु. | 3 कोटी |
| लेखाशिर्ष सांकेतांक | मच्छिमार आणि बोटीवरील मजुरांसाठी कल्याणकारी योजना |
| मंजुरी | 1) स्थायी समिती सभा ठराव क्र.790 दि.25/8/2014<br>2) सर्वसाधारण सभा ठराव क्र.20 सभा सुचना क्र.11 दि.14/1/2015 |
| प्रशासकीय व वित्तीय मंजुरी | मा.आयुक्त विभागाची टी / 9 वरील टिप्पणी |
| निविदा प्रसिध्दी वृत्तपत्राचे नाव व दिनांक | निविदा सुचना क्र. 22 दि. 1/8/2014 दैनिक सकाळ व दैनिक नरविर चिमाजी<br>प्रथम मुदतवाढ दि.13/8/2014 दैनिक सकाळ व दैनिक नरविर चिमाजी<br>व्दितीय मुदतवाढ दि.15/8/2014 दैनिक वार्ताहार व दैनिक नरविर चिमाजी |
| ई-टेंडर | महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द दि. 1/08/2014 |
| ऑनलाईन अर्ज स्विकृती | दि.20/8/2014 संध्याकाळी 5.01 मिनीट ते 21/8/2014 रोजी संध्याकाळी 5.00 वाजेपर्यत |
| निविदा उघडण्याचा दिनांक | दि. 22/8/2014 संध्याकाळी 3.00 मिनीटानंतर |
| प्राप्त निविदा | 5 |
| न्युनतम निविदाकार | 2<br>अ) मे.एम.के.शाह एन्टरप्रायझेस ब) मे.एच.एम.शिपकेअर |
| वाटाघाटीसाठी पाचारण | नाही |
| करारनामा रक्कम रुपये व दिनांक | आहे प्रत्येकी 5000 रुपये दि.11/9/2014 |
| कार्यादेश | वविशम/भां/2807/15 दि. 10/3/2015 |

वरील कामाच्या नस्तीचे लेखा परिक्षणात खालील अनियमितता आढळुन येतात.

1. सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय सीएटी10 / 2006 / प्र.क्र.33 / इमारती-2 दि. 2/11/2006 अन्वये रु. 50 लक्ष पेक्षा जास्त् किंमतीच्या कामासाठी पहिली निविदा सुचना कालावधी 25 दिवस निश्चित करण्यात आला आहे . सदर निविदा प्रसिध्दीकरिता विहीत केलेली कालमर्यादा पाळली नाही. त्यामुळे सदर नियमांचे उल्लंघन झाले आहे.

2. महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र . भांखस.1088/2512/ उद्योग - 6 दि. 2/1/1992 मधील तरतुदी नुसार विविध जिल्हास्तरीय / राज्यस्तरीय / राष्ट्रीय पातळीवरील प्रसिध्दी न करता स्था निक वृत्तपत्रात प्रसिध्दी दिल्याने स्पर्धात्मक दराचा फायदा महानगरपालिकेस झालेला नाही.

3. मुबंई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 चे कलम 03 मधील तरतुदीनुसार कामाच्या ठेक्याचे

संबंधीत पुरवठादारांकडुन अधिनियमाच्या शेडयुल 1 मधील क्रमांक 63 नुसार दि. 1/5/2006 पासुन न्युनतम निविदाकाराकडुन विहीत रकमेचे मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे . निविदा नस्तीत नमुद केल्यानुसार एकुण रुपये 3 कोटी रकमेची खरेदी करावयाची असल्याने रक्कम रुपये 29100/- इतक्या रकमेचे मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक असतांना एकुण 10000/- इतक्याच रक मेचे मुद्रांक शुल्क रक्कम वसुल करण्यात आली असल्यामुळे उर्वरीत 19100/- रुपयाचे मुद्रांक शुल्कापोटी शासनाचे नुकसान झाले आहे . सबब सदरची रक्कम संबधीत पुरवठादारांकडुन वसुल करुन शासन खाती जमा केल्याची लेखापरिक्षणात खात्री पटवुन देण्यात यावी.

4. आपत्कालीन प्र संगी मागील इतिहास पाहता बोटी व मच्छिमारांना परवान्यास अनेक अडचणींचा सामना करावा लागतो . बऱ्याचवेळा बोटी व मच्छिमारांचा सुगावा लागत नाही . सदरच्या साहित्यांचा पुरवठा मच्छिमारांना केल्यास समुद्रात त्यांच्या ठिकाणाचा शोध घेणे व त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी सदरची सामुग्री त्यांचे जवळ असणे गरजेचे आहे. त्यामुळे जिवीत किंवा वित्त हानी फार कमी प्रमाणात होईल असे ठरावात समर्थन करण्यात आले आहे. तथापि, जिवन संरक्षक म्हणुन सदरचे साहित्य खरेदी करण्यासाठी करारनामा केल्यानंतर ठेकेदारास तब्बल 6 महीन्यांनी साहित्याचा पुरवठा करण्याचे आदेश दि .10/3/2015 रोजी देण्यात आले आहेत . तसेच साहित्याचा पुरवठा करण्यासाठी कार्यादेशाच्या दिनांकापासुन 60 दिवसांचा कालावधी देण्यात आला आहे . त्यामुळे सदरील साहित्य तातडीची बाब म्हणुन खरेदी करुन लाभार्थीना पुरवठा करण्याचा उद्देश सफल झाल्याचे दिसुन येत नाही.

5. वसई विरार शहर महानगापालिकाने M.A.C. फॉर्म क्र.109 (नियम 142(2) आणि 150(1)) मिळालेल्या मालाची रोजकिर्द नोंदवही मधील पृष्ठ क्रमांक 003 वर वर्कवेस्ट लाईफ जॅकेट मे.सिकॉम सर्विसेस यांचेकडुन दि . 5/7/2015 रोजी रु.1678 दराने नग 1841 (रक्कम रु.30,98,198/-) प्राप्त झाल्याची नोंद घेण्यात आली आहे . नस्तीमध्ये लेखापरिक्षणात मे.सिकॉम सर्विसेस यांचे दर न्युनतम असल्याचे तसेच मे .सिकॉम सर्विसेस यांचे सोबत महानगरपालिकेने करारनामा केला असल्याचे दस्तऐवज आढळुन येत नाही.

उपरोक्त आक्षेपांबाबत विभागास अर्धसमास पत्र क्रं . 103 दि. 05/4/2019 देण्यात आले होते, परंतु अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATANJM6301 (Ref No : 35, Hmm No : 103)

## *41 वसई विरार शहर महानगरपालिका सेवेत असलेल्या लिपीक टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तकातील अनियमिततां बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***कर्मचाऱ्यांची पुर्वचारित्र्य पडताळणी न करताच त्यांना लिपीक, टंकलेखक संवर्गात नियुक्ती देण्यात आली आहे, धर्म, जात (प्रवर्गासह) जन्मदिनांक, तंतोतंत उंची, ओळखण्यासाठी अंगावरील खुणा, शासकीय कर्मचाऱ्यांची दिनांकीत सही, क्रमांक 1 ते 9 मधील नोंदी तपासल्या बद्दल कार्यालय प्रमुखाची पदनामासहीत सही, वैद्यकीय तपासणी अहवाल हे रकाने निरंक आहेत, रजा लेखा अद्यायावत नाही इ.***

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार ब, सप्टेंबर 9, 2014/भाद्र 18, शके 1936 अन्वये नगरविकास विभागाने अधिसुचना प्रसिध्द करुन वसई विरार शहर महानगरपालिका (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम 2014 निर्गमित केले आहेत. सदर नियमातील नियम क्र.11 (ब) नुसार उमेदवाराच्या पुर्वचारित्र्य पडताळणी बाबत पोलीस विभागाचे / सक्षम प्राधिकाऱ्याकडुन चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर महापालिका सेवेतील कोणत्याही पदावरील नामनिर्देशनाने नियुक्ती करावयाच्या उमेदवारास नियुक्ती दयावयाची आहे तथापि, खालील कर्मचाऱ्यांची पुर्वचारित्र्य पडताळणी न करताच त्यांना लिपीक, टंकलेखक संवर्गात नियुक्ती देण्यात आली आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | नियुक्तीचा दिनांक |
|---|---|---|
| 1 | श्रीमती सपना नटवरलाल पवार | 13/4/2016 |
| 2 | श्री.हितेश सुरेश पाटील | 12/4/2016 |
| 3 | श्री.देवेंद्र गणपत गुरव | 12/4/2016 |
| 4 | श्री.गुरुनाथ नामदेव केणी | 27/4/2016 |
| 5 | श्रीमती मिना लिलाधर पाटील | 11/4/2016 |
| 6 | श्री.जोएल मायकल डिसोजा | 12/4/2016 |
| 7 | श्री.निरज धनाजी राऊत | 12/4/2016 |
| 8 | श्री.विनोद रमेश परेड | 12/4/2016 |
| 9 | श्री.ब्रिस्टन पि. रॉड्रीक्स | 21/4/2016 |
| 10 | श्री.विक्रांत किशोर विश्वाद | 16/4/2016 |

1. उपरोक्त कर्मचाऱ्यांची नावे उदाहरण दाखल असुन वर्ग 3 व वर्ग 4 संवर्गात अनेक कर्मचारी असुन त्यांच्या पुर्वचारित्र्याची पडताळणी न करताच त्यांना नियुक्ती देण्यात आल्यामुळे अधिसुचना नियम 11 (ब) चे उल्लंघन झाले आहे. सदरची पुर्तता करुन अनुपालन सादर करावे.

2. उपरोक्त सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकातील प्रथम पृष्ठावरील बहुतांश रकान्यांत माहिती भरलेली नाही. उदा.श्री.विक्रांत किशोर विश्वाद यांचे सेवापुस्तकातील 11 रकान्यांपैकी केवळ 4 रकाने भरलेले असुन धर्म , जात (प्रवर्गासह) जन्मदिनांक, तंतोतंत उंची, ओळखण्यासाठी अंगावरील खुणा, शासकीय कर्मचाऱ्यांची दिनांकीत सही, क्रमांक 1 ते 9 मधील नोंदी तपासल्या बद्दल कार्यालय प्रमुखाची पदनामासहीत सही, वैद्यकीय तपासणी अहवाल हे रकाने निरंक आहेत.

3. माहे एप्रिल 2016 मध्ये नियुक्त्या दिलेल्या सदर कर्मचाऱ्यांचा रजा लेखा अद्या यावत करण्यात आलेली नाही

4. श्री.अभिजीत आत्माराम कोळी यांचे सेवापुस्तकातील प्रथम पृष्ठावर नमुद असलेली जन्मतारीख उपरीलेखन करुन लिहीली आहे . तसेच सदर जन्मतारीखेची नोंद कशाचे आधारे घेण्यात आली याचा उल्लेख त्यात केलेला नाही.

5. सदरचे सर्व कर्मचारी प्रथम नियुक्तीकरिता आवश्यक असलेले संगणक हताळणी व वापराबाबतचे ज्ञान प्राप्त केल्याची (महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या एम .एस.सी.आय.टी. प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असल्याची) नोंद सेवापुस्तकात आढळुन येत नाही.

6. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.अकंपा-1014/प्र.क्र.34/अ/6 दि.1/3/2014 अन्वये अनुकंपा नियुक्तीसाठी गट "क" आणि "ड" मध्ये प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या 5% मर्यादेमध्ये वाढ करुन ती 10% करण्यात आली आहे . लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सेवापुस्तकामध्ये लिपीक टंकलेखक संवर्गात सन 2015-16 या वर्षात (गट क) 23 तर शिपाई (गट ड) मध्ये सुमारे 18 कर्मचाऱ्यांना नियुक्ती देण्यात आली आहे . अनुकंपा नियुक्त्यांकरिता सदर शासन निर्णयात विहीत केलेले प्रतिवर्षी रिक्त होणाऱ्या पदांची 10% ही मर्यादा पाळली असल्याची लेखापरिक्षणास खात्री करुन देण्यात यावी.

महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षण (सुधारणा) अधिनियम, 2011 मधील कलम 6 (3) अन्वये विहीत कार्यवाहीस्तव सदरचे अर्धसमास ज्ञापन देण्यात येत आहे . उपरोक्त त्रुटींबाबत विभागास अध्रसमास ज्ञापन क्रं. 107 दि. 18/04/2019 अवगत करण्ययात आले होते, तथापी विभागाने विहीत कालावधीत अनुपालन सादर न केल्याने आक्षेप ठेवण्यात येत आहे.

DATANJM6301 (Ref No : 36, Hmm No : 107)

## *42 वसई विरार शहर महानगरपालिका सेवेत असलेल्या आस्थापनेवरील अधिकारी/ कर्मचारी विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या नोंदीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***विहीत कालावधीत अथवा संधीत विभागीय परीक्षा उत्तीर्ण न झाल्यामुळे संबंधीत कर्मचाऱ्यांची वेतनवाढी रोखुन धरल्यांची नोंद सेवा पुस्तकात आढळुन येत नाही. त्यामुळे वसई विरार शहर महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी विभागीय परीक्षा नियम-2014 मधील नियम 3, नियम 4, नियम 9 व नियम 10 चे उल्लंघन झाले आहे***

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार ब , सप्टेंबर 9, 2014/भाद्र 18, शके 1936 अन्वये नगरविकास विभागाने प्रसिध्द केलेल्या अधिसुचनेनुसार वसई विरार शहर महानगरपालिका (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण ) नियम 2014 निर्गमित करण्यात आले आहेत . सदरचे नियमातील नियम अस्तित्वात आल्यापासुन महानगरपालिकेच्या आस्थापनावरील स्थायी /अस्थायी स्वरुपातील कोणत्याही पदावर नियुक्त असलेल्या /होणाऱ्या सर्व संवर्गातील अधिकारी /कर्मचारी यांना सदर नियमा सोबतचे परिशिष्ठ - 3 मधील नियम - 3 अन्वये विहीत केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य करण्यात आली आहे. तसेच नियम 4 अन्वये परीक्षा उत्तीर्ण करण्याचा कालावधी व संधीची संख्या निश्चित केली आहे. तर विहीत कालावधीत/संधीत परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास होणारे परिणाम नियम 9 व नियम 10 अन्वये परीक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट देण्याबाबत कार्यपध्दती विषद करण्यात आली आहे. तथापि, लेखापरिक्षणात उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या सेवापुस्तकापैकी खालील कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकात विभागीय परीक्षा उत्तीर्ण अथवा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासुन सुट देण्यात आल्याच्या नोंदी आढळुन येत नाहीत . तसेच विहीत कालावधीत अथवा संधीत वि भागीय परीक्षा उत्तीर्ण न झाल्यामुळे संबंधीत कर्मचाऱ्यांची वेतनवाढी रोखुन धरल्यांची नोंद सेवा पुस्तकात आढळुन येत नाही . त्यामुळे वसई विरार शहर महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी विभागीय परीक्षा नियम -2014 मधील नियम 3, नियम 4, नियम 9 व नियम 10 चे उल्लंघन झाले आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | पद |
|---|---|---|
| 1 | श्रीमती मेरी जोसेफ तुस्कानो | वरिष्ठ लिपिक |
| 2 | श्री.प्रकाश रघुनाथ गायकर | लिपिक |
| 3 | श्री.अरुण एल.जानी | लिपिक |
| 4 | श्रीमती हर्षल नितीन साने | लिपिक |
| 5 | श्रीमती निलम गंगाधर निजाई | लिपिक |
| 6 | श्रीमती निता गिरीष कोरे | लिपिक |
| 7 | श्री.प्रकाश बळीराम जाधव | लिपिक |
| 8 | श्री.रघुनाथ कृष्णा कापडी | लिपिक |
| 9 | श्री.मोहन तुकाराम संखे | लिपिक |
| 10 | सौ.रुपाली राजेंद्र संखे | लिपिक |

वसई विरार शहर महानगरपालिका कर्मचाऱ्यासांठी विहीत केलेली विभागीय परीक्षा 2014 हे नियम अस्तित्वात आल्यापासुन मनपाने सदर नियमा अनुषंगाने कोणतीही कार्यवाही केल्याचे लेखापरिक्षणात आढळुन येत नाही. सदर प्रकरणी उपरोक्त त्रुटींबाबत विभागास अर्धसमास ज्ञापन क्रं. 108 दि. 18/04/2019 अवगत करण्ययात आले होते, तथापी विभागाने विहीत कालावधीत अनुपालन सादर न केल्याने आक्षेप ठेवण्यात येत आहे.

DATANJM6301 (Ref No : 37, Hmm No : 108)

## *43 वसई विरार शहर महानगरपालिकेत विविध विभागात कामे करण्यासाठी ठेका पद्धती वर भरण्यात आलेल्या विविध संवर्गातील भरतीमधील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**No. of Irregularities: 11**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 15251140.00/-

***वसई विरार शहर महानगरपालिकेने दि. 09/09/2014 अन्वये मंजूर करुन घेतलेल्या आकृतीबंधापेक्षा जास्तीची भरलेली पदे लेखा परीक्षणात अमान्य करण्यात येत आहेत. बाह्ययंत्रणेद्वारे ठेका/ कंत्राटी पध्दतीवर सेवा उपलब्ध करुन घेतांना त्यांच्या पारीश्रमिकाच्या खर्चात 10 ते 25% बचत झाल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे जादा पदे भरल्यामुळे अति प्रदान केलेले पारीश्रमिक लेखा परीक्षणात मान्य करता येत नाही. शासन खाती मुद्रांक शुल्का पोटी जमा करावयाची रक्कम रु. 174700/- वसूलपात्र ठेवण्यात येत आहे. शासन खाती भरणा करावयाच्या रक्कमा जमा केल्याच्या चलनाच्या प्रती नस्तीवर आढळून येत नाही.***

वसई विरार शहर महानगरपालिकेत विविध विभागात कामे करण्यासाठी आवश्यक व मागणी नुसार अभिकर्ता नेमणे कामी महासभा ठराव क्रमांक 9 दि. 8/2/2013 अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर मान्यते नुसार अभिकर्ता नेमाणेकामी जाहीर निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे . तसेच ई - टेंडरिंग प्रणाली द्वारे ई निविदा मागविण्यात आल्या आहेत . निविदा प्रक्रीयेद्वारे न्यूनतम दर असलेल्या अभिकर्त्याकडून महानगरपालिकेच्या 1) बांधकाम विभाग 2) पाणी पुरवठा विभाग 3) सामान्य प्रशासन विभाग 4) सार्वजनिक आरोग्य विभाग 5) सार्वजनिक वाचनालय 6) अग्निशमन विभाग 7) वाहन विभाग 8) महिला बाल कल्याण विभाग 9) दिवाबात्ती विभाग 10) वैद्यकीय आरोग्य व रुग्णालय व्यवस्थापन 11) वर्ग 4 च्या कामांचे व्यवस्थापन करणेसाठी मजुर, मालमत्तेची निगा राखणे कामी शिपाई , पाणी पुरवठा विभागा करीता फिटर / वॉलमन व पंप ऑपरेटर तसेच अकुशल /कुशल मजुर या सेवा उपलब्ध करून घेण्याचे प्रस्तावित करून निविदा प्रक्रिया पुर्ण केली आहे. सदर निविदा प्रक्रियेत न्यूनतम दर असलेल्या अभिकार्त्यास वाटाघाटीकरीता पाचारण करुन त्यांचेकडून न्यूनतम दर उपलब्ध करुन घेतले आहेत व त्यानुसार अभिकार्त्यासोबत करारनामा करून महानगरपालिकेने सन 2014-15 या वर्षातील आठ महिन्यांकरीता कंत्राटी सेवा उपलब्ध करुन घेतल्या आहेत. तद्नंतर स्थायी समिती सभा ठराव क्र . 60 दि. 13/04/2015 अन्वये सन 2015-16 या वर्षासाठी वसई विरार शहर महानगरपालिकेस अभिकर्त्यामार्फत विविध सेवा प्राप्त करून घेणेकामी वार्षिक दरातील ई-निविदा मागवून पुढील अभिकार्त्याची नेमणूक होईपर्यंत सध्या कार्यरत अभिकार्त्यास मुदतवाढ व होणा -या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे . लेखापरीक्षणास उपलब्ध झालेल्या सदर नस्तीवर खालील प्रमाणे आक्षेप नोंदविण्यात येत आहेत.

1. बाह्ययंत्रणेद्वारे अथवा अभिकर्तामार्फत ठेका/कंत्राटी कर्मचारी घेण्याचे प्रस्तावित करण्यापूर्वी

वसई विरार शहर महानगरपालिकेचा पदांचा सुधारित आकृतीबंध नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. ववीम/1911/प्र.क्र.649/ नवि-23 दि. 09/09/2014 अन्वये मंजूर करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णया सोबतचे परिशिष्ठ - ब सहपत्र क्र 1 ते 47 अन्वये विविध विभागांसाठी संवर्गनिहाय मंजूर केलेली पद संख्या दर्शविण्यात आलेली आहे . लेखापरीक्षण कालावधीत विभागाद्वारे मंजूर , भरलेल्या व रिक्त पदांची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली असून खालील सं वर्गात आकृतीबंधातील मंजूर पदांपेक्षा जास्तीची पदे भरल्याचे आढळून येतात . सदरचे संवर्ग त्यांची मंजूर , भरलेल्या व रिक्त पदांची स्थिती खालीलप्रमाणे

| अ.क्र. | पदाचे नाव | मंजूर पदे | भरलेली पदे | ज्यादा पदे |
|---|---|---|---|---|
| 1. | लिपिक टंकलेखक, समिती लेखनिक, रेकॉर्ड किपर | 405 | 677 | 272 |
| 2. | अग्निशमन विमोचन | 147 | 193 | 46 |
| 3. | तारतंत्री | 24 | 72 | 48 |
| 4. | आरोग्य निरीक्षक | 48 | 49 | 1 |
| 5. | स्त्रीरोग तज्ञ | 4 | 7 | 3 |
| 6. | आयुर्वेदिक वैद्यकीय अधिकारी | 27 | 91 | 64 |
| 7. | कनिष्ट अभियंता (SOFTWEAR) | 2 | 3 | 1 |
| 8. | औषद निर्माता | 3 | 43 | 40 |
| 9. | कक्ष सेवक / सेविका | 12 | 27 | 15 |
| 10. | प्रसाविका/ परिचारिका (ANM) | 125 | 190 | 65 |
| 11. | आया | 4 | 29 | 25 |
| 12. | समुपदेशी | 4 | 6 | 2 |
| 13. | वाहन चालक | 26 | 72 | 46 |
| 14. | माळी | 8 | 9 | 1 |
| 15. | रखवालदार | 8 | 9 | 1 |
| 16. | पंप चालक | 7 | 10 | 3 |
| 17. | प्लंबर | 3 | 9 | 6 |
| 18. | मीटर रीडर | 1 | 2 | 1 |
| 19. | मजुर | 71 | 80 | 9 |
| 20. | हॉलमन | 6 | 8 | 2 |
| | **एकूण** | **935** | **1586** | **651** |

वित्त विभागाच्या दिनांक 02/12/2013 रोजीच्या परिपत्रका नुसार बाह्य यंत्रणेद्वारे काम करून घेताना आवश्यकतेपेक्षा जास्त कर्मचा -यांच्या सेवा सक्षम प्राधिकाऱ्याची (HPC) मान्यता न घेता प्रशासकीय विभागस्तरावर घेतल्या जात असल्याचे परिपत्रकात नमुद आहे . वसई विरार श हर महानगरपालिकेस मंजूर आकृतीबंधानुसार उपरोक्त संवर्गाकरीता एकुण 935 पदे मंजुर असुन महापालिकेने त्याबदल्यात एकुण 1586 पदे भरलेली आहेत. मंजुर पदापेक्षा एकुण 651 अधिकची पदे भरली असुन सदरची पदे भरतांना स्थायी समिती, आयुक्त अथवा अतिरिक्त आयुक्त यांची मान्यता

घेतल्याचे नस्तीवरुन दिसून येत नाही. भरलेल्या 1586 पदांमध्ये महानगरपालिकेचे व कंत्राटी कर्मचारी किती याची वर्गवारी नसल्याने एकुण जादा कर्मचाऱ्यांची संख्या निश्चित करता येत नाही . तथापि, मंजुर आकृतीबंधापेक्षा 651 जादा पदे सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरी / मान्यतेशिवाय भरल्याने सदरची जादा पदे लेखापरीक्षणात मान्य करता येत नाहीत.

2. वसई विरार शहर महानगरपालिकेमध्ये अनेक विभागात रिक्त असलेल्या पदांची विविध कामे करण्यासाठी अभिकार्त्यांची नेमणूक करण्यात आली असून वरील तक्त्यात नमूद केलेल्या पदांची कामे विविध कार्यालयीन आदेशाद्वारे अभिकार्त्यांकडून ठेक्यावर अभियांत्रिकी सेवा , रुग्णालय (वैद्यकीय) सेवा, अग्निशमन विभागाचे व्यवस्थापन इ. सेवांकरिता ठेका कर्मचारी उपलब्ध करून घेण्यात आलेले आहेत. बाह्य यंत्रणेकडून अथवा आऊट सोर्सिंगद्वारे कामे करून घेण्यावर वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. पदनि 2013/प्र.क्र.112/13/ वित्तीय सुधारणा -1 दि. 02/12/2013 अन्वये स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार उच्चस्तरीय सचिव समितीने बाह्य यंत्रणेद्वारे सेवा घेण्यासाठी जी पदे मंजूर केली आहेत तितक्याच पदांचे काम बाह्ययंत्रणेद्वारे करून घ्या वयाचे आहे. तसेच नियमित पद्धतीने पदे भरण्यावरील खर्चाच्या तुलनेत बाह्य यंत्रणेद्वारे सेवा घेताना खर्चात 10 ते 25% बचत झालीच पाहिजे याची जबाबदारी प्रशासकीय विभाग प्रमुखाची राहील असे सूचित केले आहे . सदर प्रकरणी ठेका / कंत्राटी कर्मचारी म्हणून महानगरपालिकेने मासिक वेतनावर घेतलेल्या कर्मचाऱ्याच्या वेतनावर 10 ते 25% बचत झाल्याचे लेखापरीक्षणात आढळून येत नाही. तसेच मंजूर आकृतीबंधापेक्षा जास्तीच्या भरलेल्या पदांवरील वेतनापोटी झालेला खर्च लेखापरिक्षणात मान्य करता येत नाही.

3. अभिकर्तामार्फत ठेका / कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा उपलब्ध करुन घेतेवेळी महानगरपालिकेने अभिकर्त्यासोबत ठेका / कंत्राटी पध्दतीने उपलब्ध करुन घेतलेल्या पदांचे मासिक युनिट दर प्रत्यक्ष करारनामा करतेवेळी मंजूर केलेली पदे तथा प्रत्यक्षात पुरवठा केलेली व जादाची पदे खालीलप्रमाणे -

| अ.क्र | ठेकेदाराचे नांव | पदनाम | मासिक प्रति युनिट दर रु. | युनिटची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | करारनामा प्रमाणे | प्रत्यक्ष पुरवठा | ज्यादा |
| 1 | रेन्बो कंस्ट्रक्शन | मजूर/ कामगार | 11,630/- | 170 | 190 | 20 |
| 2 | मे. स्वागत लेबर कॉन्ट्रॉक्टर | मजूर/ कामगार | 11,630/- | 136 | 160 | 24 |
| 3 | मे. अनंत एंटरप्रायझेस | मजूर/ कामगार | 11,630/- | 106 | 108 | 02 |
| 4 | संखे सिक्युरिटि सर्व्हिसेस | मजूर/ कामगार | 11,630/- | 102 | 113 | 11 |
| 5 | मे. आकाश एंटरप्रायझेस | ग्रंथपाल | 16,700/- | 01 | | |
| | | सहा. ग्रंथपाल | 15,700/- | 04 | | |
| | | वाहन चालक (आवजड) | 15,600/- | 14 | | |
| | | वाहन चालक (हलकी) | 12,700/- | 03 | | |
| | | सर्व्हिस सेंटर चालक | 12,700/- | 02 | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | तारतंत्री | 13,600/- | 31 | | |
| | | सहा. तारतंत्री | 12,600/- | 10 | | |
| | | मदतनीस | 13,600/- | 01 | | |
| | | समुह संघटक | 12,600/- | 10 | | |
| | | अंगणवाडी शिक्षिका | 12,600/- | 00 | | |
| | | | | 74 | 76 | 02 |
| 6 | मे.दिव्या एंटरप्रायझेस | विधी सल्लागार | 25,000/- | 132 | 01 | |
| | | संगणक चालक | 15,620/- | | 90 | |
| | | लिपिक | 15,620/- | | 63 | |
| | | लघुटंकलेखक | 15,620/- | | 03 | |
| | | सर्वेक्षण मनुष्यबळ | 11,680/- | | 00 | |
| | | स्वच्छता निरिक्षक | 16,700/- | | 08 | |
| | | | | 132 | 165 | 32 |
| 7 | मे. अनंत एंटरपारयझेस | फिटर | 15,000/- | 37 | 12 | |
| | | वॉलमन | 12,700/- | | 29 | |
| | | पंप ऑपरेटर | 15,000/- | | 00 | |
| | | | | 37 | 41 | 04 |

नगरविकास विभाग शासन निर्णय क्र . ववीम/1911/प्र.क्र.649/ नवि-23 दि. 09/09/2014 अन्वये मंजूर असलेल्या पदांपेक्षा जास्तीची पदे लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही.

4. वसई विरार महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांचा सुधारित आकृतिबंध मंजूर करण्यात आलेला आहे. तथापि, महानगरपालिकेने आकृतीबंध मंजूर असतांनाही वरीलप्रमाणे वाजवीपेक्षा जास्त कर्मचारी भरलेले आहेत. त्यामुळे आकृतीबंधात मंजूर नसलेल्या जास्तीच्या पदांचे वेतन लेखापरीक्षणात मान्य करता येत नाही. सदरची रक्कम खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | अभिकर्त्याचे नांव | युनिटची संख्या | प्रत्यक्ष कामावर घेतलेले युनिट | ज्यादा युनिट | मासिक प्रति युनिट दर | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | रेन्बो कंस्ट्रक्शन | 170 | 190 | 20 | 11,630/- | 232600/- |
| 2 | मे. स्वागत लेबर कॉन्ट्रॉक्टर | 136 | 160 | 24 | 11,630/- | 279120/- |
| 3 | मे. अनंत एंटरप्रायझेस | 106 | 108 | 02 | 11,630/ | 23,260/- |
| 4 | संखे सिक्युरिटि सर्व्हिसेस | 102 | 113 | 11 | 11,630/ | 127930/- |
| 5 | मे.दिव्या एंटरप्रायझेस | 132 | 165 | 33 | 15,620/- | 515460/- |
| 6 | मे. आकाश एंटरप्रायझेस | 74 | 76 | 02 | 13,600/- | 27200/- |
| 7 | मे. अनंत एंटरप्रायझेस | 37 | 41 | 04 | 12700/- | 50800/- |

| | |
|---|---|
| **एकूण रक्कम** | **1256370/-** |

जास्तीचे भरलेल्या कर्मचाऱ्यांमुळे महानगरपालिकेचे सन 2015-16 या वर्षात (1256370×12) 1,50,76,440/- इतक्या रक्कमेचे नुकसान झाले असून सदरची रक्कम लेखापरीक्षणात अमान्य करण्यात येवुन ती वसुलपात्र ठरविण्यात येत आहे.

5. सन 2014-15 या वर्षामधील एकूण आठ महिन्यांकरीता व महासभा, ठराव क्र. 19, दि. 14 जानेवारी, 2015 अन्वये सन 2015-16 या वर्षाकरीता ठेकेदारास मागील मंजूर दराने दि. 01 एप्रिल, 2015 पासून मुदतवाढ दिली असल्यामुळे सदर कालावधीचे ठेक्याच्या रक्कमेनुसार अभिकर्त्यांकडून मुद्रांक शुल्क वसुल करुन शासन खाती भरणे आवश्यक आहे. तथापि, महानगरपालिकेने संबंधीत अभिकर्त्याकडून त्या - त्या रक्कमेचे मुद्रांक शुल्क वसुल केल्याचे तसेच ते शासन खाती जमा केल्याचे दिसून येत नाही. सदरची रक्कम खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | अभिकर्त्याचे नांव | ठेक्याची रक्कम | अनुज्ञेय मुद्रांक शुल्क | भरलेले मुद्रांक शुल्क | वसुलपात्र रक्कम | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | सन 2014-15 | सन 2015-16 | एकूण |
| 1 | रेन्बो कंस्ट्रक्शन | 1,58,16,800 | 15,000 | 17000 | 00 | 22900 | 22900 |
| 2 | मे. स्वागत लेबर कॉन्ट्रॉक्टर | 1,26,53,440 | 11800 | 00 | 11800 | 18100 | 29900 |
| 3 | मे. अनंत एंटरप्रायझेस | 98,62,240 | 9000 | 00 | 9000 | 13900 | 22900 |
| 4 | संखे सिक्युरिटि सर्व्हिसेस | 94,90,080 | 8600 | 00 | 8600 | 13400 | 22000 |
| 5 | मे.दिव्या एंटरप्रायझेस | 10,68,800 | 19900 | 00 | 19900 | 31300 | 51200 |
| 6 | मे. आकाश एंटरप्रायझेस | 81,40,800 | 7300 | 00 | 7300 | 11400 | 18700 |
| 7 | मे. अनंत एंटरप्रायझेस | 43,86,400 | 4400 | 3000 | 1400 | 5700 | 7100 |
| | | | | | | **एकूण वसुलपात्र रक्कम** | **1,74,700/-** |

वरीलप्रमाणेची रक्कम रु. 1,74,700/- संबींत अभिकर्त्याकडून वसुल करुन शासन खाती जमा केल्याचे चलनाची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात यावी.

6. ठेका / कंत्राटी पध्दतीवर कामावर घेण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत ज्या विभागात नियुक्ती करण्यात आली आहे, त्या विभागाकडून त्यांना कोणत्या प्रकारची कामे वाटप केली आहेत व त्यांनी सदर वाटप केलेली कामे समाधानकारकपणे पार पाडल्याचा कोणताही आढावा अथवा अहवाल किंवा त्याबाबतचा कार्यामुल्यमापन अहवाल नस्तीमध्ये दिसुन येत नाही.

7. महानगरपालिकेने ठेक्यावर कर्मचारी उपलब्ध करुन घेतांना अभिकर्त्यासोबत केलेल्या करारनाम्यामध्ये शासकीय वसुल्या उदा. सेवाकर, व्यवसाय कर, कर्मचाऱ्याचे भविष्य निर्वाह निधीची रक्कम इ. वसुल करुन शासन खाती भरण्याची जबाबदारी संबंधीत अभिकर्त्यावर टाकलेली आहे . महापालिकेने नियुक्त केलेल्या अभिकर्त्यांना देयके अदा करतांना अभिकर्त्याने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधी / कामगार विमा / कामगार कल्याण निधी व इतर शासकीय वजाती

कर्मचाऱ्यांच्या पारिश्रमिकातून कपात करुन संबंधित शासन यंत्रणेस भरणा केल्याची चलने देयकासोबत दिसून येत नाही . सबब अभिकर्त्याने नियुक्ती केलेल्या कर्मचाऱ्यांच्या वर नमूद शासकीय वजाती शासन खाती भरणा केल्याची खात्री लेखापरीक्षणात करता येत नाही. महानगरपालिकेने प्रस्तुत प्रकरणी अभिकर्तानिहाय अदा केलेली प्रमाणके व अभिकर्त्याने कर्मचाऱ्यांचे शासनास वजाती करुन शासन खाती जमा करावयाच्या रक्कमा यांची शहानिशा करून अनुपालन अहवाल लेखापरीक्षणास सादर करावा . तसेच महानगरपालिकेत ठेका / कंत्राटी तत्वावर पुरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत अभिकर्त्यांनी त्यांचे वेतनातून वसूल केलेल्या सेवाकराची रक्कम सेवाकर अधिसुचना क्रमांक 14/2015 मधील तरतुदीनुसार पुरविण्यात आलेल्या सेवांसाठी 14 टक्के दराने अभिकर्त्यांनी रक्कम शासन खाती जमा करणे आवश्यक होते . तथापि, उपलब्ध दस्तऐवजावरून अभिकर्त्यांनी सदरची रक्कम शासन खाती भरणा केल्याचे दिसुन येत नाही . सदरची रक्कम परिगणाना करून शासन खाती भरणा केल्याच्या चलनाची प्रत लेखा परीक्षणास उपलब्ध करून देण्यात यावी.

8. महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाचे पत्र क्र .जीईएन 1098/1357/प्र.क्र.166/98/नवि-28 दि.3 नोव्हेंबर 2003 अन्वये महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिका आयुक्तांना महानगरपालिका त्यांचे मार्फत देण्यात येणाऱ्या कंत्राटी कामांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविण्या बाबत स्पष्ट सुचना दिल्या आहेत तथापि, त्याबाबतचे अभिलेख नस्तीमध्ये दिसुन येत नाहीत.

9. मा.आयुक्त केंद्रीय कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटन, नवी दिल्ली यांचे दि.11/02/2011 चे नोटीफिकेशननुसार व कर्मचारी भविष्य निर्वाह अधिनियम 1952 मधील तरतुदीनुसार ठेका पध्दतीने रोजंदारीवर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी योजना दि .08/01/2011 पासुन लागु करण्यात आलेली आहे. त्यानुसार कर्मचाऱ्यांच्या नावाने वैयक्तिक कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खाती काढुन त्या खात्यामध्ये त्यांचे वेतनामधून तसेच ठेकेदाराची स्वहिश्याची रक्कम कपात करुन भरणा करणे आवश्यक आहे . या योजनेमधील उपरोक्त कलमानुसार कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनामधून 12% व कंत्राटदाराच्या स्व :निधीमधून 13.61% प्रमाणे रक्कम कपात करुन कर्मचारी भविष्य निर्वाह निधी खात्यांमध्ये महिन्याच्या 15 तारखेपर्यंत भरणे आवश्यक आहे . त्यानुसार अभिकर्त्याने कामगारांची भविष्य निर्वाह निधी रक्कम भरणा केल्याचे अभिलेखे नस्तीत दिसुन येत नाहीत. याबाबतचे समर्थनिय अनुपालन सादर करावे.

10. महानगरपालिकेने अश्या प्रकारच्या कामांसाठी नियुक्त केलेल्या अन्य अभिकर्त्यामार्फत उपलब्ध करुन घेतलेल्या कंत्राटी / ठेका कर्मचाऱ्यांच्या प्रकरणी वरील प्रकारच्या आक्षेपाप्रमाणे कार्यवाही करुन अभिकर्त्यामार्फत वसुलपात्र ठरत असलेल्या रक्कमा वसुल करण्यात याव्यात तसेच शासन खाती भरणे आवश्यक असलेल्या रक्कमा शासनखाती जमा करुन त्यांच्या चलनाच्या प्रति लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

11. महानगरपालिकेच्या संबधित विभागाची आकृतीबंधा नुसार मंजूर, भरलेली व रिक्त पदे याची खातरजमा करून सामान्य प्रशासन विभागाने अभिकर्त्यास ठेका / कंत्राटी कर्मचारी उपलब्ध करून देणे बाबत आदेश देणे आवश्यक होते. तथापि तशी खात्री न करताच वरील प्रमाणे जास्तीची पदे भरल्याने अभिकर्त्यास अतिप्रदान झाले आहे . अतिप्रदानामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत असल्याने लेखा विभागाने प्रदानापुर्वी त्याची खात्री करून प्रदाने करावित . तसेच वरील प्रमाणेच्या शासनखाती जमा करावयाच्या रकमांची वसुली करून सदरच्या रक्कमा शासनखाती जमा केल्याच्या चलनाच्या प्रति लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यात याव्यात. सदर आक्षेपा बाबत अर्धसमास ज्ञापन

क्रमांक 135 दि. 05/07/2019 अन्वये विभागास समर्थनीय अनुपालन सादर करण्या बाबत सुचित करण्यात आले होते . विभागाने विहित मुदतीत अनुपालन सादर न केल्याने सदरील आक्षेप कायम करण्यात येत आहे.

एकूण वसुलपात्र रक्कम रु. 1,50,76,440 + 1,74,700 = 1,52,51,140/-

DATANJM6301 (Ref No : 38, Hmm No : 135)

## *44 मंजूर आकृतीबंधानुसार पदे न भरल्यामुळे प्रशासकीय व विकास कामावर होणा-या परीणामाबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***वसई विरार शहर महानगरपालिकेने मागणी केल्यानुसार विविध संवर्गातील पदांमध्ये वाढ करुन नवीन पदे/ संवर्ग निर्माण करुन दि. 09/09/2014 अन्वये मंजुर केलेल्या आकृतीबंधानुसार प्रशासकीय सेवा श्रेणी 1 व 2 तसेच तांत्रिक संवर्गात मंजूरर असलेल्या पदांपैकी परीवेक्षीय व कार्यात्मक पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त असल्यामुळे सदरची पदे तात्काळ भरणे आवश्यक आहे.***

वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना 3 जुलै, 2009 रोजी झाली आहे. महानगरपालिकेची वाढती लोकसंख्या, नागरिकरणांचा झपाट्याने होणारा विकास, शासनाच्या विविध योजना व त्याअनुषंगाने प्राप्त होणारे राज्य व केंद्र सरकारचे अनुदाने विचारात घेता वाढलेल्या कामांचा निपटारा होण्यासाठी वसई विरार शहर महानगरपालिकेने मागणी केल्यानुसार विविध संवर्गातील पदांमध्ये वाढ करून, नविन पदे / संवर्ग निर्माण करून त्या पदांचा / संवर्गाचा पदनिर्मितीचा एकत्रित प्रस्ताव शासनाने महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. विवम-1911/ प्र.क्र.649/ नवि-23, दि. 9 सप्टेंबर, 2014 अन्वये मंजुर केला आहे.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सक्षमीकरणासाठी विविध संवर्गात 46 विभागांकरीता उपरोक्त शासन निर्णया सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ व ब -1 ते 46 मध्ये दर्शविल्यानुसार एकूण 2852 पदांना मंजूरी देण्यात आलेली आहे. सदर पदांच्या सुधारित आकृतीबंधा अनुषंगाने लेखापरीक्षण कालावधी 2015-16 मध्ये वसई विरार शहर महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिलेल्या विवरण पत्रातील विविध विभागांच्या आस्थापनेवरील मंजूर, भरलेल्या व रिक्त पदांचा तपशील सोबत जोडलेल्या

**परिशिष्टा** मध्ये नमूद केला आहे. त्या नुसार लेखापरीक्षणात खालील आक्षेप नोंदविण्यात येत आहेत.

1. प्रशासकीय सेवा श्रेणी 1 व 2 मध्ये मंजुर असलेल्या विविध संवार्गातील 47 मंजुर पदांपैकी 46 पदे रिक्त आहेत. महापालिकेचे क्षेत्रफळ व वाढती लोकसंख्या विचारात घेता निर्णयक्षम संवर्गाची पदे रिक्त ठेवणे अथवा महानगरपालिकेच्या वर्ग 3 संवर्गातील कर्मचाऱ्यांना प्रभारी म्हणून अतिरिक्त कार्यभार देणे प्रशासकीय दृष्ट्या महानगरपालिकेच्या हितावह नाही. सदरची रिक्त पदे तात्काळ भरण्यासाठी महानगरपालिकेच्या स्तरावर कोणतीही कार्यवाही झाल्याचे / केल्याचे लेखापरीक्षणात आढळून येत नाही.

2. महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात वरील मंजूर आकृतीबंधवरुन वेगवेगळ्या संवर्गात तांत्रिक संवर्ग निर्माण केला असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर पर्यवेक्षीय व कार्यात्मक पदे रिक्त असल्याचे दिसून येते. सदरची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त असल्यामुळे निश्चित परिणाम महानगरपालिकेच्या कार्यक्षमतेवर आणि विकास कामावर होत आहे. त्यामुळे पर्यवेक्षीय व कार्यात्मक रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत महानगरपालिका स्तरावर कार्यवाही होणे आवश्यक आहे या बाबत समर्थनीय अनुपालन सादर करावे. सदर आक्षेपा बाबत अर्धसमास ज्ञापन क्रमांक 136 दि. 05/07/2019 अन्वये विभागास समर्थनीय अनुपालन सादर करण्या बाबत सुचित करण्यात आले होते. विभागाने विहित मुदतीत अनुपालन सादर न केल्याने सदरील आक्षेप कायम करण्यात येत आहे.

DATANJM6301 (Ref No : 39, Hmm No : 136)

## *45 वाहन विभागात मुदतबाहय झालेल्या कालावधीची देयके नियमबाहय पध्दतीने प्रदान केल्याबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 899324.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 899324.00/-

***मुदतबाहय झालेल्या मागण्या सामान्यतः नाकारण्यात आल्या पाहिजेत आणि अशा कालबाहय झालेल्या बाबीच्या मागण्यांचे प्रदान महापालिकेच्या स्थायी समितीच्या मंजुरीविना देण्यात येवु नयेत अशी तरतुद महाराष्ट्र नगरपरिषदा लेखासंहिता 1971 चे नियम क्र.45 मध्ये आहे, परंतु त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.***

सन 2015-16 मध्ये वाहन विभागांची विविध बाबीवरील झालेल्या प्रदानांचे लेखापरिक्षणअंर्तगत खालील मुदतबाहय झालेल्या कालावधीची देयके प्रदान झाल्याचे निर्दशनास येते. त्याचा तपशिल

खालील प्रमाणे.

| अ.क्र. | मागणीचा तपशिल | प्रमाणक क्रमांक | दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रभाग समिती ई कार्यालयाच्या पाणीपुरवठा विभागास माहे एप्रिल-13 ते नोव्हे-13 या कालावधीत 1 नग युटिलिटी वाहन भाडे तत्वावर पुरवठा देयक | 1213 | 31/3/16 | 3,60,000/- |
| 2 | पाणीपुरवठा साहित्य खरेदी वसई गोल्डन ट्रान्सपोर्ट सर्विस यांचे दि.23/7/14 चे देयक | 1238 | 31/3/16 | 38,340/- |
| 3 | प्रभाग समिती ई कार्यालया विभागवार माहे 8/13 ते 2/14 कालावधीत युटीलिटी वाहन पुरवल्याचे देयक | 5952 | 31/3/16 | 2,50,500/- |
| 4 | प्रभाग समिती ब कार्यालयाच्या अतिक्रमण विभागाच्या माहे 8/13 ते 2/14 कालावधीच्या युटीलिटी वाहन भाडेतत्वावर पुरवठा देयक | 5946 | 31/3/16 | 2,50,500/- |

सदर देयका बाबत मुदत सीमांकन कायदयातील तरतुदी नुसार मुदतबाहय झालेल्या मागण्या सामान्यत: नाकारण्यात आल्या पाहिजेत आणि अशा कालबाहय झालेल्या बाबीच्या मागण्यांचे प्रदान महापालिकेच्या स्थायी समितीच्या मंजुरीविना देण्यात येवु नयेत अशी तरतुद महाराष्ट्र नगरपरिष दा लेखासंहिता 1971 चे नियम क्र .45 मध्ये आहे . त्यानुसार उपरोक्त मागण्या बाबत नियमाप्रमाणे कार्यवाही न करताच देयके प्रदान केली असल्याचे निदर्शनास येते.

उपरोक्त मुदयांबाबत विभागास अर्धसमास पत्र क्रं . 132 दिनांक 29/5/2019 देण्यात आले होते, परंतु अनुपालन विहीत मुदतीत अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

DATPGWM6201 (Ref No : 40, Hmm No : 132)

## *46 नगर रचना विभागाने स्वतंत्र विकास निधी स्थापन न करणे,तसेच त्या अनुषंगाने प्राप्त होणा-या विकास शुल्काची रक्कम बँकेत स्वतंत्ररित्या न ठेवल्यामुळे झालेल्या अनियमिततेबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम,1966 कलम 124J नुसार स्वतंत्र विकास निधी स्थापन न करणे, विकास आकार व त्यावरील व्याज विकास निधीमध्ये जमा न करणे, विकास शुल्का अंतर्गत प्राप्त निधी अधिनियमातील तरतूदीनुसार न वापरणे इ.***

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम,1966 कलम 124J मधील तरतुदी खालीलप्रमाणे आहेत.

1. "विकास निधी" म्हणून संबोधावयाचा एक स्वतंत्र निधी स्थापन करण्यात येईल व तो अलग ठेवण्यात येईल आणि प्राधिकरण त्याच्या अर्थसंकल्पामध्ये तो स्वतंत्र दर्शवील.

2. या प्रकरणाखाली प्राधिकरणास विकास आकार म्हणून मिळालेला सर्व पैसा, त्यावरील कोणतेही व्याज असेल तर व्याजासह, विकासनिधी मध्ये जमा करण्यात येईल.

प्रगतीप्रमाणे दिनांक निहाय कामाच्या नोंदी मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक आहे, परंतु यaप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

4. कार्यादेशातील आदेशानुसार ठेकेदाराने प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी कामाचे नांव, एस्टीमेट रक्कम,ठेकेदाराचे नांव,कामाची मुदत इ. दर्शविणारा रंगीत फलक लावणे आवश्यक आहे, सदर बाबीचे पालन केले नसल्याचे नस्तीवरुन दिसून येते.

उपरोक्त मुदयांबाबत विभागास अर्धसमसास पत्र क्रं. 67 दि. 06/2/2019 देण्यात आले होते, परंतु अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

RTNPRSM6901 (Ref No : 54, Hmm No : 67)

## *58 वीजशुल्क भरण्यापासून सूट असलेल्या देयकाची रक्कम अदा केल्याबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 295338.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 295338.00/-

***नियमानुसार वीजशुल्क भरण्यापासून सूट असतांना देयकाची अदायगी करणे.***

बॉम्बे इलेक्ट्रीसिटी अॅक्ट 1958 च्या कलम 3(2)(i)(ia) नुसार सार्वजनिक रस्त्यावरील दिवाबत्ती, सार्वजनिक पाणी पुरवठा व मलनि:स्सारण सेवा यासारख्या सार्वजनिक सेवांकरिता वापरण्यात येणा-या वीजेसाठी वीज शुल्कातून सूट देण्यात येते.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाचे अभिलेख तपासले असता, असे निदर्शनास आले की, पेल्हार जलप्रकल्पातील पाणी उपसा करण्याकरीता बसवण्यात आलेल्या पंपासाठी वापरण्यात आलेल्या वीजेपोटी सन 2015-16 या कालावधीतील देयकाची खालीलप्रमाणे महिना निहाय रक्कम अदा करण्यात आल्याचे दिसून येते.

| महिना | वीज आकारणी (रक्कम रु.) |
|---|---|
| एप्रील 2015 | 22606.90 |
| मे 2015 | 18982.99 |
| जून 2015 | उपलब्ध नाही |
| जुलै 2015 | 18700.94 |
| ऑगस्ट 2015 | 33206.25 |

| | |
|---|---|
| सप्टेंबर 2015 | 29129.69 |
| ऑक्टोबर 2015 | 31341.78 |
| नोव्हेंबर 2015 | 30763.65 |
| डिसेंबर 2015 | 38414.91 |
| जानेवारी 2016 | 36154.13 |
| फेब्रुवारी 2016 | 36036.58 |
| मार्च 2016 | उपलब्ध नाही |
| एकूण | 295338 |

सन 2015-16 या वर्षात पेल्हार जलप्रकल्पासाठी वीजशुल्कातून सूटीस पात्र असलेला खर्च करण्यात आलेला आहे. त्यामुळे महापालिकेचे रु. 2,95,338/- इतके नुकसान झाल्याचे दिसून येते.
उपरोक्त मुदयांबाबत विभागास अर्धसमास पत्र क्रं. 68 दिनांक 06/2/2019 देण्यात आले होते, परंतु अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

RTNPRSM6901 (Ref No : 55, Hmm No : 68)

### *59 नालासोपारा प्रभाग समिती (क) पाणीपुरवठा विभागात समेळपाडा चाणक्य नगरी पंपीग मशनरी करीता 125 के.व्ही.ए. क्षमतेची जनरेटर पुरविणे,बसविणे व जनरेटरसाठी पत्रा शेड करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 1366529.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1366529.00/-

***निविदा जाहीरात प्रसिध्द करतांना शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम नियमावलीचे पालन न करणे, निविदा कालावधी कमी ठेवणे, कामाच्या मुल्यानुसार योग्य वर्गवारीच्या वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द न करणे, , काम करतांना कार्यादेश व करारातील अटी व शर्तीचे पालन न करणे, कामाच्या प्रगतीनुसार दिनांक निहाय नोंदी मोजमाप पुस्तिकेत न नोंदविणे, काम पुर्णत्वाचा दाखला नस्तीवर उपलब्ध नसणे इ.***

| | |
|---|---|
| कामाचे नांव | नालासोपारा प्रभाग समिती (क) पाणीपुरवठा विभागात समेळपाडा चाणक्य नगरी पंपीग मशनरी करीता 125 के.व्ही.ए. क्षमतेची जनरेटर पुरविणे,बसविणे, व जनरेटरसाठी पत्रा शेड करणे. |
| अंदाजपत्रकीय रक्कम | रु. 13,66,529/- |
| प्रशासकीय मंजुरी | स्थायी समिती सभा ठराव क्रं. 1185 दिनांक : 16/12/2013 |
| तांत्रिक मंजुरी | I/13/106 दि. 04/02/2014 |
| ई निविदा प्रसिध्दी वृत्तपत्राचे नांव, दिनांक व कालावधी | दै. लोकमत व दै. जागल्या दि.15/2/2014<br>दि. 15/02/2014 ते दि. 24/02/2014 |
| प्रथम फेर निविदा प्रसिध्दी वृत्तपत्राचे नांव, दिनांक व कालावधी | दै. सकाळ दि. 14/11/2014<br>दि. 14/11/2014 ते दि. 24/11/2014 |
| द्वितीय फेर निविदा प्रसिध्दी वृत्तपत्राचे नांव, दिनांक व कालावधी | दै. मुंबई मित्र व दै.जागरुक टाइम्स<br>दि. 15/1/2015 ते दि. 23/1/2015 |
| तृतीय फेर निविदा प्रसिध्दी वृत्तपत्राचे नांव, दिनांक व कालावधी | दै. यशोभूमी व दै. प्रहार<br>दि. 14/3/2015 ते दि. 24/03/2015 |
| निविदा स्वीकृती दिनांक | 27/3/2015 |
| प्राप्त निविदा | एक<br>मे. किंजल इलेक्ट्रीकल्स - 5.00 % जादा दराने |
| स्वीकृत निविदा | मे. किंजल इलेक्ट्रीकल्स - 5.00 % जादा दराने |
| कामाचा कालावधी | तीन महिने |
| करारनामा | रु. 500/- दिनांक 12/5/2015 |
| कार्यादेश क्रं. व दिनांक | वविशम/काअ/पापु/101/15 दि. 12/5/2015 |
| काम पुर्णत्वाचा दिनांक | उपलबध नाही |
| मोजमाप पुस्तिका | 373/62-75 |

उपरोक्त कामाबाबत लेखापरिक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. प्रस्तुत कामाची प्रथम निविदा दै.लोकमत व दै. जागल्या या वृत्तपत्रात दि. 15/2/2014 रोजी प्रसिध्द केल्याचे नमूद आहे. सार्वजनिक बांधकाम संहिता परिच्छेद क्रं. 202 व सार्वजनिक बांधकाम विभागाचा शासन निर्णय क्रं. सीएटी-10/2006/प्र.क्र. 133/ इमारती 2 दि. 21/11/2006 नुसार रु. 5 ते 50 लाख किमतीच्या कामासाठी पहिली निविदा सुचना कालावधी 15 दिवस निश्चित करण्यात आलेला आहे. परंतु प्रस्तुत निविदा सुचना कालावधी हा 10 दिवस इतका ठेवण्यात आला होता. यावरून प्रस्तुत निविदा प्रसिद्ध करतांना सार्वजनिक बांधकाम संहितेच्या परिच्छेद क्र. 202 व उपरोक्त शासन निर्णयाचे पालन करण्यात आले नाही व जाहीरातीस व्यापक प्रसिध्दी मिळाली नाही, यामुळे स्पर्धात्मक दराचा फायदा महापालिकेस होऊ शकला नाही.

2. विभागाने सदरील कामासाठी प्रथम निविदा जाहीरात दै.लोकमत व दै. जागल्या या वर्तमान पत्रात जाहीरात दिल्याचे नमूद आहे. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. पीयुबी-100 प्र.क्र.73/2000/34 दि. 01/01/2001 नुसार ज्या एका कामाचे मुल्य रु. 15 लाखापर्यंत आहे. अशी जाहीरात प्रसिध्दीचे वृत्तपत्र एक 'क' वर्ग दैनिक व एक साप्ताहिक या वृत्तपत्रात देणे

आवश्यक असुन त्याचे वितरण जिल्हा माहिती अधिकारी यांचेमार्फत करणे आवश्यक आहे व वृत्तपत्र कोणत्या भाषेचे असावे याबाबत प्रस्तुत विभागाची शिफारस घेतली नसल्याचे दिसून येते, यावरुन प्रस्तुत काम करतांना उपरोक्त शासन निर्णयाचे पालन केले नसल्याचे दिसून येते व त्यामुळे जाहीरातीस व्यापक प्रसिध्दी न मिळाल्यामुळे सदरील कामाची निविदा राबविताना स्पर्धा होऊ शकली नाही व महापालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा झाला नाही.

3. महाराष्ट्र बांधकाम नियम पुस्तिकेतील परिशिष्ट 24 मध्ये नमुद असल्यानुसार कामाच्या प्रगतीप्रमाणे दिनांक निहाय कामाच्या नोंदी मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक आहे, परंतु याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

4. कार्यादेशातील आदेशानुसार ठेकेदाराने प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी कामाचे नांव, एस्टीमेट रक्कम,ठेकेदाराचे नांव,कामाची मुदत इ. दर्शविणारा रंगीत फलक लावणे आवश्यक आहे, सदर बाबीचे पालन केले नसल्याचे नस्तीवरुन दिसून येते.

उपरोक्त मुदयांबाबत विभागास अर्धसमास पत्र क्रं. 69 दिनांक 06/2/2019 देण्यात आले होते, परंतु अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

RTNPRSM6901 (Ref No : 56, Hmm No : 69)

## *60 वसई विरार शहर महानगरपालिका सन 2013-14 या वित्तीय वर्षात प्रभाग समिती क´ पाणी पुरवठा विभागाअंतर्गत येणा-या क्षेत्रात आवश्यकतेनुसार विविध व्यासाच्या जलवाहिन्या अंथरणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 9**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 7000000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 7000000.00/-

***निविदा जाहीरात प्रसिध्द करतांना शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम नियमावलीचे पालन न करणे, निविदा कालावधी कमी ठेवणे, कामाच्या मुल्यानुसार योग्य वर्गवारीच्या वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द न करणे, निविदा प्रक्रिया करतांना ई निविदा पध्दतीचा वापर न करणे, करार करतांना योग्य किमंतीचे मुद्रांक शुल्क न भरणे, काम करतांना कार्यादेश व करारातील अटी व शर्तीचे पालन न करणे, कामाच्या प्रगतीनुसार दिनांक निहाय नोंदी मोजमाप पुस्तिकेत न नोंदविणे, काम पुर्णत्वाचा दाखला नस्तीवर उपलब्ध नसणे इ.***

| | |
|---|---|
| कामाचे नांव | वसई विरार शहर महानगरपालिका सन 2013-14 या वित्तीय |

| | |
|---|---|
| | वर्षात प्रभाग समिती ´क´ पाणी पुरवठा विभागाअंतर्गत येणा-या क्षेत्रात आवश्यकतेनुसार विविध व्यासाच्या जलवाहिन्या अंथरणे. |
| अंदाजपत्रकीय रक्कम | रु. 70,00,000/- (वार्षिक ठेका) |
| प्रशासकीय मंजुरी | स्थायी समिती सभा ठराव क्रं. 1030 दिनांक : 21/3/2013 |
| तांत्रिक मंजुरी | उपलब्ध नाही |
| ई निविदा प्रसिध्दी वृत्तपत्राचे नांव, दिनांक व कालावधी | दै. वार्ताहर व दै. हमारा महानगर दि. 03/5/2013<br>दि. 3/05/2013 ते दि. 10/5/2013 |
| निविदा स्वीकृती दिनांक | दि. 14/5/2013 |
| प्राप्त निविदा | तीन<br>मे. आर.जी.कंन्स्ट्रक्शन 10.5% जादा दराने<br>मे. के.आर. कंन्स्ट्रक्शन 9.00% जादा दराने<br>मे.नितीन जे. म्हात्रे 11.5 % जादा दराने |
| स्वीकृत निविदा | मे. के.आर. कंन्स्ट्रक्शन 4.97% जादा दराने (वाटाघाटीने) |
| कामाचा कालावधी | एक वर्ष |
| करारनामा | रु. 4200/- दि. 31/5/2013 |
| कार्यादेश क्रं. व दिनांक | वविशम/काअ/पापु/ /104 दि. 01/06/2013 |

उपरोक्त कामाबाबत लेखापरिक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. प्रस्तुत कामाची निविदा दै. वार्ताहर व दै. हमारा महानगर या वृत्तपत्रात दि. 03/5/2013 रोजी प्रसिध्द केल्याचे नमूद आहे, परंतु दै. हमारा महानगर या वृत्तपत्राचे कात्रण नस्तीवर उपलब्ध नसल्याने सदर निविदा जाहीरातीस व्यापक प्रसिध्दी दिल्याबाबत लेखपरिक्षणाची खात्री झाली नाही व त्यामुळे निविदेस व्यापक प्रसिध्दी मिळाली नाही व स्पर्धात्मक दराचा फायदा महापालिकेस झाला नाही.

2. प्रस्तुत कामाची प्रथम निविदा दै. वार्ताहर व दै. हमारा महानगर या वृत्तपत्रात दि. 03/5/2013 रोजी प्रसिध्द केल्याचे नमूद आहे. सार्वजनिक बांधकाम संहिता परिच्छेद क्रं. 202 व सार्वजनिक बांधकाम विभागाचा शासन निर्णय क्रं. सीएटी-10/2006/प्र.क्र. 133/ इमारती 2 दि. 21/11/2006 नुसार रु. 50 लाख पेक्षा जास्त किमतीच्या कामासाठी पहिली निविदा सुचना कालावधी 25 दिवस निश्चित करण्यात आलेला आहे. परंतु प्रस्तुत निविदा सुचना कालावधी हा 8 दिवस इतका अत्यल्प ठेवण्यात आला होता. यावरून प्रस्तुत निविदा प्रसिद्ध करतांना सार्वजनिक बांधकाम संहितेच्या परिच्छेद क्र. 202 व उपरोक्त शासन निर्णयाचे पालन करण्यात आले नाही व जाहीरातीस व्यापक प्रसिध्दी मिळाली नाही, यामुळे स्पर्धात्मक दराचा फायदा महापालिकेस होऊ शकला नाही.

3. विभागाने सदरील कामासाठी प्रथम निविदा जाहीरात दै. वार्ताहर व दै. हमारा महानगर या वर्तमान पत्रात दिल्याचे नमूद आहे. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. पीयुबी-100 प्र.क्र.73/2000/34 दि. 01/01/2001 नुसार ज्या एका कामाचे मुल्य रु. 50 लाखापेक्षा जास्त आहे. अशी जाहीरात प्रसिध्दीचे वृत्तपत्र संबंधित विभागातील एक 'अ' वर्ग दैनिक व त्या

विभागातील 'ब' व ज्या जिल्हयाचे काम आहे त्या विभागातील 'क' वर्ग दैनिक या वृत्तपत्रात आळीपाळीने देणे आवश्यक असुन त्याचे वितरण माहिती संचालनालयाच्या मुख्यालया मार्फत करणे आवश्यक आहे व वृत्तपत्र कोणत्या भाषेचे असावे याबाबत प्रस्तुत विभागाची शिफारस घेण आवश्यक आहे, यावरुन प्रस्तुत काम करतांना उपरोक्त शासन निर्णयाचे पालन केले नसल्याचे दिसून येते व त्यामुळे जाहीरातीस व्यापक प्रसिध्दी न मिळाल्यामुळे सदरील कामाची निविदा राबविताना स्पर्धा होऊ शकली नाही व महापालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा झाला नाही.

4. निविदा समिती सदस्य व निविदाकार अथवा निविदाकारांचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत जाहीरातीत नमूद केलेल्या ठिकाणी व वेळी कार्यकारी अभियंता यांनी प्राप्त निविदा उघडून पात्र निविदांचा तुलनात्मक दराचा तक्ता तयार करणे आवश्यक आहे व त्यानुसार न्युनतम दराची निविदा मंजूर करण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. परंतु निविदा नस्तीवर निविदा समितीचे इत्तिवृत्त व तुलनात्मक दराचा तक्ता दिसून आला नाही. यावरून निविदा मंजूर करताना बांधकाम संहितेच्या परिच्छेद क्र. 203 नुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

5. निविदा पत्रकातील अटी व शर्तीतील अनु.क्रं. 19 नुसार लिफाफा क्रं. 1 मधून तांत्रिक व आर्थिक क्षमता सिध्द करणारी कागदपत्रे सादर करणे आवश्यक होते तसेच सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील नियम क्रं. 198 टीप 3(2) नुसार कंत्राटदाराने कामाला ठेवलेला तांत्रिक कर्मचारी वर्ग याबाबत माहिती सादर करणे आवश्यक आहे याबाबतची माहीती एकाही निविदाकाराने सादर केलेली नाही तसेच सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील नियम क्रं. 206 नुसार कामाच्या निविदा मुल्याच्या 20 % कमी नाही. एवढया रकमेचे आर्थिक पतदारी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असतांना रु. पाच लक्ष किमंतीची आर्थिक क्षमतेची पतदारी प्रमाणपत्रे सादर केली आहेत, यावरुन सर्व निविदाकार तांत्रिक दृष्टया व आर्थिक दृष्टया सक्षम नसतांना निविदा स्वीकारण्यात आल्या आहेत यावरुन निविदा प्रक्रिया राबवितांना निविदा पत्रकातील अटी व शर्ती तसेच शासन नियमाचे पालन करण्यात आले नसल्याचे दिसून येते.

6. प्राप्त तिनही निविदाकारांच्या नोंदणी प्रमाणपत्रावरुन असे दिसुन येते की, त्यांची कामे घेण्याची पात्रता ही रु. 50 लक्ष इतक्या रकमेपर्यंत मर्यादित आहे व प्रस्तुत कामाचे अंदाजपत्रकीय मूल्य रु. 70 लक्ष इतके असल्याचे दिसून येते, यावरुन तिनही निविदाकार निविदा भरण्यास अपात्र होते तरीही विभागाने सदर निविदा स्वीकारण्याची कार्यवाही करुन न्यूनतम निविदाधारकाची निविदा मंजूर केली असल्याचे दिसून येते.

7. सदर कामाचे अंदाजपत्रकीय मूल्य रु. 70 लक्ष इतके असुन करारनामा रु. 4200/- इतक्या मूल्याच्या मुद्रांक पेपरवर केल्याचे दिसून येते. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 च्या कलम 63 नुसार प्रस्तुत करारनामा करतांना रु. 6100/- इतके मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक होते,तरी कमी भरलेली मुद्रांक शुल्काची रक्कम रु.1900/- संबंधिताकडून वसुल करुन शासन खाती भरुन अनुपालन दर्शवावे.

8. महाराष्ट्र बांधकाम नियम पुस्तिकेतील परिशिष्ट 24 मध्ये नमुद असल्यानुसार कामाच्या प्रगतीप्रमाणे दिनांक निहाय कामाच्या नोंदी मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक आहे, परंतु याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

9. कार्यादेशातील आदेशानुसार ठेकेदाराने प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी कामाचे नांव, एस्टीमेट रक्कम,ठेकेदाराचे नांव,कामाची मुदत इ. दर्शविणारा रंगीत फलक लावणे आवश्यक आहे, सदर बाबीचे

पालन केले नसल्याचे नस्तीवरुन दिसून येते.

उपरोक्त मुदयांबाबत विभागास अर्धसमास पत्र क्रं. 70 दिनांक 06/02/2019 देण्यात आले होते, परंतु अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

RTNPRSM6901 (Ref No : 57, Hmm No : 70)

## *61 प्रभाग समिती ´ड´ अंतर्गत नवघर माणिकपुर शहरातील संतुलन टाकी (एम.बी.आर) दिवाणमाण ते मुख्य अंबाडी रोड 100 फुटी रोड जंक्शन पर्यंत 610 मि.मी. व्यासाची मृदु पोलादी (एम.एस.) जलवाहिनी पुरविणे, अंथरणे व जोडणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 5**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 12150272.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 12150272.00/-

***निविदा जाहीरात प्रसिध्द करतांना शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम नियमावलीचे पालन न करणे, निविदा कालावधी कमी ठेवणे, कामाच्या मुल्यानुसार योग्य वर्गवारीच्या वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द न करणे, सुरक्षा ठेव म्हणून स्वीकरण्यात आलेल्या बँक गॅरंटीची सत्यता न पडताळणे, काम करतांना कार्यादेश व करारातील अटी व शर्तीचे पालन न करणे, कामाच्या प्रगतीनुसार दिनांक निहाय नोंदी मोजमाप पुस्तिकेत न नोंदविणे, काम पुर्णत्वाचा दाखला नस्तीवर उपलब्ध नसणे, करारातील अटी व शर्तीनुसार त्रयस्थ संस्थेने केलेल्या तांत्रिक लेखा परिक्षण अहवालाची प्रत नस्तीवर उपलब्ध नसणे इ.***

| | |
|---|---|
| कामाचे नांव | प्रभाग समिती “ड” अंतर्गत नवघर माणिकपुर शहरातील संतुलन टाकी (एम.बी.आर) दिवाणमाण ते मुख्य अंबाडी रोड 100 फुटी रोड जंक्शन पर्यंत 610 मि.मी. व्यासाची मृदु पोलादी (एम.एस.) जलवाहिनी पुरविणे,अंथरणे व जोडणे. |
| अंदाजपत्रकीय रक्कम | रु. 1,21,50,272/- |
| लेखाशिर्ष | विकास निधी अंतर्गत पाणी पुरवठा शहरांतर्गत जलवाहिनी व्यवस्था. |
| प्रशासकीय मंजुरी | महासभा ठराव क्रं. 16 दिनांक : 16/9/2013 |
| तांत्रिक मंजुरी | I/6/48 दि. 25/09/2013 |
| ई निविदा प्रसिध्दी वृत्तपत्राचे नांव, | दै. सामना व दै. मुंबई मित्र दि.29/10/2013 |

| | |
|---|---|
| दिनांक व कालावधी | दि. 29/10/2013 ते दि. 25/11/2013 |
| निविदा स्वीकृती दिनांक | दि. 26/11/2013 ते 27/11/2013 |
| प्राप्त निविदा | तीन<br>मे.कॉसमॉस इन्फ्रा.प्रा.लि. 24.3% जादा दराने<br>मे. गणेश डेव्हलपर्स 29.05 % जादा दराने<br>मे. संदेश बुटाला 30.5 % जादा दराने |
| स्वीकृत निविदा | मे.कॉसमॉस इन्फ्रा.प्रा.लि. 9.95% जादा दराने<br>(वाटाघाटीने) |
| कामाचा कालावधी | सहा महिने |
| करारनामा | रु. 12500/- दि. 25/2/2014 |
| कार्यादेश क्रं. व दिनांक | वविशम/काअ/पापु/ /690/14 दि. 25/02/2014 |

उपरोक्त कामाबाबत लेखापरिक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. प्रस्तुत कामाची निविदा दै. सामना व दै. मुंबई मित्र या वृत्तपत्रात दि. 29/10/2013 रोजी प्रसिध्द केल्याचे नमूद आहे, परंतु दै. सामना या वृत्तपत्राचे कात्रण नस्तीवर उपलब्ध नसल्याने सदर निविदा जाहीरात दोन वृत्तपत्रात प्रसिध्द केल्याची लेखपरिक्षणाची खात्री झाली नाही,त्यामुळे जाहीरातीस व्यापक प्रसिध्दी दिल्याचे दिसून येत नाही.

2. विभागाने सदरील कामासाठी प्रथम निविदा जाहीरात दै. सामना व दै. मुंबई मित्र या वर्तमान पत्रात जाहीरात दिल्याचे नमूद आहे. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. पीयुबी-100 प्र.क्र.73/2000/34 दि. 01/01/2001 नुसार ज्या एका कामाचे मुल्य रु. 50 लाखापेक्षा जास्त आहे. अशी जाहीरात प्रसिध्दीचे वृत्तपत्र संबंधित विभागातील एक 'अ' वर्ग दैनिक व त्या विभागातील 'ब' व ज्या जिल्हयाचे काम आहे त्या त्या विभागातील 'क' वर्ग दैनिक या वृत्तपत्रात आळीपाळीने देणे आवश्यक असुन त्याचे वितरण माहिती संचालनालयाच्या मुख्यालया मार्फत करणे आवश्यक आहे व वृत्तपत्र कोणत्या भाषेचे असावे याबाबत प्रस्तुत विभागाची शिफारस घेण आवश्यक आहे, यावरुन प्रस्तुत काम करतांना उपरोक्त शासन निर्णयाचे पालन केले नसल्याचे दिसून येते व त्यामुळे जाहीरातीस व्यापक प्रसिध्दी न मिळाल्यामुळे सदरील कामाची निविदा राबविताना स्पर्धा होऊ शकली नाही व महापालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा झाला नाही.

3. महाराष्ट्र बांधकाम नियम पुस्तिकेतील परिशिष्ट 24 मध्ये नमुद असल्यानुसार कामाच्या प्रगतीप्रमाणे दिनांक निहाय कामाच्या नोंदी मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक आहे, परंतु याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

4. कार्यादेशातील आदेशानुसार ठेकेदाराने प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी कामाचे नांव, एस्टीमेट रक्कम,ठेकेदाराचे नांव,कामाची मुदत इ. दर्शविणारा रंगीत फलक लावणे आवश्यक आहे, सदर बाबीचे पालन केले नसल्याचे नस्तीवरुन दिसून येते.

5. करारनाम्यातील अट क्रं. 21 नुसार महापालिकेने नेमलेल्या त्रयस्थ संस्थेकडून कामाचे तांत्रिक लेखापरिक्षण करण्याची जबाबदारी ठेकेदार यांची राहील असे नमुद आहे, त्यानुसार सदर कामाचे तांत्रिक लेखापरिक्षण केल्याबाबतचा अहवाल नस्तीवर दिसून आला नाही, यावरुन सदर अटीची पुर्तता केली असल्याचे दिसून येत नाही.

उपरोक्त मुदयांबाबत विभागास अर्धसमास पत्र क्रं. 71 दिनांक 06/02/2019 देण्यात आले होते,

परंतु अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

RTNPRSM6901 (Ref No : 58, Hmm No : 71)

## *62 जलउपकरावर मिळणारी सूट न घेतल्यामुळे महापालिकेस होत असलेल्या नुकसानीबाबत.........*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 876966.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 876966.00/-

***सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा कार्यान्वित न करणे, जलप्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम 1974 चे कलम 25 मधील तरतुदींची पुर्तता न करणे व प्रदूषण नियंत्रण अधिनियम 1986 चे मापदंड न पाळल्यामुळे जल उपकरावर मिळणा-या सूटीस पात्र न ठरल्यामुळे होत असलेल्या नुकसानीबाबत.***

जल (प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) उपकर अधिनियम 1977 चे कलम 5, उपकलम (1) व जल (प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण) उपकर नियम 1978 चे नियम 4, उपनियम (1) नुसार स्थानिक नागरी संस्थानी नदीतून उचल केलेल्या पाणीपुरवठा योजनांवर ठराविक कालावधीने महाराष्ट्र प्रदूषण मंडळास जलउपकर भरावा लागतो.

प्रस्तुत कायदयाच्या कलम 7 नुसार उपरोक्त उपकर भरण्यास पात्र असणा-या व्यक्ती व स्थानिक संस्था यांनी सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा कार्यान्वित केलेली असल्यास, तसेच जलप्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम 1974 चे कलम 25 मधील तरतुदींची पुर्तता करुन प्रदूषण नियंत्रण अधिनियम 1986 चे मापदंड पाळल्यास त्यांना उपरोक्त उपकरावर 25% सूट देण्यात येते.

महापालिकेने उपरोक्त तरतुदींचे पालन न केल्यामुळे महापालिका उपकरात सूट मिळणेसाठी पात्र ठरत नाही, त्यामुळे सन 2015-16 या वर्षात महापालिकेचे खालीलप्रमाणे नुकसान झाले आहे.

(रक्कम रु.)

| कालावधी | पाणी दरापोटी एकूण अदायगी | जलउपकर @20% दराने | जलउपकरासाठी पात्र रक्कम @25% दराने |
|---|---|---|---|
| 2015-16 | 17539325 | 3507865 | 876966 |

उपरोक्त नुसार महापालिकेस रु.876966/- इतक्या रकमेचे नुकसान झाल्याचे दिसून येते.

उपरोक्त मुदयांबाबत विभागास अर्धसमास पत्र क्रं. 72 दिनांक 06/02/2019 देण्यात आले होते परंतु अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

RTNPRSM6901 (Ref No : 59, Hmm No : 72)

## *63 वसई विरार शहर महानगरपालिका सन 2013-14 या वित्तीय वर्षात प्रभाग समिती "अ" पाणी पुरवठा विभागाअंतर्गत येणा-या क्षेत्रात आवश्यकतेनुसार विविध व्यासाच्या जलवाहिन्या अंथरणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 9**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 7000000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 7000000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 1900.00/-

***निविदा जाहीरात प्रसिध्द करतांना शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम नियमावलीचे पालन न करणे, निविदा कालावधी कमी ठेवणे, कामाच्या मुल्यानुसार योग्य वर्गवारीच्या वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द न करणे, निविदा प्रक्रिया करतांना ई निविदा पध्दतीचा वापर न करणे,करार करतांना योग्य किमंतीचे मुद्रांक शुल्क न भरणे, काम करतांना कार्यादेश व करारातील अटी व शर्तीचे पालन न करणे, कामाच्या प्रगतीनुसार दिनांक निहाय नोंदी मोजमाप पुस्तिकेत न नोंदविणे, काम पुर्णत्वाचा दाखला नस्तीवर उपलब्ध नसणे इ.***

| | |
|---|---|
| कामाचे नांव | वसई विरार शहर महानगरपालिका सन 2013-14 या वित्तीय वर्षात प्रभाग समिती ´अ´ पाणी पुरवठा विभागाअंतर्गत येणा-या क्षेत्रात आवश्यकतेनुसार विविध व्यासाच्या जलवाहिन्या अंथरणे. |
| अंदाजपत्रकीय रक्कम | रु. 70,00,000/- (वार्षिक ठेका) |
| प्रशासकीय मंजुरी | स्थायी समिती सभा ठराव क्रं. 952 दिनांक : 8/3/2013 |
| तांत्रिक मंजुरी | उपलब्ध नाही |
| ई निविदा प्रसिध्दी वृत्तपत्राचे नांव, दिनांक व कालावधी | दै. वार्ताहर व दै. हमारा महानगर दि. 03/5/2013<br>दि. 3/05/2013 ते दि. 10/5/2013 |
| निविदा स्वीकृती दिनांक | दि. 14/5/2013 |

| | |
|---|---|
| प्राप्त निविदा | तीन<br>मे. आर.जी.कंन्स्ट्रक्शन 10.5% जादा दराने<br>मे. के.आर. कंन्स्ट्रक्शन 9.10% जादा दराने<br>मे.नितीन जे. म्हात्रे 11 % जादा दराने |
| स्वीकृत निविदा | मे. के.आर. कंन्स्ट्रक्शन 4.97% जादा दराने<br>(वाटाघाटीने) |
| कामाचा कालावधी | एक वर्ष |
| करारनामा | रु. 4200/- दि. 31/5/2013 |
| कार्यादेश क्रं. व दिनांक | वविशम/काअ/पापु/ /105 दि. 01/06/2013 |

उपरोक्त कामाबाबत लेखापरिक्षणाचे खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1. प्रस्तुत कामाची निविदा दै. वार्ताहर व दै. हमारा महानगर या वृत्तपत्रात दि. 03/5/2013 रोजी प्रसिध्द केल्याचे नमूद आहे, परंतु सदर वृत्तपत्राचे कात्रण नस्तीवर उपलब्ध नसल्याने सदर निविदा जाहीरातीस व्यापक प्रसिध्दी दिल्याबाबत लेखपरिक्षणाची खात्री झाली नाही व त्यामुळे निविदेस व्यापक प्रसिध्दी मिळाली नाही व स्पर्धात्मक दराचा फायदा महापालिकेस झाला नाही.

2. प्रस्तुत कामाची प्रथम निविदा दै. वार्ताहर व दै. हमारा महानगर या वृत्तपत्रात दि. 03/5/2013 रोजी प्रसिध्द केल्याचे नमूद आहे. सार्वजनिक बांधकाम संहिता परिच्छेद क्रं. 202 व सार्वजनिक बांधकाम विभागाचा शासन निर्णय क्रं. सीएटी-10/2006/प्र.क्र. 133/ इमारती 2 दि. 21/11/2006 नुसार रु. 50 लाख पेक्षा जास्त किमतीच्या कामासाठी पहिली निविदा सुचना कालावधी 25 दिवस निश्चित करण्यात आलेला आहे. परंतु प्रस्तुत निविदा सुचना कालावधी हा 8 दिवस इतका अत्यल्प ठेवण्यात आला होता. यावरून प्रस्तुत निविदा प्रसिद्ध करतांना सार्वजनिक बांधकाम संहितेच्या परिच्छेद क्र. 202 व उपरोक्त शासन निर्णयाचे पालन करण्यात आले नाही व जाहीरातीस व्यापक प्रसिध्दी मिळाली नाही, यामुळे स्पर्धात्मक दराचा फायदा महापालिकेस होऊ शकला नाही.

3. विभागाने सदरील कामासाठी प्रथम निविदा जाहीरात दै. वार्ताहर व दै. हमारा महानगर या वर्तमान पत्रात दिल्याचे नमूद आहे. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. पीयुबी-100 प्र.क्र.73/2000/34 दि. 01/01/2001 नुसार ज्या एका कामाचे मुल्य रु. 50 लाखापेक्षा जास्त आहे. अशी जाहीरात प्रसिध्दीचे वृत्तपत्र संबंधित विभागातील एक 'अ' वर्ग दैनिक व त्या विभागातील 'ब' व ज्या जिल्हयाचे काम आहे त्या विभागातील 'क' वर्ग दैनिक या वृत्तपत्रात आळीपाळीने देणे आवश्यक असुन त्याचे वितरण माहिती संचालनालयाच्या मुख्यालया मार्फत करणे आवश्यक आहे व वृत्तपत्र कोणत्या भाषेचे असावे याबाबत प्रस्तुत विभागाची शिफारस घेण आवश्यक आहे, यावरुन प्रस्तुत काम करतांना उपरोक्त शासन निर्णयाचे पालन केले नसल्याचे दिसून येते व त्यामुळे जाहीरातीस व्यापक प्रसिध्दी न मिळाल्यामुळे सदरील कामाची निविदा राबविताना स्पर्धा होऊ शकली नाही व महापालिकेस स्पर्धात्मक दराचा फायदा झाला नाही.

4. निविदा समिती सदस्य व निविदाकार अथवा निविदाकारांचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत जाहीरातीत नमूद केलेल्या ठिकाणी व वेळी कार्यकारी अभियंता यांनी प्राप्त निविदा उघडून पात्र निविदांचा तुलनात्मक दराचा तक्ता तयार करणे आवश्यक आहे व त्यानुसार न्युनतम दराची निविदा मंजूर करण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. परंतु निविदा नस्तीवर निविदा समितीचे इत्तिवृत्त व तुलनात्मक दराचा तक्ता दिसून आला नाही. यावरून निविदा मंजूर करताना बांधकाम संहितेच्या

परिच्छेद क्र. 203 नुसार कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

5. निविदा पत्रकातील अटी व शर्तीतील अनु.क्रं. 19 नुसार लिफाफा क्रं. 1 मधून तांत्रिक व आर्थिक क्षमता सिध्द करणारी कागदपत्रे सादर करणे आवश्यक होते तसेच सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील नियम क्रं. 198 टीप 3(2) नुसार कंत्राटदाराने कामाला ठेवलेला तांत्रिक कर्मचारी वर्ग याबाबत माहिती सादर करणे आवश्यक आहे याबाबतची माहीती एकाही निविदाकाराने सादर केलेली नाही तसेच सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील नियम क्रं. 206 नुसार कामाच्या निविदा मुल्याच्या 20 % कमी नाही एवढया रकमेचे आर्थिक पतदारी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असतांना रु. पाच लक्ष किमंतीची आर्थिक क्षमतेची पतदारी प्रमाणपत्रे सादर केली आहेत, यावरुन सर्व निविदाकार तांत्रिक दृष्टया व आर्थिक दृष्टया सक्षम नसतांना निविदा स्वीकारण्यात आल्या आहेत यावरुन निविदा प्रक्रिया राबवितांना निविदा पत्रकातील अटी व शर्ती तसेच शासन नियमाचे पालन करण्यात आले नसल्याचे दिसून येते.

6. प्राप्त तिनही निविदाकारांच्या नोंदणी प्रमाणपत्रावरुन असे दिसुन येते की, त्यांची कामे घेण्याची पात्रता ही रु. 50 लक्ष इतक्या रकमेपर्यंत मर्यादित आहे व प्रस्तुत कामाचे अंदाजपत्रकीय मूल्य रु. 70 लक्ष इतके असल्याचे दिसून येते, यावरुन तिनही निविदाकार निविदा भरण्यास अपात्र होते तरीही विभागाने सदर निविदा स्वीकारण्याची कार्यवाही करुन न्यूनतम निविदाधारकाची निविदा मंजूर केली असल्याचे दिसून येते.

7. सदर कामाचे अंदाजपत्रकीय मूल्य रु. 70 लक्ष इतके असुन करारनामा रु. 4200/- इतक्या मूल्याच्या मुद्रांक पेपरवर केल्याचे दिसून येते. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 च्या कलम 63 नुसार प्रस्तुत करारनामा करतांना रु. 6100/- इतके मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक होते,तरी कमी भरलेली मुद्रांक शुल्काची रक्कम रु.1900/- संबंधिताकडून वसुल करुन शासन खाती भरुन अनुपालन दर्शवावे.

8. महाराष्ट्र बांधकाम नियम पुस्तिकेतील परिशिष्ट 24 मध्ये नमुद असल्यानुसार कामाच्या प्रगतीप्रमाणे दिनांक निहाय कामाच्या नोंदी मोजमाप पुस्तिकेत नोंदविणे आवश्यक आहे, परंतु याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

9. कार्यादेशातील आदेशानुसार ठेकेदाराने प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी कामाचे नांव, एस्टीमेट रक्कम,ठेकेदाराचे नांव,कामाची मुदत इ. दर्शविणारा रंगीत फलक लावणे आवश्यक आहे, सदर बाबीचे पालन केले नसल्याचे नस्तीवरुन दिसून येते.

उपरोक्त मुदयांबाबत विभागास अर्धसमास पत्र क्रं. 73 दिनांक 06/2/2019 देण्यात आले होते, परंतु अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

RTNPRSM6901 (Ref No : 60, Hmm No : 73)

## *64 वॉर्ड क्र.55 मध्ये नवीन उद्यानात ऑक्टोगोनोल पोल उभारणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 3**

वसई विरार महानगर पालिका

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 1086518.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1086518.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 54326.00/-

***स्थळ पाहणी अहवाल उपलब्ध नाही, कामाच्या मुळ संरचनेत झालेल्या बदलास सक्षम प्राधिका-याची मान्यता नाही,स्थानिक संस्था कर वसुल केलेला नाही.***

| | |
|---|---|
| प्राकलन निधी | विकास निधी अंतर्गत नवीन पोल/केबल व्यवस्था |
| प्रशासकीय मान्यता | मा.स्थायी समिती - 505 दि.06/08/2014 |
| तांत्रिक मान्यता क्र. दिनांक | I /82/754 दि.19/08/2014 |
| निविदा प्रसिध्दी वृत्तपत्राचे नाव ई निविदा | दै. वार्ताहर दै. महाराष्ट्र जनमुद्रा |
| | दि. 7/1/2015 |
| निविदा मंजुरी (म.म.अ.1949 चे कलम 73 (क). | मा. स्थायी समिती - 104, दि.13/04/2015 |
| कंत्राटदाराचे नाव | मे. किंजल इलेक्ट्रीकल्स, वसई |
| कार्यादेश | जा.क्र. 805, दि.12/05/2015 |
| कामाची मुदत | 3 महिने (तीन) |
| काम सुरु केल्याचा दिनांक | दि. 12/05/2015 |
| काम पुर्ण झाल्याची दिनांक | दि. 04/8/2015 |
| मोजपाम पुस्तक | MB - 42 पा.नं.14 -18 |
| मोजमाप पुस्तकानुसार देयकांची रक्कम | अंदाजपत्रकीय रक्कम रु.9,97,836 /- |
| पहिले चालु देयक<br>प्रमाणक क्र. 1463 दि. 03/6/2015 | 1) 958388/- 862549/- |
| दुसरे अंतिम<br>प्रमाणक क्र. 6028 दि. 31/3/2016 | 2) 128130/- 115317/- |
| एकूण | 10,86,518/- निव्वळ 9,77,866/- |
| जादा काम | 88,642/- |
| निविदा 5% अधिक | 49892/- |
| अधिक मुल्याचे काम | 38,790/- |

सदर कामाचे लेखापरिक्षणात खालील आक्षेप नोंदविण्यात येत आहेत.

1. महानगरपालिका लेखा संहिता 1971 मधील नियम 158 अन्वये स्थळ पहाणी अहवाल लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नसल्याने सदर काम प्रस्तावित करतांना सदर जागेवर यापुर्वी अस्तीत्वात असलेल्या प्रकाश व्यवस्थेबाबत व हाती घ्यावयाचे कामाबाबत आढावा घेता आला नाही.

2. प्रत्यक्ष अंदाजपत्रकाप्रमाणे प्रस्तावित केलेल्या कामाचे परिणाम व काम कमी /जास्त प्रमाणात केले आहे. बाब क्र. 3,6,7,8,11,16,17,18,19 त्यामुळे कामाचे मुळ संरचनेत बदल झालेला आहे. त्यास नगरपालिका लेखा संहिता 1971 मधील नियम क्र .167 अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता आवश्यक आहे.

3. करारनाम्यातील अट क्र.21 नुसार स्थानिक संस्था करासाठी नोंदणी करणे बंधनकारक असतांना तशी कार्यवाही निदर्शनास आली नसल्याने 5% स्थानिक संस्था कर रु.54,326/- वसुल करण्यात यावे.

उपरोक्त आक्षेपाबाबत अर्धसमास पत्र क्रं. 54 दिनांक. 29/1/2019 अन्वये संबंधित विभागास कळविण्यात आले होते, तथापि अनुपालन अप्राप्त असल्याने प रिच्छेद कायम करण्यात येत आहे.

आक्षेपाधीन खर्च रु.10,86,518/-

वसुलपात्र रु.54,326/-

DATPGWM6201 (Ref No : 61, Hmm No : 54)

## *65 प्रभाग समिती 'ब' पेल्हार अतंर्गत येणाऱ्या विविध प्रभागा मध्ये असुरक्षीत विदयुत पोल सुरक्षित करणे बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 479734.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 479734.00/-

***दुरुस्ती बाबत सांख्यिकी अहवाल उपलब्ध नाही, पूर्वी स्थापित पोलचा गुणदोष अहवाल उपलब्ध नाही, साहित्य गुणदोष अहवाल उपलब्ध नाही.***

| | |
|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम रु. | रु.4,79,734/- |
| लेखाशिर्ष | प्रभाग विकास निधी |
| प्रशासकीय मान्यता | स्थायी समिती सभा प्रस्ताव ठराव क्र.1170 दि.28/3/2016 |
| तांत्रिक मान्यता | प्रभाग समिती ठराव क्र.126 दि.11/3/2015 |
| कंत्राटदाराचे नाव | मेर्सस साई वैभव इलेक्ट्रीकल्स, नालासोपारा (प.) |
| मोजमाप पुस्तक क्रं. | 10 पृष्ठ क्रं.81 ते 85 |
| मुदत | 90 दिवस |

| | |
|---|---|
| कार्यादेश क्र.व दिनांक | जा.क्रं.वविशम/प्रसब/दिवा/83/15, दि.6/7/2015 |
| कामाची सुरुवात दिनांक | दि.6/7/2015 |
| काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र | दि.4/9/2015 |

सदर कामाचे लेखापरिक्षणा अतंर्गत खालील आक्षेपाची पुर्तता करणे आवश्यक आहे.

1. विदयुत विभागाने सदर काम प्रस्तावित करतांना स्थळ पाहणी अहवालात प्रभाग समिती (ब) अतंर्गत किती पोल काळवंडलेले/गंजलेले आहेत. तसेच कोणकोणत्या बाबी दुरुस्ती करावयाच्या आहेत याबाबत संख्यात्मक अहवाल सादर केलेला नाही. तथापि, अंदाजपत्रक तयार करतांना संख्या कशी निश्चित केली त्याबाबत खात्री होत नाही.

2. सदर दुरुस्ती प्रस्तावित करताना यापुर्वी स्थापना करण्यांत आलेल्या पोल चा गुण दोष कालावधी किती होता याबाबत पाहणी अहवालात माहिती सादर करण्यात आली नाही. त्यामुळे प्रस्तावित केलेल्या दुरुस्ती परिमाणाबाबत लेखापरिक्षणाची खात्री होत नाही.

3. कंत्राटदाराने केलेल्या कामाचे/साहित्याचे गुणवत्ता अहवाल लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

आक्षेपाधीन रक्कम रु.4,79,734/-

उपरोक्त आक्षेपाबाबत अर्धसमास पत्र क्रं. 52 दि. 29/1/2019 अन्वये संबंधित विभागास कळविण्यात आले होते, तथापि अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATPGWM6201 (Ref No : 62, Hmm No : 52)

## *66 प्रभाग समिती “ड” कार्यक्षेत्रातील राजप्रभा मिनाक्षी ते एलकॉन पर्यत 22 केव्हीए रिकेय फिडर एच.टी.लाईन पोल स्थलांतर करणे.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 377455.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 377455.00/-

***स्थळ पाहणी अहवाल उपलब्ध नाही, खर्च महाराष्ट्र विद्युत वितरण कं. यांनी करणे आवश्यक असतांना महापालिकेने केला आहे, निविदा मंजुर करतांना वाटाघाटी करण्यात आल्या नाहीत.***

| | |
|---|---|
| लेखाशिर्ष | प्रभाग विकास नीधी प्रभाग क्र.ड |
| प्रशासकीय मान्यता | प्रभाग समिती ठराव क्र. 296 दि. 29/10/2013 |

| | |
|---|---|
| तांत्रिक मान्यता क्र. दिनांक | 95/866 दि.20/12/2013 |
| निविदा प्रसिध्दी वृत्तपत्राचे नाव ई निविदा | सकाळ दि.7/2/2014 |
| | दै.नवभारत दि.7/2/2014 |
| कंत्राटदाराचे नाव | मे.सुपर्णा इलेक्ट्रीकल्स |
| निविदा मंजुरी.(म.म.अ.1949 चे कलम 73 (क). | 17/2/2014 रु.3,87,936/- |
| कार्यादेश | 1156/28/5/14 |
| कामाची मुदत | 60 दिवस |
| काम सुरु केल्याचा दिनांक | दि.28/5/2014 |
| काम पुर्ण झाल्याची दिनांक | दि.22/7/2014 |
| तपासणी अहवाल | दि.22/7/2014 |
| मोजपाम पुस्तक | 40 पृ.क्र.40 ते 43 |
| मोजमाप पुस्तकानुसार देयकांची रक्कम | रु.3,77,455/- प्रथम व अंतिम देयक |
| | प्रमाणक क्र. 881 दि. 17/8/2015 रु.3,77,455/- |

सदर कामाचे लेखापरिक्षणात खालील आक्षेप नोंदविण्यात येत आहेत.

1. महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता 1971 मधील नियम -158 नुसार कामाचा स्थळ पहाणी अहवाल लेखा परिक्षणास दिसुन आला नाही . त्यामुळे काम कोणत्या आधारे प्रस्तावित केले याबाबत लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

2. सदर कामामध्ये 3 कन्डक्ट्रर्स फेस एच .टी.लाईन स्थलांतरीत केल्या आहेत . सदर काम करण्याची प्राथमिक जबाबदारी महाराष्ट्र विदयुत वितरण कंपनी यांची असतांना सदर कामावर महापालिकेने केलेला खर्च लेखापरिक्षणात मान्य करता येत नाही.

3. सदर कामाचे अंदाजपत्रक सन. 2012-13 चे डीएसआर वर आधारीत असुन निविदा 5 % जादा दराने मंजुर केली आहे . सदर बाबतीत आवश्यक ती वाटाघाटी करण्यांत आल्याचे दिसुन येत नाही.

उपरोक्त आक्षेपाबाबत अर्धसमास पत्र क्रं. 53, दि. 29/1/2019 अन्वये संबंधित विभागास कळविण्यात आले होते , तथापि अनुपालन अप्राप्त असल्याने प रिच्छेद कायम करण्यात येत आहे.

आक्षेपाधीन रक्कम रु.3,87,936/-

DATPGWM6201 (Ref No : 63, Hmm No : 53)

***67 वसई विरार शहर महापालिका क्षेत्रातील प्रभागामधील मालमत्ता वर जुन्या दराने आकारणी करण्यात आल्याने मोठया प्रमाणावर मालमत्ता कर निर्धारणा मधील नुकसानी बाबत.***

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 129 मधील तरतुदीनुसार महापालिका स्थापने नंतर आकारण्यात येणाऱ्या करांच्या दरामध्ये सुधारणा करण्यासाठी कर निर्धारण मंडळ स्थापन केले नाही. तसेच सदर कलमातील तरतुदीनुसार दर 5 वर्षानी दरांची सुधारणा करण्यांत आली नाही त्यामुळे महापालिका हद्दीमध्ये मोठया प्रमाणावर नागरीकरण व नविन बांधकामे झाली असल्याने मालमत्ता कर आकारणीचे मोठया प्रमाणावर वित्तीय नुकसान झाले आहे.***

वसई विरार शहर महापालिका क्षेत्रातील नवघर माणिकपुर क्षेत्रातील सन 2015-16 मध्ये नविन मालमत्ता वर कर आकारण्याच्या प्रकरणांची तपासणी केली असता नगररचना आणि मुल्य निर्धारण विभागाचे पत्र क्र.कर आकारणी/नवघर माणिकपुर/ससं ठाणे/568 दि.17/3/2006 अन्वये खालील प्रमाणे निश्चित केलेल्या दराप्रमाणे मालमत्ता कर आकारणी करण्यात आलेली आहे.

| अ.क्रं. | बांधकामाचा प्रकार | झोन 1 | झोन 2 | झोन 3 |
|---|---|---|---|---|
| | | नवघर माणिकपुर दिवाणमान, (लेआऊट सर्वे क्र. मधील बांधकामे) | नवघर माणिकपुर, दिवाणमान, चुळणे, बऱ्हामपुर, उमेळमान(गावठणामधील वैयक्तीक बांधकामे) | चुळणे, बऱ्हामपुर, उमेळमान (लेआऊट सर्वे क्र.मधील बांधकामे) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | आरसीसी/विटाच्या भिंती | 1.80(प्रती चौ.फु.) | 1.10(प्रती चौ.फु.) | 1.25 (प्रती चौ.फु.) |
| 2 | लोडबेअरिंग, कौलारु छप्पर, सिमेंट पत्रे, विटाच्या भिंती | 1.45 | 0.80 | 1.10 |
| 3 | मातीच्या भिंती,सिमेंट पत्रे, कौलारु घरे | 1.10 | 0.75 | 0.85 |
| 4 | कुडाच्या भिंती,झोपडया बेडे घरे | 0.75 | 0.40 | 0.45 |

नवघर माणिकपुर क्षेत्रामध्ये वरिल प्रमाणे दरानुसार कर आकारणी केले असल्याने व दरामध्ये सुधारणा न केल्याने महापालिकेचे वित्तीय नुकसान झाल्याचे निदर्शनास येते.

सन.2015-16 मधील वसई विरार शहर महापालिकेच्या इतर प्रभागातील मालमत्ता कर आकारणीच्या प्रकरणांची तपासणी केली असता ग्रामपंचायत अस्तित्वात असतांना ज्या दराने मालमत्ता कर आकारणी करण्यात येत होती त्याच नगन्य दराने मालमत्ता कर आकारणी केल्याचे

निदर्शनास येते. वसई विरार महापालिका सन .2009-10 पासुन असित्वात आली असुन नगररचना विभागाकडुन महापालिकेच्या अधिनस्त विभागामधील बांधकामावर दर चतुर्थ वार्षिक दराची पुर्नरचना करुन घेवुन सुधारित दराने कर आकारणी करणे आवश्यक आहे . तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 129 मधील तरतुदीनुसार महापालिका स्थापने नंतर आकारण्यात येणाऱ्या करांच्या दरामध्ये सुधारणा करण्यासाठी कर निर्धारण मंडळ स्थापन केल्याचे निदर्शनास येत नाही तसेच सदर कलमातील तरतुदीनुसार दर 5 वर्षानी दरांची सुधारणा करण्यांत आली नाही त्यामुळे महापालिका हद्दीमध्ये मोठया प्रमाणावर नागरीकरण व नविन बांधकामे झाली असल्याने मालमत्ता कर आकारणीचे मोठया प्रमाणावर वित्तीय नुकसान झाल्याचे निदर्शनास आले.

DATPGWM6201 (Ref No : 64, Hmm No : 85)

## *68 नालासोपारा विभागातील मालमत्ता धारकांना कमी कर आकारणे बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 16**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 351779.00/-

***मालमत्ता कराची आकारणी करतांना निश्चित केलेले क्षेत्रफळ निदर्शनास आले नाही, कर स्थळ पाहणी अहवालावर सक्षम प्राधिका-याची स्वाक्षरी नाही, प्रत्यक्ष आकारणीमध्ये कमी वसुली, मालमत्ता धारकांनी ताबा घेतलेल्या दिनांकाबाबत पुरावे उपलब्ध नाहीत इ.***

वसई विरार शहर महापालिका क्षेत्रातील नालासोपारा विभागातील सन .2015-16 मधील मालमत्ता कर आकरणी प्रकरणांची तपासणी केली असता खालील प्रकरणांमध्ये कमी कर आकारणी केल्याचे निदर्शनास येते.

**1. ॲसेटस इन्फ्रास्ट्रक्शन कंपनी, ओम साई अष्टविनायक कॉम्पलेक्स, मोरेगाव तलावा जवळ, वॉर्ड- तुळीज-2, सर्वे न.75/3, 76/5, 5,4,6 गाव मोरे, विरार पुर्व :-**

अ) वसई विरार महापालिका उपसंचालक नगररचना, विरार यांचे पत्र क्र.VVCMC/TP/OC/VP-0296/98/2015/16 दि.12/8/2015 अन्वये मालमत्ता कर आकारणी करण्यात आली असुन सदर बांधकामा पोटी एकुण बिल्टप क्षेत्रफळ 9194.99 sq.mtr. म्हणजेच 96363 sq.ft. बांधकामावर कर आकारणी करणे आवश्यक असतांना कागदपत्रांची पडताळणी केली असता एकुण 90695 रहिवास व 2878 वाणिज्य बांधकामावर म्हणजेच एकुण 93573 sq.ft. बांधकामावर कर आकारणी केली असल्याचे आढळुन येते. सदर कर आकारणी करतांना किती टक्के क्षेत्रफळ सार्वजनिक वापरा करीता

मोकळे सोडुन किती कारपेट क्षेत्रफळा कर आकारणीसाठी विचारात घेतलेले आहे याबाबतचा खुलासा होत नाही.

ब) सदर बांधकामावर कर आकारणी करतांना प्रऱ्यक्ष जागेवर जावुन मोजमापे घेतले बाबत व त्याप्रमाणे कर आकारणी के ल्या बाबतचा अहवाल लेखा परिक्षणात उपलब्ध झाला नाही , त्यामुळे प्रत्यक्ष जागेवरील क्षेत्रफळा प्रमाणे कर आकारणी केल्याची लेखा परिक्षणात खात्री करता आली नाही.

क) सदर नस्ती सोबत जोडण्यात आलेल्या कर आकारणी तकत्यावर सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही.

ड) सदर इमारती मधील गाळे धारकांच्या गाळयाचा ताबा कधी देण्यात आला त्याबाबतच्या पझेशन लेटरच्या सत्य प्रती लेखा परिक्षणात उपलब्ध झाल्या नाहीत किंवा गाळा धारकांना विद्युत , पाणी जोडण्या केव्हा झाल्या याबाबतचे अभिलेख कर आकारणी करतांना विचारात घेतल्याचे दिसुन येत नाही. तेव्हा सदर इमारतीच्या गाळा धारकांनी आपल्या गाळयाचा प्रत्यक्षात ताबा केव्हा घेतला त्याबाबतचे पुरावे लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाहीत..

इ) सदर बांधकामांस पर्णत्व दाखला दि .15/7/2014 रोजी लायसन्स वास्तुविषारद यांनी दिलेला असतांना कर आकारणी सन.2015-16 पासुन केली आहे.

ई) सदर इमारतीसाठी ऑक्युपेशन सर्टिफिकेट दि .12/8/2015 अन्वये देण्यात आले असल्याने सन.2015-16 मध्ये एकुण 9 महिन्याची मालमत्ता कर आकारणी करणे आवश्यक असतांना 6 महिन्याची प्रत्यक्षात कर आकारणी केली आहे . त्यामुळे उर्वरित 3 महिन्याची वसुल न झालेली मालमत्ता कराची रक्कम रु .1,40,019/- वसुल करुन महानगरपालिका लेख्यात भरणा करुन पुर्तता दर्शविण्यात यावी.

वसुलपात्र रक्कम 1,40,019/-

**2. शिवकुमार राजनाथ पटेल - मालक - विजय सुरजबली यादव व इतर - सर्वे क्रमांक -163/15 गांव मोरे, कमी मालमत्ता कर आकारणी बाबत.**

महाकालेश्वर अपार्टमेंट या इमारतीचे कर आकारणी प्रकरणाची तपासणी केली असता खालील आक्षेप नोदविण्यात येत आहेत.

अ. सदर इमारतीच्या कर आकारणी प्रकरणी जागेवर जावुन प्रत्यक्ष पहाणी अहवालानुसार क्षेत्रफळ मोजणी अहवाल उपलब्ध झाला नाही त्यामुळे मालमत्ता कर आकारणी केलेल्या जागेच्या क्षेत्रफळाबाबत लेखा परिक्षणात खात्री झाली नाही.

ब. मालमत्ता कर आकारणी विवरण पत्रावर सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी नसल्याने त्याचे विधी ग्राहयतेबाबत लेखा परिक्षणात खात्री करता आली नाही.

क. अर्जदाराने मिळकती वर सन .2014 पासुन अनधीकृत बांधकाम केल्याचे प्रतिज्ञापत्रा वर दि.19/2/2016 रोजी लिहुन दिलेले असतांना महापलिकेने सन .2015-16 पासुन मालमत्ता कर आकारणी केलेली आहे . ती सन.2014-15 ची मालमत्ता कर आकारणी रु .1,21,287/- संबंधितांकडुन वसुल करुन महापालिका नोदींत भरणा करुन पुर्तता दर्शविण्यात यावी.

ड. सदर इमारतीस मालमत्ता कर आकारणी करतांना सदर बांधकाम अनधिकृत रित्या केव्हा उभारण्यात आले याबाबत अधिकृत कागदोपत्री पुरावा उदा .विद्युत देयक ताबा प्रमाणपत्रे इत्यादी लेखा परिक्षणात उपलब्ध झाले नसल्याने महानगरपालिकेने मालमत्ता कर आकारणी केलेले वर्ष हे लेखा परिक्षणात ग्राहय धरता येत नाही.

वसुलपात्र रक्कम रु.1,21,287/-

**3. गोविंद बाळु नाईक - सर्वे क्र. 52, गाव मोरे या बांधकामास नवीन कर आकारणी करतांना कमी मालमत्ता कर आकारणी बाबत.**

सन 2015-16 मध्ये सदर मालमत्ता धारकांस मालमत्ता कर आकारणी सन .2008/09 पासुन करण्यांत आली आहे. त्याबाबत खालील आक्षेप नोंदविण्यात येत आहेत

रहिवास क्षेत्रफळ 2000 चौ.फु.

अ. सदर कर आकारणी नस्तीची तपासणी केली असता मालमत्ता धारकाने सादर केलेल्या कागदपत्रावरुन म्हणजे Sale Agreement /Light Bills इत्यादी वरुन सदर बांधकाम ताबा सन.2007-08 मध्ये म्हणजेच मार्च 2007-08 मध्ये घेतल्याचे निदर्शनास येते . परंतु मालमत्ता कर सन.2008-09 पासुन आकारणी करण्यात आली आहे. तेव्हा सादर केलेल्या कागदपत्रानुसार सन.2007-08 पासुन आकारणी करणे आवश्यक असल्याने सन .2007-08 ची वसुलपात्र रक्कम रुपये 35016/- संबंधिताकडुन वसुल करुन महानगरपालिका लेख्यात भरणा करुन पुर्तता दर्शविण्यात यावी.

ब. लेखा परिक्षणात सदर मालमत्तेचा प्रत्यक्ष पहाणी करुन मोजमापे घेतल्याबाबतचा पहाणी अहवाल उपलब्ध झाला नाही . त्यामुळे कर आकारणी केलेल्या क्षेत्रफळाची सत्यता पडताळता आली नाही.

वसुलपात्र रक्कम रु.35,016/-

**4. शिवा दामोदर चौधरी व इतर सर्वे क्र .66 गांव - आचोळे प्रभाग - ई कमी मालमत्ता कर आकारणी केल्याबाबत.**

वरील मालमत्ता कर आकारणी प्रकरणाची तपासणी केली असता खालील आक्षेप नोदविण्यात येत आहेत.

अ. सदर मालमत्ते मध्ये एकुण 4 शॉप व 17 सदनिकांना मालमत्ता कर 3900 चौ.फुट रहिवास व 300 चौ.फुट वाणिज्य स्वरुपात मालमत्ता कर आकारणी केली आहे . अनधिकृत बांधकामाप्रमाणे सदर धारिकेमधील काही सदनिकांची नोंदणी सन .2010 मध्ये झाल्याचे निदर्शनास येते. उदा.रियाझ अमीन अन्सारी सेल अग्रीमेंन्ट - एप्रिल 2010 श्री.असीम मोहम्मद अक्रम अन्सारी - माहे. मार्च 2010 मध्ये केल्याने सदर इमारतीस सन.2010-11 पासुन मालमत्ता कर आकारणी करणे आवश्यक असतांना सन .2011-12 पासुन कर आकारणी केली आहे . त्यामुळे महानगरपालिकेचे रु.18,619/- कर व 36,838/- अनधिकृत शास्ती अशी एकुण रु .55,457/- एवढे मालमत्ता कराचे नुकसान झालेले आहे.

ब. सदर कर आकारणी करतांना प्रत्यक्ष जागेवर जावुन मोजमापे घेण्याचा पहाणी अहवाल लेखा परिक्षणात उपलब्ध झाला नाही त्यामुळे जागेवरील प्रत्यक्ष क्षेत्र व आकारणी केलेले क्षेत्र याबाबत लेखा परिक्षणात खात्री करता आली नाही.

क. सदर कर आकारणी करतांना सदर जागेवरील विद्युत पुरवठा देयके यांच्या सत्य प्रती लेखा परिक्षणात उपलब्ध झाल्या नाहीत त्यामुळे अचुक तारखेपासुन कर आकारणी झाल्याचे लेखा परिक्षणात खात्री करता आली नाही.

ड. सदर प्रकरणी कर निर्धारण केल्यानंतर प्रत्यक्ष कर आकारणी प्रत सदर नस्तीस आढळुन आली नाही त्यामुळे प्रत्यक्षात सदर कर आकारणी केव्हा पासुन करण्यात आली याबाबत लेखा परिक्षणात खात्री करता आली नाही.

वसुलपात्र रु. 55,457/-



## *69 नवघर माणिकपुर विभागातील मालमत्ता धारकांना कमी मालमत्ता कर आकारणी बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 7878.00/-

***मालमत्ता धारकांनी प्रत्यक्ष ताबा घेतलेल्या दिनांकापासून कर आकारणी न करणे, प्रत्यक्ष वसुलपात्र रकमेपेक्षा कमी वसुली करणे, बांधकाम पुर्णत्वाचा दाखला नस्तीवर उपलब्ध नसणे, स्थानिक संस्था कर भरल्याचे पुरावे उपलब्ध नसणे इ.***

वसई विरार शहर महापालिका क्षेत्रातील नवघर माणिकपुर विभागातील सन .2015-16 मधील मालमत्ता कर आकरणी प्रकरणांची तपासणी केली असता खालील प्रकरणांमध्ये कमी मालमत्ता कर आकारणी केल्याचे निदर्शनास येते.

1. श्री.राकेश राजाराम शिंदे व इतर 3 जन - प्रभाग ई मधील स र्वे नं.84/8 गांव उमेळमान (मंगलमुर्ती चाळ रहिवास क्षेत्र)

पाहणी अहवालानुसार 4 रुम चे 865 चौ.फु. प्रमाणे सन.2013-14 पासुन मालमत्ता कर आकारणी केली आहे . सदर नस्तीची तपासणी केली असता मालमत्ते संबधात खरेदी करारनामा/प्रतिज्ञापत्र सन.2012 मध्ये अनधिकृत बां धकाम केल्याचे नमुद केल्याने सन .2012-13 पासुन कर आकारणी करणे आवश्यक असतांना सन .2013-14 पासुन मालमत्ता कर आकारणी करण्यात आली आहे तेव्हा खालील प्रमाणे करण्यांत आलेले मालमत्ता कर आकारणी सन .2012-13 पासुन लागु करुन न आकारणी करण्यांत आलेली मालमत्ता कराची रक्कम रु . 7878/- संबधित मालमत्ता धारकाकडुन वसुल करुन महानगरपालिका निधीत जमा करुन पुर्तता दर्शविण्यात यावी.

झोन -3 - उमेळमान

| अ.क्र. | रुम नं | एरीया चौ.फु | वार्षिक भाडे | दुरस्तीसाठी 10 % | एकुण मुल्य कर आकारणी | मालमत्ता कर | वृक्षकर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | रुम नं.1 | 220 | 2244 | 224 | 2020 | 566 | 20 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | रुम नं.2 | 230 | 2352 | 235 | 2117 | 593 | 21 |
| 3 | रुम नं.3 | 213 | 2172 | 217 | 1955 | 547 | 20 |
| 4 | रुम नं.4 | 202 | 2064 | 206 | 1858 | 520 | 15 |
| | | 865 चौ.फु | | | | 2226 | |

| शिक्षण कर | विशेष स्वच्छता कर | विशेष अग्नि कर | शास्ती कर | एकुण कर आकारणी |
|---|---|---|---|---|
| 81 | 180 | 20 | 1132 | 1999 |
| 85 | 180 | 20 | 1186 | 2085 |
| 78 | 180 | 20 | 1094 | 1939 |
| 74 | 180 | 20 | 1040 | 1853 |
| | | | | 7876 |

2. मानव एन्टरप्रायझेस बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स - प्रभाग समिती (ड) सर्वे क्र.55 हिस्सा क्र.14 गांव चुळणा विस्ठेरिया अपार्टमेन्ट - नविन कर आकारणी - कमी मालमत्ता कर आकारणी

सदर प्रकरणाची तपासणी केली असता खालील आक्षेप नोंदविण्यात येत आहेत.

अ. सदर बांधकामास सिडको /VVSR/CC/BP/4127/W/1092 दि.31/3/2008 अन्वये बांधकाम परवाना देण्यांत आला आहे . तसेच वसई विरार शहर महानगरपालिका विरार यांचे भोगवटा दाखला क्र.VVCMC/TP/POC/VP/0102/039/2015-16 दि.21/5/2015 अन्वये भोगवटा दाखला दिलेला आहे व 15484 चौ.फुट क्षेत्रफळासाठी 35 सदनिकासाठी मालमत्ता कर दर 1.45 पैसे दराने मालमत्ता कर आकारणी सन.2015-16 पासुन रु.92,026/- करण्यांत आले आहे. सदर कर आकारणी करतांना सदर इमारतीचे बांधकाम पुर्णत्व दाखला लेखा परिक्षणात उपलब्ध झाला नाही त्यामुळे बांधकाम केव्हा पुर्ण झाले त्याबाबत लेखा परिक्षणात खात्री करता येत नाही.

ब. बांधकाम परवाना दिल्यानंतर बांधकाम पुर्ण होईपर्यत मोकळया जमीनीचे क्षेत्रफळानुसार शेतसारा शासनास भरणा केल्याबाबत चलनाच्या प्रती उपलब्ध नाहीत.

क. स्थानिक संस्था कर भरल्याचा दाखला लेखा परिक्षणात उपलब्ध झाला नाही त्यामुळे स्थानिक संस्था कर भरणा केल्याबाबत तपशील लेखा परिक्षणात सादर करुन वसुलीबाबत खात्री पटवावी.

DATPGWM6201 (Ref No : 66, Hmm No : 87)

## *70 पेल्हार विभागातील मालमत्ता धारकांना कमी कर आकारणे बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 28939.00/-

***कमी मालमत्ता कर आकारणी करणे, इ.***

1. हालीमा इब्राहीम मन्सुरी व खालीद इब्राहिम मन्सुरी
   मालमत्ता कर अनु.क्र.6249 - डोंगरपाडा - पेल्हार प्रभाग - कमी मालमत्ता कर आकारणी बाबत (अनधिकृत बांधकाम)

सदर नवीन मालमत्ता कर आकारणी प्रकरणाची तपासणी केली असता खालील आक्षेप नोंदविण्यात येत आहेत.

अ) सदर मालमत्ता खरेदी दि.21/1/2010 रोजी दुय्यम निबंधक वसई -3 यांचेकडे नोंदणीकृत झालेले आहे त्यानुसार सदर प्रकरणी सन.2010-11 पासुन कर आकारणी करणे आवश्यक असतांना सन.2013-14 पासुन कर आकारणी खालील प्रमाणे केली आहे.

| अ.क्र. | क्षेत्र | मालमत्ता कर (2/- वाणिज्य प्रति चौ.फुट) | दिवाबत्ती | आरोग्य कर | शास्ती दुप्पट | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 950 चौ.फुट | 1900/- | 25/- | 25/- | 3800/- | 5750/- |

सन.2010-11 पासुन प्रतिवर्ष 5750/- प्रमाणे 3 वर्षाची कमी वसुली रु.17,250/-
17,250/- संबधिताकडुन वसुल करुन निधीत भरणा करुन पुर्तता दर्शवावी.
वसुलपात्र रु.17,250/-

2. श्री. अनिल कुमार के. गिरी व इतर (अनधिकृत बांधकाम) पेल्हार - प्रभाग -डोंगरपाडा सर्वे क्र.281 वॉर्ड क्र.27 येथील बांधकामास कमी मालमत्ता कर आकारणी केल्याबाबत.

मालमत्ता आकारणी नोंदवही अ.क्र.6245/1 ते 11 आक्षेप

अ. इमारती मध्ये एकुण 1 ते 11 सदनिकासाठी सन.2014-15 आर्थिक वर्षापासुन नवीन कर आकारणी करण्यांत आली आहे. सदर सदनिकांचे नोंदणीकृत/नोटराईज करारनामा सन.2013 मध्ये करण्यात आला त्यामुळे सदर मालमत्तेवर सन.2013-14 पासुन कर आकारणी करणे आवश्यक आहे.परंतु सन 2014-15 पासुन आकारणी केले असल्याने महानगरपालिकेचे रु.7789/- एवढया महसुलाचे नुकसान झालेले आहे ते संबधिताकडुन वसुल करुन महानगरपालिका निधीत भरणा करुन पुर्तता दर्शवावी.

| एकुण सदनिका | मालमत्ता कर (1/- रु.प्रति चौ. फुट प्रमाणे आकारणी) | स्थानिक कर | दिवाबत्ती | शास्ती | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| 11 | 2413 चौ.फु | 275/- | 275/- | 4826/- | 7789/- |

वसुलपात्र रु.7789/-

3. मालमत्ता नोंदवही अ.क्र.6242 अनधिकृत पेल्हार प्रभाग डोंगरपाडा सर्वे क्र.281 वॉर्ड क्र.27 रहिवास क्षेत्र 200/- चौ.फुट

अ) सदर मालमत्ता खरेदी समक्ष सन.2008 मध्ये झाले असुन सन.2008-09 पासुन मालमत्ता कर आकारणी करणे आवश्यक असता ते सन.2014-15 पासुन खालील प्रमाणे केले आहे.

| क्षेत्र | दर | मालमत्ता कर | दिवाबत्ती कर | स्वच्छता कर | शास्ती | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| 200 चौ.फु | 1 रु.प्रति चौ.फुट रहिवास | 200/- | 25/- | 25/- | 400/- | 650/- |

वरील प्रमाणे रु.650/- प्रमाणे सन.2008-09 पासुन थकबाकी समजुन कमी केलेली वसुली रु .3900/- संबधिताकडुन वसुल करुन महानगरपालिकेच्या निधीत भरणा करुन पुर्तता दर्शविण्यात यावी.
वसुलपात्र रु.3900/-

DATPGWM6201 (Ref No : 67, Hmm No : 88)

## *71 पाणीपट्टी वसुलीच्या थकीत रकमेबाबत.....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*
*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 184600487.00/-

***महानगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठा करणा-या विविध स्त्रोतून उपलब्ध झालेल्या पाणी साठयाची खात्री न होणे, पाणीपट्टीद्वारे वसुल करण्यात आलेल्या महसुली उत्पन्नापेक्षा पाणी पुरवठा खर्च जास्त असणे,पाणी पुरवठा अपव्यय याबाबतची खात्री न होणे, पाणीपट्टी वसुली मोठया प्रमाणात थकीत असल्याबाबत इ.***

वसई विरार शहर महानगरपालिकेचे पाणीपुरवठा विभागाचे सन 2015-16 या आर्थिक वर्षाचे लेखा परिक्षण केले असता पाणीपट्टी वसुली संदर्भात लेखापरिक्षणाचे खालील अभिप्राय आहेत.

1) महानगरपालिका क्षेत्रात पाणीपुरवठा करण्यात येणा-या विविध स्त्रोतांतून (पाणीपुरवठा प्रकल्प,तलाव,विहीरी बोअरवेल इ.) किती पाणी उपलब्ध झाले याबाबतची खात्री लेखापरिक्षणास करता आली नाही.
2) पाणी पुरवठयाद्वारे महापालिकेस प्राप्त होणारे उत्पन्न व सदरच्या उत्पन्नातून पाणीपुरवठयाचा किमान महसुली खर्च भागविणे अपेक्षित आहे. सदरची सेवा ही किमान ´ना नफा ना तोटा ´ या तत्वावर चालविणे हे शासनाचे धोरण आहे. सन 2015-16 या आर्थिक वर्षात पाणी पुरवठयापोटी

महसुली उत्पन्न रु.281274919 इतके असुन महसुली खर्च रु.379235104 इतका आहे, यावरुन उत्पन्नापेक्षा रु.97960185 इतका जादा खर्च झाल्याचे दिसून येते. यावरुन वसुलीपेक्षा खर्च जास्त झाल्यामुळे पाणी पुरवठा यंत्रणा उपलब्ध निधीच्या कमतरतेमुळे पूर्ण क्षमतेने राबविता येणे शक्य नसल्याचे दिसून येते.

3) पाणी पुरवठा करतांना अनुज्ञेय असलेली घट व प्रत्यक्षात झालेला पाण्याचा अपव्यय इ. बाबतचा दस्ताऐवज नस्तीत नसल्याने याबाबतची खात्री लेखापरिक्षणास करता आली नाही.

4) प्रभागनिहाय पाणी पट्टीचे लेखे तपासले असता खालीलप्रमाणे पाणी पट्टी थकीत असल्याचे दिसून येते.

| प्रभागाचे नांव | एकूण मागणी | एकूण वसुली | एकूण थकबाकी | वसुलीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| अ विरार | 187675061 | 102817254 | 84857807 | 54.78 |
| ब पेल्हार | 1318438 | 548395 | 770043 | 41.59 |
| क नालासोपारा | 165674919 | 104750304 | 60924615 | 63.23 |
| ड नवघर माणिकपूर | 92500193 | 62684361 | 29815832 | 67.77 |
| ई वसई | 18706795 | 10474605 | 8232190 | 55.99 |
| एकूण | 465875406 | 281274919 | 184600487 | 60.38 |

उपरोक्त बाबत अर्धसमासपत्र क्रं. 94 दि.26/03/2019 देण्यात आले होते, परंतु अनुपालन विहीत मुदतीत अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

RTNPRSM6901 (Ref No : 68, Hmm No : 94)

## *72 अग्निशमन विभागाने स्वतंत्ररित्या " आग सुरक्षा निधी " स्थापन न करणे याबाबत....*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र आगप्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 कलम 25 नुसार आग सुरक्षा निधी स्थापन न करणे, अधिनियमान्वये गोळा करण्यात आलेली फी त्यात जमा न करणे व अधिनियमातील तरतुदीनुसार त्यातून खर्च न करणे इ.***

महाराष्ट्र आगप्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 कलम 25 मध्ये खालील तरतुदी आहेत.

1. " आग सुरक्षा निधी " या नावाने संबोधला जाणारा एक विशेष निधी स्थापन करण्यात येईल आणि या अधिनियमान्वये बसवण्यात व गोळा करण्यात आलेली फी त्यामध्ये जमा करण्यात येईल.

2. संबंधित प्राधिकरणाच्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये या विशेष निधीचा तपशील देण्यात येईल आणि संबंधित प्राधिकरणाला लागू असलेल्या संबध्द कायदयामध्ये किंवा त्यान्वये करण्यात आलेल्या नियमांमध्ये वा आदेशांमध्ये, लेखे ठेवण्यासाठी विहीत केली असेल अशा कार्यपध्दतीनूसार, या निधीचे लेखे ठेवण्यात येतील व त्यांची लेखा परीक्षा करण्यात येईल.

3. या अधिनियमाच्या तरतूदींना अधीन राहून आणि राज्य शासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाला अधीन राहून सर्वसाधारणत: अग्निशामक पथकसेवा चालविण्यासाठी (ज्यात अग्नि शमन अधिकारी आणि कर्मचारी यांचे वेतन, भत्ते आणि इतर आनुषंगिक खर्च यांचा समावेश असेल) आणि विशेषत: प्राधिकरणाच्या हद्दीतील अथवा हद्दी बाहेरील कोणत्याही जमिनीवर किंवा कोपणत्याही इमारतीत आगीस प्रतिबंध करण्याच्या किंवा आग विझविण्याच्या प्रयोजनार्थ, अत्याधुनिक साधनसामुग्री व उपकरणे पुरविण्यासाठी, या निधीतील रक्कम वापरण्यात येईल, आणि या अधिनियमामध्ये उल्लेखिलेल्या प्रयोजनांव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी ती वापरण्यात येणार नाही.

अग्निशमन विभागाचे अभिलेख तपासले असता असे निदर्शनास आले की, स्वतंत्र " आग सुरक्षा " निधीची स्थापना केलेली नसल्यामुळे कलम 12 ते 14 नुसार वसुल करण्यात आलेली अग्निशमन सेवा कर व इतर सेवा शुल्काची रक्कम स्वतंत्ररित्या वेगळी ठेवण्यात आलेली नाही, त्यामुळे कायदयातील तरतुदीनुसार प्रस्तुत रक्कम फक्त अनु.क्रं. 3 मधील प्रयोजनासाठी वापरणे आवश्यक असतांना तसेच शिल्लक असलेली रक्कम वेगळी ठेवणे आवश्यक असतांना याप्रमाणे अंमलबजावणी केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अग्निशमन सेवा कर व इतर सेवा शुल्का अंतर्गत प्राप्त निधीचा उपयोग करतांना कायदेशीर तरतुदींचे पालन करण्यात आल्याचे दिसून येत नाही.

उपरोक्त बाबत अर्धसमासपत्र क्रं. 95 दि.26/03/2019 देण्यात आले होते, परंतु अनुपालन विहीत मुदतीत अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

RTNPRSM6901 (Ref No : 69, Hmm No : 95)

## *73 अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागाने आवश्यक अभिलेख न ठेवल्याबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिवन संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 चे कलम 12 ते 14 नुसार अग्निशमन सेवा कर व इतर सेवा शुल्क आकारणी करुन वसुल करण्यासाठी आवश्यक ते अभिलेख न ठेवल्याबाबत.***

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिवन संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 चे कलम 12 ते 14 नुसार अग्निशमन सेवा कर व इतर सेवा शुल्क आकारण्याबाबत तरतूद आहे . वसई विरार शहर महापालिका अग्निशमन विभागातील अग्निसुरक्षा निधी याबाबत खालील आक्षेप नोंदविण्यात येत आहे.

1. महापालिका सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 06 दि.15/2/2011 नुसार वार्षिक तपासणी शुल्क व अग्निशमन विशेष निधीबाबत आवश्यक शुल्क आकारण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार 15 मीटर उंचीपेक्षा जास्त निवासी व अनिवासी इमारती , कायम स्वरुपी कारखाने, गोडाऊन, वेअरहाऊस, सिनेमा, मॉल,रिसॉर्ट इत्यादीची वार्षिक तपासणी करुन ना-हरकत दाखला नुतनीकरण करणे आावश्यक आहे.या संदर्भात वर नमुद बाबींची मागणी नोंदवही ठेऊन निरीक्षण करुन शुल्काची वसुली करणे आवश्यक असतांना याबाबतची निरीक्षण व मागणी नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

2. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिवन संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 चे कलम 12 ते 14 नुसार अग्निशमन सेवा कर व इतर सेवा शुल्क आकारण्याबाबत तरतूद आहे . सन 20015-16 मध्ये किती प्रकरणे नोंदणी झाली व किती प्रकरणांचे नुतनीकरण करण्यात आले याबाबतची नोंदवही ठेवण्यात आलेली नाही.

3. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिवन संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 चे कलम 12 ते 14 नुसार अग्निशमन सेवा कर व इतर सेवा शुल्क आकारण्याबाबत तरतूद आहे . महापालिका सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 06 दि.15/2/2011 मधील तक्ता क्रं. 2 मधील अनु. क्रं. 1 ते 17 प्रमाणे लेखे ठेवण्यात आलेले नाहीत, सबब महापालिकेस प्राप्त होणा-या महसुलाची खातर जमा करता येत नाही.

4. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिवन संरक्षक उपाययोजना अधिनियम 2006 चे कलम 12 ते 14 नुसार अग्निशमन सेवा कर व इतर सेवा शुल्क आकारण्याबाबत तरतूद आहे . महापालिका सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 06 दि.15/2/2011 मधील तक्ता क्रं. 2 मधील अनु. क्रं. 18 नुसार फ्रेंच पॉलीस विक्रीचे दुकाने, लिकर बियर शॉप इ. आस्थापनाचे सर्वेक्षण केल्याचे दिसून येत नाही.

उपरोक्त बाबत अर्धसमासपत्र क्रं . 91 दि.14/03/2019 देण्यात आले होते , परंतु अनुपालन विहीत मुदतीत अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम ठेवण्यात येत आहे.

DATPGWM6201 (Ref No : 70, Hmm No : 91)

## *74 वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील मोकळया जागा व मोबाईल टॉवर यावर मालमत्ता कराची आकारणी करुन वसुल न केल्यामुळे महापालिकेस मोठया प्रमाणावरील उत्पन्नापासून वंचित राहावे लागत असल्याबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***मोकळया जागा व मोबाईल टॉवर यावर मालमत्ता कराची आकारणी करुन वसुल न करणे.***

मालमत्ता कर हा महापालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्तोत असुन, महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियम 1949 चे कलम 128 व कलम 129 नुसार इमारती व जमिनी यावर मालमत्ता कराची आकारणी करून वसुल करण्याचे अधिकार महापालिकेस आहे.

1. वसई विरार शहर महासनगरपालिकेच्या 2015-16 लेखापरिक्षणादरम्यान असे निदर्शनास आले की, नगररचना विभागास जमिनीच्या अकृषीक परवाना मिळणेसाठी ना हरकत परवाना मिळणेसाठी 296 प्रस्ताव प्राप्त झाले होते व तद्नंतर सदर प्रस्तावावर कार्यवाही करुन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत अकृषीक जमीन परवाने प्रमाणपत्र मिळाल्यानंतर सदर जमीनीवर बांधकाम करणेसाठी बांधकाम परवाना मिळणेसाठी प्रस्ताव सादर केले जातात. अकृषीक परवाना मिळाल्यानंतर बांधकाम परवाना मिळेपर्यंतच्या कालावधीत पडून असलेल्या मोकळया जागांवर मालमत्ता कराची आकारणी करून तो वसुल करणे आवश्यक आहे.

2. वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात अशा पडून असलेल्या जमीनीवर मालमत्ता कराची आकारणी करुन कर वसुली करण्यात आल्याचे दिसून येत नाही. त्याचप्रमाणे उपरोक्त अधिनियमानुसार महापालिका हद्दीतील कार्यरत असलेल्या मोबाईल टॉवरवर मालमत्ता कराची आकारणी करून वसुली करणे आवश्यक आहे. नगररचना विभागाच्या अभिलेख्यांवरुन असे दिसून येते की, महानगरपालिका कार्यक्षेत्रात एकूण 513 मोबाईल टॉवर कार्यरत असून, मालमत्ता कर विभागाने सदर मोबाईल टॉवरवर कर आकारणी करून तो वसुल करणे आवश्यक आहे, परंतु मालमत्ता कर विभागाने प्रस्तुत कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

महापालिका हद्दीत पडून असलेल्या मोकळया जागा व कार्यरत असलेल्या मोबाईल टॉवरवर कर आकारणी करुन वसुली न केल्यामुळे महापालिकेस मोठया प्रमाणावर मिळणा-या महसुली उत्पन्नापासून वंचित राहावे लागत असल्याचे दिसून येते.

उपरोक्त आक्षेपाबाबत अर्धसमास पत्र क्रं. 112 दि. 04/05/2019 देण्यात आले होते, परंतु अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

RTNPRSM6901 (Ref No : 71, Hmm No : 112)

## *75 मालमत्ता कराच्या वसुलीबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 2**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 765603000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 765603000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 765603000.00/-

***महाराष्ट्र प्रांतिक महागरपालिका अधिनियम मधील कलम 140 व 141 नुसार मालमत्ता कर वसुलीसाठी विशेष प्रयत्न न केल्यामुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे व तसेच न वटलेले धनादेश याबाबतची माहिती नस्तीवर नाही.***

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 127 ते 141 आणि परिशिष्ट VIII नुसार शहरी स्थानिक संस्थाना कर आकारणी करुन तो वसुल करण्याचा अधिकार आहे. त्यानुसार महापालिका त्यांच्या कार्यक्षेत्रात असलेल्या मालमत्तांवर मालमत्ता कराची आकारणी करुन तो वसुल करतात व तसेच मालमत्ता कर हा महापालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत असुन,
वसई विरार शहर महापालिकेचे अभिलेख तपासले असता सन 2015-16 मधील मालमत्ता कराची मागणी व वसुलीचे विवरण खालीलप्रमाणे.

( रु.लाखात)

| विभागाचे नांव | मागणी | | | वसुली | | | थकबाकी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मागील | चालू | एकूण | मागील | चालू | एकूण | मागील | चालू | एकूण |
| बोळींज | 1550.26 | 2361.87 | 3912.13 | 536.99 | 1562.63 | 2099.61 | 1013.27 | 799.25 | 1812.52 |
| पेल्हार | 272.54 | 569.58 | 842.12 | 232.10 | 431.59 | 663.68 | 40.44 | 137.60 | 178.04 |
| नालासोपारा | 4889.52 | 6012.13 | 10901.65 | 2939.90 | 2971.81 | 5911.70 | 2589.41 | 1912.08 | 4501.49 |
| नवघर माणिकपूर | 1363.59 | 506.24 | 1869.83 | 234.94 | 1090.49 | 1325.43 | 488.86 | 544.40 | 1033.26 |
| वसई गांव | 112.80 | 440.40 | 553.20 | 51.76 | 370.72 | 422.48 | 61.04 | 69.69 | 130.72 |
| एकूण | 8188.71 | 9890.22 | 18078.92 | 3995.69 | 6427.24 | 10422.90 | 4193.02 | 3463.02 | 7656.03 |

1. उपरोक्त विवरण पत्रानुसार दि. 31/03/2016 अखेर एकत्रित थकबाकीची रक्कम रु.7656.03 लक्ष इतकी असल्याचे दिसून येत आहे. सदर थकबाकीची रक्कम एकूण मागणीच्या 42.34 % इतक्या मोठया प्रमाणावर असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र प्रांतिक महागरपालिका अधिनियम मधील कलम 140 व 141 नुसार मालमत्ता कर वसुलीसाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक होते, परंतु विभागाने याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे सन 2015-16 या वर्षात मोठया प्रमाणात वसुली प्रलंबित असल्याचे दिसून येते.

2. सन 2015-16 अखेर मालमत्ता करापोटी धनादेशाद्वारे वसुल केलेल्या रकमांपैकी एकूण न वटलेले धनादेश व त्यात गुंतलेली रक्कम याबाबतची माहिती नस्तीवर उपलब्ध नसल्याने याबाबत लेखापरिक्षणास खात्री करता आली नाही.

उपरोक्त आक्षेपाबाबत अर्धसमास पत्र क्रं. 113 दि. 04/05/2019 देण्यात आले होते, परंतु अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

RTNPRSM6901 (Ref No : 72, Hmm No : 113)

## *76 सन 2015-16 मध्ये महापालिकेने केलेल्या गुंतवणूकीबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व-निधी व शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महापालिकेने गुंतवणूक करतांना स्थायी समितीची मंजुरी न घेणे, गुंतवणूक करतांना बँकांकडून स्पर्धात्मक व्याजदराची दरपत्रके न मागविणे, खासदार निधी, स्थानिक विकास निधीच्या रकमांची दिर्घकालीन गुंतवणूक करुन त्यापासून उत्पन्न मिळविणे इ.***

सन 2015-16 या सालात वसई विरार शहर महापालिकेने एकूण रु.1092614418.84 इतकी रक्कम मुदती ठेवी मध्ये गुंतविल्याचे दिसून येते. त्यापैकी पुढील गुंतवणूक विशेष निधी, स्थानिक विकास निधी व खासदार निधी यामधून गुंतविल्याचे दिसून येते.

| अ.क्र | मुदत ठेवी दिनांक | बँकेचे नाव व मुदत ठेवी क्रमांक | रक्कम | निधीचे नाव | व्याजदर | रोख परिणत होण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3-Dec-15 | विजया बँक 505203311000552 | 3805579.00 | विशेष निधी | 7.75 | 3-Dec-16 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 9-Dec-15 | विजया बँक 6292581509 | 2796287.00 | विशेष निधी | 7.25 | 9-Dec-16 |
| 3 | 23-Oct-13 | कार्पोरेशन बँक FD/01/070294009354 | 21181.20 | स्थानिक विकास निधी | 9 | 23-Oct-16 |
| 4 | 25-Mar-15 | कार्पोरेशन बँक ंkcc/01/150567012744 | 1701578.60 | स्थानिक विकास निधी | 8.75 | 25-Mar-16 |
| 5 | 25-Mar-16 | कार्पोरेशन बँक ंkcc/01/160566012744 | 1855424.00 | स्थानिक विकास निधी | 7.65 | 25-Mar-17 |
| 6 | 25-Mar-15 | कार्पोरेशन बँक kcc/01/150566012744 | 1266165 | स्थानिक विकास निधी | 8.75 | 25-Mar-16 |
| 7 | 25-Mar-16 | कार्पोरेशन बँक kcc/01/160565012744 | 1380643.00 | स्थानिक विकास निधी | 7.65 | 25-Mar-17 |
| 8 | 21-Feb-15 | सेंट्रल बँक 3059028449 | 712401 | स्थानिक विकास निधी | 9 | 21-Feb-16 |
| 9 | 21-Feb-16 | सेंट्रल बँक 3059028449 | 765354.00 | स्थानिक विकास निधी | 7.75 | 21-Feb-17 |
| 10 | 21-Feb-15 | सेंट्रल बँक 3059028085 | 743190 | स्थानिक विकास निधी | 9 | 21-Feb-16 |
| 11 | 21-Feb-16 | सेंट्रल बँक 3059028085 | 805399.00 | स्थानिक विकास निधी | 7.75 | 21-Feb-17 |
| 12 | 12-Mar-15 | कार्पोरेशन बँक kcc/01/160462019744 | 24897070.00 | खासदार निधी | 8.85 | 12-Mar-16 |
| 13 | 12-Mar-16 | कार्पोरेशन बँक kcc/01/160462019744 | 27174670.00 | खासदार निधी | 7.4 | 12-Mar-17 |
| 14 | 11-Jan-15 | इंडियन बँक 6303720692 | 9000000.00 | खासदार निधी | 8.75 | 11-Jan-16 |
| 15 | 11-Jan-16 | इंडियन बँक 6303720692 | 9813719.00 | खासदार निधी | 7.25 | 11-Jan-17 |
| 16 | 11-Jan-15 | इंडियन बँक 6303721062 | 9000000.00 | खासदार निधी | 8.75 | 11-Jan-16 |
| 17 | 11-Jan-16 | इंडियन बँक 6303721062 | 9813719.00 | खासदार निधी | 7.25 | 11-Jan-17 |
| 18 | 11-Jan-15 | इंडियन बँक 6303728126 | 962253.00 | खासदार निधी | 8.75 | 11-Jan-16 |
| 19 | 11-Jan-16 | इंडियन बँक 6303728126 | 1049253.00 | खासदार निधी | 7.25 | 11-Jan-17 |
| 20 | 1-Jun- | इंडियन बँक | 5000000.00 | खासदार निधी | 9.03 | 29-May-16 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | 15 | 6342672914 | | | | |
| 21 | 1-Jun-15 | इंडियन बँक 6342671910 | 5000000.00 | खासदार निधी | 9.03 | 29-May-16 |
| 22 | 1-Jun-15 | इंडियन बँक 6342672266 | 5000000.00 | खासदार निधी | 9.03 | 29-May-16 |
| 23 | 1-Jun-15 | इंडियन बँक 6342672506 | 5000000.00 | खासदार निधी | 9.03 | 29-May-16 |
| 24 | 1-Jun-15 | इंडियन बँक 6342673167 | 5000000.00 | खासदार निधी | 9.03 | 29-May-16 |
| 25 | 1-Jun-15 | इंडियन बँक 6342673430 | 5000000.00 | खासदार निधी | 9.03 | 29-May-16 |
| एकूण | | | 137563885.8 | | | |

1. उपरोक्त गुंतवणुक करतांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 92 (2) नुसार स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे, तसेच सदर गुंतवणूकीस मा. आयुक्त यांची मान्यता असणे आवश्यक आहे परंतु, याप्रमाणे कार्यवाही केल्याचे नस्तीवरुन दिसून येत नाही.

2. गुंतवणूक करतांना बँकांकडून स्पर्धात्मक व्याजदराची दरपत्रके मागवून जास्त व्याजदर देणा-या बँकेत गुंतवणूक करणे आवश्यक होते, परंतु याप्रमाणे कार्यवाही केली असल्याचे नस्तीवरुन दिसून येत नाही, त्यामुळे गुंतवणूकीस स्पर्धात्मक व्याजदर प्राप्त होऊ शकला नाही व महापालिकेस स्पर्धात्मक व्याजदराचा फायदा होऊ शकला नाही.

3. खासदार निधी, स्थानिक विकास निधी व विशेष निधी हे विशिष्ट स्थानिक विकास कामे पुर्ण करण्यासाठी प्राप्त झालेले असतात, त्यामुळे सदर निधीचा वापर फक्त हे कामे पुर्ण् करण्यासाठी करणे आवश्यक आहे, परंतु उपरोक्त विवरणपत्रावरुन सदर कामे पुर्ण न करता प्रस्तुत निधीची रु. 137563885.8 इतकी रक्कम गुंतवणूक व पुर्नगुंतवणूक करुन महापालिकेने सदर निधीचे उत्पननाचे साधन केल्याचे दिसून येते.

उपरोक्त आक्षेपाबाबत अर्धसमास पत्र क्रं. 115 दि. 04/05/2019 देण्यात आले होते, परंतु अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

RTNPRSM6901 (Ref No : 74, Hmm No : 115)

## *77 महापालिकेच्या विविध बँक खात्यांचा रोख पुस्तकांशी ताळमेळ न घेतल्याबाबत.....*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ङ*

गुंतलेली रक्कम रु. 1502662944.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 1502662944.00/-

***महापालिकेच्या विविध बँक खात्यांचा रोख पुस्तकांशी ताळमेळ न घेणे इ.***

वसई विरार शहर महानगरपालिकेचे सन 2015-16 ची रोख नोंदवही व बँक खाते पुस्तक तपासले असता त्यात खालीलप्रमाणे तफावत दिसून येते.

| अ.क्रं. | निधीचे नांव | एकूण खाती | रोखवही नुसार शिल्लक | खाते पुस्तकानुसार शिल्लक | फरक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | सर्वसाधारण रोकडवही | 404 | 1989281244.35 | 3621418035.45 | -1632136791.10 |
| 2 | वृक्ष निधी | 5 | 1658408.06 | 6313414.41 | -4655006.35 |
| 3 | कर्ज निवारण निधी | 5 | 251397.37 | 22514267.37 | -22262870.00 |
| 4 | जल-मल प्रवाह निधी | 100 | 463095436.06 | 386726579.30 | 76368856.76 |
| 5 | वैयक्तिक शौचकुप योजना निधी | 1 | 3695.00 | 3733.00 | -38.00 |
| 6 | घसारा निधी | 4 | 228631.83 | 229024.83 | -393.00 |
| 7 | वेतन राखीव निधी | 5 | 4361093.36 | 4505460.36 | -144367.00 |
| 8 | प्राथमिक शिक्षण निधी | 3 | 9928924.23 | 9944764.23 | -15840.00 |
| 9 | सुवर्ण जयंती शहरी रोजगार | 10 | 15536604.60 | 17435941.60 | -1899337.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | योजना | | | | |
| 10 | भविष्य निर्वाह निधी | 1 | 12288.00 | 12617.00 | -329.00 |
| 11 | पाणीपुरवठा राखिव निधी | 4 | 57660.58 | 57660.58 | 0.00 |
| 12 | परिवहन उपक्रम | 1 | 47450923.31 | 54099384.31 | -6648461.00 |
| 13 | सॅटेलाईट सिटी | 2 | 93929610.00 | 4313186.00 | 89616424.00 |
| 14 | विशेष नियोजन प्राधिकरण | 5 | 10085240.00 | 10445332.56 | -360092.56 |
| 15 | स्वच्छ महाराष्ट्र अभियान | 1 | 7732183.12 | 8256883.12 | -524700.00 |
| | | | 3736227758.71 | 5238890702.96 | 1502662944.25 |

महानगरपालिका लेखासंहिता 1971 चे नियम 51(3) नुसार प्रत्येक महिना अखेरीस रोखवहीमधील जमा व खर्चाच्या नोंदी बँकपासबुकमधील नोंदीशी ताळमेळ घेऊन त्यामध्ये तफावत असल्यास त्या दुर करणे आवश्यक आहे. परंतु विभागाने याप्रमाणे कार्यवाही केलेली नसल्याने शिल्लक असलेल्या अचूक रकमा निश्चित करता आल्या नाहीत.

उपरोक्त आक्षेपाबाबत अर्धसमास पत्र क्रं. 116 दि. 04/05/2019 देण्यात आले होते, परंतु अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

RTNPRSM6901 (Ref No : 75, Hmm No : 116)

### *78 उपर्जित द्विनोंद पध्दतीने लेखे न ठेवल्याबाबत...*

**00**

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***उपर्जित द्विनोंद पध्दतीने लेखे न ठेवणे इ.***

शासन निर्णय क्रं. लेखास-102004/71/प्र.क्र.5/04/नवि-31, दि.06.07.2005 नुसार भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेल्या केंद्र शासनाने लागू केलेल्या राष्ट्रीय महानगरपालिका लेखा संहिता (National Muncipal Account Manual) मधील प्रकरण 2 ते 5 मधील तरतुदीनुसार सन2005-06 पासून महानगरपालिकांनी उपर्जित पध्दतीवर आधारीत द्विनोंद पध्दतीने लेखे व ताळेबंद ठेवणे आवश्यक आहे.

वसई विरार शहर महापालिकेची स्थापना जुलै 2009, मध्ये झाली असल्याने महापालिकेने सन 2010-11 पासून उपर्जित पध्दतीवर आधारीत द्विनोंद पध्दतीने लेखे व ताळेबंद ठेवणे आवश्यक आहे, परंतु सन 2015-16 चे अभिलेख तपासले असता महापालिकेने सन 2015-16 पर्यंत प्रस्तुत पध्दतीने लेखे ठेवले नसल्याचे दिसून येते त्यामुळे महापालिकेने लेखे ठेवतांना उपरोक्त शासन आदेशाचे पालन केले नसल्याचे दिसून येते.

उपरोक्त आक्षेपाबाबत अर्धसमास पत्र क्रं. 117 दि. 04/05/2019 देण्यात आले होते, परंतु अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

RTNPRSM6901 (Ref No : 76, Hmm No : 117)

### *79 घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत नेमण्यात आलेल्या कंत्राटदाराकडुन करण्यात आलेल्या कामाचे देयके प्रदान करतांना करारनाम्यातील अटी व शर्तीचे पालन न करताच देयके अदा केले बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 978301796.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 978301796.00/-

***कचरा उचलण्यासाठी वापरण्यात आलेल्या वाहनांची मंजूर करारनाम्यातील अटी शर्तीनुसार नस्तीवर कागदपत्रे उपलब्ध नसणे, कामासाठी वापरण्यात आलेले मनुष्यबळ व वाहने यांच्या बाबतीत हजेरी पट व लॉग बुकच्या प्रती नस्तीवर उपलब्ध नसणे तसेच स्वच्छता निरीक्षक यांनी कामाचे प्रमाणीकरण न करताच प्रदान करणे, गटारातील गाळ, माती व कचरा वाहतुक कामकाजाचे महापालिकेने विहित केलेल्या नमुन्यात नोंदी प्रत्येक निविदाकाराने ठेवुन त्यावर संबंधित स्वच्छता निरीक्षक त्यांच्या स्वाक्षऱ्या न घेणे, घनकचरा विल्हेवाट नेमुन दिलेल्या क्षेपनभुमीवर वाहन रिकामे केल्याबाबत क्षेपनभुमी वरील कर्मचाऱ्यांकडुन नोंदी घेतल्याबाबत रजिस्टर न ठेवणे, प्रभाग निहाय किती वाहनाने व किती मनुष्य बळाने किती फेऱ्यात कचरा क्षेपणभुमीवर टाकण्यांत आला त्याबाबतचे अहवाल लेखा परिक्षणात उपलब्ध नसणे, दैनंदिन गटारतील गाळ, माती कचरा साफसफाई करुन गटारातील गाळ माती व कचरा वाहतुक करणे हे अत्यावश्यक सेवेतील काम असल्याने वर्षातील 365 दिवस काम चालु राहील असे असतांना त्याबाबत आवश्यक ते मनुष्यबळ पुरविल्या बाबत कोणतेही अहवाल उपलब्ध नसणे इ.***

| | |
|---|---|
| अंदाजपत्रकीय रक्कम रु. | 200,00,00,000/- |
| योजनेवर झालेला एकुण खर्च | 97,83,01,796/- |
| लेखाशिर्ष | घनकचरा व्यवस्थापन |
| प्रशासकीय व वित्तीय मान्यता | सर्वसाधारण सभा ठराव क्र.16 दि.16/02/2015<br>स्थायी समिती सभा ठराव क्र.65 दि.06/04/2015 |
| निविदा प्रसिध्दी वृत्तपत्राचे नाव | 1) दै.नरविर चिमाजी<br>2) दै.मुबई तरुण भारत<br>3) दै.सकाळ दि.12/06/2013 |

वसई विरार शहर महापालिका क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत मार्केट साफसफाई करुन कचरा वाहतुक करणे, औषधे व धुर फवारणी करणे, गटारे नाले साफसफाई करणे, गाळ माती वाहतुक करणे इत्यादी सेवा पुरविणे संबंधी प्रभाग निहाय सन 2015-16 मध्ये 2013-14 चे मंजुर दरास ठराव क्र.16 दि.16/2/2015 अन्वये मुदत वाढ देऊन कामे करण्यात आली आहेत . सदर कामाची देयके प्रदान करतांना स्विकृत करारनाम्यामध्ये विविध अटी शर्तीचा अर्तभाव करण्यात आला आहे . सन 2015-16 मध्ये कंत्राटदारानी केलेल्या कामा चे देयकांचे प्रदान करतांना स्विकृत निविदेतील मुख्यत्वे खालील अटी व शर्तीचे पालन न करतांच देयके प्रदान केल्याचे लेखापरिक्षणात निदर्शनास येते.

1. गटारातील गाळ , माती व कचरा वाहतुकीसाठी आवश्यक असणारे सर्व साहित्य , वाहन, वाहनचालकासह निविदाकाराने पुरविणेची आहेत. घनकचरा वाहतुकीसाठी वापरण्यांत येणारी सर्व वाहने

(Hydraulic) असावीत. तसेच वाहन आठ वर्षा पेक्षा जुने असता कामा नये वाहन कचरा वाहतुकीसाठी उपयोगात आणणे पुर्वी त्याची कागदपत्रे सादर करावी लागतील अशी अट /शर्त करारनाम्यातील अ.क्र.1 वर नमुद आहे. त्याप्रमाणे नस्ती सोबत कोणतीही कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत त्यामुळे आवश्यक त्या क्षमतेने साहित्य, वाहने पुरवुन काम पुर्ण केल्या बाबत लेखा परिक्षणात खात्री करता आली नाही.

2. निविदेतील अटी व शर्तीनुसार निविदेत नमुद केलेले मनुष्यबळ व वाहने त्यासाठी कामगारांचे हजेरी प त्रक व वाहनांचे लॉग बुक ठेवणे व त्यावर रोज स्वच्छता निरीक्षक किंवा अन्य सक्षम अधिकाऱ्यांची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे. तथापि, तशी कार्यवाही झाल्याचे दस्तऐवज ठेवल्याचे लेखा परिक्षणात आढळुन आले नाही . त्यामुळे करण्यांत आलेल्या कामामध्ये आवश्यक ते मनुष्यबळ व वाहने वापरले आहेत याबाबत लेखापरिक्षणात खात्री करता आली नाही.

3. गटारातील गाळ, माती व कचरा वाहतुक कामकाजाचे महापालिकेने विहित केलेल्या नमुन्यात नोंदी प्रत्येक निविदाकाराने ठेवुन त्यावर संबंधित स्वच्छता निरीक्षक त्यांच्या स्वाक्षऱ्या घेणे बंधनकारक राहील असे असतांना तशा प्रकारच्या नोंदी ठेवुन स्वच्छता निरीक्षक यांच्या प्रभाग निहाय स्वाक्षऱ्या घेतल्याचे लेखा परिक्षणात आढळुन आले नाही.

4. घनकचरा विल्हेवाट नेमुन दिलेल्या क्षेपनभुमीवर वाहन रिकामे केल्याबाबत क्षेपनभुमी वरील कर्मचाऱ्यांकडुन नोंदी घेतल्याबाबत रजिस्टर ठेवणे आवश्यक असुन त्यात प्रत्येक वेळी वाहन क्रमांक , वाहन चालकाचे नाव , वेळ व क्षेपनभुमी वरील नेमलेल्या कर्मचाऱ्यांची सही इत्यादी गो ष्टी अंर्तभुत असतील अशा नोंदीच्या छायांकित प्रती देयका सोबत सल्लंग्न केल्याचे लेखा परिक्षणात आढळुन येत नाही. त्यामुळे झालेल्या प्रदानांची लेखा परिक्षणात खात्री करता आली नाही.

5. प्रभाग निहाय किती वाहनाने व किती मनुष्य बळाने किती फेऱ्यात कचरा क्षेपणभुमी वर टाकण्यांत आला त्याबाबतचे अहवाल लेखा परिक्षणात उपलब्ध झाले नाहीत . त्यामुळे त्या ठेक्याव्दारे निश्चित केलेले काम योग्य क्षमतेने झाल्याचे लेखापरिक्षणात खात्री करता आली नाही.

6. दैनंदिन गटारतील गाळ , माती कचरा साफसफाई करुन गटारातील गाळ माती व कचरा वाहतुक करणे हे अत्यावश्यक सेवेतील काम असल्याने वर्षातील 365 दिवस काम चालु राहील असे असतांना त्याबाबत आवश्यक ते मनुष्यबळ पुरविल्या बाबत कोणतेही अहवाल उपलब्ध झाले नाहीत त्यामुळे 365 दिवस कामकाज योग्य क्षमतेने केल्याबाबत लेखा परिक्षणात खात्री करता आली नाही.

महापालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या घनकचरा व्यवस्थापन ठेक्याबाबत झालेल्या कामाचे प्रदान करतांना महानगरपालिका मार्फत आवश्यक ते सनियंत्रण तसेच क्षेत्रिय स्तरावर झालेल्या कामाचे प्रत्यक्ष अहवाल लेखा परिक्षणात उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे करारनाम्या प्रमाणे झालेल्या प्रदानाबाबत लेखा परिक्षणात खात्री पटत नाही तेव्हा आवश्यक ते समर्थनीय अनुपालन सादर करावे तो पर्यत सदर योजनेवर झालेला एकुण खर्च रु.97,83,01,796/- आक्षेपाधीन ठेवण्यांत येत आहे.

उपरोक्त आक्षेपाबाबत अर्धसमास पत्र क्रं . 119 दि. 08/05/2019 अन्वये संबंधित विभागास कळविण्यात आले होते, तथापि अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATPGWM6201 (Ref No : 77, Hmm No : 119)

## *80 वसई विरार शहर महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागातील कर निर्धारण प्रकरणातील कमी वसुली बाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ङ*

वसूलपात्र रक्कम रु. 12726.00/-

| |
|---|
| ***स्थानिक संस्था कर निर्धारण प्रकरणातील रु. 12726 कमी वसुलीबाबत.*** |

**11) मे.ग्रेस ऑल एन्टरप्रायझेस नोंदणी क्र.60/64**

सदर कर दात्याने सन 2011-12 चे ॲसेसमेंट सन 2015-16 मध्ये सादर केले असुन सदर कर निर्धारण प्रकरणाची तपासणी केली असता सदर करदात्यास महापालिका जा.क्र.वविशम/स्था.स.कर/88/2015-16 दि.29/4/2015 अन्वये कर भरणा रु.15035/- ची डिमांड नोटीस बजावण्यात आली आहे. सदर करदात्याने सदर कराचा भरणा द.फेडरल बॅक लि. वालीव शाखा, वसई (पुर्व) येथे दि.2/3/2016 रोजी केला आहे. सदर भरणा हा नोटीसीपासुन 15 दिवसांत म्हणजेच दि.18/5/2015 रोजी करणे आवश्यक असतांना तो दि.2/3/2016 रोजी केला आहे. त्यामुळे सदर भरणा एकुण 10 महिने उशिराने केला आहे. त्यामुळे सदर विलंब आकार मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम 1949 चे कलम 48 3(क) अन्वये 2% प्रतिमाह दंडाची रक्कम रु.3007/- वसुल करुन महापालिका निधीत भरणा करुन पुर्तता दर्शवावी.
वसुलपात्र रक्कम रु.3007/-

**2) मे.क्लियर पॉईट इलेक्ट्रॉनिक्स प्रा.लि. नोंदणी क्र. 63/189**

सदर कर निर्धारण प्रकरण सन 2012-13 चे सन 2015-16 मध्ये सादर केले आहे. सदर कर निर्धारण प्रकरणाची तपासणी केले असता सदर करदात्यास डिमांड नोटीस पत्र क्र. वविशम/स्था.स.कर/3892/ 2015-16 दि.10/3/2016 अन्वये बजावण्यात आली आहे. सदर करदात्यास मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम 1949 चे कलम 48 (6) नुसार रक्कम रु.5000/- इतके अधिक नसेल एवढा दंड आकारणे आवश्यक असतांना रु.1000/- दंड आकारला आहे तेव्हा कमी आकारणी केलेला दंड रु.4000/- संबधित करदात्याकडुन वसुल करुन महापालिका निधीत भरणा करुन पुर्तता दर्शवावी.
वसुलपात्र रु.4000/-

**3) मे.शार्प कोट नोंदणी क्र. 28/627**

सदर करदात्याने सन 2012-13 चे ॲसेसमेंट सन 2015-16 मध्ये सादर केले असुन सदर कर निर्धारण धारिकेची तपासणी केली असता करदात्यास डिमांड नोटीस क्र.वविशम/स्था.स.कर/3883/2015-16 दि.10/3/2016 अन्वये रु.5719/- एवढा कर देय ठरविला आहे. पुर्ण नस्तीची तपासणी केली असता सदर नोटीसी प्रमाणे रु.5719/- कर महापालिका निधीत जमा केल्याचे चलन लेखा परिक्षणात उपलब्ध झाले नाही. तेव्हा सदर रक्कम रु. 5719/- महापालिका निधीत जमा केल्याबाबत चलनाची प्रत लेखा परिक्षणास उपलब्ध करुन दयावी.

आक्षेपाधिन रक्कम रु.5719/-

उपरोक्त आक्षेपाबाबत अर्धसमास पत्र क्रं. 118 दि. 08/05/2019 अन्वये संबंधित विभागास कळविण्यात आले होते, तथापि अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATPGWM6201 (Ref No : 78, Hmm No : 118)

## *81 भाडे तत्वावर यंत्रसामुग्री पुरविण्यांत आलेल्या देयकांचे प्रदानामधील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 6**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 5114500.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 5114500.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 409160.00/-

***स्वीकृत निविदेतील अट क्रं. 5 अन्वये अनधिकृत बांधकामे निष्काशित करतांना प्रत्येक प्रसंगाचे फोटो घेऊन देयकासोबत सादर करणे बंधनकारक असतांना तशी कार्यवाही न करताच देयक प्रदान,वाहनांचे लॉगबुक नस्तीवर उपलब्ध नसणे,वाहनांचे आरटीओ नोंदणीबाबत आवश्यक परवाने नस्तीवर उपलब्ध नसणे, जड वाहने यंत्रसामुग्री वापर दैनंदिनी नस्तीवर उपलब्ध नसणे, आयकर अधिनियम 1960 चे कलम 194 जे नुसार तांत्रिक सेवा पुरविल्याबाबत रु.409160/- कमी आयकर वसुली यंत्र सामुग्री कोठून कोठे शिफट केली याबाबतचा तपशील उपलब्ध नसणे इ.***

वसई विरार शहर महानगापालिकेस सन 2015-16 मध्ये या वित्तीय वर्षात आवश्यकते

नुसार जड वाहने , यंत्रसामुग्री भाडे तत्वावर घेण्यास सर्वसाधारण सभा ठराव क्र .31 दि.16/2/2015 अन्वये प्रशासकीय मान्यता घेवुन दि .4/3/15 रोजी दै.वार्ताहर व दै.खबरे आजतक हया वृत्तपत्रा मध्ये जाहीरात निविदा सुचना प्रसिध्द करुन कद .16/3/15 पर्यत निविदा मागविण्यांत आल्या होत्या दिलेल्या मुदतीत प्राप्त 3 निविदा पैकी सर्वात कमी दराच्या निविदेय मा .स्थायी समिती सभा दि.6/4/2015 ठराव क्र.56 अन्वये मान्यता देण्यांत आली असुन महापालिकेने आवश्यकतेप्र माणे जड वाहने यंत्र सामुग्री पुरविणे बाबत सर्वात कमी दर स्वीकृत निविदा धारक मे .बी.ए.ट्रेडर्स यांना कार्यादेश देण्यांत आल्या प्रमाणे खालील प्रमाणे खर्च नोंदविला आहे.

| अक्र | प्रमाणक क्रं.व दिनांक | कालावधी | कार्यादेश संदर्भ | वापरलेल्या वाहनांचा प्रकार | प्रत्यक्ष वापर | कामाचे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 5866 31/3/2016 | 1/12/2015 ते 31/12/2015 | कार्यादेश दि.31/10/15 वविशम/वाहन/314/15 | एक्सवेटर 30 टन क्षमतेचा (ब्रेकरसह) | 137 तास × 4900 प्रति तास | 671300 |
| | | | | 30 ×76 (पॉवर क्षमतेचा) बॅकहो लोडर) | 151 तास × 1200 प्रतितास | 181200 |
| | | | | टॅक्टर माउंटेड 30 मीटर होज पाईप व ब्रेकरसह | 2 दिवस × 13000 प्रतिदिन | 26000 |
| | | | | शिफ्टींग चार्जे | 57× 45000 प्रति फेरा | 765000 |
| | | | | | | 1643500 |
| 2 | 5865 31/3/2016 | 3/11/15 ते 31/11/15 | | बांधकाम विस्थापनासाठी | 65×4900 | 318500 |
| | | | | बॅकहो लोडर | 56×1200 | 67200 |
| | | | | ट्रॅक्टर माऊंटेड | 7×13000 | 91000 |
| | | | | शिफ्टींग चार्जे | 5×45000 | 225000 |
| | | | 5फेऱ्या ट्रेलर ने/आण बाबत तपशील नाही | | | 701000 |
| 3 | 5864 31/3/2016 | 4/9/15 ते 30/9/15 | कार्यादेश वविशम/वाहन 214 दि.31/8/15 | एक्सवेटर 30 टन क्षमतेचा | 214×4900 | 1048600 |
| | | | | बॅकहो लोडर | 46.30×1200 | 55800 |
| | | | | ट्रॅक्टर माऊंटेड | 6×13000 | 78000 |
| | | | | शिफ्टींग चार्जे | 9×45000 | 405000 |
| | | | | | | 1587400 |
| | | | मे.बाबा कन्स्ट्रक्शनस | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | नालासोपारा 2013-14 चे मुदतवाढ दरांना दरानुसार प्रदान | | | |
| 4 | 5863 31/3/2016 | 1/4/2015 ते 34/5/2015 | कार्यादेश ववशिम/वाहन 16 दि.8/4/2013 | बॅकहो लोडर | 25×1200 | 30000 |
| | | | | | 1×12000 | 12000 |
| | | | | एक्सवेटर 30 टन क्षमतेचा | 16×4900 | 78400 |
| | | | | शिफ्टींग चार्जे | शिफ्टींग 2×60000 | 120000 |
| | | | | | | 240000 |

बाबा कन्स्ट्रक्शन

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 5862 31/3/2016 | | कार्यादेश ववशिम/वाहन 272/14 दि.27/10/2014 | 3 ×76 हॉर्स पॉवर क्षमतेचा बॅकहो लेडर | 648 तास ×1200 | 777600 |
| | | | | 2 ब्रास क्षमतेचा डंपर | 30 दिवस × 5500 | 165000 |
| | | | | | | 942600 |
| | | | कालावधी 1/11/14 ते 31/1/15 या कालावधीसाठी पुरवठा | | | |

महापालिकेमार्फत सदर जड वाहने व यंत्र सामुग्री भाडयावर उपलब्ध करुन घेवुन अनधिकृत बांधकामे निषकासनाच्या कार्यवाहीसाठी वापरण्यात आली असुन त्यावर एकुण 5114500/- एवढा वरील प्रमाणे खर्च केला आहे त्याबाबत खालील प्रमाणे आक्षेप नोदविण्यात येत आहेत.

1. स्वीकृत निविदेच्या करारनामा अ .क्र.5 अन्वये अनधिकृत बांधकाम निष्काशित करतेवेळी सदर कामाचे स्वखर्चाने प्रत्येक दिवशी किमान चार फोटो काढावे लागतील सदर फोटो प्रिंट मध्ये खाली तारीख वेळ स्पष्टपणे येईल अशी कॅमेरातुन फोटो काढणे बंधनकारक आहे . दुतर्फा शिफ्टींग वेळचे दोन फो टो तोड कार्यवाही सुरु करतांना व एक तोड कार्यवाही संपल्यानंतर एक असे त्या त्या दिवसांची तारीख व वेळ प्रिंट मध्ये दिसणारे एकुण 4 फोटो प्रत्येक दिवसांचे देयकाबरोबर सादर करणे बंधनकारक राहील सदरचे फोटो देयकासोबत सादर केल्यानंतर देयक अदा करणेत येईल अशी तरतुद असतांना तशा प्रकारची कोणतीही कार्यवाही न करताच देयके अदा करण्यात आली आहेत . त्यामुळे ज्या कारणासाठी यंत्र सामुग्री जड वाहने वापरली आहेत त्याबाबत वापर झाल्याची लेखापरिक्षणात

खात्री करता आली नाही व तशा प्रकारची कार्यवाही न करताच नियमबाहय प्रदान झाले आहे.

2. वाहने / जड वाहने / यंत्र सामुग्री वापरा बाबतचे कोणतेही लॉगबुक लेखापरिक्षणात उपलब्ध झाले नाहीत त्यामुळे प्रदान करण्यांत आलेले मूल्याबाबत लेखापरिक्षणात खात्री करता आली नाही.

3. वापरण्यांत आलेल्या जड वाहने /यंत्र सामुग्रीचे RTO नोंदणी बाबत व आवश्यक परवाने असले बाबत लेखा परिक्षणात कोणतेही कागदपत्रे आढळुन आले नाहीत

4. स्वीकृत करारनाम्या नुसार सर्व जड वाहने / यंत्र सामुग्री यांचे वापर दैनंदिनी नोंदवही ठेवणे बंधनकारक असतांना तशी नोंदवही लेखापरिक्षणात आढळुन आले नाही , त्यामूळे प्रती तास/दिन वापर तपासता आला नाही.

5. कंत्राटदारने सदर सेवा महापालिकेस पुरविल्या असल्याने त्यांचे देयकाचे प्रदानातुन भारतीय आयकर अधिनियम 1960 मधील कलम 194 जे नुसार तांत्रिक सेवा दिल्याने 10% आयकर कपात करणे आवश्यक असतांना फक्त 2% आयकर कपात केली आहे तेव्हा त्यांचे कडुन उर्वरि त 8% आयकर रु.409160/- वसुल करुन शासन भरणा करुन पुर्तता दर्शवावी.

6. पुरवठा आदेश 8/4/2013 चे असतांना यंत्रसामुग्री 1/4/15 ते 28/4/2015 या कालावधीत कशी पुरवली. याबाबत खुलासा आवश्यक आहे . शिफटींग यंत्रसामुग्री कोठून कोठे केली याबाबतचा तपशील देयकासोबत जोड णे आवश्यक असतांना तो आढळून आला नसल्याने त्याबाबत झालेल्या प्रदानाची लेखापरिक्षणास खात्री पटत नाही.

वरील प्रमाणे केलेल्या खर्चा बाबत आवश्यकते लेखे लेखापरिक्षणात देयकासोबत जोडलेले दिसुन येत नसल्याने सदर बाबतीत झालेला खर्च रु.5114500/- तात्पुरता अमान्य करण्यात येत आहे.
तात्पुरता अमान्य खर्च रु.5114500/-
वसुलपात्र रु. 409160/-

उपरोक्त आक्षेपाबाबत अर्धसमास पत्र क्रं . 120 दि. 09/05/2019 अन्वये संबंधित विभागास कळविण्यात आले होते, तथापि अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATPGWM6201 (Ref No : 79, Hmm No : 120)

## *82 जाहिरात प्रसिध्दीसाठी घेण्यात आलेल्या परिवहन बसेस व बसथांबे यांच्या भाडयाची रक्कम अदा करण्यामधील अनियमितता.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**
**No. of Irregularities: 4**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

आक्षेपाधीन रक्कम रु. 1574616.00/-

| |
|---|
| ***बसेसवर व बस स्टॉपवर कोणकोणत्या जाहीराती प्रसिध्द केल्या याबाबतची नोंदवही अगर अहवाल नस्तीवर*** |

***उपलब्ध नसणे,अट क्रं.29 मधील तरतुदीनुसार ऑपरेटरने महापालिकेस किती जाहीरात कर जमा केला याबाबतचा अहवाल नस्तीवर उपलब्ध नसणे,बसेसच्या रॉयल्टीची रक्कम कमी असतांना मोठया प्रमाणावर बस जाहीरातीचे भाडे प्रदान करणे व्यवहार्य आढळत नाही,इतर प्रदानाचेही या धर्तीवर तपासणी करणे आवश्यक इ.***

वसई विरार शहर महापालिका हद्दीत मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम 1949 चे कलम 66(20) नुसार वसई विरार शहर महापालिकेच्या स्थायी समिती ठराव क्रं. 430 दि. 3/8/2012 च्या निर्णयानुसार वसई विरार शहर महापालिकेने प्राप्त झालेल्या अधिकाराप्रमाणे BOOM (Buy,Own, Operate & Maintain ) तत्वावर रॉयल्टी बेसीसवर शहर बस वाहतूक सुरु करण्यासाठी मे. भगीरथी ट्रान्स कार्पोरेशन प्रा. लि. यांना दिनांक 8/8/2012 रोजी करारबध्द केले आहे. करारनाम्यातील अट क्रं. 29 अन्वये शहरातील शक्य असेल त्या ठिकाणी बस थांब्यावर योग्य डिझायनचे निवारे बांधण्याचे काम स्वखर्चाने बस ऑपरेटर यांना करावे लागेल, बस, बॉडी, बस डेपो, बस टर्मिनल व बस थांब्याच्या निवा-यावरील दिल्या जाणा-या जाहीरातीचे सर्व प्रकारचे हक्क बस ऑपरेटर यांचे राहतील व बस ऑपरेटर यांना आवश्यकता वाटल्यास बस थांब्याच्या निवा-याजागी प्रायोजक नेमू शकतात तथापी जाहीरात कराची रक्कम बस ऑपरेटर यांना महापालिकेकडे वेळोवेळी भरणा करणे बंधनकारक राहील. बसेसच्या बाहेरील मागील बाजूस 50% क्षेत्र जनहिताच्या दृष्टीकोनातून मनपातर्फे वेळोवेळी देण्यात येणा-या जाहीरातीसाठी वसई विरार शहर महापालिकेच्या मागणीनुसार नि:शुल्क उपलब्ध करुन दयावे लागेल, उर्वरीत क्षेत्र बस ऑपरेटर यांचेकडे जाहीरातीसाठी उपलब्ध राहील. महापालिकेने जाहीरात प्रसिध्दीस घेण्यात आलेल्या परिवहन बसेस व बसथांबे यांच्या भाडयाची रक्कम खालील दराने अदा केली आहे.

बसेससाठी मंजूर दर

| अ.क्रं. | बस प्रकार | बस संख्या | जाहीरात दर |
|---|---|---|---|
| 1 | मोठी बस | 44 | रु.14000/- प्रतिमहा प्रति बस. |
| 2 | मिनी बस | 75 | रु.11000/- प्रतिमहा प्रति बस. |
| **बस स्टॉपसाठी मंजूर दर** | | | |
| अ.क्रं. | बस स्टॉप संख्या | जाहीरात दर | |
| 1 | 114 | रु.2000/- प्रति माह प्रति बसस्टॉप | |

त्याबाबत खालील आक्षेप नोंदविण्यात येत आहेत.

1. उपरोकत बाबीवर प्रमाणक क्रं. 5976 दि. 31/3/2016 नुसार माहे माहे फेब्रुवारी 2016 चे देयक रु.1381242/- अधिक 14% सेवाकरासहित रु.1574616/- प्रदान केले आहे महापालिकेने कालावधीत 119 बसेसवर व 114 बस स्टॉपवर कोणकोणत्या जाहीराती प्रसिध्द केल्या त्याबाबतचा तपशील सादर करुन देयक अदा करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केली नसल्याचे लेखापरिक्षणास आढळून येते, तसेच अशा प्रकारच्या नोंदवहया अगर अहवाल लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाहीत. त्यामुळे केलेले प्रदान लेखापरिक्षणांत मान्य करता येत नाही किंवा सदर प्रदानाच्या पुष्ठयर्थ सदर कालावधीमध्ये देण्यात आलेल्या जाहीरातीचा सविस्तर तपशील सादर करुन पुर्तता

दर्शवावी.

2. दि. 8/8/2012 च्या करारनाम्यातील अट क्रं. 29 मधील तपशीलानुसार कंत्राटदाराने / बस ऑपरेटरने महापालिकेस किती जाहीरात कर जमा केला याबाबत कोणतीही माहिती अगर लेखे लेखापरिक्षणात उपलब्ध झाले नाहीत, त्यामुळे जाहीरात करापोटी महापालिकेस कोणतेही ठोस उत्पन्न मिळत नसतांना महापालिकेने बस ऑपरेटर यांना जाहीरातीचे बाबत वरीलप्रमाणे भाडे प्रदान करणे व्यवहार्य ठरत नाही.

3. महापालिकेने BOOM अंतर्गत बसेसच्या रॉयल्टीची रक्कम सर्वसाधारण बस साठी रु.1000/- प्रति वर्ष व ए.सी. बस साठी रु.2500/- प्रति वर्ष ठरविण्यात आली असून त्याच बसेसाठी जाहीरातीचे भाडे प्रति बस मोठीसाठी रु.14000/- व रु.11000/- मिनी बससाठी प्रतिमाह प्रदान केले आहे ते प्रदान करतांना कोणतेही आर्थिक निकष अथवा व्यवहार्यता पडताळणी न करताच केवळ कंत्राटदारास फायदा होईल अशा उद्देशाने प्रदान केल्याचे लेखापरिक्षणात दिसून येते याबाबत साधार स्पष्टता व्हावी.

4. सन 20015-16 मध्ये अशा प्रकारचे इतर महिन्यामध्ये झालेल्या प्रदानाबाबता वरीलप्रमाणे पूर्तता करणे आवश्यक असून ते प्रदानही लेखा परिक्षणात मान्य करता येत नाही, त्याबाबत साधार खुलासा व्हावा.

तात्पुरता अमान्य खर्च रु.1574616/-

उपरोक्त आक्षेपाबाबत अर्धसमास पत्र क्रं. 121 दि. 09/05/2019 अन्वये संबंधित विभागास कळविण्यात आले होते, तथापि अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

DATPGWM6201 (Ref No : 80, Hmm No : 121)

## *83 राज्य शासनाच्या पोलीस विभागाकडून रु. 9.09 लक्ष इतक्या मालमत्ता कराची वसूली न केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

वसूलपात्र रक्कम रु. 909000.00/-

| |
|---|
| ***शासकीय विभागाकडून मालमत्ता कराची वसुली न करणे इ.*** |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 चे कलम 133 (1) नुसार शासन प्रतिवर्षी महानगरपालिकेस निहित असलेल्या इमारतींना च जमीनींना कलम 132, पोटकलम (1), खंड (क) अन्वये

ज्यापासून सूट देण्यात आली आहे अशा सामान्य कराच्या ऐवजी पोट कलम (2) व (3) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने निश्चित केलेली रक्कम प्रत्येक वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या 30 तारखेपर्यंत देय असलेल्या दोन सहामाही हप्त्यांमध्ये देईल.

महालेखापाल कार्यालयाकडून करण्यात आलेल्या लेखापरिक्षणावेळी असे निदर्शनास आले की, राज्य शासनाच्या पोलीस विभागाच्या 24 मालमत्तांच्या बाबतीत रु. 9.09 लक्ष इतकी करायी येणे बाकी असुन, सदरची रक्कम ही उदाहरणादाखल असून महापालिका हद्दीत असलेल्या शासनाच्या इतरही मालमत्तांच्या बाबतीत प्रस्तुत कर आकारणी करुन वसुली करणे आवश्यक आहे.

उपरोक्त बाबतीत महालेखापाल कार्यालयाचा अहवाल क्रं. स्थानिक निकाय III & IV / आय.आर.नं.679/फा.नं.1119/120, दि.23/05/2017 पार्ट बी मधील परिच्छेद 4 नुसार संबधित विभागास विचारणा करण्यात आली होती, तरी उपरोक्त बाबतचा प्रगती अहवाल लेखापरिक्षणास सादर करण्यात यावा.

उपरोक्त आक्षेपाबाबत अर्धसमास पत्र क्रं. 123 दि. 09/05/2019 अन्वये संबंधित विभागास कळविण्यात आले होते, तथापी अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

RTNPRSM6901 (Ref No : 81, Hmm No : 123)

## *84 प्रजनन व बालआरोग्य योजना तसेच राष्ट्रीय शहरी आरोग्य योजनेअंतर्गत प्राप्त अनुदानाचा वापर न केल्याबाबत...*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 67974000.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 58134000.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 58134000.00/-

| ***विविध आरोग्य योजनेअंतर्गत प्राप्त शासकीय अनुदानाचा वापर न करणे इ.*** |
|---|

महालेखापाल कार्यालयाच्या तपासणी अहवालानुसार वसई विरार शहर महापालिकेच्या एकात्मिक आरोग्य & कुटुंब कल्याण विभागास प्रजनन व बालआरोग्य योजनेअंतर्गत सन 2011-12 मध्ये एकूण रु.142.42 लक्ष इतके अनुदान प्राप्त झाले होते, त्यापैकी सन 2011-12 व सन 2015-16 या वर्षात सदर याजनेवर रु.93.01 लक्ष इतका खर्च करण्यात आला व उर्वरीत रक्कम रु. 49.41

लक्ष इतकी रक्कम सन 2011-12 पासून अखर्चित असल्याचे दिसून येते.

तसेच सन 2014-15 व सन 2015-16 या आर्थिक वर्षात अनुक्रमे राष्ट्रीय शहरी आरोग्य योजने अंतर्गत अनुक्रमे रु. 164.72 लक्ष व रु. 372.60 लक्ष इतकी रक्कम प्राप्त झाली व त्यापैकी सन 2014-15 व सन 2015-16 या आर्थिक वर्षात अनुक्रमे रु. 4.39 व रु.1.00 लक्ष इतकी रक्कम खर्च केल्याचे दिसून येते. यावरुन रु. 531.93 लक्ष इतकी रक्कम अखर्चित असल्याचे दिसून येते.

यावरुन शासनाने ज्या योजना राबविण्यासाठी निधी उपलब्ध करुन दिला त्या योजनांवर खर्च न केल्यामुळे शासनाचा उद्देश सफल झाला नसल्याचे दिसून येते व उपरोक्त प्राप्त निधीची रक्कम महापालिका खर्च करु न शकल्यामुळे शासनास परत करणे आवश्यक होते, परंतु सदरचा निधी महापालिकेने उत्पन्नाचा स्त्रोत समजुन मुदत ठेवी मध्ये गुंतवणूक केल्याचे दिसून येते तेंव्हा प्राप्त व्याजासह रक्कम शासन खाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

उपरोक्त बाबतीत महालेखापाल कार्यालयाचा अहवाल क्रं. स्थानिक निकाय III & IV / आय.आर.नं.672/फा.नं.1112/68, दि.11/05/2017 पार्ट बी मधील परिच्छेद 5 नुसार संबधित विभागाकडून माहिती मागविण्यात आली होती, तरी प्रस्तुत आक्षेपाच्या अनुषंगाने प्रगती अहवाल लेखापरिक्षणास सादर करण्यात यावा.

वसुलपात्र रक्कम रु. 58134000/-

उपरोक्त आक्षेपाबाबत अर्धसमास पत्र क्रं . 127 दि. 09/05/2019 अन्वये संबंधित विभागास कळविण्यात आले होते, तथापि अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

RTNPRSM6901 (Ref No : 82, Hmm No : 127)

## *85 सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमा अंतर्गत प्राप्त् अनुदानाचा वापर न केल्याबाबत.*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 1**

*लेखा शीर्ष :00 शासन निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

गुंतलेली रक्कम रु. 7687148.00 /- आक्षेपाधीन रक्कम रु. 3173138.00/-

वसूलपात्र रक्कम रु. 3173138.00/-

***सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमा अंतर्गत प्राप्त अनुदानाचा वापर न करणे इ.***

सन 2014-15 व 2015-16 या आर्थिक वर्षात सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण उपक्रमा अंतर्गत महापालिका कार्यक्षेत्रात योजना चांगल्याप्रकारे राबविणे व क्षयरोगाचे समूळ उच्चाटन करणे यासाठी वसई विरार शहर महापालिकेस अनुक्रमे रु. 2742700/- व रु. 4944448/- इतके अनुदान प्राप्त झाले होते.

प्रस्तुत उपक्रमासंबंधीचे अभिलेख तपासतांना असे निदर्शनास आले की, सन 2014-15 व 2015-16 या कालावधीसाठी प्राप्त अनुदानापैकी अनुक्रमे रु. 837008/- आणि रु. 2336130/- इतकी रक्कम विनाखर्च तशीच पडून असल्याचे दिसून येते. यावरुन सदर योजनेवर खर्च न केल्यामुळे सदर उपक्रम परिणामकारकरित्या राबविला गेला नसल्याने सदर योजनेचा तसेच शासनाचा उद्देश सफल झाला नसल्याचे दिसून येते व उपरोक्त प्राप्त निधीची रक्कम महापालिका खर्च करु न शकल्यामुळे शासनास परत करणे आवश्यक होते, परंतु सदरचा निधी महापालिकेने उत्पन्नाचा स्त्रोत समजुन मुदत ठेवी मध्ये गुंतवणूक केल्याचे दिसून येते तेंव्हा प्राप्त व्याजासह रक्कम शासन खाती भरणा करुन अनुपालन दर्शवावे.

उपरोक्त बाबतीत महालेखापाल कार्यालयाचा अहवाल क्रं. स्थानिक निकाय III & IV / आय.आर.नं.672/फा.नं.1112/68, दि.11/05/2017 पार्ट बी मधील परिच्छेद 6 नुसार संबधित विभागाकडून माहिती मागविण्यात आली होती, तरी प्रस्तुत आक्षेपाच्या अनुषंगाने प्रगती अहवाल लेखापरिक्षणास सादर करण्यात यावा.

वसुलपात्र रक्कम रु. 3173138

उपरोक्त आक्षेपाबाबत अर्धसमास पत्र क्रं . 126 दि. 15/05/2019 अन्वये संबंधित विभागास कळविण्यात आले होते, तथापि अनुपालन अप्राप्त असल्याने परिच्छेद कायम करण्यात येत आहे.

RTNPRSM6901 (Ref No : 83, Hmm No : 126)

## *86 नवघर माणिकपुर विभागीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तकातील त्रुटीबाबत*

**लेखापरीक्षण वर्ष : 2015-2016**

**No. of Irregularities: 3**

*लेखा शीर्ष :00 महानगरपालिका स्व- निधी*

*अनियमितता कलम : 9ड*

***महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 अतंर्गत सेवा निवृत्ती विषयक लाभांचे बाबत नामनिर्देशन पत्रे घेण्यात आली नाहीत, वेतन निश्चितीच्या नोंदी प्रमाणित नाहीत.***

सन 2015-16 मध्ये नवघर माणिकपुर विभागीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे सेवा पुस्ताकांची पडताळणी केली असता खालील त्रुटी आढळुन येतात.

1. श्री. थॉमस विक्टर रॉड्रीक्स वरिष्ठ लिपीक - श्री.थॉमस यांची शैक्षणिक पात्रता कोणत्या प्रमाणपत्रावरुन पडताळणी केली आहे याबाबत कार्यालय प्रमुखांनी पडताळणीची नोंद करणे आवश्यक आहे सेवेत नियुक्ती करण्यात आल्या नंतर चारित्र्य पडताळणी करण्यात आली नाही ,ती करुन त्याबाबत सेवा पुस्तकात नोंद घ्यावी . श्री थॉमस यांना दि .2/7/1983 रोजी शिपाई कम लिपीक या पदावर हंगामी नेमणुक दिली आहे . त्यांना 11/8/1985 च्या ठराव क्र. 20 अन्वये मुंबई ग्रामपंचात अधिनियम 1960 चे कलम 61 अन्वये नियमित केल्याचे दिसुन येत आहे . तेव्हा त्याची सेवा नियमित करतांना शासकीय सेवा प्रवेश नियमाची पुर्तता करण्यात आली आहे किवा कशी याबाबत आढावा घेतल्याचे दिसुन येत नाही सर्व सेवा प्रवेश व अटीची पुर्तता केल्याबाबत लेखा परिक्षणात खात्री पटवावी. दि.1/2/1991 व दि .1/81992 रोजी वेतन निश्चित करण्यात आलेल्या वेतन निश्चिती आदेशाची प्रत लेखापरिक्षणात उपलब्ध झाली नाही त्यामुळे निश्चित केलेल वेतन तपासता आले नाही. दि.1/8/2004 रोजी कालबद्द्ध पदोन्नोती च्या सेवा पुसतकातील नोंदीवर कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी नसताना लाभ कसा मंजुर केला या बाबत खुलासा करावा . दि.1/7/2015 रोजी मंजुर केलेल्या वेतन वाढी आदेशावर कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी नसल्याने लाभ अनुज्ञेय ठरत नाही पुर्तता दर्शवावी.

2. खालील कर्मचाऱ्यांच्या बाबतीत महाराष्ट्र नागरी सेवा नियम 1981 अतंर्गत सेवा निवृत्ती विषयक लाभांचे बाबत नामनिर्देशन पत्र घेवुन ती स्विकृत करुन सेवा पुस्तकात नोंदी घेण्यात येवुन अनुपालन दर्शविण्यात यावी. सर्व वेतन निश्चितीचे आदेशाच्या प्रती सेवा पुस्तकात अ तंर्भुत करण्यात याव्यात. कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी करण्यात येवुन त्याप्रमाणे सेवा पुस्तकात नोंदी घेवुन पुर्तता दर्शवावी. वेतन निश्चितीच्या घेतलेल्या नोंदी कार्यालय प्रमुख यांनी साक्षांकित केलेल्या नाहीत पुर्तता दर्शवावी.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | पद |
|---|---|---|
